# तुमची वित्तीय क्रांति

## तरतुदीचे सामर्थ्य

**गॅरी कीसी**

REVOLUTION

ख्रिस्तामध्ये प्रिय मित्र,

आमची प्रार्थना आहे की हे शिक्षण संसाधन तुमच्यासाठी आशीर्वाद आणि प्रोत्साहन मिळण्यास लाभदायक होईल! कृपया ही सामग्री आपले मित्र, कुटुंब आणि आपल्या चर्चमधील सदस्यां सोबत सामायिक करण्यास संकोच करू नका. याव्यतिरिक्त, **FLNFree.com** वर जाऊन अतिरिक्त प्रती डाउनलोड करा आणि तुमच्या भाषेतील इतर विनामूल्य धडे प्राप्त करु शकता.

देव तुमच्यावर प्रेम करतो आणि त्याच्या जवळ तुमच्या जीवनासाठी एक अद्भुत योजना आहे! देवाचे राज्य कसे कार्य करते हे जाणून घेतल्याने आमचे जीवन अधिक उत्तम झाले आहे आणि आम्हाला खात्री आहे की ते तुमच्या जीवनात देखील असेच कार्य करेल!

ख्रिस्तामध्ये प्रेमाने,

गॅरी आणि ड्रेंडा कीसी



P.S. तुमच्या भाषेतील अधिक मोफत धडे डाउनलोड करण्यासाठी आमच्या मोफत डाउनलोड वेबसाइट **FLNFree.com** ला भेट द्यायला विसरू नका!

# तुमची वित्तीय क्रांति

## तरतुदीचे सामर्थ्य

REVOLUTION

गॅरी कीसी

*Your Financial Revolution: The Power of Provision, Marathi*
Copyright © 2025 by Gary Keesee

Originally published in English
Copyright © 2020 by Gary Keesee
ISBN: 978-1-945930-39-3

Gary Keesee Ministries,
P.O. Box 779, New Albany,
OH 43054, USA

GaryKeesee.com

This book is a FREE GIFT
from Gary Keesee Ministries and is
NOT FOR SALE

Printed in India

***तुमची वित्तीय क्रांति: तरतुदीचे सामर्थ्य, मराठी***
कोपीराइट © 2025 द्वारा गैरी किसी

मूलतः अंग्रेजी भाषा में प्रकाशित
कोपीराइट © 2020 द्वारा गैरी किसी
ISBN: 978-1-945930-39-3

गैरी किसी मिनिस्ट्रीज,

पी.ओ. बॉक्स 779, न्यु अल्बेनी,
ओएच 43054, युएसए

GaryKeesee.com

हे पुस्त क गॅरी कीसी मिन स्ट्रिीज कडून विनामूल्य भेट आहे
आणि विक्रीसाठी नाही

भारत में मुद्रित

# विषय सूची

**परिचय** . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . .7

**अध्याय 1:** प्रकाश अंधारात चमकतो . . . . . . . . . . . . . . . . . . . . 23

**अध्याय 2:** विचार करण्याची एक नवीन पद्धत . . . . . . . . . . . . . . . . . 41

**अध्याय 3:** अधिकार क्षेत्राचा मुद्दा . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . 61

**अध्याय 4:** तुम्हाला आठवत नाही का? . . . . . . . . . . . . . . . . . . . 93

**अध्याय 5:** तुमच्या तरतुदीला सक्षम बनवणे . . . . . . . . . . . . . . . . . 113

**अध्याय 6:** विश्वास ही गुरुकिल्ली आहे . . . . . . . . . . . . . . . . . . . 145

**अध्याय 7:** चेतावणी: तुमच्या विकसित विश्वासात राहा! . . . . . . . . . . . . 165

**अध्याय 8:** तुम्हाला योजनेची आवश्यकता आहे! . . . . . . . . . . . . . . . . 185

**अध्याय 9:**आता जाण्याची वेळ आली आहे! . . . . . . . . . . . . . . . . . 201

# परिचय

या पुस्तकाचे शीर्षक कदाचित एक साधेसुधे, वस्तुस्थितीचे स्पष्ट विधान आहे असे वाटेल. म्हणजे, त्याची योग्यता कोण सांगेल? मला वाटते की आपण सर्वजण सहमत असू की जीवनात आपल्याला आवश्यक असलेल्या गोष्टींसाठी तरतूद असणे आवश्यक आहे. तरीही अनेकांना आवश्यक असलेली तरतूद त्यांच्याकडे नसते. खरं तर, बरेच जण जगण्यासाठी पुरेसे मिळावे यासाठी संघर्ष करत आहेत. ते बिल भरणे आणि कर्जाच्या गुलामगिरीत जीवन जगतात ज्याचा 'काही अंत नाही' असे दिसते. त्यांची स्वप्ने जगण्याऐवजी, ते निराशेच्या स्थितीत जगत आहेत, त्यांना आवडत नसलेल्या नोकरीत जाण्याच्या भीतीने ग्रस्त आहेत, आणि सर्वात वाईट म्हणजे, ते कोणत्याही अर्थपूर्ण उद्देशाशिवाय जगत आहेत.

अलिकडच्या एका अभ्यासात असे म्हटले आहे की 48% अमेरिकन लोक दरवर्षी $31,561 किंवा महिन्याला $2,630 किंवा त्यापेक्षा कमी पैसे कमवतात, आणि 40% लोक प्रथम नियोजन केल्याशिवाय $400 चा चेक लिहू शकत नाहीत.

पुढील पगार मिळेल ह्या आशेने आठवड्यामागून आठवडे, महिन्यामागून महिने, तुम्ही खर्च करत असलेल्या प्रत्येक पैशावर लक्ष ठेवावे लागते, याचा किती ताण असतो याची तुम्ही कल्पना करू शकता का? तुम्हाला असे आढळते की, पुढे जाण्याऐवजी, तुम्ही आणखी कर्जात बुडत आहात आणि त्यातून बाहेर पडण्याचा कोणताही मार्ग दिसत नाही. मी ते कल्पना करू शकतो, कारण मी नऊ वर्षे असेच जगलो; आणि ते माझे जीवन काल्पनिक नव्हते. ते अगदी वास्तविक होते.

## अभावाची लाज

माझे आणि माझी पत्नी, ड्रेंडा चे लग्न झाले आणि आम्ही एक अद्भुत जीवन सुरू करण्याची आशा बाळगली, परंतु आम्ही कर्जात बुडालो आणि आर्थिक ताणतणावात जगत होतो. काही वर्षांतच, बिल न भरल्या मुळे आमची 10 क्रेडिट कार्डे रद्द करण्यात आली;

28% व्याजदराचे तीन फायनान्स कंपन्यांची कर्जे आमच्यावर होते; दोन निकामी कारचे पेमेंट बाकी होते, दोन्ही कार चा 200,000 मैलांपेक्षा जास्त प्रवास झाला होता; आयआरएस परवाना; आणि इतर असंख्य कर्जे होती जी आम्ही फेडू शकत नव्हतो. आमच्या आई-वडीलां कडून घेतलेले हजारो डॉलर्स देणे बाकी होते त्यामुळे त्यांनी आम्हाला पैसे देणे बंद केले.

आम्ही कर्ज घेऊन आमचे जीवन उद्ध्वस्त करायला निघालो होतो असे नाही; पण आम्ही फक्त जगण्याचा प्रयत्न करत होतो. हे कितीही वेडेपणाचे वाटले तरी, मी विमा कंपनीत काम करत असल्या मुळे, लोकांना आर्थिक क्षेत्रात त्यांच्या विमा आणि गुंतवणुकीच्या गरजा पूर्ण करण्यात मदत करत होतो. माझ्या कामातून मला 100% कमिशन आधारावर पैसे दिले जात होते, परंतु कमिशन कधीच पुरेसे नव्हते. आम्हाला आशा होती की व्यवसाय वाढेल, परंतु आठवडे आणि नंतर अनेक वर्ष निघून गेले पण काही बदलले नाही.

अखेर, नऊ वर्षे कर्जा खाली जीवन जगल्यानंतर, कुठूनही कर्ज घेण्याचा किंवा मिळू शकण्याच्या प्रत्येक मार्ग बंद झाला. आमच्या असलेल्या जवळजवळ सर्व मौल्यवान वस्तू आम्ही गहाण ठेवल्या आणि त्या आर्थिक कोंडीत जगण्याच्या ताणामुळे माझ्यावर आणि माझ्या कुटुंबावर गंभीर मानसिक परिणाम होऊ लागले.

मला पॅनिक अटॅक येऊ लागले आणि त्यामुळे मला अँटीडिप्रेसेंट्स देण्यात आले, ज्यांचा खरोखर काही फायदा झाला नाही परंतु गंभीर दुष्परिणाम नक्कीच झाले. माझ्या डॉक्टरांनी मला हे देखील सांगितले होते की रक्तातील वाढणाऱ्या साखरेच्या प्रमाणा मुळे मला मधुमेह होण्याची शक्यता आहे.

माझ्या वैद्यकीय समस्यांपेक्षाही वाईट म्हणजे भीतीने मला एवढे ग्रासले की मला घराबाहेर पडण्याचीही भीती वाटू लागली. माझे जग एका नरकमय, वेदनादायक भीतीने ग्रासून गेले होते ज्यामुळे मला अर्धांगवायू झाल्या सारखे वाटत होते! आम्ही नियमितपणे बिलं भरू शकत नव्हतो आणि दर महिन्याला हे ठरवण्याचा प्रयत्न करत होतो कि, ह्या महिन्यात आधी कोणते बिल भरायचे आणि पुढच्या महिन्यात कोणते बिल भरले तरी चालेल.

मला वाटतं की आम्ही ज्या आर्थिक गोंधळाच्या परिस्थितीत राहत होतो त्यातील सर्वात कमजोर करणारी गोष्ट म्हणजे मला वाटणारी लाज. क्रेडिट कार्ड वापरतांना मला

सतत भीती वाटत असायची, आणि मनात उगाच एक आशा वाटायची की ते ह्या एका वेळेस चालेल आणि माझे काम भागेल. मी सतत सबबी शोधत असे, बिलांचे पैसे मागणाऱ्या लोकांसोबत मी खोटे बोलायचो, ते जवळजवळ दररोज फोन करायचे. माझ्यासाठी जे सहन करणे सर्वात कठीण होते ते म्हणजे माझ्या सुंदर कुटुंबाला आवश्यक असलेल्या गोष्टींशिवाय काम भागवतांना पाहणे, ज्यामुळे माझ्या आत्म्यात वेदना होत होत्या. खरे सांगायचे तर, दररोज समस्या सोडविण्याचा प्रयत्न करत असतांना मला काही यशच येत नाही असे वाटायचे.

ही आर्थिक अराजकता रडारवरची एक छोटीशी घटना नव्हती, एका क्षणापुरती नव्हती. हे असे नऊ वर्षे चालू राहिले!

तुमच्या समोर हा प्रश्न असेल, तर उत्तर आहे, हो, आम्ही दर आठवड्याला चर्चमध्ये जायचो. माझ्याकडे माझे स्वतःचे बायबल होते, थिऑलॉजी आणि व्यवसाय ह्या विषयात पदवी होती आणि मी एक वर्ष बायबल शाळेत शिकलो होतो. पवित्र आत्म्याने माझा बाप्तिस्मा झाला होता आणि मी देवावर प्रेम करत होतो, पण काहीतरी भयंकर चूक होती. मला ते काळात होते, पण नेमकं काय ते समजत नव्हतं. बायबलमध्ये मी वाचत असलेल्या घटना प्रत्यक्ष जीवनात घडत नव्हत्या. आम्ही एका मोठ्या चर्चमध्ये जात होतो तिथे आम्हाला हे शिक्षण मिळाले की आपण समृद्ध व्हावे ही देवाची इच्छा आहे, पण मला ते घडतांना दिसत नव्हते. आणि ते का होत नाही हे मला कळले नाही. स्पष्टपणे सांगायचे तर, मी खरोखर माझ्या कोणत्याही मित्राला मोठ्या प्रमाणात समृद्ध होतांना पाहिले नाही.

## जागृतीचा इशारा

पैशांसाठी माझा पाठलाग करणाऱ्या अनेक वकिलांपैकी एका वकिलाने जेंव्हा मला पुन्हा फोन केला तेंव्हा तर सर्व काही शिगेला पोहोचले. यावेळी, तो अगदी खडसावून आणि स्पष्टपणे म्हणाला. "मिस्टर कीसी, माझ्या क्लायंटला तुम्ही जे $1,600 द्यायचे आहेत ते त्यांना देण्यासाठी माझ्या कडे तीन दिवसाच्या आत पाठवा, नाहीतर मला त्या रकमेसाठी तुमच्याविरुद्ध खटला दाखल करावा लागेल." एवढे बोलून त्यांनी लगेच फोन ठेवला.

मला समजून चुकलं की आता सगळं संपलं. काही आशा राहिली नाही. जिथून काही मदत मिळेल असं एकही ठिकाण उरलं नव्हतं. आमच्या जवळ पैसे नव्हते आणि अन्नही

नव्हतं. आमचा रेफ्रिजरेटर आमच्या बँक अकाउंटइतकाच रिकामा दिसत होता. मला सतत आशा वाटत होती की असा एक आठवडा येईल कि मला चांगले उत्पन्न मिळेल आणि आम्ही ह्या सर्व परिस्थिती मधून बाहेर येऊ, पण तो आठवडा कधीच आला नाही.

अत्यंत निराशेने, मी जुन्या फार्महाऊसमधील माझ्या छोट्या बेडरूममध्ये गेलो, जे आम्ही $300 महिन्याच्या भाड्याने घेतले होते. मला माहित होते की आपण अशा आर्थिक बंधनात राहावे ही देवाची इच्छा नव्हती, तरीही आमच्या जीवनात समृद्धीशिवाय इतर सर्व काही घडत होते. मी स्वतःला पलंगावर झोकून दिले आणि रडत देवाला हाक मारली.

आणि आश्चर्य म्हणजे, मी रडून त्याला विनंती करत असतांना, अचानक मला त्याचे उत्तर ऐकू आले. माझ्या आत्म्यात, मी हे शास्त्रवचन ऐकले:

> *माझा देव आपल्या संपत्त्यनुरूप तुमची सर्व गरज ख्रिस्त येशूच्या ठायी गौरवाच्या द्वारे पुरवील.*
>
> —फिलिप्पैकरांस पत्र 4:19 (NASB)

मी मोठ्याने म्हणालो, "मला ते वचन माहित आहे, पण मला ते माझ्या आयुष्यात दिसत नाही." मग मी पवित्र आत्म्याला असे म्हणताना ऐकले:

"तू ज्या भयानक अवस्थेत आहेस त्याच्याशी माझा काहीही संबंध नाही. तू ह्या अवस्थेत आहेस याचे कारण म्हणजे तुम्हाला माझे राज्य कसे चालते हे माहित नाही." तो मला पुढे म्हणाला की त्याचे लोक फारोच्या काळात इस्राएल जसे गुलाम म्हणून जगत होते तसेच जगत आहेत. तो म्हणाला, "माझी इच्छा आहे कि माझे लोक आर्थिकदृष्ट्या मुक्त असावेत!"

जरी मला राज्य म्हणजे काय हे खरोखरच समजले नाही, तरी मला हे नकीच समजले की तो हे सांगण्याचा प्रयत्न करत होता की कर्जबाजारी राहणे हे योग्य नाही आणि जगण्याचा एक उत्तम मार्ग आहे जो मी अजून पर्यंत शिकलो नव्हतो. तो काय आहे किंवा कसे कार्य करतो, मला माहित नव्हते, परंतु माझ्या हे लक्षात आले की मला तो शोधून काढाव लागेल.

मी वेळ न घालवता लगेच खाली गेलो आणि ड्रेंडाला म्हटले इथे बस. देवाने मला काय सांगितले होते ते मी तिला सांगितले आणि मला आठवते की मी तिच्या जवळ उभा राहून तिचा हात धरला होता आणि मी माझ्या कुटुंबाला ज्या ह्या भयानक परिस्थितीत टाकले

होते त्याबद्दल तिची क्षमा मागितली आणि देवाकडे पश्चात्ताप केला. त्याच ठिकाणी आम्ही दोघांनी निश्चय केला की देवाने ज्या राज्याचा उल्लेख केला त्याबद्दल त्याला काय म्हणायचे आहे ते आम्हाला समजले नाही, तरी त्या विषयी आम्ही अभ्यास करू आणि समजून घेण्याचा प्रयत्न करू. आम्ही निर्णय घेतला कि यापुढे आम्ही कर्ज घेऊन जीवन जगणार नाही- परंतु आम्ही देवाला म्हणालो, हे कसे करायचे हे आम्हाला माहित नाही. आम्ही प्रार्थना करत असताना, माझ्या ह्रदयात एक शांती आली आणि मला माहित होते की हे कसे करायचे हे देव आम्हाला त्याच्या पद्धतीने दाखवणार आहे.

पण 'राज्य' या शब्दा विषयी मी विचार करू लागलो, तो कशाबद्दल बोलत होता हे मला खरोखरच कळले नाही. मला माहित होते की मी मृत्यू नंतर नक्कीच स्वर्गात जाणार आहे, माझे बायबलचे बरेच प्रशिक्षण झाले आहे, परंतु तरीही मला त्याचा अर्थ काय हे माहित नव्हते. खरं तर, 'राज्य' हा शब्द मला फारसा माहित नव्हता. बायबलमध्ये त्याचा उल्लेख केवळ प्रभूच्या प्रार्थनेतच केलेला मला आठवत होता.

*तुझे राज्य येवो.जसे स्वर्गात तसे पृथ्वीवरही तुझ्या इच्छेप्रमाणे होवो.*

—मत्तय 6:10

त्यावेळी मला वाटले की भविष्यात येशू पृथ्वीवर कधीतरी जे राज्य स्थापन करणार आहे त्या विषयी तो हे बोलत आहे, पण तो  नेमकं काय सांगण्याचा प्रयत्न करत आहे ते मला कळत नव्हते. परंतु हे वचन पुन्हा काळजीपूर्वक वाचल्या नंतर मला कळले की मी चुकलो आहे. येशू आपल्याला आत्ता येथे पृथ्वीवर प्रार्थना कशी करावी हे सांगत होता. आपण पृथ्वीवर देवाच्या इच्छे प्रमाणे प्रार्थना करावी ही त्याची इच्छा आहे. पण देवाचे राज्य म्हणजे काय?

जर तुम्ही माझी मागील पुस्तके वाचली असतील, तर तुम्ही सरळ ह्या पुस्तकाच्या पहिल्या अध्यायाकडे जाऊ शकता, परंतु जेव्हा तुम्ही परीक्षेत उतरणार असाल तेंव्हा पुनरावलोकन करणे हे नेहमीच आवश्यक असते असे मला वाटते. तुमची परीक्षा म्हणजे, जीवनाचा खेळ, जो आधीच सुरू झाला आहे, परंतु काळजी करू नका. योग्य उत्तरे मिळविण्यासाठी आणि उत्तीर्ण होण्यासाठी अजून बराच वेळ आहे. परंतु जर तुम्ही हे पुस्तक पहिल्यांदाच वाचत असाल, तर पुढील भाग वाचणे टाळू नका तो महत्त्वाचा आहे!

## जगण्याचा एक नवीन मार्ग

जेव्हा देवाने मला सांगितले की त्याचे राज्य कसे कार्य करते हे मला कधीच समजण्याचा प्रयत्न केला नाही, तेव्हा मी गोंधळून गेलो आणि काय म्हणावे ते मला कळेना. त्याचा खरोखर काय अर्थ आहे हे ड्रेंडा ला आणि मला काहीच कळत नव्हते. आम्ही प्रार्थना केली आणि देवाला विनंती केली की तू जे म्हणतोस कि तुझे राज्य कसे कार्य करते हे आम्हाला माहित नाही तर ते आम्हाला शिकव.

म्हणून स्वाभाविक दृष्टीने राज्य म्हणजे काय हे शिकणे माझ्या साठी सर्वात महत्वाचे होते. मला वाटते की ही संकल्पना आमच्या पाश्चात्य विचारांना समजणे कठीण आहे, कारण आम्ही लोकशाही आणि स्पष्ट अभिव्यक्ती स्वातंत्र्याच्या अमेरिकन मानसिकतेत राहतो. देवाचे राज्य हे लोकशाही नाही; ते राजा असलेले राज्य आहे. राजाचे शासन हे राज्यासाठी नियुक्त केलेले अधिकारी, विविध सरकारी संस्था आणि त्यांमध्ये काम करणाऱ्या अधिकाऱ्या करवी चालते. लोकांचा जमाव असणे हे राज्य नाही. तुमच्याकडे एका जमावात लाखो लोक असू शकतात पण ते राज्य नसते. राज्य म्हणजे कायद्याने किंवा सरकारद्वारे एकत्र बांधलेल्या लोकांचा समूह.

शब्दकोशात राज्याची व्याख्या अशी आहे: "राज्य: एक राज्य किंवा सत्ता ज्याचे प्रमुख राजा किंवा राणी असतात."

जरी आपण क्रिसमस च्या वेळी येशूचे पृथ्वीवर आगमन साजरे करतो, तरी तो आपण हे म्हणत नाही कि तो आपल्यासोबत एक सत्ता घेऊन आला आहे. बायबल यशया 9:6-7: मध्ये या सत्ते बद्दल बोलते:

> *कारण आमच्यासाठी बाळ जन्मला आहे, आम्हांला पुत्र दिला आहे; त्याच्या खांद्यांवर सत्ता राहील; त्याला "अद्भुत, मंत्री, समर्थ देव, सनातन पिता, शांतीचा अधिपती" म्हणतील. त्याच्या सत्तावृद्धीला व शांतीला अंत नसणार; तो दाविदाच्या सिंहासनावर बसून त्याचे साम्राज्य चालवील आणि तेथून पुढे ते सर्वकाळ न्यायाने व नीतिमत्तेने दृढ व स्थिर करील. सेनाधीश परमेश्वराचा आवेश हे सिद्धीस नेईल.*

येशू या सत्तेचा प्रमुख आहे आणि जेव्हा आपण येशूला आपला वैयक्तिक तारणारा म्हणून स्वीकारतो तेंव्हा आपण त्या सत्तेचा लाभ प्राप्त करणारे बनतो; आपण नागरिक

बनतो. आपण केवळ नागरिकच बनत नाही तर पुत्र आणि कन्या म्हणून देवाच्या स्वतःच्या कुटुंबाचा भाग देखील बनतो.

> *परंतु जितक्यांनी त्याचा स्वीकार केला तितक्यांना म्हणजे त्याच्या नावावर विश्वास ठेवणाऱ्यांना त्याने देवाची मुले होण्याचा अधिकार दिला;त्यांचा जन्म रक्त, अथवा देहाची इच्छा, अथवा मनुष्याची इच्छा ह्यांपासून झाला नाही; तर देवापासून झाला.*
>
> —योहान 1:12-13

> *तर ह्यावरून तुम्ही आतापासून परके व उपरे नाहीत; पण पवित्र जनांच्या बरोबरीचे नागरिक व देवाच्या घरचे आहात;*
>
> —इफिसकरांस पत्र 2:19

देवाच्या कुटुंबाचे सदस्य म्हणून, आपण त्याच्या कुटुंबाचा भाग बनतो आणि अशा प्रकारे त्याच्या मालकीच्या प्रत्येक गोष्टीचे मालक असतो किंवा त्याचा भाग असतो. तसेच, आपण कायदेशीर हक्क आणि फायदे प्राप्त करणारे त्याच्या महान राज्याचे नागरिक बनतो.

## नवीन राज्य

मी ज्याबद्दल बोलत आहे ते अधिक चांगल्या प्रकारे समजून घेण्यासाठी, मी अमेरिकेचा जन्मतः नागरिक असण्याच्या परिस्थिती बद्दल सांगतो. अमेरिकेचा नागरिक म्हणून, व्यक्तीला कायदेशीर अधिकार असतात. व्यक्तीला मिळणारे ह्या कायदेशीर अधिकारांची नोंद देशाच्या संविधानात आणि सरकारमध्ये पारित झालेल्या कायद्यांमध्ये लिहिलेले असतात. हे कायदे आणि त्यांचे फायदे प्रत्येक नागरिकाला दिले जातात, मग ते कोणीही असोत. ते अधिकार आपल्या भावना किंवा बुद्धिमत्तेवर आधारित नाहीत. ते कायद्याने स्थापित केलेले आहेत आणि अमेरिकेला आपले घर मानणाऱ्या प्रत्येक नागरिका साठी कायदेशीररित्या उपलब्ध आहेत. एखाद्या नागरिकाला त्यांचे कायदेशीर अधिकार काय आहेत हे माहित नसेल याची शक्यता आहे, परंतु तरीही, परंतु ते केवळ अमेरिकेचे नगरिक ह्या एका कारणामुळे त्यांना ते मिळतात.

आता, विचार करण्यासारखी गोष्ट आहे, आणि मला आशा आहे की यामुळे देवाबद्दलचा

तुमचा संपूर्ण दृष्टिकोन आणि देवाकडून तुम्हाला जे प्राप्त होते त्या विषयी चा दृष्टिकोन बदलेल. इथे अमेरिके मध्ये, जर आपल्याला हे समजले की कशामुळे तरी किंवा कोणीतरी आपले कायदेशीर अधिकार हिरावून घेण्याचा प्रयत्न करत आहे किंवा आपल्यावर अन्याय झाला आहे, तर आपल्याला न्याय मिळतो (न्याय म्हणजे कायद्याची अंमलबजावणी किंवा प्रशासना द्वारे ते लागू करणे), ही एक प्रक्रिया आहे जी आपले कायदेशीर अधिकार लागू करते. आपण न्यायालयात जातो आणि न्यायाधीश आपल्या दिसण्याकडे किंवा आपण किती श्रीमंत किंवा गरीब आहोत याकडे लक्ष देत नाही. तो हे पाहतो कि कायदा काय आहे. तो प्रत्येक वेळी कायद्याच्या बाजूने निर्णय देत असतो. कायदा आणि न्यायाधीश आपल्या साठी सुरक्षा आहेत.

आम्हाला कायदेशीर अधिकार आहेत आणि आमचे सरकार अमेरिकेच्या कायदेशीर व्यवस्थेत न्यायाच्या प्रक्रियेद्वारे आमच्या कायदेशीर अधिकारांची हमी देते आणि त्यांची अंमलबजावणी करते. हे लक्षात घेऊन, यशया 9 कडे बारकाईने लक्ष द्या कारण ते येशूने जी सत्ता पृथ्वीवर आणली त्या बद्दल बोलते.

> *तो (येशू) दाविदाच्या सिंहासनावर बसून त्याचे साम्राज्य चालवील आणि तेथून पुढे ते सर्वकाळ न्यायाने व नीतिमत्तेने दृढ व स्थिर करील.*
>
> —यशया 9:7

ह्या शास्त्रभागात म्हटले आहे की देवाचे राज्य न्यायाद्वारे, न्यायाने व नीतिमत्तेने दृढ व स्थिर करील. न्याय म्हणजे तुमचे कायदेशीर हक्क अंमलात आणण्याची किंवा लागू करण्याची प्रक्रिया. तुमचे कायदेशीर हक्क म्हणजे देव ज्याला नीतिमत्ता म्हणतो किंवा त्याच्या दृष्टीने जे योग्य आहे ते त्याचे नियम. त्याच्या राज्यात जे योग्य आहे असे जे देव म्हणतो त्या मध्ये तुम्हाला न्यायाची सुविधा प्राप्त झाली आहे, याची खात्री करण्यासाठी, त्या राज्यात नागरिक म्हणून कायदेशीररित्या तुमचे जे आहे ते, तुम्हाला मिळेल.

आपल्याला त्याच्या राज्यात आपले कायदेशीर हक्क समजावेत म्हणून देवाने त्याच्या वचनाद्वारे, बायबलद्वारे आपल्याला त्याची इच्छा प्रगट केली आहे. ही चांगली बातमी आहे! देवाने तुम्हाला जे वचन दिले आहे त्याबद्दल बायबलमध्ये तुम्ही जे काही वाचता ते त्याच्या राज्याचे नागरिक ह्या नात्याने कायदेशीररित्या तुमचे आहे!

दुसरे करिंथ 1:20 स्पष्टपणे सांगते की प्रत्येक वचन - प्रत्येक वचन - "होय" आणि "आमेन" आहे. ते आधीच ठरवले गेले आहे; ते आधीच कायदेशीररित्या तुमचे आहेत.

> *देवाची वचने कितीही असोत, त्याच्या ठायी होय हे आहे; म्हणून आम्ही देवाच्या गौरवाला त्याच्या द्वारे आमेन म्हणतो.*
>
> —2 करिंथ 1:20

देवाच्या राज्याचा पाया न्याय आणि नीतिमत्ता आहे - तो डळमळीत होऊ शकत नाही. म्हणून अशा प्रकारे विचार करा: जर मला देवाच्या राज्याचा कायदा (त्याची इच्छा) माहित असेल आणि मला हे देखील माहित असेल की मला न्याय मिळण्याची संधी आहे, आणि त्यासाठी कायद्याची अंमलबजावणी होण्याची खात्री मिळते तर मला आत्मविश्वास आहे आणि मी घाबरत नाही.

> *त्याच्यासमोर येण्यास आपल्याला जे धैर्य आहे ते ह्यावरून की, आपण त्याच्या इच्छेप्रमाणे काही मागितले तर तो आपले ऐकेल; आणि आपण जे काही मागतो ते तो ऐकतो, हे आपल्याला ठाऊक आहे; म्हणून ज्या मागण्या आपण त्याच्याजवळ केल्या आहेत त्या आपल्याला मिळाल्या आहेत हेही आपल्याला ठाऊक आहे.*
>
> —1 योहान 5:14-15

जेव्हा हे वचन म्हणते की तो आपले ऐकतो, तेव्हा ते ध्वनी प्रवाहाद्वारे आपले शब्द ऐकण्याबद्दल बोलत नाही; तर तो आपली परिस्थिती हातात घेण्याबद्दल बोलत आहे.

विचार करा एक न्यायाधीश जो व्यक्तीला न्याय मिळावा यासाठी खटल्याची सुनावणी करतो. न्यायालय आणि न्यायाधीश प्रत्येक नागरिकाला न्याय मिळावा याची खात्री करण्यासाठी असतात. न्यायाधीशाचा निर्णय त्याच्या भावनांवर आधारित नसून तो प्रत्येक नागरिकासाठी लागू करण्यासाठी ज्या कायद्याचे अध्यक्षपद भूषवतो त्यावर आधारित असतो. न्यायाधीश लिखित कायद्यानुसार न्याय (कायद्याची अंमलबजावणी) झाली आहे याची खात्री करण्यासाठी असतो.

देवाच्या बाबतीत, त्याचे सिंहासन (अधिकाराचे स्थान) आणि त्याचे सामर्थ्य, येशू आणि त्याच्या राज्याकडे येणाऱ्या सर्व लोकांना न्याय (त्याच्या इच्छेची अंमलबजावणी)

सुनिश्चित करण्यासाठी आहे.

कृपया ते विधान पुन्हा खूप हळू वाचा आणि तुमचा देवाबद्दलचा सध्याचा दृष्टिकोन बदलून जाऊ द्या. बहुतेक लोकांना वाटते की देव त्याचे निर्णय प्रत्येक परिस्थितीनुसार घेतो, परंतु ते खरे नाही. तो अशा राज्याचा राजा आहे ज्याचे कायदे बदलत नाहीत. तो त्याच्या कायद्याबाहेर निर्णय घेत नाही आणि घेणारही नाही. आपण मागण्या पूर्वीच त्याचे उत्तर काय आहे हे आपण जाणून घेऊ शकतो आणि आपण खात्री बाळगू शकतो की आपल्याला दिसून येण्या पूर्वीच त्याच्या कायद्या अनुसार आपल्या साठी जे निश्चित केलेले आहे ते प्राप्त झाले आहे, कारण त्याच्याकडे त्याच्या कायद्याची अंमलबजावणी करण्याची शक्ती आहे.

## आता भीक मागायची नाही

ड्रेंडा आणि मी राज्यामधील आमच्या कायदेशीर हक्कांबद्दल शिकू लागलो तेव्हा देव आणि बायबलबद्दलच्या आमच्या विचारसरणीत नाट्यमय बदल झाला. आमच्या नवीन समजुतीमुळे आमचे जगण्याचे स्वरूप बदलले. आता भीक मागायची नाही. आता विनवणी करायची नाही. त्याच्या राज्याचे नागरिक म्हणून आम्हाला कायदेशीररित्या जे काही दिले गेले आहे ते आम्हाला समजले. आणि त्या वचनांवर दावा कसा करायचा आणि त्यांना पृथ्वीच्या क्षेत्रात कसे मुक्त करायचे हे आम्ही शिकत राहिलो. स्वर्गात जे काही आहे त्याचे आपण मालक आहोत हे शिकणे खूप आनंददायी होते. नागरिक म्हणून, आपल्याला राज्याच्या कायद्यांमध्ये कायदेशीर प्रवेश आहे. परंतु घरातील सदस्य म्हणून, आपण मालक आहोत आणि स्वर्गात जे काही आहे त्याच्या वारशावर आपला कायदेशीर हक्क आहे.

> *आणि जर मुले आहोत तर वारसही आहोत, म्हणजे देवाचे वारस, ख्रिस्ताबरोबर सोबतीचे वारस असे आहोत.*
>
> —रोमकरांस पत्र 8:17

आपण ख्रिस्ताबरोबर सोबतीचे वारस असे आहोत. असे लिहिले आहे ते लक्षात घ्या! याचा अर्थ ख्रिस्ताकडे जे काही आहे ते आपले देखील आहे!

त्या दिवशी जेंव्हा देव माझ्याशी माझ्या छोट्या मोडकळीस आलेल्या फार्महाऊसमध्ये बोलला आणि मला सांगितले की त्याचे राज्य कसे चालते हे मला माहित नाही, तेंव्हा तो

त्याच्या राज्याच्या कायद्यांचा आणि कायदेशीर रचनेचा संदर्भ देत होता. तो बरोबर होता. राज्य म्हणजे काय किंवा ते कसे काम करते हे मला माहित नव्हते. पण एक गोष्ट मी लगेच लक्षात घेतली, ज्यामुळे माझी राज्याची समज वाढली, ती म्हणजे राज्ये अपरिवर्तनीय कायद्यांद्वारे चालतात. कायदे पक्षपात दाखवत नाहीत. ते एखाद्या विशिष्ट व्यक्तीच्या बाजूने बदलत नाहीत. नाही, ते अचल आणि स्थिर आहेत.

मी तुम्हाला एक उदाहरण देतो. आज आपण वीज आणि ती आपल्या घरात पुरवणाऱ्या प्रकाशाचा आनंद घेतो. पृथ्वीची निर्मिती झाल्यापासून वीज नियंत्रित करणारे नियम नेहमीच अस्तित्वात होते यावर तुम्ही सहमत असाल. तरीही, हजारो वर्षांपूर्वी, दिवे नव्हते! कारण? वीज नियंत्रित करणारे नियम आणि त्यांचा वापर करून वीजेचा बल्ब कसा लावायचा हे कोणीही शोधले नव्हते. जरी आकाशात चमकणारी वीज आणि स्थिर वीज जीवनाचा एक सामान्य भाग म्हणून मानले जात असले तरी, ती फक्त निरीक्षणे होती. प्रत्यक्षात कोणीही ते जे पाहत होते त्याची नक्कल करण्याचा विचार केला नाही कारण त्यांना हे माहित नव्हते की ते जे पाहतात ते नैसर्गिक नियमांवर आधारित आहे जे शिकता येते.

आज चर्चमध्येही ह्याच समजाची कमतरता आहे. लोक बायबलमध्ये देवाने केलेल्या महान गोष्टींबद्दल वाचतात पण ते जे वाचत आहेत त्याचे फक्त निरीक्षणात्मक आकलन करण्या पलीकडे कधीच जात नाहीत. अनेकांनी देवाला त्यांच्या आयुष्यात काही आश्चर्यकारक गोष्टी करताना पाहिले आहे, परंतु उन्हाळ्याच्या वादळात विजेचा तेजस्वी प्रकाश पाहिल्यासारखे ते स्तब्ध राहून म्हणतात, "वाह, तुम्ही ते पाहिले का?" पण ते त्याची पुनरावृत्ती करू शकत नाहीत कारण त्यांनी नुकतेच जे पाहिले त्याचे नियम त्यांना समजत नाहीत. उदाहरणार्थ, आज आपण जगात कुठेही, आपल्याला पाहिजे तिथे विजेचे दिवे लावू शकतो, कारण आपल्याला वीज नियंत्रित करणारे कायदे समजतात.

त्याचप्रमाणे, आज आपण जगात कुठेही विमानाने एका दिवसात हजारो मैल प्रवास करण्याआनंद उपभोगतो. विमानाला वर उचलण्या जाण्याच्या नियमाचे आकलन आणि वापर करून उड्डाण करण्याची क्षमता मिळते. पण, पृथ्वीची निर्मिती झाल्यापासून तो नियम पृथ्वीवर आहे, आणि हे दररोज त्या नियमाचा वापर करणाऱ्या पक्ष्यांवरून दिसून येते. परंतु हजारो वर्षांच्या मानवी अस्तित्वात कोणीही विमान उडवले नाही कारण कोणीही वर उचलण्या जाण्याचा नियम शोधला नव्हता आणि तो कसा वापरायचा हे शिकले नव्हते.

आणि, देवाच्या राज्याबाबतही असेच आहे. बहुतेक लोक भीक मागतात, रडतात आणि देवाला त्यांच्या मनाने काहीतरी करायला लावण्याचा प्रयत्न करत राहतात. परंतु त्यांना हे माहित नाही की जेव्हा ते विश्वासी झाले, तेंव्हा राज्याचे सर्व कायदे आणि फायदे त्यांच्या वापरासाठी आणि उपभोगण्यासाठी आहेत, आता त्यांना भीक मागण्याची आवश्यकता नाही.

समजा मी तुमच्या चर्चमध्ये येणार असेल. तेंव्हा तुम्ही चर्च मधील लोकांना ह्या साठी प्रार्थना आणि उपवास करायला सांगाल का की मी तिथे पोहचेल त्या रात्री लाईट चालू राहावेत? अर्थातच नाही! आणि जर मी तुमच्या चर्चमध्ये पोहोचलो आणि लाईट चालू नसतील, तर सर्वजण देवाकडे प्रार्थना, आणि विनवणी करून ते लाईट सुरु कर असे म्हणतील का? नाही, ते स्विच शोधतील, ते सुरु करतील आणि लाईट चालू होईल. ह्यात काही भीती नाही, कुठलाही गोंधळ नाही, फक्त स्विच चालू करायचे आहे!

पण काही कारणास्तव, ख्रिस्ती लोकांनी कधीही या दृष्टिकोनातून देवाचे राज्य आणि वचन पाहिलं नाही. ते आपला बहुतेक वेळ भीक मागण्यात घालवतात, आणि काहीतरी घडेल अशी आशा बाळगतात. जेव्हा ते घडत नाही, तेव्हा ते लगेच देवाला दोष देतात, असा विश्वास धरतात की देवाने त्यांची विनंती मान्य केली नाही. या समजुतीच्या अभावामुळेच आज बहुतेक ख्रिस्ती लोकांचा असा विश्वास आहे कि देव वाईट गोष्टी घडू देतो, किंवा जेव्हा एखादी दुर्घटना घडते तेव्हा त्याला त्याबद्दल माहिती असते. मित्रांनो, देवाचे राज्य असे चालत नाही!!!! पुन्हा, आपण 1 योहान मधील आपल्या शास्त्रवचनाकडे पाहूया.

> *त्याच्यासमोर येण्यास आपल्याला जे धैर्य आहे ते ह्यावरून की, आपण त्याच्या इच्छेप्रमाणे काही मागितले तर तो आपले ऐकेल; आणि आपण जे काही मागतो ते तो ऐकतो, हे आपल्याला ठाऊक आहे; म्हणून ज्या मागण्या आपण त्याच्याजवळ केल्या आहेत त्या आपल्याला मिळाल्या आहेत हेही आपल्याला ठाऊक आहे.*
>
> —1 योहान 5:14-15

आम्हाला माहित आहे की आम्ही आमच्या कायदेशीर अधिकारानुसार मागत आहोत आणि तो आमची परिस्थिती आपल्या हातात घेतो, आम्हाला खात्री आहे की आम्ही त्याच्याकडून जे मागितले आहे ते आम्हाला मिळाले आहे! दुर्दैवाने, ह्या वचनात सांगितलेले

सत्य बहुतेक विश्वासणाऱ्यांना समजलेले नाही. माझ्या अनुभवा प्रमाणे, मी असे म्हणेन की बहुतेकांना. पण मला त्या वाचनाचा जो अर्थ समजला त्यामुळे माझे जीवन अक्षरशः बदलून गेले! दृष्टांत ह्याच्या विपरीत वास्तविकपणे जगणे.

## दृष्टी विरुद्ध जगणे

मी बायबलमधील गोष्टी नव्याने आवडीने वाचू लागलो. मला माहित होते की प्रत्येक गोष्टीत आध्यात्मिक कायदे पाहायला मिळणार आहेत. आणि अशाप्रकारे मी एक आध्यात्मिक शास्त्रज्ञ झालो. प्रत्येक शास्त्रभाग वाचल्या नंतर मी प्रश्न विचारायचो. "असे का घडले?" "ह्या शास्त्रभागात कोणता कायदा दाखवला गेला आहे?" हळूहळू, मी देवाच्या राज्यात माझे तत्त्व आणि कायदे शिकू लागलो आणि त्यामुळे माझे जीवन अक्षरशः बदलून गेले.

आम्ही हे कायदे लागू करायला सुरुवात केली, आणि अडीच वर्षांत आम्ही पूर्णपणे कर्जमुक्त झालो. आम्ही नवीन गाडी रोख पैसे देऊन खरेदी करू लागलो, 55 एकर जमिनीवर आमचे स्वप्नातील घर बांधले आणि असेच बरेच काही केले. सर्वात चांगली गोष्ट म्हणजे आता आमच्यावर कोणताही आर्थिक दबाव नव्हता. आमच्या घराची किंमत पूर्णपणे चुकती झाली आहे, आणि फक्त जगायचे म्हणून जगण्याऐवजी आम्ही आमच्या कामावर, आमच्या उद्देशावर लक्ष केंद्रित करू शकतो. आम्ही जे शिकत होतो त्याबद्दल आम्ही खूप उत्साहित होतो पण आमच्या जीवनात ज्या गोष्टी घडत होत्या त्या, आमचे बहुतेक मित्र आणि ओळखीचे लोक, ह्यांच्या जीवनात घडत नव्हत्या आणि ते जीवनाचा आनंद घेताना दिसत नव्हते. आमची इच्छा होती कि, आम्ही जे शिकलो ते इतर लोकांना देखील शिकवावे व त्यांची मदत करावी, म्हणून आम्ही 1995 मध्ये फेथ लाइफ चर्च सुरू केले. देवाने आम्हाला शिकवलेले कायदे आणि तत्त्व त्यांना शिकवण्यावर आम्ही लक्ष केंद्रित केले, आम्ही लोकांना हे सांगण्यावर लक्ष केंद्रित केले कि ते कसे मुक्त होऊ शकतात आणि राज्याचे चांगले जीवन कसे जगू शकतात.

त्यानंतर 2005 मध्ये, आम्ही फेथ लाईफ नाऊ सुरू केले, जी आमची मीडिया सेवकाई आहे. फेथ लाईफ नाऊ आमचे दोन दैनिक टेलिव्हिजन शो - फिक्सिंग द मनी थिंग आणि ड्रेंडा - जगातील प्रत्येक टाईम झोनमध्ये राज्याची सुवार्ता सांगण्या साठी प्रसारित करते.

आज, आम्ही आमच्या गाडीच्या सीटमध्ये कुठेतरी दडून बसलेले नाणे शोधून तीन मुलांमध्ये वाटून देता येईल असे काहीतरी स्वस्त जेवण विकत घेण्याचा प्रयत्न करत नाही. आत्ता आम्ही आमच्या गरज पूर्ण करण्या साठी लाखो रुपये खर्च करतो आणि आम्ही असे करण्या पर्यंत कसे पोहचलो हे लोकांना शिकण्यास मदत करण्याची आमची तळमळ आहे. आम्ही केवळ जगायचे म्हणून जगण्याच्या विचारसरणीपासून अचानक दूरदृष्टीवर आधारित विचारसरणीकडे वळलो आणि आपल्या आयुष्यात आपण काय निर्माण करू शकतो आणि काय करू शकतो याचे स्वप्न पाहू लागलो. आम्ही आर्थिक अराजकता आणि गुलामगिरीतून आर्थिक स्वातंत्र्याकडे गेलो.

आमच्या मोडकळीस आलेल्या आणि आर्थिक तणावाच्या काळात, रोख रकमेने काहीही खरेदी करणे हा एक मोठा आणीबाणीचा विषय होता. आम्ही प्रचंड तणावात यायचो, आणि आता कुणाकडून पैसे उधार घेता येतील याचा शोध घेण्याचा प्रयत्न करायचो, किंवा पुन्हा सापडतील त्या वस्तू घेऊन गहाण ठेवण्या साठी दुकानात जायचो! पण आज, आम्ही तरतूदीच्या सामर्थ्याचा आनंद घेत आहोत.

तुम्ही विचाराल, "गॅरी, तरतूदीचे सामर्थ्य काय आहे?" तरतूदीचे सामर्थ्य म्हणजे तुमचे उद्देश काय आहे हे शोधण्याची आणि जीवन केवळ जगायचे म्हणून जगण्याच्या सापळ्यातून बाहेर पडण्याची क्षमता आहे. नेहमी लक्षात ठेवा की तरतूद म्हणजे प्रो-व्हिजन आहे. ते पुन्हा सावकाश वाचा; ह्या शब्दाचा अर्थ नीट समजून घ्या, त्यामध्ये विशेष  अर्थ आहे.

कोणतीही तरतूद नसल्यामुळे व्यक्ती गुलामगिरीचे जीवन जगतो आणि गुलाम मोठी स्वप्ने पाहत नाहीत! आणि नेहमी लक्षात ठेवा, तुम्ही गुलाम नाही! तुम्ही देवाच्या कुटुंबातील सदस्य आहात, संपूर्ण संपत्तीचे येशूसोबत वारस आहात. म्हणून वर बघा आणि एक नवीन भविष्य पहा. माझी ही इच्छा आहे कि तुम्ही स्वप्न पाहण्यास, आपले  दृष्टांत तयार करण्यात आनंद घेण्यास आणि उत्तम जीवन जगण्यास स्वतंत्र असावे. मला विश्वास आहे की तुम्ही हे पुस्तक वाचत असतांना तुम्हाला प्रेरणा मिळेल, परंतु केवळ प्रेरणाच नाही तर तुम्ही आत्मविश्वासू व्हाल. माझे जीवन बदलणाऱ्या राज्याच्या कायद्यांचे नियम तुमच्यासाठी देखील आहेत.

—गॅरी कीसी

"तुमची आर्थिक क्रांती" नावाच्या पाच पुस्तकांच्या मालिकेतील हे खरे तर चौथे पुस्तक आहे. मी तुम्हाला मागील तीन पुस्तके वाचण्यास प्रोत्साहित करेन जेणेकरून मी ज्या कायद्यांचा संदर्भ देत आहे त्याबद्दल आणि देवाचे राज्य कसे कार्य करते याबद्दल अधिक माहिती मिळेल. ती पुस्तके: तुमची आर्थिक क्रांती: निष्ठेचे सामर्थ्य, तुमची आर्थिक क्रांती: विश्रांतीचे सामर्थ्य आणि तुमची आर्थिक क्रांती: रणनीतीचे सामर्थ्य. तुम्हाला ती GaryKeesee.com किंवा Amazon.com वर मिळू शकतात.

अध्याय 1

# प्रकाश अंधारात चमकतो

मी तुम्हाला प्रस्तावनेत वकिल मला जे बोलला त्या बद्दल सांगितले आहे, ज्यामुळे आमची खरी परिस्थिती आमच्या समोर अगदी स्पष्टपणे आली आणि त्यामुळे शेवटी आम्हाला देवासमोर याचना करावी लागली. मी माझ्या पलंगावर रडत पडलो असतांना प्रभुने मला काय सांगितले ते देखील मी तुम्हाला सांगितले आहे, की मी ज्या परिस्थितीत मी होतो त्याचे कारण म्हणजे त्याचे राज्य कसे चालते हे मला कधीच कळले नव्हते. पण ते कसे कार्य करते? तो मला काय दाखवण्याचा प्रयत्न करत होता? मला काहीच कळत नव्हते, पण मी ते शिकायला सुरुवात करणार होतो.

तुम्हाला आठवत असेल कि, खटला टाळण्यासाठी मला तीन दिवसांत ते $1,600 वकिलाला द्यायचे होते. त्यावेळी, आमच्याकडे पैसे नव्हते आणि $1,600 देण्या साठी आमच्या व्यवसायातून वेळेवर पैसे मिळण्याची शक्यताही नव्हती. मी एका अशक्य परिस्थितीत होतो, किंवा मला तसे वाटत होते. आणि आता मी राज्याबद्दलचा माझा पहिला धडा शिकणार होतो. त्यावेळी, मी एक जुना डॉज कैरावान चालवत होतो आणि चिमणी मधून निघतो तसा धूर त्यामधून निघत होता. त्या रात्री, माझी एका कुटुंबासोबत त्यांच्या विम्याच्या संबंधात चर्चा करण्यासाठी अपॉइंटमेंट होती आणि त्यासाठी मला त्यांच्या घरी जायचे होते, जे माझ्या ऑफिसपासून सुमारे 15 मिनिटांच्या अंतरावर होते.

त्या काळात, मी जाणूनबुजून रस्त्यावर किंवा माझ्या क्लायंटच्या घराच्या कोपऱ्याजवळ व्हॅन पार्क करायचो. ह्याचे कारण असे होते कि, मी जेंव्हा व्हॅन सुरू करायचो तेव्हा त्यामधून नेहमीच पंधरा धूर निघायचा आणि सगळीकडे पसरायचा, त्यामुळे मला वाटले नाही कि, माझे क्लायंट ला असे वाटेल कि मी त्यांना गुंतवणूक कशी करावी आणि विमा कसा खरेदी करावा याचा सल्ला देणारा एक तथाकथित आर्थिक तज्ञ होतो. आणि त्यामुळे माझ्या व्यवसायाची चांगली वाढ होऊ शकणार नाही.

ह्या रात्री देखील, नेहमीप्रमाणे, मी माझ्या क्लायंटच्या घराच्या अगदी कोपऱ्यावर गाडी पार्क केली. त्यांच्यासोबत भेटून चर्चा खूप छान झाली आणि मी त्यांचा निरोप घेतला, पण जेव्हा ते गृहस्थ माझ्यासोबत माझ्या गाडी पर्यंत चालत गेले तेव्हा मला काळजी वाटू लागली. त्यामुळे मी थोडा अस्वस्थ झालो, पण मी म्हटले कि, मी गाडी सुरु करण्या पूर्वी ते निघून गेले तर काही हरकत नाही, पण दुर्दैवाने तसे झाले नाही. मी माझी ब्रीफकेस आणि व्हॅनमधील इतर वस्तू व्यवस्थित करण्यात वेळ घालवत राहिलो ह्यासाठी कि तेव्हड्या वेळात त्यांनी तिथून निघून जावे, पण तसे झाले नाही, शेवटी मला गाडी सुरु करावी लागली. आणि, अपेक्षेप्रमाणे, गाडीतून पांढरा धूर निघू लागला आणि सगळीकडे पसरला.

मी व्हॅन चालवायला सुरुवात करणार इतक्यात त्यांनी मला ती बंद करायला सांगितले आणि खिडकीजवळ येऊन म्हणाले कि ते थोडे अतिरिक्त पैसे कमविण्यासाठी अर्धवेळ गाड्यां दुरुस्त करण्याचे काम करतात. आणि ते म्हणाले कि मला तुमची गाडी तपासायची आहे. मी हो म्हणालो आणि गाडीचे बोनेट उघडले. मला माहित होते की त्यांना गाडीत काय खराबी आहे हे सापडले तरी काही फरक पडत नाही. पण त्या जुन्या व्हॅनला दुरुस्त करण्यासाठी माझ्याकडे सध्या पैसे नव्हते.

काही मिनिटांतच ते माझ्या कडे परत आला आणि म्हणाले, “मला वाटलं होतं तसंच आहे, ह्या गाडीचं हेड गॅस्केट फुटलंय. आता गाडी घरी घेऊन जा आणि गाडी पुन्हा चालवण्यापूर्वी ते दुरुस्त करून घ्या. त्यासाठी तुम्हाला फक्त $700 खर्च येईल.” मी त्यांच्या सल्ल्याबद्दल त्यांचे आभार मानले आणि परत ऑफिसला जायला निघालो. माझ्या डोक्यात फक्त एवढंच ऐकू येत होतं, “तुम्हाला फक्त $700  खर्च येईल!” त्या क्षणी मला $700 हे दशलक्ष डॉलर्ससारखे वाटत होते आणि वकिलाला देण्यासाठी मला अजूनही $1,600 ची व्यवस्था करायची होती. त्याशिवाय, इतर बिलांचा ढीग होता जे भरणे देखील आवश्यक होते.

माझ्याकडे ह्या सर्व परिस्थितीचे उत्तर नव्हते, पण मी आणि ड्रेंडाने केलेली प्रार्थना मला आठवली, "देवा, तुझे राज्य कसे चालते ते आम्हाला शिकव आणि कर्जमुक्त जीवन कसे जगायचे ते आम्हाला दाखव."

ऑफिसला परत येतांना, मी माझ्या आर्थिक परिस्थितीबद्दल प्रभूशी बोलू लागलो. "प्रभू, मला किती पैसे हवे आहेत हे तुला सर्व माहिती आहे. तुला माहिती आहे की ह्या

व्हॅनचे पैसे देणे अजूनही बाकी आहे आणि आता $700 ची गरज आहे. प्रभू, मला अगदी प्रामाणिकपणे वाटते कि, ही व्हॅन जाळून खाक झाली तर व्हॅनचे बँकेला देण्याचे बाकी पैसे आणि दुरुस्तीचा एकूण खर्च, विम्या मधून पूर्ण होईल!" मी ही प्रार्थना करत नव्हतो, पण निराशेने, व्यंग्य केल्या सारखे मोठ्याने म्हणत होतो.

मी हे बोललो, आणि माझं लक्ष कशाने तरी वेधून घेतलं. ते ह्यापूर्वी तिथे होते किंवा नाही मला निश्चितपणे माहित नाही, पण बोनेट च्या वरच्या बाजूला एक लहान बुडबुडा असल्यासारखे वाटत होते. मी त्याच्याकडे पाहत होतो, आणि तो हळूहळू मोठा होत आहे असे दिसू लागले. आणि मी त्या बुडबुड्या कडे पाहत असतांनाच तो, आकाराने वाढू लागला. मला धक्काच बसला. व्हॅनच्या मागच्या बाजून नेहमी येणाऱ्या धुराशिवाय मला इतर कोणताही धूर दिसला नाही, म्हणून मी ऑफिसकडे जात राहिलो.

मी ऑफिस पार्किंगमध्ये पोहोचताच, व्हॅनच्या पुढच्या भागात अचानक आगीचा गोळा पसरला! इंजिन मधून ज्वाळा हवेत सहा फूट उंच जात होत्या. मग मी मोठ्याने म्हणालो, "प्रभु, मी जे आत्ता बोललो ते तू ऐकले का?"

दुसऱ्या दिवशी, विमा कंपनीने दावा भरला आणि रातोरात माझ्याकडे वकिलाला देण्या साठी 1,600 डॉलर्स होते इतकेच नाही तर व्हॅनचे पैसेही फेडून झाले आणि किराणा सामान खरेदी करण्यासाठीही पुरेसे पैसे शिल्लक राहिले. आम्ही सर्वजण आनंदी होतो आणि आश्चर्यचकित देखील हतो, पण आता आमच्याकडे व्हॅन नव्हती, जी आम्हा सहा जणांना जाण्या येण्या साठी फार उपयुक्त होती. त्यावेळी नेमकं काय घडल ते मी खरोखर सांगू शकत नाही, पण व्हॅन जळून जावी हे जे मी मोठ्याने बोललो त्याकडे माझे लक्ष गेले. मला हे अगदी स्पष्टपणे माहित आहे की माझ्या मालकीच्या आतापर्यंतच्या कोणत्याही वाहनाला यापूर्वी कधीही आग लागली नव्हती. दुसरी गोष्ट म्हणजे, मी ह्या पूर्वी कधीही असे म्हटले नव्हते कि माझी गाडी आगीमध्ये जळून जावी. ह्या गोष्टी राज्याशी जुळलेल्या होत्या का? मी हे असे बोललो त्या मुळे हे घडले, की हा फक्त एक योगायोग होता?

**मग मी मोठ्याने म्हणालो, "प्रभु, मी जे आत्ता बोललो ते तू ऐकले का?"**

मला काहीच कळत नव्हते. जरी आम्हाला व्हॅन आणि कर्जदाराचे पैसे फेडण्याचा

आनंद होत होता, तरीही आम्हाला आता एका व्हॅनची आवश्यकता होती, पण ती कशी पूर्ण होणार?

## नवीन व्हॅनच्या शोधात

माझ्या वडिलांनी आमची विचारपूस करण्या साठी एक दिवस फोन केला, आणि आमची व्हॅन जळाली म्हणून दुसरी गाडी घेण्यासाठी मदत करण्याची इच्छा प्रगट केली. माझ्या वडिलांकडे पैसे आहेत हे मला माहित होते आणि मी मनातल्या मनात विचार करत होतो कि जर त्यांनी आमची मदत केली तर किती बरे होईल. ते म्हणाले कि आपण जुन्या पण चांगल्या स्थितीत असलेल्या गाड्यांच्या डीलरशिपकडे जाऊ या. आणि मी, मनापासून त्यांचा प्रस्ताव स्वीकारला.

आम्ही काही डीलरशिपमध्ये गेलो आणि मला एक उत्तम स्थितीत असलेली डॉज कॅरव्हॅन सापडली. ती सुमारे एक वर्ष जुनी आणि चांगल्या स्थितीत होती. मी माझ्या वडिलांना म्हणालो, मला वाटते की हे ड्रेंडाला, ही बरगंडी गाडी सुंदरी नक्कीच आवडेल, आणि मला वाटले कि हे ऐकून ते लगेच म्हणतील, "छान! ठीक आहे, चला आपण त्या गाडीचे पेपर तयार करू या." पण ते तसे म्हणाले नाहीत. त्याऐवजी, ते म्हणाले, "मी तुम्हाला खरेदीसाठी $5,000 देईन." हो, त्यांनी दिलेला प्रस्ताव फार चांगला होता, पण खरे तर ते मला फक्त डाउन पेमेंट करण्या साठी पैसे देत होते, बाकीचे पैसे मला लोन घेऊन पूर्ण करावे लागणार होते.

मला अचानक वास्तवतेची जाणीव झाली. बँकेकडून कर्ज मिळण्या साठी माझ्याकडे क्रेडिट रेटिंग नव्हते. आणि आतापर्यंत मी माझ्या वडिलांपासून आमची बिकट आर्थिक परिस्थिती लपवून ठेवली होती. दुसरे म्हणजे, मला वाटले की मी आता आणखी कर्ज घेण्याच्या स्थिती मध्ये नाही. पण त्या व्यतिरिक्त मला इतर दुसरा कोणताही मार्ग माहित नव्हता, त्यामुळे मी कर्ज घेण्यासाठी फॉर्म भरण्याचा लगेच निर्णय घेतला. परंतु मला हे देखील माहित होते की ते करण्यासाठी, मला माझ्या वडिलांसमोर माझी परिस्थिती स्पष्ट करावी लागेल आणि त्यांना त्या कर्जासाठी हमिदाखल माझ्या सोबत सही करावी लागेल. मी अनिच्छेने माझ्या वडिलांना माझी संपूर्ण परिस्थिती सांगितली, ते हमिदाखल सही करायला तयार झाले आणि आम्ही ते पेपर कंपनीला दिले. डीलरशिपने मला सांगितले की

मला कर्ज मिळेल किंवा नाही हे मला सकाळी कळवतील.

अर्थात, मला माहित होते की बँक कर्ज मंजूर करेल कारण माझ्या वडिलांचे क्रेडिट उत्तम होते. घरी जात असतांना मी विचार करत होतो कि कर्ज मंजूर होईल ही मोठी गोष्ट नाही. पण मला जे त्रासदायक वाटत होते ते हे कि मला माहित होते कि मी ते कर्ज घेण्याच्या स्थितीत नाही, पण हे देखील खरे होते कि मला त्याची गरज होती आणि माझ्याकडे पैसे नव्हते. मी काय करावे ह्या विचाराने गोंधळलो होतो आणि थोडासा अस्वस्थ होतो.

मी घरी पोहोचल्यावर ड्रेंडाला सर्व परिस्थिती सांगितली, तेव्हा तिला देखील माहित होते की आम्ही पुन्हा एकदा कर्ज घेण्यासाठी अर्ज करू शकत नाही, पण आमच्याकडे दुसरा पर्याय काय होता? त्या रात्री आम्हा दोघांनाही झोप आली नाही, पण सकाळी उठल्यावर आम्हा दोघांचाही निश्चितपणे हा निर्णय होता की पैसे उधार घेऊ नये.

म्हणून मी माझ्या वडिलांना फोन केला आणि त्यांनी देऊ केलेल्या मदती बद्दल त्यांचे आभार मानले आणि त्यांना सांगितले की आम्ही गाडी विकत घेण्यासाठी आणखी कर्ज घेऊ शकत नाही. त्यानंतर मी डीलरशिपला फोन करून सांगितले की आम्ही गाडी घेण्यासाठी येणार नाही. त्यावर ते म्हणाले की, व्हॅन खरेदी करण्या साठी कर्ज मंजूर झाले आहे आणि व्हॅन स्वच्छ करून ठेवलेली आहे आणि डिलिव्हरीसाठी तयार आहे. मी त्यांचे आभार मानले पण त्यांना पुन्हा सांगितले कि मी व्हॅन घेऊ शकत नाही.

फोन ठेवताच मला शांतता मिळाली, पण त्याच वेळी, आमच्या सहा जणांच्या कुटुंबाला पुरे होईल एवढी मोठी गाडी कशी खरेदी करता येईल हा विचार मनात घोळत राहिला. माझ्याकडे एक जुनी पाच सीट ची कूप गाडी होती जी मी कामाला जाण्या साठी वापरत असे आणि दुसरी गाडी मिळे पर्यंत त्यावरतीच काम भागवावे लागणार होते. सुमारे दोन आठवडे पर्यंत आम्ही आमच्या ह्याच गाडीने काम चालविले, सहकुटुंब कुठेतरी जायचे असले तर आम्हाला एकदोन फेऱ्या कराव्या लागत होत्या. मग एके दिवशी, मला एका गृहस्थाचा फोन आला, काही महिन्यांपूर्वी ड्रेंडाची आणि त्याची अचानक भेट झाली होती. तिचे आई वडील अटलांटामध्ये दर महिन्याला प्राचीन वस्तूंचा लिलाव करत असत आणि त्या ठिकाणी विकण्यासाठी ती अशा काही वस्तू शोधत होती, आणि त्या ठिकाणी तिची आणि ह्या गृहस्थाची आणि तिची भेट झाली होती. ते महिन्यातून एकदा लिलावासाठी वस्तू विकत घेण्यासाठी ओहयोला येत असत आणि ड्रेंडा तिच्या आई वडिलांना आवडतील

अशा वस्तू कुठे मिळतील ह्या वर सतत लक्ष ठेऊन असे. त्यामुळे दरमहा थोडे जास्त पैसे मिळत असत कारण तिचे आई वडील विक्री करून त्यांना जी कमाई होत होती त्याचे कमिशन तिला देत असत.

तर, ड्रेंडाची ह्या माणसाशी जेंव्हा भेट झाली तेंव्हा त्यांनी एकमेकांना विचारले कि ते काय काम करतात. तिने त्याला सांगितले की जर त्याच्याकडे कधी विकण्यासाठी काही असेल तर तिला ती ते विकत घेण्या बाबत विचार करू शकते. तो एक मोठा नर्सिंग होम चालवत होता आणि अनेकदा रुग्णांना ह्या नर्सिंग होम मधेच येऊन राहावे लागत असे त्या मुळे त्यांना आपले सामान विकून टाकावे लागत असे. जेव्हा त्या रुग्णांच्या घरातील वस्तूंची काळजी घेण्यासाठी त्यांचे कुणी कुटुंब नसायचे तेव्हा तो त्या वस्तू स्वतः कडे एका ठिकाणी साठवून ठेवायचा आणि नंतर त्या विकायचा.

मी त्याला ओळखत नव्हतो, म्हणून जेंव्हा त्याने फोन केला तेंव्हा मी त्याला ओळखत नव्हतो म्हणून ड्रेंडाला सांगितले की त्याने फोन केला होता. थोडक्यात सांगायचे तर, जेंव्हा तिने त्याला परत फोन केला तेव्हा त्याने तिला सांगितले की त्याच्याकडे तीन खोल्यां मध्ये फर्निचर आणि घरगुती वस्तूं भरलेल्या आहेत काढून टाकायच्या आहेत तर तिला त्या मधील काही विकत घ्यायच्या आहेत का. त्याने त्या सर्व वस्तू खूप कमी किमतीत देईन असे देखील म्हटले. ड्रेंडा आणि मी ते सामान पाहण्यासाठी गेलो, आणि जरी आम्ही खोल्यां मधील सर्वच सामान पाहू शकलो नाही, कारण खोल्यांमध्ये जमिनीपासून छतापर्यंत सामान खचाखच भरलेले होते, तरी आम्हाला अशा काही वस्तू दिसल्या ज्या आम्ही घेऊन विकल्या तर तो मागत असलेली किंमत आम्ही त्या सर्व सामाना साठी देऊ शकलो असतो. आम्ही तिच्या आई वडिलांना फोन केला आणि त्यांनी आम्हाला लगेच पैसे पाठवले, त्या नंतर ते ट्रक घेऊन आले आणि महिन्याला होणाऱ्या लिलावासाठी सर्व सामान अटलांटाला घेऊन गेले.

लिलावाला खूप यश मिळाले आणि आमच्या कमिशन म्हणून त्यांनी आम्हाला थोडेच वर्ष जुनी पण उत्तम स्थितीत असलेली प्यूजो स्टेशन वॅगन देण्याचे वचन दिले. मला माहित आहे कि बहुतेक लोकांच्या दृष्टीने जुनी आणि वापरलेली कार घेणे फार आनंद करण्याची गोष्ट नाही. पण आमच्यासाठी, त्यावेळी, ही फार आनंदाची गोष्ट होती कारण आम्हाला पहिल्यांदाच पैसे न देता गाडी मिळाली होती. त्या गाडीला नुकताच पेंट केला होता आणि

ती अगदी नवीन दिसत होती. आम्ही खूपच आनंदी होतो.

आणि अचानक, मला ह्याची जाणीव झाली कि. आपल्याला जे हवे आहे ते कर्ज न घेता प्राप्त करण्यासाठी आपण देवावर विश्वास ठेवू शकतो.

## एक आदर्श बदल

एक वर्षापूर्वी, आम्ही ओक्लाहोमामध्ये राहत असतांना, प्रभूने मला काही सांगितले ते आता मला स्पष्ट झाले. ह्या घटनेकडे मागे वळून पहिले तेंव्हा, मला समजले की प्रभु माझे लक्ष वेधण्याचा प्रयत्न करत होता, परंतु आम्ही कर्ज आणि तणावात इतके बुडालो होतो की, देव आम्हाला काय शिकवण्याचा प्रयत्न करत आहे ते आम्हाला समजत नव्हते.

मला शिकार करायला आवडते, आणि विशेषतः मला हरणांची शिकार करायला आवडते. पण त्याही पेक्षा मला हरणाचे मांस खायला आवडते आणि मी शिकार केली आहे ह्याचे प्रत्यक्षात प्रदर्शन करायला आवडते. मी तर शिकार करतच होतो, पण गेल्या काही वर्षांपासून मला प्रदर्शन करण्या सारखे काही मिळत नव्हते. मी बाहेर जायचो, थंडीत बसायचो, असे दिवसांमागून दिवस जायचे, पण शिकार मिळत नव्हती. हे थोडे निराशाजनक होते कारण मला माझ्या लेकरांसाठी अन्नाची व्यवस्था करणे गरजेचे होते, आणि शिकार मिळाली तर बरेच दिवस अन्नाची समस्या मिटू शकणार होती. ह्या पूर्वी मी जरी मी फार चांगली शिकार केली असली तरी, आता मला हरणांची शिकार करून अनेक वर्षे झाली होती आणि मी एकही शिकार घरी घेऊन आलो नव्हतो.

एक दिवस, मी जो हरणाची शिकार करण्याचा हंगाम येणार होता त्याबद्दल विचार करत होतो, मला प्रभूचा आवाज ऐकू आला. तो म्हणाला, "या वर्षी तू हरणाची शिकार कशी करायची ते तू मला का दाखवू देत नाही?" ते ऐकून मी चकित झालो. "मी हरणाची शिकार कशी करायची ते तू मला दाखवणार आहेस?" याचा अर्थ काय?

देव जे बोलला त्याबद्दल मी प्रार्थना करू लागलो, मला वाटले की पवित्र आत्म्या मला सांगत आहे कि, हरणाची शिकार यशस्वी रीतीने करण्या साठी मी आर्थिक बीज किंवा देणगी द्यावी. मी यापूर्वी कधीही हरणाची शिकार यशस्वी रित्या होण्या साठी करून देणगीच्या रूपाने बी पेरले नव्हते म्हणून सुरुवातीला मला ते थोडे विचित्र वाटले. पण मला स्पष्टपणे जाणवले की प्रभु मला ते बीज पेरण्यास काही तपशीलवार सूचना देऊन मार्गदर्शन

करत आहे. देणगीची नेमकी रक्कम देण्या साठी देवाने मला प्रेरित केले आणि त्या रकमेचा चेक लिहायला सांगितले. ड्रेंडाने आणि मी त्यावर हात ठेवून घोषणा करावी की आम्हाला 1987 चे आमचे हरण मिळाले आहे, आणि ते मी शिकार करेन तेंव्हा नाही ते आत्ता प्रार्थना करत असतांनाच मिळाले आहे असा विश्वास धरायचा असे त्याने सांगितले.

एक ख्रिस्ती ह्या नात्याने, मी नेहमीच माझ्या चर्चला दान दिले आणि सहकार्य केले, विशिष्ट हेतूने देणगीचे बी पेरणे आणि त्या साठी प्रार्थना केल्यावर ते प्राप्त होते असा विश्वास ठेवणे माझ्यासाठी नवीन होते.

म्हणून मी एक चेक घेतला आणि मेमोच्या भागात लिहिले, "माझ्या 1987 च्या हरणासाठी." मी आणि ड्रेंडाने त्यावर हात ठेवले, मला ज्या सेवा संस्थेवर विश्वास होता त्या संस्थेला मी तो चेक पाठवून दिला, आणि तो चेक पाठवत असतांना मी घोषणा केली कि मला माझे हरण मिळाले आहे. मी एक कागद घेतला आणि त्यावर तो दिवस आणि वेळ लिहिली जेव्हा मला वाटले की मला हरण मिळाले आहे आणि ते माझ्या शिकारीच्या कोटच्या खिशात ठेवले.

त्यावेळी आम्ही ओक्लाहोमा शहराच्या जवळ तुल्सा येथे राहत होतो, माझ्याकडे शिकार करण्यासाठी काही जागा नव्हती, परंतु चर्चमधील माझ्या एका मित्राने मला थँक्सगिव्हिंगसाठी गावी त्याच्या आजीच्या घरी येण्याचे आमंत्रण दिले; आणि तो म्हणाला की तिथे शेताच्या आजूबाजूला काही हरीण आहेत.

म्हणून माझे कुटुंब थँक्सगिव्हिंगच्या सकाळी माझ्या मित्राच्या घरी जेवण आणि एकमेकां सोबत वेळ  घालविण्या साठी आणि माझे घोषणा केलेल्या हरणाची शिकार करून ते सोबत घरी घेऊन जावे म्हणून निघालो. माझ्या मित्राला हे समजत नव्हते कि शिकार करण्या साठी मी नेमके कुठे जावे, परंतु त्याच्या घराच्या बाजूला झाडांनी वेढलेले जंगला होते आणि त्याने मला त्या जंगलात जाऊन एका मोठ्या झाडाजवळ बसण्याचा सल्ला दिला.

आता, तुम्ही ही कल्पना करावी अशी माझी इच्छा आहे. सूर्याच्या प्रकाशाने माझ्या सभोवतालचा परिसर हळू हळू उजळून गेला, मी एका शेताच्या मध्यभागी बसलो होतो आणि त्या शेततले गवत कापलेले होते आणि मध्यभागी एक मोठे झाड होते. मला वाटले की मी अगदीच चुकीच्या जागी बसलो आहे कारण मला माहित होते की कोणताही  हरण मला तिथे उघड्यावर बसलेले पाहून त्या भागात येणार नाही.

मी विचार केला कि उठून समोर सुमारे 130 यार्ड दूर असलेल्या जंगलाकडे जावे, तेवढ्यात मला माझ्या डावीकडे कुंपणाच्या जवळ जंगलात हालचाल ऐकू आली. दूरवर मला पानांचा सळसळ आवाज ऐकू आला आणि मला कळले की ते हरीण आहे.

अचानक मला दिसले कि, कुंपणा जवळून जंगलाकडे तीन हरिण चालत जात आहेत. ते झुडुपातून जात असतांना मला त्यांची एक झलक दिसली. हरिण खूप दूर होते, म्हणून मी थांबलो आणि काही मिनिटे वाट पाहिली आणि नंतर मी जंगलात त्या ठिकाणी गेलो जिथे मला वाटले की हरिण हालचाल करत होते. मग अचानक पहिले कि, एक हरिण माझ्या मागून शेतातून त्या झाडाकडे धावत होता जिथे मी बसलो होतो.

मी झाडाच्या विरुद्ध बाजूला होतो तेव्हा हरीण शेतातून माझ्या समोरच्या जंगलाकडे जात होता, पण त्याला मी दिसलो नाही. हरीण झाडाकडे धावले, त्याला तिथे बहुतेक माझा वास आला आणि तो जोरात ओरडून थांबला, त्यामुळे मी घाबरलो. अचानक आलेल्या आवाजाने मी उजवीकडे पाहिले तेव्हा, फक्त पाच यार्ड अंतरावरून एक सहा-ठिबके असलेला हरीण माझ्याकडे पाहत होत, ते पाहून मला आश्चर्य वाटले. हरणाला लगेचच परिस्थितीची जाणीव झाली, आणि उंच उड्या मारत तो धावत जंगलाकडे जाऊ लागला.

आता, दुर्बीण असलेल्या रायफलने वेगाने धावणाऱ्या पांढऱ्या शेपटीच्या हरणावर लक्ष्य साधने सोपे नव्हते, आणि मला माहित होते की तो जंगलात अदृश्य होण्यापूर्वी मला त्याच्यावर गोळी चालविण्याची एकच संधी मिळेल. हरण फारच लांब उड्या मारत असल्याने मी त्याच्यावर लक्ष्य साधू शकत नव्हतो. हरण जंगलात यायला फक्त 20 यार्ड बाकी होते, आणि मी ट्रिगर दाबला. गोळी लागल्या मुळे हरण पडला आणि काहीच हालचाल करत नव्हता. मला आश्चर्य वाटले! हे खरोखर घडले का? हे सर्व फारच वेगाने घडले होते! मी हळूच उठलो आणि हरण होते तिथे गेलो. मी पटकन खिशातून चिठ्ठी काढली आणि हरणासाठी देवाचे आभार मानू लागलो.

रायफलचा आवाज ऐकून माझा मित्र बाहेर आला आणि त्याने माझे अभिनंदन केले कारण त्याला हरण समोर पडलेले दिसत होते. प्रभूने मला ह्या हरणाविषयी काय सांगितले होते याबद्दल मी माझ्या मित्राला सांगितले नव्हते, परंतु आत्ता मी त्याच्याकडे पाहिले आणि म्हणालो, "मला नाही वाटत की हे हरण मी उत्तम शिकारी आहे म्हणून मिळाले आहे." मग मी त्याला ड्रेंडा आणि मी त्या हरणासाठी प्रार्थना केली त्या दिवशी मी लिहिलेला कागद

दाखवला. त्यावर असे लिहिले होते, "मला विश्वास आहे की जेव्हा मी येशूच्या नावाने प्रार्थना केली आहे तर मला माझे 1987 चे हरण याच तारखेला आणि त्याच वेळी मिळाले आहे." मी माझ्या मित्राला दाखवण्यासाठी तो कागद वर धरला आणि नंतर प्रभूने मला काय करायला सांगितले ते त्याला सांगू लागलो.



या घटनेने माझे लक्ष वेधून घेतले. मला खात्री होती की हे देवापासून आहे. पण अजूनही मी ह्या घटनेतील सर्व बिंदू जोडू शकलो नव्हतो. राज्याचे नियम आणि कायदे आणि ह्या हरणाची शिकार माझ्या आर्थिक स्थितीवर परिणामकारक कशी होणार आहे हे मला अजूनही समजत नव्हते. ते हरण मिळणे मनाला आनंद देणारे होते, पण असे पुन्हा घडेल का? मला राज्याच्या कायद्याची कल्पना नसती तर, मला कधीच कळले नसते की ते हरण तिथे कसे आणि कोणत्या कायद्यांमुळे आले. पण पुढच्या वेळी जेंव्हा हरणाची शिकार करण्याचा हंगाम येईल तेंव्हा पुन्हा असे घडते का हे पाहण्या साठी मी उत्सुक होतो.

**या घटनेने माझे लक्ष वेधून घेतले. मला खात्री होती की हे देवापासून आहे.**

## विश्वास नेहमीच कार्य करतो

हरणांची शिकार करण्याचा पुढचा हंगाम येईतोवर आम्ही तुल्साहून ओहायोला स्थलांतरित झालो होतो.  एक दिवस जॉगिंग करत असताना हे स्थलांतर करण्या विषयी देवाने प्रेरणा दिली. पवित्र आत्म्या माझ्याशी बोलला आणि म्हणाला कि आता ओहायोला घरी परत जाण्याची वेळ आली आहे आणि त्या ठिकाणी मी माझे शेवटच्या क्षणाचे कार्य करेन.

मी तुलसामध्ये दहा वर्षे राहिलो होतो आणि मला तुलसा खूप आवडायचा, पण तिथून निघून प्रगती कडे पुढे जाण्याची शक्यता हे जाणून मला खूप आनंद झाला. एक वर्षापूर्वी आलेल्या तेल मंदी मुळे तुलसाला असाधारणपणे मोठा फटका बसला होता, कारण तुलसा ची अर्थव्यवस्था प्रामुख्याने तेलावर आधारित होती. आमची आर्थिक परिस्थिती गंभीर झाली होती आणि आम्हाला स्वतःला उदरनिर्वाह करणे कठीण झाले होते. म्हणून नवीन ठिकाणी नवीन सुरुवात करण्या विषयी मी उत्साहित होतो. मला थोडी देखील कल्पना नव्हती की पुढची नऊ वर्षे आमच्या साठी तुलसापेक्षा ही जास्त आर्थिक ताण देणारे असणार आहेत.

उन्हाळ्याच्या सुरुवातीला आम्ही ओहायोला राहायला गेलो आणि ओहायोमध्ये आमच्यासाठी काय आहे याची मी उत्सुकतेने वाट पाहत होतो. आम्हाला लवकरच कळले की आपली कर्जं सोबत घेऊन येऊन येणे हे अत्यंत तणावपूर्ण होते.

अर्थात, हरणांची शिकार करण्याचा हंगाम येत होता आणि आमचा तिसरा मुलगा, टॉमच्या जन्माची वेळ देखील जवळ येत होती. टॉमचा जन्म ओहायो मधील हरणांच्या शिकारीचा हंगाम सुरु होण्याच्या दुसऱ्या दिवशी झाला, त्यामुळे बाळाच्या जन्माची घाई गडबड आणि व्यवसाय पुन्हा सुरू करण्याची धावपळ ह्या मुले मला पुरेसा वेळ मिळत नव्हता. मला शिकार करण्यासाठी फक्त एकाच ठिकाणी माहिती होते.

मी हायस्कूलमध्ये असतांना ज्या घरात वाढलो त्या घराच्या पलीकडे, मी एक ट्रॅपलाइन चालवली होती. माझ्या पालकांच्या घराजवळ एक तलाव होता, ज्या मध्ये शेजारच्या शेतातून वाहणाऱ्या आणि नंतर आमच्या तलावापर्यंत येणाऱ्या एका लहान ओढ्याच्या पाण्याने भरला जात असे. मी हे तुम्हाला निश्चितपणे सांगतो की, मी लहाण असतांना पासून त्या ओढ्यावरून चालत गेलो आहे, पण मला कधीही त्या ठिकाणी हरण दिसले नाही किंवा

तिथल्या जमिनीवर एकदाही हरणाच्या पायाचे ठसे दिसले नाहीत. पण मला आठवते की कॉलेजमध्ये असताना एकदा माझ्या भावाचा फोन आला आणि त्याने मला सांगितले की एक दिवस त्याला तिथे एक हरण दिसले आणि ते पाहून त्याला फार आश्चर्य वाटले आणि तो येत्या शरद ऋतूत तिथे शिकार करण्याची योजना करत आहे. आम्ही दोघेही आश्चर्यचकित झालो. नऊ किंवा दहा वर्षांपूर्वीचे हे संभाषण माझ्या अगदी लक्षात होते.

तो हरण त्याला कुठे दिसला होता हे त्याने मला सांगितले होते ते मला आठवले, कारण मला तो ओढा खूप परिचित होता. त्याने सांगितले होते की त्याने ते हरण जिथे ओढा दुभागतो आणि तिथेच मेपलचे एक खूप मोठे झाड तिथे पाहिले होते. नंतर त्याने मला सांगितले की मोठ्या झाडाच्या शेजारी एक लहान मेपलचे झाड आहे आणि त्या लहान झाडाचा उपयोग मोठ्या झाडावर चढण्यासाठी केला जाऊ शकतो, त्या मुळे हरणाची शिकार करण्यासाठी ती एक उत्तम जागा बनू शकते असे त्याला वाटले. माझ्या भावाने एकदा त्या ठिकाणी शिकार करण्याचा प्रयत्न केला आणि त्याचा निशाणा चुकला, पण त्यानंतर त्याने परत कधीही त्या ओढ्यावर हरण मारले नाही. पण तो कित्येक वर्षांपासून तिथे परतला देखील नव्हता, म्हणून मला माहित नव्हते की ते झाड अजूनही तिथे आहे की नाही किंवा माझ्या नियोजित शिकारीच्या दिवशी सकाळी अंधार असल्या मुले मला ते सापडेल किंवा नाही.

माझ्या साठी परिस्थिती थोडी कठीण होती, कारण ओहायोमध्ये फक्त बंदुकीने शिकार करण्याचा कायदा होता. हरणांची शिकार करण्याच्या हंगामात कोणतीही रायफल वापरण्याची परवानगी नव्हती, हरणं मारण्यासाठी असलेल्या गोळ्या शॉटगनमधून वापरल्या जात होत्या. त्यावेळी माझ्याकडे फक्त डबल बॅरलची 20-गेज होती आणि त्याने मी हरणांना फक्त 20 यार्ड च्या आत असले तरच मारू शकतो पण त्यापेक्षा दूर असतील तर मारणे शक्य होणार नाही असे ठाम वाटत होते. पण त्यावेळी माझ्याकडे फक्त हीच बंदूक होती, म्हणून मी ही योजना बनवली.

ड्रेंडा आणि मी आमचे बी पेरले, गेल्या वर्षीप्रमाणेच चेकवर हात ठेवला आणि मार्क 11:24 नुसार मला माझे हरण मिळाले असा दावा केला. थोडक्यात सांगायचे तर, ओहायोच्या बंदुकीने शिकार करण्याच्या हंगामाच्या चौथ्या दिवशीच, तो शिकारीचा माझा पहिला दिवस होता, मी 40 मिनिटांत एक हरण आणि एक हरणी मारली, दोन्ही 75-यार्ड

दूर होते जे माझ्या निशाणें पासून खूप जास्त दूर होते. त्यावेळी ओहायोमध्ये फक्त दोन-हरणं मारण्याची परवाणगी होती, म्हणूनच मी त्या वर्षी दोन हरणांची कापणी केली, म्हणजे विश्वासाने जे बी पेरले होते त्या अनुसार केलेली ही कापणी. होय अगदी बरोबर, 40 मिनिटांत मला विश्वासाचे दोन हरणं मिळाले.

पुन्हा एकदा, मला माहित होतं की मी काहीतरी करणार आहे. पण या हरणांच्या शिकारीच्या हंगामाच्या वेळी, आमची आर्थिक परिस्थिती खूपच वाईट होती आणि त्या तणावामुळे गुदमरून गेल्यासारखे वाटत होते. पण हेच तत्व आमच्या आर्थिक बाबतीत लागू करण्याचा विचार माझ्या मनात कधीच आला नाही.

## अनेक बाबतीत "योगायोग"

ओहायोमधील तो पहिला हिवाळा आणि पुढचे 12 महिने भयानक होते कारण मी अत्यंत मानसिक समस्या, पॅनिक अटॅक आणि नैराश्याशी झुंजत होतो, जसे कि मी या पुस्तकाच्या प्रस्तावनेत सांगितले आहे.

**अगदी स्पष्टपणे सांगायचे तर, देव तुमचे लक्ष वेधण्वासाठी कशाचाही उपयोग करतो.**

त्यावेळी नोव्हेंबरमध्ये, हरणांच्या शिकारीच्या हंगामाच्या अगदी आधी, व्हॅन जळून खाक झाली. जरी मी मागील दोन हरणांच्या शिकारीच्या हंगामात आश्चर्यकारकरित्या हरणांची शिकार केलीं होती, तरीही मला राज्याविषयी प्रकाशन मिळाले नव्हते. व्हॅन जळून खाक झाल्यामुळे आणि देव माझ्याशी राज्याबद्दल बोलत असतांना, मला जाणवले की या तीन बाबीं मध्ये मी पहिल्यांदा विचार केला होता त्यापेक्षा बरेच काही आहे. मला खूप प्रोत्साहन मिळाले, परंतु त्या वेळीही, मला राज्याचे कायदे कसे चालतात ह्याची  कल्पना नव्हती.

हरणांची शिकार करण्याचा पुढचा हंगाम आला, आणि घड्याळाच्या ठोक्या प्रमाणे, सुमारे 40 मिनिटांत पुन्हा मला माझी शिकार मिळाली. आमच्या आर्थिक बाबतीत देखील राज्य काम करत असल्याचे आम्हाला दिसू लागले, ज्या बद्दल आपण दुसऱ्या प्रकरणात विचार करणार आहोत. पण त्या सुरुवातीच्या काळात मला काही आश्चर्यकारक गोष्टींचा

अनुभव येत राहिला.

जेव्हा मी हरणांच्या शिकारीला जातो तेंव्हा देव मला नेहमीच काहीतरी नवीन शिकवत आहे असे मला जाणवले. मला वाटते की हरणांच्या शिकारीचा हंगाम हा कापणीचा असतो आणि तो नियंत्रित आणि मर्यादित वेळेत होतो. ओहायोमध्ये बंदुकीने शिकार करण्याचा हंगाम सहसा फक्त दोन आठवड्यांसाठी खुला असतो. अशा ह्या कापणीच्या हंगामात, तुम्हाला अजिबात वेळ वाया घालवायला नको असतो. आणि म्हणूनच हरणांचे बहुतेक शिकारी ह्या हंगामात शिकार करण्यावर लक्ष केंद्रित करत असतात. बहुतेक जण दोन आठवड्यांची ती  संधी वाया जाऊ नये म्हणून तासनतास तयारी करण्यात आणि शिकार शोधण्यात घालवतात. त्यामुळे राज्य कसे कार्य करते ह्याचा अभ्यास करण्यासाठी ही एक उत्तम प्रयोगशाळा बनते.

मी आता पर्यन्त हरणांच्या शिकारीच्या कथा सांगत राहिलो आहे, पण त्या माझ्यासाठी खूप महत्त्वाच्या होत्या. शिकारीच्या त्या घटनां मुळे राज्याचे असे छुपे कायदे उघड केले जे मी अन्यथा पाहू शकलो नसतो. अगदी स्पष्टपणे सांगायचे तर, तुमचे लक्ष वेधण्यासाठी देव कशाचाही वापर करतो. लूककृत शुभवर्तमानाच्या पाचव्या अध्यायात पेत्र, याकोब आणि योहान यांचे लक्ष वेधण्यासाठी त्याने मासे पकडण्याचा उपयोग केला, त्यांनी इतके मासे पकडले की त्यांच्या बोटी बुडू लागल्या. माझ्या बाबतीत असे घडले की त्याने हरणांच्या शिकारीचा उपयोग केला.

त्या दिवशी माझ्या बेडरूममध्ये देव माझ्या सोबत राज्याबद्दल बोलला त्यानंतर माझी व्हॅन जाळून गेली, त्यानंतर मला हरणांची शिकार कशी चमत्कारीकरित्या करता आली, आणि कोणतेही कर्ज न घेता आम्हाला ती वापरलेली मोठी स्टेशन वॅगन आम्हाला मिळावी यासाठी देवाने कसे दार उघडले ह्यांची आठवण झाली तेंव्हा, नेमकं काय होत आहे ते अचानक आम्हाला कळू लागले. मला आणि ड्रेंडाला ते सर्व काही समजून येऊ लागले.

मी बायबलचा अभ्यास पूर्णपणे नवीन पद्धतीने सुरू केला. मी स्वतःला आध्यात्मिक शास्त्रज्ञ म्हणू लागलो. बायबल चा अभ्यास करतांना मी प्रश्न विचारू लागलो. "असे का घडले? तसे का घडले नाही?" मी बायबलमध्ये वाचत असलेल्या घटनां मागील आध्यात्मिक नियमांचे संकेत शोधायला सुरुवात केली.

देव मला नवीन गोष्टी दाखवत राहिला; आणि पुन्हा एकदा, त्याने मला राज्याबद्दल

अधिक दाखवण्यासाठी हरणांच्या शिकारीचा वापर केला. या पुढच्या घटनेने खरोखरच माझे लक्ष वेधून घेतले. "तुम्हाला ते दिसून आले का?" या पैकीच तो आणखी एक क्षण होता.

हॅलोविनची संध्याकाळ होती, आणि इतर लोक साजरे करतात त्या भूतांच्या उत्सवात कसलाही सहभाग नसावा म्हणून आम्ही सहकुटुंब चर्च मध्ये आयोजित कार्यक्रमाला जाण्यासाठी तयार होत होतो, आणि आम्हाला निघायला अजून 45 मिनिटं होती.

काही आठवड्यांपूर्वी मी आणि ड्रेंडा ने एक हरण शिकार म्हणून मिळण्या साठी आमचे विश्वासाचे बी पेरले होते, आम्ही चेकवर हात ठेऊन प्रार्थना केली होती, आणि देवाने आम्हाला मार्गदर्शन केल्याप्रमाणे आम्ही तो चेक देवाची सेवा करणाऱ्या एका संस्थेला पाठवला होता, आणि मार्क 11:24 अनुसार ते पूर्ण झाले अशी घोषणा विश्वासाने केली होती. हरणांची शिकार करण्याच्या या हंगामात मी पहिल्यांदाच बाहेर पडून आम्ही भाड्याने घेतलेल्या जमिनीवर मी शिकार करत होतो.

जरी माझ्याकडे वेळेची कमतरता होती, तरी देवाने मला विश्वासाने शिकार कशी करायची हे सांगितले होते त्यामुळे, मी सहसा 40 मिनिटांत शिकार पूर्ण करत असे, म्हणून मला वाटले की माझ्याकडे शिकार करण्यासाठी अजून बराच वेळ आहे. या विशिष्ट दिवशी, मी आमच्या जुन्या फार्महाऊसच्या मागे पाइनच्या जंगलामध्ये असलेल्या माझ्या झाडाच्या स्टँडवर कडे गेलो आणि वर चढलो. मला तिथे जाऊन 10 मिनिटे देखील झाले नसतील, आणि मला माझ्यापासून सुमारे 200 यार्ड अंतरावर एक हरण शेजाऱ्यांच्या शेतात जाताना दिसले. मला माहित होते की ते माझी शिकार आहे, पण तो चुकीच्या दिशेने जात होता!

धनुष्याने शिकार करण्याचे हे माझे दुसरेच वर्ष होते आणि मला त्याबद्दल फारशी माहिती नव्हती. मी कॅमॉफ्लोज घातले नव्हते, माझ्याकडे हरणाला आकर्षित करण्या साठी आवाज करणारी मशीन नव्हती, आणि त्यांना आकर्षित करण्यासाठी सुगंध वापरला जातो ह्या बद्दल देखील मी कधी ऐकले नव्हते. मी चढलो होतो त्या झाडाच्या स्टँडवर मी जमिनीपासून फक्त 12 फूट अंतरावर एक बोर्ड दोन्ही बाजूंना खिळे ठोकून लावून ठेवला होता, जर तुम्हाला झाडाच्या स्टँडवरून धनुष्याने शिकार करण्याबद्दल काही माहिती असेल, तर तुम्हाला समजून येईल कि तो बोर्ड पुरेश्या उंचीवर नव्हता. पण गेल्या वर्षी, म्हणजे धनुष्याने शिकार करण्याचे जे माझे पहिले वर्ष होते, मी दोनदा विश्वासाने शिकार करण्या साठी गेलो आणि दोन्ही वेळेस शिकार केली, आणि ह्या वर्षी देखील मला अगदी तीच अपेक्षा होती.

मी हरीण चुकीच्या दिशेने जाताना पाहिले तेव्हा काय करावे हे मला कळेना, म्हणून मी प्रार्थना करू लागलो. अचानक, मला जाणवले कि पवित्र आत्मा माझ्याशी बोलत आहे. तो म्हणाला, "हरीणाला तू आपल्याकडे यायला सांग." ते ऐकून मला थोडा धक्का बसला. हरीणाला आपल्याकडे यायला सांग? मला माहित होते की मोठ्याने ओरडणे योग्य नाही, म्हणून मी फक्त अगदी हळू आवाजात म्हटले, "हरीण, थांब! मागे वळ आणि माझ्या झाडाखाली येऊन उभा राहा." वेडेपणा आहे हा, बरोबर? हरणाला आकर्षित करणारा आवाज वगैरे काही नव्हते. पण मी ते म्हणताच, हरीण थांबला, त्याने दोन्ही दिशांना पाहिले, नंतर मागे वळून माझ्या दिशेने 200 यार्ड चालायला लागला. मी ज्या जंगलात होतो ते सुमारे 400 यार्ड लांब रुंद असले तरी, तो हरीण थेट माझ्या झाडाकडे आला, सरळ येऊन झाडाखाली थांबला आणि स्थिर उभा राहिला.

मी तो निशाणा कसा चुकवणार. व्वा! मी आत्ता जे पहिले ते खरेच आहे का? झाडावर जिथे मी बसलो होतो त्याच्या अगदी खाली ते हरीण उभे होते, आणि मी नेम धरून निशाणा साधला. मी माझ्या घड्याळाकडे पाहिले आणि मी म्हणालो, पार्टीला वेळेवर पोहचायचे असेल तर आता लगेच निघाले पाहिजे आणि  नंतर परत येऊन हे शिकार केलेले हरीण आत घेऊन जावे लागेल. ह्या घटनेनंतर अनेक आठवडे आलेल्या ह्या अनुभवाबद्दल मी विचार करत राहिलो. पण देवाने माझे लक्ष वेधून घेणे थांबविले नाही.

आम्ही भाड्याने घेतलेल्या शेतातून एक ओढा वाहत होता आणि त्याच्या काठावर भरपूर झाडे होती. तिथे नेहमीच सशांची शिकार चांगली होत असे. त्या दिवशी रात्री बर्फ पडला होता आणि बर्फामुळे ससे इकडे तिकडे फिरतांना सहज दिसत असत. मी स्वतःला आवरू शकलो नाही, म्हणून मी आणि माझा मुलगा टिम ओढ्याच्या दुसऱ्या बाजूला जायला निघालो, चालत असतांना झुडुपांना लाथ मारत जात होतो, तेव्हा अचानक, झुडुपातून एक तीतर उडून बाहेर आला.

ओहायोमध्ये तीतरांचा हंगाम असायचा, पण मला त्या शेतात क्वचितच तीतर पाहायला मिळाले होते, कदाचित वर्षातून एखाद्या वेळेस. बरं, जेव्हा हा पक्षी उडाला, तेव्हा मी लगेच निशाणा साधला आणि त्या पक्ष्याला मारले. तो पक्षी खाली जमिनीवर कोसळला पण पुढे धावत राहिला. माझ्या लगेच लक्षात आले कि मी नेमकं काय केल आहे. मी त्याचे पंख जखमी केले होते. तो पक्षी पूर्ण ताकदीने टेकडी कडे धावत होता आणि तीतर ताशी 35

मैल वेगाने धावू शकतो. पण, बर्फ पडत असल्या मुळे तो इतक्या वेगाने धावू शकत नव्हता, तरीही तो वेगाने जाण्याचा प्रयत्न करत होता. समोर रुंद मैदान असल्याने, मला डोंगराचा संपूर्ण भाग स्पष्टपणे दिसत होता. गेल्या वर्षी टेकडीवर गवत उगवले जात होते, त्यामुळे ती खूप सपाट होती आणि अधूनमधून काही भागात वाढलेले गवत दिसत होते.

तो पक्षी टेकडीवर पूर्ण वेगाने जात होता, आणि मला माहित होते की मी त्याला पकडू शकणार नाही आणि तो बंदुकीच्या निशाणेच्या बाहेर होता. पण अचानक, मला हरिनाची ती घटना आठवली, माझ्या बोलवण्या मुळे तो कसा माझ्याकडे आला. म्हणून मी मोठ्याने ओरडलो, "तीतर, थांब!" मी ते म्हणताच, तीतर गायब झाला. मला माझ्या समोर संपूर्ण टेकडी स्पष्ट दिसत होती, ती पूर्णपणे बर्फाने आच्छादलेली होती आणि त्या बर्फातून अधूनमधून उगवलेले गवत दिसत होते, तरी देखील तो तितर कुठे गायब झाला कळत नव्हते. टिम ओरडून म्हणाला, "बाबा, तो कुठे गेला?" "मला माहित नाही," मी त्याला म्हणालो.

म्हणून आम्ही त्याचा माग घेत टेकडीवर जाऊ लागलो, आणि आम्हाला दिसून आले कि, तो तिथेच बसला होता त्याचे छोटेसे डोके बर्फामध्ये रोवलेले होते. मी विचार केला, "कदाचित त्याला बंदुकीची गोळी लागली पण तो मरेपर्यंत धावत राहिला का?" मी खाली वाकून त्या पक्ष्याला पकडले, आणि तो जंगली तीतर पंख फडफडवत, किंचाळू लागला. तो तर जिवंत होता! त्या रात्री घरी जाऊन त्याला कापत असतांना मी त्याचे खूप बारकाईने परीक्षण केले. त्याच्या अंगावर कुठेही गोळी लागल्याचे चिन्ह दिसत नव्हते, परंतु गोळीच्या निशाणे मुळे उजवा पंख नेमका कुठे तुटला होता ते मला दिसले. म्हणजे तो पक्षी खरोखरच जिवंत होता पण मी जेंव्हा ओरडून "थांब!" म्हणालो तेंव्हा तो थांबला होता.

हो, प्रभू, माझे पूर्ण लक्ष तुझ्या कडे आहे!

अध्याय 2

# विचार करणवाची एक नवीन पद्धत

मी आणि ड्रेंडाने आमच्या आयुष्यात राज्याचे काम पाहण्यास सुरुवात केली तेंव्हा, त्याबद्दल लोकांना सांगण्यापासून आम्ही स्वतःला रोखू शकलो नाही. आम्हाला माहित होते की आम्ही नविन शोध आणि सुटकेच्या एका रोमांचक मार्गावर आहोत. मी अजूनही विमा आणि सिक्युरिटीज चा एजंट म्हणून काम करत होतो, पण मला जाणीव झाली की काहीतरी बदलत आहे. पण ते नेमके काय हे मला माहित नव्हते, परंतु मला माहित होते की ज्याप्रकारे मी हरणांच्या शिकारीत घडतांना पाहिले होते, वापरलेली परंतु उत्तम स्थितीत असलेली स्टेशन वॅगन मला कश्या अद्भुत रीतीने मिळाली ते मी पहिले, जरी मला वाटत होते कि ह्या वापरलेल्या गाडी पेक्षा अधिक उत्तम गाडी मला मिळायला हवी होती, तरी जी गाडी मला मिळाली होती त्याबद्दल मला नक्कीच आनंद होता, आणि त्यावरून मला हे निश्चितपणे माहित होते कि माझ्या आर्थिक परिस्थिती मध्ये देखील उत्तरे मिळायला सुरुवात होणार आहे.

आमच्या जीवनात ह्या ज्या घटना घडल्या तरी आम्ही अजूनही खूप कर्जात होतो. मला कर्जमुक्त व्हायचे होते पण बदल नेमका कुठे करायचा हे मला कळत नव्हते. जरी मला बदल कुठे करायचा हे माहित नव्हते, तरी मला खात्री होती की मला ते नक्की कळेल. मला माहित होते की मला माझे उत्तर मिळाल्यातच जमा आहे, परंतु, बायबलमध्ये नमूद केलेल्या घटना किंवा दृष्टांत माझ्या आयुष्यात प्रत्यक्षात कशा दृश्यमान होतील याबद्दल मला अधिक जाणून घ्यायचे होते. त्या वेळी माझा व्यवसाया मधून येणाऱ्या कमाईतुन आमच्या आवश्यक गरजा देखील भागत नव्हत्या. पण पूर्वी जसे आम्ही दर महिन्याला जास्त आणि जास्त कर्जात जात होतो त्या पेक्षा आताची परिस्थिती चांगली होती.

मी आणि ड्रेंडा बायबल वाचत राहिलो आणि राज्याच्या कार्याबद्दल अधिक माहिती

आणि ज्ञान शोधत राहिलो. आम्हाला आवश्यक असलेली आर्थिक मदत प्राप्त व्हावी म्हणून आम्ही विश्वासाने आर्थिक बी पेरले.

मग एका रात्री मला एक स्वप्न पडले. स्वप्नात, मी एक सुरवंट "तुमची आर्थिक क्रांती: तरतुदीचे सामर्थ्य" एका झुडपाच्या फांदीवरून हळूहळू रेंगाळत वर चढत असल्याचे पाहिले. नंतर ते एका फांदीच्या देठावर रेंगाळत गेले आणि त्याने एक कोश विणला. अचानक, त्या कोशातून एक सुंदर फुलपाखरू बाहेर आले, आणि उडून गेले. मग एक आवाज आला, "तुझा व्यवसाय असाच होईल."

मी जागा झालो आणि त्या स्वप्नाचा अर्थ काय आहे ते मला समजले. एक सुरवंट फक्त रेंगाळू शकतो आणि त्याचे आयुष्य खूप मर्यादित असते, ज्या झाडावर तो असतो त्याच झाडावर त्याचे संपूर्ण आयुष्य तो जागून पूर्ण करतो. पण एक परिवर्तन घडते ज्यामुळे त्या सुरवंटाची क्षमता आणि संपूर्ण जीवन बदलते. ते स्वतःला फुलपाखरात रूपांतरित करते, ज्यामुळे ते कुठेही जाऊ शकते. काही फुलपाखरं, उत्तर गोलार्धातील हिवाळ्यातील थंडी पासून स्वतःचा बचाव करण्या साठी हजारो मैल उडून उष्ण प्रदेशात जाऊ शकतात. मला हे स्वप्न पडले तेंव्हा हे परिवर्तन कसे होणार आहे हे मला माहित नव्हते, तरी मला हे निश्चितपणे माहित होते की देव मला दाखवत होता कि ते घडणार आहे. त्यामुळे मला प्रोत्साहन मिळाले.

## एक आश्चर्यकारक शोध

ओहायोला परत आल्यापासून मी दररोज सकाळी मी  किमान 90 कॉल करत असे ह्या आशेने कि कुणीतरी विमा घेण्यासाठी तयार होईल. तुम्हाला वाटत असेल कि मी हे अगदी सहजपणे करत असेल, पण तसे नाही, माझ्या कडे कोणतीही आधुनिक टेक्निक नव्हती, पण मी यलो पेज फोन बुक घेऊन बसायचो आणि त्यामध्ये नावे शोधून लोकांना कॉल करायचो (हे कॉल करू नका असे बंधन घालण्याच्या वेळे आधीची गोष्ट आहे).

मी ज्या कंपनीत काम करत होतो त्या कंपनीचा मी प्रादेशिक उपाध्यक्ष असल्याने, माझे मुख्य काम नवीन विक्री प्रतिनिधींना नियुक्त करणे आणि प्रशिक्षण देणे हे होते. मी फोन करून सांगायचो की माझी कंपनी ओहायोमध्ये मोठया प्रमाणात वाढत आहे आणि मी त्या भागात काही लोकांना कॉल करून हे विचारण्याचा प्रयत्न करत होतो कि त्यांना

कुणी असे लोक माहित आहेत का ज्यांना विमा घेण्याची इच्छा आहे. पण बहुतेक वेळा, मला फोनवर व्यक्ती नव्हे तर उत्तर देणारी मशीन मिळत असे आणि मग मी नाईलाजाने त्या मशीनवर माझा संदेश नोंद करत असे. आणि मग जर त्यांना विमा घेण्याची इच्छा असेल तर ते मला परत कॉल करत असत. एका दिवसात 90 कॉल केल्यानंतर, मी दोन ते तीन लोकांना भेटण्याची वेळ निश्चित करू शकत होतो, आणि त्यापैकी कुणीतरी विमा घेईलच अशी अपेक्षा करत असे.

अशा प्रकारे प्रयत्न करत असतांनाच एक दिवस मी डेव्हला भेटलो. आम्ही फोनवर बोलत असतांना, त्याने नवीन क्षेत्रात करिअर शोधण्याची इच्छा व्यक्त केली आणि त्याला जाणून घ्यायचे होते कि माझ्याकडे त्याच्या साठी काय ऑफर आहे. मी त्याला म्हणालो कि मला संध्याकाळी त्याच्या घरी येऊन त्याला भेटण्याची इच्छा आहे आणि त्याने त्याला होकार दिला. मी त्याच्या घरी गेलो आणि त्याला व त्याच्या पत्नीला काही प्रश्न विचारले, तू सध्या कुठे काम करतोस, तुला करिअर बदल का हवा आहे आणि तुमची सध्याची आर्थिक परिस्थिती काय आहे याबद्दल मी सर्व सामान्य प्रश्न विचारू लागलो. लोकांशी बोलत असतांना मी सहसा त्यांच्या वैयक्तिक आर्थिक परिस्थितीबद्दल विचारत असे, कारण त्यांनी जर कंपनीच्या संबंधात निर्णय घेतला नाही तर माझ्याकडे निदान त्यांची आर्थिक स्थिती काय आहे ह्याची नोंद असायची, त्यामुळे मी हे जाणून घेण्याचा प्रयत्न करत असे कि त्यांच्या कडे इतर कोणता विमा आहे, आणि आता त्यांनी कोणता विमा घेण्याविषयी विचार करावा.

मला हे पाहून आश्चर्य वाटले कि, जेंव्हा आम्ही त्यांच्या सध्याच्या आर्थिक परिस्थितीबद्दल चर्चा करत होतो, तेंव्हाडेव्ह ची पत्नी निराशेने रडू लागली. त्यांची आर्थिक परिस्थिती डबघाईला आली होती आणि त्यांना काय करावे किंवा काय बदल करावे हे काहीच कळत नव्हते. मला समजले की त्यांची समस्या विमा नाही. त्यांना त्यांची कमाई वाढवणे आणि कर्जातून बाहेर पडणे आवश्यक होते, म्हणून मी त्यांना सांगू लागलो कि ड्रेंडा आणि मी देवाचे राज्य आणि ते कसे कार्य करते हे कसे शिकलो. मी त्यांना आश्वासन दिले की मी त्यांची मदत करण्यासाठी जे काही शक्य होईल ते करेन आणि त्यांच्या जीवनात परिवर्तन होण्या साठी लागू होणाऱ्या बाबींवर चर्चा करण्यासाठी त्या आठवड्यात पुन्हा भेटेन.

त्या अपॉइंटमेंटनंतर ऑफिसला जातांना मला खूप वाईट वाटत होते. मी विचार करत होतो, नक्कीच काहीतरी असेलच ज्या द्वारे मी त्यांची मदत करू शकतो!

ऑफिसला परत आल्यावर, मी माझ्या टेबलवर बसलो आणि अचानक मला एक कल्पना सुचली. मी विचार केला कि त्यांच्याकडे सध्या ज्या विमा योजना आहेत, त्याऐवजी मी जर त्यांना अधिक लाभ देणाऱ्या आणि कमी पैसे भराव्या लागणाऱ्या योजनांचा पर्याय शोधला तर त्यांना त्याचा फायदा होईल. ह्यामागे माझा उद्देश्य हा होता कि असे केल्याने त्यांच्या कडे कर्ज फेडण्या साठी थोडे जास्त पैसे असू शकतील. ह्यावेळेस इंटरनेट ची सुविधा नव्हती, म्हणून मला सर्व माहिती आणि पर्याय टेलेफोन च्या यलो पेजेस च्या पुस्तकात शोधावे लागत असे आणि मग प्रत्येक ठिकाणी फोन करावा लागत असे.

त्यांच्याकाडे असलेले विमा किंवा अन्य उत्पादनाची माहिती तपासून काढायला मला एक आठवडा लागला. आणि मला जे आढळून आले ते पाहून मी खरोखरच आश्चर्यचकित झालो. त्यांची सध्याची पॉलिसी ची दरमाही मध्ये फेरबदल करून किंवा पॉलिसीची कंपनी बदलून मी त्यांचे दरमाहा $600 वाचवले. त्यानंतर मी कॅल्क्युलेटर वर हिशोब करून त्यांच्या सध्याच्या कर्जाच्या दरमाही मध्ये हे वाचवलेले $600 जोडले, आणि परिणाम बघितला.

कॅल्क्युलेटर वर तो आकडा पाहून मी स्तब्ध होऊन तिथेच बसलो. नक्कीच, मी कुठेतरी चूक केली असेल. माझ्या हिशोबातून असे दिसून आले की हे जोडपे सात वर्षांपेक्षा कमी कालावधीत, त्यांच्या उत्पन्नात बदल न करता, त्यांच्या घराच्या कर्जातून, पूर्णपणे कर्जमुक्त होऊ शकतील. मला वाटले हे अशक्य आहे. म्हणून मी पुन्हा हिशोब केला, आणि मला पुन्हा तेच आढळून आले.

मग मी माझ्या फाईल ड्रॉवरमधून माझ्या इतर क्लायंटच्या काही फाईल्स काढल्या आणि त्या आठवड्यात त्या सर्व तपासल्या. माझ्या सध्याच्या क्लायंटप्रमाणेच, त्यांच्यापैकी प्रत्येकजण आपल्या उत्पन्नात काहीही बदल न करता, पाच ते सात वर्षांत आपल्या घराच्या कर्जा व्यतिरिक्त इतर कर्जातून देखील पूर्णपणे कर्जमुक्त होऊ शकतो असे मला दिसून आले. जर हे शक्य आहे, आणि मला आता हे समजून आले आहे, तर कोणीही ह्या बद्दल स्पष्टपणे का सांगत नाही? मी माझ्या क्लायंटसाठी हा सर्व हिशोब ज्यामध्ये ते सात वर्षांपेक्षा कमी कालावधीत पूर्णपणे कर्जमुक्त कसे होऊ शकतात हे दाखवले होते तो

टाइप केला आणि त्याचे प्रिंट आऊट काढले. मी त्यांना पुन्हा भेटून मला जे सापडले होते ते त्यांना दाखवण्यास खूप उत्सुक होतो आणि ते ऐकून त्यांची प्रतिक्रिया काय असेल हे देखील पाहण्याची उत्सुकता मला होती.

डेव्ह आणि त्याच्या पत्नीसोबत बसून मी त्यांना नीट समजावून सांगितले कि ते आहे त्याच उत्पनांतून पैसे कसे वाचवू शकतात. पैसे वाचवण्याची योजना सांगत असतांना मी जाणूनबुजून शेवटची विशेष गोष्ट त्यांच्या पासून लपवून ठेवली. मी त्यांना हे सर्व समजावून सांगत असतांना, ते दोघेही आश्चर्यचकित होऊन स्तब्ध बसले होते. त्यांच्या मतानुसार त्यांच्याकडे पैसे नव्हते आणि कर्जातून बाहेर पडण्याचा कोणताही मार्ग त्यांच्या कडे नव्हता - अजिबात नव्हता! मी माझ्या खुलाश्याचे शेवटचे पान उघडले, आणि त्यांना सांगितले कि तुम्ही सात वर्षांपेक्षा कमी कालावधीत, तुमच्या घरा साठी घेतलेल्या कर्जातून मुक्त होऊ शकता, हे ऐकताच, डेव्ह ने आनंदाने उडीच मारली आणि त्याच्या डोळ्यातून अश्रू वाहू लागले. तो आनंदाने भारावून गेला. ते दोघेही रडू लागले आणि मी त्यांच्या कडे आल्याबद्दल वारंवार माझे आभार मानू लागले. त्यानंतर मी, देवाने मला जे काही प्रकट केले होते आणि देवाच्या राज्याबद्दल मी आतापर्यंत जे काही शिकलो होतो ते सर्व त्यांना सांगण्यात काही वेळ घालवला. ते दोघेही माझे बोलणे अगदी लक्ष देऊन ऐकत होते!

मला माझ्या ह्या ग्राहकाकडून एकही पैसा मिळाला नाही, पण मला त्यांच्या सोबत काम करायला मिळाले ह्याबद्दल मला सर्वात जास्त आनंद होता; आणि आता माझे मन आनंदाने जणूकाही ताशी दहा लाख मैल वेगाने धावत होते. आता मला माझ्या प्रत्येक ग्राहका साठी असेच करायचे होते, पण त्याच्या कडून एकही पैसे न घेता मला त्या कामा बद्दल पैसे कसे मिळतील हे समजण्यासाठी मी प्रभूकडे ज्ञान माहीतले. जर मला समजले कि ह्या कामातून पैसे कसे कमवायचे तर हे माझे नवीन व्यवसाय मॉडेल असेल हे मला माहित होते. काही प्रयत्नांनंतर, आम्हाला आमची सेवा ग्राहकाला मोफत देऊन देखील, आम्ही डिझाइन केलेल्या रेफरल सिस्टमद्वारे आमच्या व्यवसायासाठी पैसे कमवण्याचा मार्ग सापडला. हे विश्वास ठेवण्यासारखे नव्हते पण मी आणि ड्रेंडा ह्या बाबतीत खूप उत्साहित होतो.

मला माहित होतं की स्वप्नात जे दर्शन पहिले होते तेच हे परिवर्तन होतं. मला माहित होतं की आम्ही स्वप्नातील अंडकोशाच्या टप्प्यावर आहोत, तरी मी लवकरच उडून भरारी घेण्यासाठी अगदी तयार होतो! खऱ्या अर्थाने उडण्यासाठी मला अजून खूप काही शिकायचं

होतं, पण मला माहित होतं की मी योग्य मार्गावर आहे.

आम्ही आमची नवीन कंपनी स्थापन केली आणि तिचे नाव फेथ-फुल फॅमिली फायनान्स असे ठेवले कारण आम्हाला माहित होते की विश्वासाने तुमची आर्थिक स्थिती भरपूर होईल; आणि आम्ही देत असलेल्या आर्थिक सल्ल्या पेक्षाही हाच संदेश सर्वांना द्यायचा होता. आम्ही 20 वर्षांहून अधिक काळ ते नाव कायम ठेवले पण आम्हाला जाणवले कि हे नाव ख्रिश्चन आहे आणि आम्हाला अधिक अविश्वासू लोकांपर्यंत पोहोचायचे होते, म्हणून आम्ही आमचे नाव फॉरवर्ड फायनान्शियल ग्रुप असे बदलण्याचा निर्णय घेतला, आणि आजपर्यंत तेच नाव आहे. (तसे, आम्ही अजूनही त्या मोफत कर्ज योजना करतो तसेच लोकांना त्यांच्या सेवानिवृत्ती खात्यांसाठी बाजारातील जोखीम टाळण्यास मदत करतो. तुम्ही फॉरवर्ड फायनान्शियल ग्रुपशी 1-(800)-815-0818 वर किंवा Forwardfinancialgroup.com वर ऑनलाइन संपर्क साधू शकता.)

आमची ही कंपनी सुरू करताना आम्ही अजूनही मोठ्या कर्जात होतो, तरीही आम्हाला माहित होते की आम्ही योग्य मार्गाने जात आहोत. कंपनीला खूप मोठे यश मिळाले आणि मी आणि ड्रेंडा सुमारे अडीच वर्षांत कर्जमुक्त झालो. ते किती रोमांचक होते हे मी तुम्हाला सांगू शकत नाही! अचानक, आमच्या जीवनातून जीवन आहे म्हणून जगायचे ही भावना संपून गेली आणि आमच्या मध्ये एक नवीन दृष्टिकोन उत्पन्न होऊ लागला.

आमच्यासाठी नवीन गाडी रोख पैसे देऊन विकत घेणे फार आनंददायक होते. ओहायोमधील काही सर्वात सुंदर जमिनीपैकी 55 एकर जमीन नगद पैसे देऊन खरेदी करणे हा आमच्यासाठी शब्दांनी वर्णन न करता येण्यासारखा अनुभव होता. आमच्या स्वप्नातील 7,700 चौरस फूट घर नकदी पैसे देऊन बांधणे हे अविश्वसनीय होते! आमच्या ह्या नवीन घराचे बांधकाम सुरु झाले तेंव्हा पाया खोदण्याचे काम मी ड्रेंडासोबत उभे राहून पाहत असायचो हे मी कधीही विसरणार नाही. आमच्या घराचे तळघर आम्ही राहत असलेल्या त्या फार्महाऊसपेक्षा मोठे होते. ते खोदकाम पाहत असतांना आम्हा दोघांची डोळे अश्रूंनी भरली होती. आम्ही पृथ्वीवरील आमचे नऊ वर्षांचे नरकमय जीवन मागे पडतांना पाहत होतो. आम्हाला समजले कि परिस्थिती कधीही सारखीच राहत नसते. आम्हाला देवाचे राज्य सापडले आणि आता आम्हाला कळले की संदेष्टा यशया त्याला सुवार्ता का म्हणतो.

*प्रभू परमेश्वराचा आत्मा माझ्यावर आला आहे; कारण दीनांना शुभवृत्त सांगण्यास परमेश्वराने मला अभिषेक केला आहे.*

—यशया 61:1

खरं सांगायचं तर, अशा अविश्वसनीय गोष्टी घडत असल्याने मला आणि ड्रेंडाला स्वतःला वारंवार चिमटा काढावा लागत होता. कर्जातून पूर्णपणे बाहेर पडणे हे एकेकाळी एक अशक्य स्वप्न होते, पण आता ते वास्तवात उतरले होते!

आता पहा, मी इतका चांगला नाहीये! तुम्ही माझा इतिहास पाहिला आहे. मी वर्षानुवर्षे माझ्या पद्धतीने प्रयत्न केला, कठोर परिश्रम केले पण मनाला वेदना आणि तणावाशिवाय काहीही प्राप्त झाले नाही. देवाच्या मार्गाने जीवन कसे जगायचे हे मी शिकत होतो आणि त्यामध्ये मला यश मिळत होते. आणि म्हणूनच आज तुम्ही हे पुस्तक वाचत आहात, मला काय प्राप्त झाले ते जाणून घेण्या साठी आणि तुम्हाला ते कसे प्राप्त होईल हे जाणून घेण्यासाठी. पण प्रथम तुम्हाला हे लक्षात आले पाहिजे की मी एका नवीन व्यवस्थेचा, एका नवीन राज्याचा आणि जीवन जगण्याच्या पूर्णपणे नवीन पद्धतीचा वापर केला आहे. हेच उत्तर तुमच्यासाठी देखील आहे. तुम्हाला हेच उत्तर हवे आहे. हीच ती चांगली बातमी आहे ज्याची तुम्ही वाट पाहत आहात. मला माहिती आहे, मला माहिती आहे, तुमचे चर्च हे शिकवत नाही. आणि, माझेही चर्च ते शिकवत नव्हते, पण हे सर्व बायबलमध्ये आहे.

## देव—नेहमीच चांगला आहे

तर आता मी तुम्हाला मी काय म्हणतोय ते समजून घेण्यासाठी एक प्रमुख गुरुकिल्ली देतो - धर्म किंवा धार्मिकता सोडून द्या! हा धार्मिक मुद्दा नाही. हे देवाबद्दल आहे, तो तुम्हाला काय हवे आहे आणि त्याने येशूद्वारे तुम्हाला राज्य देण्यासाठी किंमत कशी दिली याबद्दल आहे. तर, चला राज्याचा शोध घेऊ या आणि ते कसे कार्य करते ते पाहू या.

जेव्हा ड्रेंडा आणि मी आमच्या आयुष्यात देवाचे राज्य कसे कार्य करत आहे हे पाहू लागलो, तेंव्हा आम्हाला बऱ्याच वेळा बऱ्याच परिस्थिती बद्दल आश्चर्य वाटले. आम्हाला जाणवले की बहुतेक विश्वासणाऱ्यांना ते कसे कार्य करते याची कल्पना नव्हती. उदाहरणार्थ, मी नुकतीच एक बातमी वाचली कि, एका सात वर्षांच्या मुलीचा टॉन्सिलेक्टोमीच्या ऑपरेशन दरम्यान टेबलावर मृत्यु झाला. जरी ही शस्त्रक्रिया अत्यंत सामान्य आणि सामान्यतः खूप

सुरक्षित असली तरी, ऑपरेशन दरम्यान तिचे हृदय बंद पडले, ही अत्यंत दुःखद घटना होती. ही बातमी ऐकून आम्ही सर्वांनीच दुःखाचा उसासा टाकला. परंतु, ही घटना जितकी दुःखद होती, तितकीच दुःखाची आणखी एक बाब होती ज्या मुळे ह्या संपूर्ण कुटुंबाच्या जीवनावर त्याचा परिणाम होणार होता. त्या मुलीच्या वडिलांनी एका पत्रकाराला काय म्हटले ते मी इथे जसेच्या तसे सांगत आहे.

> "तुम्हाला समजत नाही की या गोष्टी का घडतात, पण आम्हाला माहित आहे की ही देवाची योजना होती. आणि तीच एकमेव गोष्ट आहे जी आम्हाला ह्या दुःखातून बाहेर काढू शकते, कारण आम्हाला माहित आहे की ती देवाची योजना होती."3

मी ग्रीन बे पॅकर्सचा क्वार्टरबॅक आरोन रॉजर्सबद्दल देखील ह्या ठिकाणी सांगू इच्छितो, त्याची ही कहाणी 22 जानेवारी 2020 च्या पीपल मासिकात प्रकाशित झाली होती. 4

> रॉजर्सने आपली कहाणी सांगत असतांना स्पष्टपणे सांगितले कि तो लहानपणी धर्म आणि त्या संबंधित बाबींवर प्रश्न उठवत असे पण आता तो मोठा झाल्यावर "वेगळ्या प्रकारच्या अध्यात्मिक" जीवनाशी त्याचा संबंध आहे. "मला माहित असलेले बहुतेक लोक, चर्चला म्हणजे .... तुम्हाला जावे लागते म्हणून जातात." तो असेही म्हणाला, "मला माहित नाही की तुम्ही अशा देवावर कसे विश्वास ठेवू शकता जो पृथ्वीवरील जास्तीत जास्त लोकांना अग्निच्या नरकात टाकू इच्छितो. असा कोणता प्रेमळ, संवेदनशील, सर्वव्यापी, सर्वशक्तिमान देव आहे जो शेवटी आपल्या सुंदर निर्मितीला अग्निच्या नरकात टाकू इच्छितो?"

ह्या वेड्यासारख्या टिप्पण्या आहेत! पण जर ते देवाबद्दल असे विचार करतात, तर तुम्हाला मान्य करावे लागेल की, जो देव त्यांच्या सात वर्षांच्या मुलीला घेऊन जातो त्या देवावर कोण विश्वास ठेवायला किंवा त्याची सेवा करण्यासाठी तयार होऊ शकेल? कोणीही नाही! आणि जो देव पृथ्वी वरील बहुतेक लोकांना नरकात टाकू इच्छितो अशा देवाची सेवा करायला कोणाला आवडेल? कुणालाही नाही! पण बहुतेक ख्रिस्ती लोक असेच मानतात. तुम्ही बऱ्याचदा हे ऐकले असेल: “देवाने ते होऊ दिले,” “देवाने ते केले,” “ती देवाची योजना होती,” “त्याची जाण्याची वेळ आली होती,” आणि अशी अनेक विधाने. आणि, मी निश्चितपणे

सांगू शकतो की तुम्ही देखील असेच विचार करत असाल. म्हणून आता मी स्पष्ट बोलणार आहे. जर तुम्हाला खरोखरच असे वाटते की देव असाच आहे, तो स्वेच्छेने लेकरांना मारतो किंवा एखाद्याला कर्करोग होऊ देतो, तर आपल्याला ह्या विषयी गंभीरपणे बोलण्याची गरज आहे. मी त्याविषयी अशा प्रकारे म्हणेल:

**ज्याच्यावर तुमचा भरंवसा नाही त्याच्यावर तुम्ही कधीही विश्वास ठेवणार नाही!**

जर तुम्हाला असे शिक्षण मिळाले असेल कि आपण देवावर भरंवसा ठेवू शकत नाही कारण तो निष्पाप लोकांना मारतो, पण तुम्ही तसा विश्वास करता की तो सृष्टीचा सर्वशक्तिमान निर्माता आहे, तर आपण त्याची उत्तम बाजू जाणून घेऊन त्यावर टिकून राहण्याचा सर्वतोपरी प्रयत्न केले पाहिजे.

भूतकाळात अनेक आदिम संस्कृतींमध्ये लोक हेच करायचे. क्रोध करणाऱ्या देवाला संतुष्ट करण्यासाठी ते अनेक प्रकारचे नैवेद्य दाखवत असत. ते स्वतःला सर्व प्रकारच्या बंधनांमध्ये ठेवत असत, हे प्रगट करण्यासाठी की ते खरोखरच त्याच्या अधीन आहेत, आणि ह्या आशेने कि त्याचा क्रोध शांत होईल, ते स्वतःला अनेक प्रकारच्या वेदनांनी पीडा देत असत. पण बायबलमधील देव खरोखर असा आहे का? आपल्याला देवाची भीती वाटतच जगले पाहिजे का? नाही, अर्थातच नाही. देव आपल्या विरुद्ध आहे किंवा आपण त्याच्यावर विश्वास ठेऊ शकत नाही ही विचारसरणी आदाम आणि हव्वा यांच्यापासून बागेत सुरू झालेल्या अयोग्य शिकवणीचा परिणाम आहे.

> *परमेश्वर देवाने केलेल्या सर्व वनचरांत सर्प फार धूर्त होता. तो स्त्रीला म्हणाला, "तुम्ही बागेतल्या कोणत्याही झाडाचे फळ खाऊ नये असे देवाने तुम्हांला सांगितले हे खरे काय?" स्त्रीने सर्पाला म्हटले, "बागेतल्या झाडांची फळे खाण्याची आम्हांला मोकळीक आहे: पण बागेच्या मध्यभागी असलेल्या झाडाच्या फळाविषयी देवाने सांगितले आहे की ते खाऊ नका; त्याला स्पर्शही करू नका, कराल तर मराल." सर्प स्त्रीला म्हणाला, "तुम्ही खरोखर मरणार नाही; कारण देवाला हे ठाऊक आहे की तुम्ही त्याचे फळ खाल त्याच दिवशी तुमचे डोळे उघडतील. आणि तुम्ही*

*देवासारखे बरेवाईट जाणणारे व्हाल."त्या झाडाचे फळ खायला चांगले, दिसायला मनोहर आणि शहाणे करायला इष्ट आहे असे त्या स्त्रीला दिसून आले; तेव्हा तिने त्याचे फळ काढून खाल्ले, आणि आपल्याबरोबर आपल्या पतीलाही ते दिले व त्याने ते खाल्ले.*

—उत्पत्ती 3:1-6

सैतान उत्पत्तीच्या सुरुवाती पासून देवाच्या चारित्र्यावर शंका घेत आला आहे. आश्चर्याची गोष्ट म्हणजे, हव्वेला ज्या ज्ञानाची कमतरता भासत होती ती खरे तर देवाशी असलेल्या तिच्या संबंधामुळे तिला आधीच प्राप्त झालेली होती. तरीही सैतान तिला हे पटवून देऊ शकला की तिच्यामध्ये काहीतरी उणीव आहे जी देव तिच्यापासून लपवून ठेवत आहे. आदाम आणि हव्वेने देवाबद्दल सांगितल्या गेलेल्या खोट्या गोष्टीवर विश्वास ठेवला आणि आपल्या साठी वेगळे राज्य तयार करण्याच्या उद्देश्याने स्वेच्छेने त्याच्या राज्यात आपले स्थान गमावून बसले. त्यांना असे वाटले की सैताना जवळ त्यांच्यासाठी चांगले भविष्य आहे. परंतु लक्षात घ्या कि, त्यांच्या ह्या निर्णयामुळे त्यांच्या जीवनात केवळ दुःख, यातना आणि मृत्यूच आला.

सैतानाच्या डावपेचांमध्ये कधीही बदल झालेला नाही आणि त्याचे सर्वात मोठे लक्ष्य चर्च आहे ह्यात आश्चर्य करण्यासारखे काही नाही. सैतानाला पायाखाली घालण्याचा आणि प्रत्येक सामन्यामध्ये त्याला पराभूत करण्याचा अधिकार मंडळीला आधीच प्राप्त झालेला आहे, तरीही त्याची एकमेव शस्त्रे तेंव्हा होती तशीच आहेत, फसवणूक आणि खोटेपणा.

## देवाचे चरित्र

तुमच्या भविष्याविषयी आणि तुमच्या तरतुदींविषयी, हा सर्वात महत्त्वाचा विषय आहे जो आपल्याला प्रथम हाताळण्याची गरज आहे, तो म्हणजे देवाचे चरित्र. जर आपण हा प्रश्न सोडवला नाही, तर तुम्ही "श्रीमंत कसे व्हावे" हे सांगणाऱ्या इतर पुस्तकांप्रमाणे ह्या पुस्तकाला देखील बाजूला टाकून द्याल. माझी आशा आहे की तुम्ही मला यातून तुम्हाला मार्गदर्शन करण्यासाठी वेळ द्याल. मला आशा आहे की तुम्हाला खरोखर आर्थिकदृष्ट्या मुक्त व्हायचे आहे आणि तुम्हाला समज आणि ज्ञान हवे आहे. यावेळी, शिकवण आदाम आणि हव्वेला फसवणाऱ्या लबाड सैतानाकडून नाही तर स्वतः देवाकडून आहे.

सर्वात आधी, मी हे समजू शकतो कि तुम्हाला असे का वाटते की देव वाईट गोष्टी घडू देतो. म्हणजे जर तो देव असेल तर त्याला काहीही करण्याची शक्ती आहे, बरोबर? म्हणजे जर सात वर्षांचा मुलगा मरण पावला आणि देवाकडे त्याचा मृत्यू थांबवण्याची शक्ती असेल तर त्याने त्याचा मृत्यू होऊ दिला असेल. तर, हे वाक्य काही प्रमाणात खरे आहे. जरी देवाकडे त्याचा मृत्यू थांबवण्याची शक्ती होती, तरी त्याला ते थांबवण्याचा कायदेशीर अधिकार नव्हता. मी पुढील प्रकरणात या अधिकार क्षेत्राच्या मुद्द्यावर चर्चा करणार आहे, परंतु मला आता प्रथम चारित्र्याच्या मुद्द्यावर चर्चा करायची आहे आणि नंतर तुम्हाला खात्री करून घ्यायची आहे की देव चांगला आहे आणि त्याचे वचन सत्य आहे.

तुम्हाला कदाचित प्रश्न पडेल की हे इतके महत्त्वाचे का आहे. या पुस्तकात आपण पुढे जातांना, मी राज्याचे कायदे, त्यांचे कार्य आणि त्या कायद्यांनी मला ज्या आर्थिक नरकात मी राहत होतो त्यातून कसे मुक्त केले याबद्दल चर्चा करणार आहे. जर तुम्ही राज्याच्या राजावरच विश्वास ठेवला नाही, तर त्याच्या कायद्यांचा तुमच्यासाठी काहीही अर्थ राहणार नाही.

लक्षात ठेवा, ह्या प्रवासात मला पहिला शोध हा लागला की देवाचे राज्य हे एक सरकार आहे. या सरकारचा एक राजा आहे जो राज्याचे कायदे ठरवतो. हे कायदे राज्यात राहणाऱ्या नागरिकां साठी उपलब्ध फायदे आणि जबाबदाऱ्या प्रस्तुत करतात. ते राज्यातील प्रत्येक नागरिकाला त्यांच्या जीवनासाठी राजाच्या द्वारे मिळणाऱ्या संरक्षणाची  हमी देतात. राजाचे कायदे स्वतः समजून घेणे ही राजाचे चारित्र्य समजून घेण्याची पूर्वअट आहे.

मी आधी म्हटल्याप्रमाणे, एकदा जेंव्हा मला समजले की देवाचे राज्य हे एक असे सरकार आहे ज्यामध्ये जे कायदे आणि फायदे आहेत ते कायदेशीररित्या राज्याच्या प्रत्येक नागरिकाचे अधिकार आहेत, तेंव्हा मी एक आध्यात्मिक शास्त्रज्ञ झालो. तेव्हा मला कळले की राज्याच्या प्रत्येक कृतीमागे, एक आध्यात्मिक कायदा आहे जो त्याला चालना देतो. तेव्हा माझ्या मध्ये आशा उत्पन्न झाली, कि मी ते कायदे शिकू शकतो! कोणीही शिकू ते शकतो! कीथ आणि कॅथीला देखील हे समजले.

## चार वर्षांत त्यांचे आयुष्य बदलले

कीथ आणि कॅथी एका सामान्य नोकरी करत होते आणि त्यांना सामान्य पगार मिळत होता, ते सामान्य जीवन जगत होते. त्यांनी नुकतेच एक नवीन घर घेतले होते आणि

त्यानंतर कीथची नोकरी गेली. पण, कीथला एक वर्षापूर्वी आमच्या फिक्सिंग द मनी थिंग टीव्ही शोबद्दल माहिती मिळाली आणि त्याने माझ्या काही साहित्याचा अभ्यास त्यावर मनन करण्यात, राज्याबद्दल आणि नागरिक म्हणून त्याच्या कायदेशीर हक्कांबद्दल जाणून घेण्यात वेळ घालवला.

जेंव्हा त्याची नोकरी गेली तेंव्हा त्याने त्याबद्दल प्रार्थना केली आणि दुसरी नोकरी शोधण्याऐवजी स्वतःची ट्रकिंग कंपनी सुरू करण्याचा निर्णय घेतला.

त्याने हे मान्य केले की त्याला या व्यवसायाबद्दल फारशी माहिती नव्हती, पण त्याला वाटले की तो शिकू शकतो. त्याने सामान हलविण्यासाठी त्याचा ट्रक भाड्याने देण्याचा व्यवसाय एका ट्रकने सुरू केला आणि त्यानंतर तो गाड्या आणि इतर जे काही साधन त्याला भाड्याने देता येईल ते तो देऊ लागला. कीथ आणि कॅथी ह्या व्यवसायाबद्दल शिकत राहिले, एका राष्ट्रीय कंपनीला मोठ्या प्रमाणात सामान हलवण्याची आवश्यकता होती आणि कीथ आणि कॅथी साठी हे एका नवीन संधीचे दार उघडले. कीथसाठी हे एक मोठे पाऊल होते आणि त्यासाठी त्याला स्वतःची कंपनी असणे आणि ट्रकिंग वाहतूक व्यवसायासंबंधीचे बरेच कायदे शिकणे आवश्यक होते - परंतु त्याने ते स्वीकारले आणि देव त्याचे मार्गदर्शन करत आहे यावर विश्वास ठेवला.

**देव चांगला नाही असे सांगणारी कोणतीही व्यक्ती किंवा कोणतीही परिस्थिती तुम्हाला ते खोटे सांगते!**

तेंव्हा पासून, कंपनीने चांगलीच प्रगती केली आहे. आता, तो दररोज आठ सेमी ट्रान्समिशन पूर्णवेळ करतो. कीथने मला सांगितले की त्याच्या कॉर्पोरेट नोकरीत तो आठवड्याला सुमारे $1,500 कमवत असे. स्वतःची ट्रकिंग कंपनी सुरू केल्याच्या पहिल्या वर्षात, कीथ म्हणाला की तो आठवड्याला जवळजवळ $4,000 कमवू लागला. दुसऱ्या वर्षी, कीथने आठवड्याला $15,000 पेक्षा जास्त कमाई केली. त्याच्या पुढच्या वर्षी, त्याने आठवड्याला $25,000 आणि त्याच्या पुढच्या वर्षी $38,000 पेक्षा जास्त कमाई केली. कीथने चार वर्षात दरवर्षी $78,000 ते डॉलर दोन दशलक्ष कमाई केली!

मी हा अध्याय लिहित असतांना मला कीथकडून एक मेसेज आला. त्याने सांगितले की

त्याला आणखी फक्त चार ड्रायव्हर्स कामावर ठेवावे लागेल आणि आता त्याची आठवड्याची कमाई $70,000 आहे. चार वर्षांच्या कालावधीत वर्षाला $78,000 वरून तो आठवड्याला $70,000 पर्यंत पोहचला! ह्याने माझे लक्ष वेधून घेतले! कीथ आणि कॅथी आता आणखी दोन कंपन्या सुरू करण्याची योजना आखत आहेत आणि भविष्यात आणखी मोठ्या गोष्टी घडतील अशी अपेक्षा करत आहेत.

जर तुम्ही कीथ आणि कॅथी यांना विचारले की त्यांनी हे कसे केले, तर ते सर्व श्रेय राज्य कसे कार्य करते ह्या शिक्षणाला देतील. कीथ आणि कॅथी तुम्हाला पहिली गोष्ट सांगतील की त्यांना देवाबद्दल आणि तो कसा कार्य करतो याबद्दल आयुष्यभर जे अयोग्य शिक्षण मिळाले होते, ते सोडून द्यावे लागले. त्यांना ज्या गोष्टींवर लक्ष केंद्रित करणे आवश्यक होते त्यापैकी एक म्हणजे देव चांगला आहे, नेहमीच चांगला आहे आणि तो कधीही खोटे बोलत नाही. देव चांगला नाही असे सांगणारी कोणतीही व्यक्ती किंवा कोणतीही परिस्थिती तुम्हाला ते खोटे सांगते!

> *माझ्या प्रिय बंधूंनो, फसू नका; प्रत्येक उत्तम देणगी व प्रत्येक पूर्ण दान वरून आहे; ज्याला विकार नाही व जो फिरण्याने छायेत जात नाही अशा ज्योतिमंडळाच्या पित्यापासून ते उतरते.*
>
> —याकोब 1:16-17

दुसरे म्हणजे, ते तुम्हाला सांगतील की त्यांना पूर्णपणे नवीन पद्धतीने दान द्यायला शिकावे लागले. त्यांना मिळणाऱ्या पैशातून देवाच्या सेवाकार्याला पाठिंबा देणे ही त्यांच्या यशाची एक महत्वाची गुरुकिल्ली आहे.

ह्या विषयी बायबल स्पष्ट आहे. लोकांसोबत घडणाऱ्या भयानक गोष्टींसाठी देवाला दोष देणे योग्य नाही. बायबल म्हणते की सैतानच मारण्यासाठी, चोरी करण्यासाठी आणि नाश करण्यासाठी येतो.

> *चोर येतो तो केवळ चोरी, घात व नाश करायला येतो; मी तर त्यांना जीवनप्राप्ती व्हावी व ती विपुलपणे व्हावी म्हणून आलो आहे.*
>
> —योहान 10:10

आणि येशू त्या पहिल्या वाक्या नंतर काय म्हणतो ते लक्षात घ्या, “मी तर त्यांना जीवनप्राप्ती व्हावी व ती विपुलपणे व्हावी म्हणून आलो आहे.” किंवा काही भाषांतरांमध्ये म्हटले आहे की “अधिक विपुल प्रमाणात जीवन देण्यासाठी आलो आहे”. देव तुमचा शत्रू नाही. पण जर तुम्हाला वाटत असेल की तो तुमचा शत्रू आहे, तर याकोब 1:16 नुसार, तुम्हाला कोणीतरी फसवले आहे. तुम्हाला स्वतःला हा प्रश्न विचारावा लागेल की देव खोटे बोलतो हे तुम्हाला कोणी सांगितले. त्या सात वर्षांच्या मुलाला देवाने मारले हे तुम्हाला कोणी सांगितले? देव कधीकधी व्यक्तीला बरे करतो आणि कधीकधी बरे न करण्याचा निर्णय घेतो हे तुम्हाला कोणी सांगितले? मी कदाचित अंदाज लावू शकतो कि तुम्हाला हे कोणी सांगितले असेल - असा एखादा उपदेशक ज्याला देवाविषयी एवढेच ज्ञान आहे. परंतु जर तुम्हाला देवाकडून प्राप्त करून घेण्याची इच्छा असेल तर हे एक वचन आहे जे धरून ठेवण्याची तुम्हाला आवश्यकता आहे. देव खोटे बोलत नाही! खरं तर, बायबल म्हणते की त्याला खोटे बोलणे अशक्य आहे (इब्री करांस पत्र 6:18).

मी पुन्हा एकदा म्हणेन कि, लोक असे मानतात की देव नेहमीच चांगला नसतो कारण त्यांना पृथ्वीवरील राज्याची कायदेशीर व्यवस्था समजत नाही. मी आधी सांगितल्याप्रमाणे, आपण पुढील प्रकरणात ह्यावर चर्चा करणार आहोत, आणि त्यातून तुमच्या अनेक प्रश्नांची उत्तरे तुम्हाला मिळतील. परंतु जर तुम्हाला राज्य कसे कार्य करते हे समजून घ्यायचे असेल, तर तुम्हाला हे माहित असले पाहिजे की देव चांगला आहे आणि तो कधीही खोटे बोलत नाही.

## देवाच्या राज्याचे स्थिरांक

एकेकाळी, मी एक धडा शिकलो आणि मला वाटते कि तो इथेही लागू होईल. आम्हाला शिकवण्यात आले होते की जेंव्हा तुम्ही भौतिक पदार्थ हाताळता तेंव्हा त्यांचे काही गुणधर्म कधीही बदलत नाहीत आणि ते स्थिर राहतात. तुम्हाला समजले का मी काय म्हणत आहे ते! या नियमांना भौतिकशास्त्रात स्थिरांक म्हणतात. उदाहरणार्थ, 0 अंश सेल्शियश वर पाणी गोठते. तो एक स्थिरांक आहे; हे समीकरण कधीही बदलत नाही. त्याचप्रमाणे, देव चांगला आहे ही वस्तुस्थिती एक स्थिरांक आहे. तर पाण्याच्या बाबतीत, तुम्ही पाण्याशी संबंधित तुमच्या सर्व समीकरणांमध्ये पाण्याच्या गोठण्याच्या तापमानाचा एकच स्थिरांक वापरत असता.

*तेव्हा परमेश्वर त्याला म्हणाला, “मनुष्याचे तोंड कोणी केले आहे? मनुष्याला मुका, बहिरा, डोळस किंवा आंधळा कोण करतो? मी परमेश्वरच की नाही?*

—निर्गम 4:11-12 (KJV)

पहिल्या दृष्टीक्षेपात, असे दिसते की देव लोकांना जाणूनबुजून आंधळे आणि बहिरे बनवतो. परंतु आपण आपला स्थिरांक लक्षात ठेवला पाहिजे - की देव नेहमीच चांगला आहे. चला तेच शास्त्रवचन वेगळ्या आवृत्तीत काय म्हणते ते पाहूया.

*मग परमेश्वराने मोशेला विचारले, "माणसाचे तोंड कोण बनवते? लोकांनी बोलावे किंवा बोलू नये, ऐकावे किंवा ऐकू नये, किंवा पाहावे किंवा पाहू नये हे कोण ठरवते? मी, परमेश्वरच नाही का?"*

—निर्गम 4:11 (NLT)

ह्या शास्त्रभागात संदर्भ असा आहे की देवाने मोशेला त्याच्या स्वतःच्या लोकांकडे, इब्री लोकांकडे जाण्यास सांगितले आहे आणि तो म्हणाला कि तू त्यांना हे सांग, की देवाने त्याला फारोकडे इब्री लोकांना मुक्त करण्याची मागणी करण्यासाठी जाण्यास सांगितले आहे. त्यावेळेस मोशे देवाला विचारतो, "जर इब्री लोकांनी विश्वास ठेवला नाही की तू मला दर्शन दिले आहेस तर?" तेंव्हा देव त्याला अशा काही गोष्टी करण्यास सांगतो जेणेकरून ते विश्वास ठेवतील. पण मग मोशे परमेश्वराकडे विनंती करतो,

*“हे प्रभू, मी बोलका नाही; पूर्वीही नव्हतो, व तू आपल्या दासाशी बोललास तेव्हापासूनही नाही; मी तर मुखाचा जड व जिभेचाही जड आहे.”तेव्हा परमेश्वर त्याला म्हणाला, "माणसाचे तोंड कोण बनवते? लोकांनी बोलावे किंवा बोलू नये, ऐकावे किंवा ऐकू नये, किंवा पाहावे किंवा पाहू नये हे कोण ठरवते? मी, परमेश्वरच नाही का?"तर आता जा, मी तुझ्या मुखास साहाय्य होईन आणि तू काय बोलायचे ते तुला शिकवीन.”*

—निर्गम 4:10–12 (NLT)

देव मोशेला काय म्हणत होता ते मी आपल्या शब्दात तुम्हाला सांगतो. मी माणसाचे तोंड बोलण्यासाठी बनवले की बोलू नये म्हणून? मी माणसाचे डोळे पाहण्यासाठी बनवले

की पाहू नये म्हणून? उत्तर स्पष्ट आहे. तोंड बोलण्यासाठी बनवले गेले आहे आणि डोळे पाहण्यासाठी बनवले गेले आहे. देव मोशेला एवढेच सांगण्याचा प्रयत्न करत आहे. म्हणजे, देव म्हणत आहे, "जर मी तोंड बनवले आहे, तर मी तुम्हाला ते वापरण्यास नक्कीच मदत करू शकतो!" देव मोशेला हे समजावून सांगण्याचा प्रयत्न करत आहे की जेव्हा तो इब्री लोकांकडे जाईल, तेव्हा त्याने हा विश्वास करावा कि देव मला बोलण्यास मदत करणारच आहे. परंतु देवाबद्दल आपला योग्य दृष्टिकोन नसल्यामुळे, आपण त्याचा जो उद्देश्य आहे त्याचा चुकीचा अर्थ लावतो. मला वाटते की आपल्या सर्वांना माहित आहे कि मोशेला नीटपणे बोलता येत नव्हते. बहुतेक लोक मानतात कि हेच पूर्णतः सत्य आहे, पण ते खरोखरच तसे आहे का? ह्याला उत्तर म्हणून, तुम्ही म्हणाल, "अगदी निश्चितच. मोशेने स्वतः म्हटले की त्याला नीटपणे बोलता येत नाही." हो मी मान्य करतो, त्याने तसे म्हटले आहे, पण कशाच्या संदर्भात? जर मोशे नीटपणे बोलू शकत नव्हता, तर आपल्याला प्रेषितांची कृत्ये 7:22 चे स्पष्टीकरण करणे आवश्यक आहे.

> *मोशेला मिसरी लोकांच्या सर्व विद्यांचे शिक्षण मिळाले आणि तो भाषणात व कृतीत पराक्रमी होता.*
>
> —प्रेषितांची कृत्ये 7:22 (NLT)

खरंतर, आपण ह्या ठिकाणी पाहतो की मोशे जे म्हणतो कि मला नीटपणे बोलता येत नाही पण खरे तर तो ह्या वस्तुस्थितीच्या अगदी विरुद्ध होता. तो बोलण्यात शक्तिशाली आणि निपुण होता. तर मग मोशे देवाला जेंव्हा म्हणतो की, “हे प्रभू, मी बोलका नाही; पूर्वीही नव्हतो, व तू आपल्या दासाशी बोललास तेव्हापासूनही नाही; मी तर मुखाचा जड व जिभेचाही जड आहे.” याचा अर्थ काय? जेंव्हा निर्गम 4 मध्ये मोशे हे म्हणतो कि मला नीटपणे बोलता येत नाही, तेंव्हा तो हे सांगण्याचा प्रयत्न करत आहे कि त्याला इब्री भाषा चांगली बोलत नाही. तो इब्री लोकांसोबत वाढला नव्हता. तो इजिप्शियन म्हणून वाढला होता आणि प्रामुख्याने इजिप्शियन भाषा बोलत होता. देव मोशेला आश्वासन देत आहे की त्याने माणसाचे तोंड बनवले आहे म्हणून, तो त्याला इब्री लोकांशी बोलण्यास मदत करेल. पण पुन्हा एकदा, मोशे थांबून म्हणतो.

*तेव्हा तो म्हणाला, "हे प्रभू, तुझ्या मर्जीस येईल त्याच्या हस्ते त्यांना संदेश पाठव." मग मोशेवर परमेश्वराचा राग भडकला, तो त्याला म्हणाला, "लेवी अहरोन हा तुझा भाऊ नाही काय? त्याला चांगले बोलता येते हे मला ठाऊक आहे. पाहा, तो तुला भेटायला येत आहे; तुला पाहून त्याला मनात आनंद होईल. तू त्याच्याशी बोलून त्याच्या मुखात शब्द घाल; मी त्याच्या व तुझ्या मुखाला साहाय्य होईन, आणि तुम्ही काय करायचे ते तुम्हांला शिकवीन. तो तुझ्यातर्फे लोकांशी बोलेल; तो तुझे मुख होईल आणि तू त्याला देवाच्या ठिकाणी होशील.*

—निर्गम 4:13-16

निष्कर्ष असा आहे की अहरोन इब्री भाषा उत्तम प्रकारे बोलत होता, कारण तो इब्री म्हणून वाढला होता आणि तो मोशेसाठी इब्री लोकांशी बोलू शकत होता, मोशेने तोतरा नव्हता किंवा त्याला बोलता येत नव्हते असे नाही.

तर आता तुम्हाला समजले आहे की देवाच्या चारित्र्याबद्दल योग्य आणि स्थिर दृष्टिकोन असणे किती महत्त्वाचे आहे. तो नेहमीच चांगला आहे ह्यावर दृढपणे विश्वास ठेवल्या मुळे आपण एखाद्या शास्त्रभागा संबंधी विचार करून त्याचा नेमका अर्थ काय आहे हे योग्यप्रकारे जाणून घेण्या साठी त्याचा खोलवर अभ्यास करू शकतो. तर पुन्हा एकदा तुम्हाला सांगू इच्छितो कि, राज्याचा तुमचा पाया म्हणजे त्या राज्याच्या राजाचे चारित्र्य जाणून घेणे. आणि तुम्ही ते जाणून घेतले नसेल, तर सैतान तुम्हाला फसवू शकतो, जसे त्याने हव्वेला फसवले, तो तुम्हाला म्हणू शकतो कि देव संपूर्ण सत्य सांगत नाही किंवा त्याहूनही वाईट म्हणजे, तो तुमच्याशी खोटे बोलला आहे असा विश्वास करण्यास तुम्हाला भाग पाडू शकतो.

**बायबलमध्ये देवाचे मूल म्हणून तुमचे कायदेशीर हक्क परिभाषित करणारे 7,000 हून अधिक 'वचने' आहेत.**

## देवाची अभिवचने समजून घेणे

बायबलमध्ये देवाचे मूल म्हणून तुमचे कायदेशीर हक्क परिभाषित करणारे 7,000 हून अधिक 'वचने' आहेत. प्रत्येक वचन राजा स्वतः तुम्हाला देतो आणि आपण निश्चितपणे

त्यावर विश्वास ठेवू शकतो. किंवा असे करणे शक्य आहे का? जर देवाच्या चांगुलपणाबद्दल शंका उपस्थित केली जाऊ शकते, तर त्याच्या वचनांबद्दल देखील शंका उपस्थित केली जाऊ शकते हे तितकेच खरे आहे.

मी तुम्हाला एक उदाहरण देतो. समजा मी तुम्हाला $1,000 चा चेक दिला, तर त्याबद्दल तुम्ही माझे आभार मानाल आणि तुमच्या मनात, तुम्ही हे समजू लागलं कि तुमच्याकडे आता $1,000 आहेत. तुमच्याकडे आता $1,000 आहेत अशाप्रकारे तुम्ही वागू लागलं, तुमचे बोलणे देखील अशाच प्रकारचे होईल आणि पुन्हा एकदा त्या $1,000 बद्दल तुम्ही माझे आभार मानाल. पण वस्तुस्थिती अशी आहे की तुमच्याकडे खऱ्या अर्थाने ते $1,000 नाहीत; तुमच्याकडे फक्त त्याची हमी देणारा कागदाचा तुकडा आहे. चेक हे फक्त एक वचन आहे जे मी तुम्हाला दिले आहे की तुम्हाला माझ्या बँकेकडून $1,000 मिळविण्याचा कायदेशीर अधिकार आहे. प्रत्यक्षात पैसे मिळविण्यासाठी तुम्हाला तो चेक कॅश करावा लागेल! पण तुमच्या साठी माझा हेतू स्पष्ट आहे म्हणून, मी तुम्हाला स्वेच्छेने तो चेक दिला आणि त्यावर स्वाक्षरी केली, आणि जरी तुमच्या कडे केवळ हमी देणारा तो चेक आहे तरी तुम्ही विश्वास धरला आहे कि आता माझ्याकडे $1,000 आहेत.

निश्चितपणे देव माझ्यापेक्षा महान आहे. त्याचे वचन खोटे नाही. तो आपल्याला त्याची महान आणि मौल्यवान वचने देतो. जर देव तुम्हाला त्याचे वचन देतो, तर ते पूर्ण झाले आहे! देवाचे वचन पूर्ण होण्यापासून रोखण्यासाठी सैतान फक्त एकच गोष्ट करू शकतो ती म्हणजे तुमच्या मनामध्ये देवाच्या वचनाबद्दल संशय निर्माण करणे. म्हणूनच देव चांगला आहे आणि खोटे बोलत नाही हे तुम्हाला माहित असणे अत्यंत महत्वाचे आहे. मी तुम्हाला आणखी एक उदाहरण देतो. मला माहित आहे की अनेकांनी ऐकले आहे की ह्या काळात चमत्कार होत नाहीत आणि येशू पृथ्वीवर असतांना देवाने त्याच्या द्वारे जे केले ते तो आता करत नाही. मी एका अतिशय रूढीवादी चर्चमध्ये वाढलो आणि खरे सांगायचे तर, त्याठिकाणी मी कधीही देवाचे सामर्थ्य प्रकट झालेले पाहिले नाही, किमान मला तसे आठवत नाही. तर मी त्या ठिकाणी लोकांना बरे होतांना पाहिले नाही म्हणून याचा अर्थ असा होतो का की देव आता लोकांना बरे करत नाही? याचे उत्तर, आपण आपल्या अनुभवानुसार देऊ शकत नाही. बायबल काय म्हणते, रोग्यांना बरे करण्या बद्दल राजाचा नियम काय आहे हे शोधण्याची आपल्याला आवश्यकता आहे.

*नासोरी येशूला देवाने पवित्र आत्म्याचा व सामर्थ्याचा अभिषेक केला; तो सत्कर्मे करत व सैतानाच्या सत्तेखाली असलेल्या सर्वांना बरे करत फिरला; कारण देव त्याच्याबरोबर होता.*

—प्रेषितांची कृत्ये 10:38

आपण पाहू शकतो की, बरे करणे हे येशूच्या सेवेचे एक प्रमुख लक्षण होते. ह्या शास्त्रभागात म्हटले आहे की येशूने सर्वांना बरे केले कारण देव त्याच्यासोबत होता. आता "देव त्याच्यासोबत होता" हे वाक्य तुम्हाला समजून घेणे आवश्यक आहे. अर्थात, पृथ्वीवरील त्याच्या संपूर्ण आयुष्यात देव येशूसोबत होता. परंतु ह्या ठिकाणी जो संदर्भ आहे तो म्हणजे येशू पाण्याचा बाप्तिस्मा घेतला तेंव्हा पवित्र आत्मा त्याच्यावर कबुतरासारखा उतरला ह्याचा आहे. ह्या घटनेपूर्वी, येशूने कोणतेही चमत्कार केले नव्हते. येशूने बालपणी नाश्ता करत असतांना तो वाढवून खूप लोकांना पुरेल एवढा केला नाही, किंवा त्याने लहानपणी कुणाला तरी आजारापासून बरे केले अशी कुठेही नोंद नाही. पवित्र आत्म्याने त्याला अभिषेक केल्यानंतरच त्याची सेवा वास्तविकरीत्या सुरू झाली. तो काम करत असतांना देव त्याच्यासोबत होता.

बरं, तुम्ही म्हणाल, "हो, येशूने बरे केले, पण तो आता येथे नाही." होय, मी तुमच्या सोबत सहमत आहे, तुम्ही म्हणता ते बरोबर आहे, पण त्याने ते काम मंडळीला दिले आहे. येशूवर उतरलेले तेच सामर्थ्य मंडळीला देखील देण्यात आले आहे. येशू पृथ्वी सोडून जात असतांना, त्याने आपल्या शिष्यांना पुढील गोष्टी सांगितल्या.

*परंतु पवित्र आत्मा तुमच्यावर येईल तेव्हा तुम्हांला सामर्थ्य प्राप्त होईल, आणि यरुशलेमेत, सर्व यहूदीयात, शोमरोनात व पृथ्वीच्या शेवटापर्यंत तुम्ही माझे साक्षी व्हाल."*

—प्रेषितांची कृत्ये 1:8

येशूने केलेले चमत्कार करण्यासाठी हेच सामर्थ्य, अर्थात पवित्र आत्मा, मंडळीवर उतरला.

तुम्ही मला वेगळे काही सांगण्याचा प्रयत्न करू शकत नाही. माझी मुलगी एमीच्या पोटात 6 किलो वाजनाचा ट्यूमर होता. देवाच्या वचनानुसार आम्ही सर्वांनी तिच्या बरे

होण्यासाठी प्रार्थना केली आणि रात्रि ती झोपायला गेली आणि सकाळी पूर्णपणे बरी झाली. 6 किलो वाजनाचा ट्यूमर पूर्णपणे निघून गेला होता आणि तिची पाठ (जी गाठींनी भरलेली आणि मुरगळलेली होती) पुन्हा पूर्णपणे सरळ झल्ली होती. तुम्ही तिची ही साक्ष तिच्या हील्ड ओवरनाइट या पुस्तकात पाहू आणि वाचू शकता. माझ्या सुनेच्या काखेत संत्र्याच्या आकाराचा ट्यूमर होता, डॉक्टरांनी सांगितले होते की तो शस्त्रक्रियेने काढून टाकावा लागेल. त्यांनी सांगितले की तिला एक दुर्मिळ प्रकारचा कर्करोग आहे आणि ती फ़क्त एक ते दोन महिनेच जगू शकेल. तिने देखील देवाच्या वचनांवर विश्वास ठेवला आणि सकाळी उठल्यावर ती पूर्णपणे बरी झाली. ट्यूमर पूर्णपणे निघून गेला होता.

माझी पत्नी, ड्रेंडा, हिच्या पाठीवर 50 पैशाच्या नाण्याच्या आकाराचा गोळा होता. तिने तय गोळ्याला तिच्या शरीरातून निघून जाण्याची आज्ञा दिली आणि दोन आठवड्यांत तो गोळा पूर्णपणे नाहीसा झाला.

या महिलांना बरे करण्याची निवड देवाने केली का? हे करण्याची निवड देवाने करावी असे काही होते का? त्याला या तीन महिला तुमच्यापेक्षा जास्त आवडत होत्या का? नाही! ह्या तिघींना राज्याचे कायदे आणि फायदे समजले आणि त्यांनी त्यावर फक्त दावा केला. "बरं, ठिक आहे," तुम्ही विचाराल, "इतके लोक आजारी का आहेत? आपल्या चर्चमध्ये नेहमीच लोक बरे होत असतांना आपल्याला का दिसत नाहीत?"

तुम्ही हा प्रश्न विचारला याचा मला खूप आनंद आहे. पुढच्या प्रकरणात आपण त्याबद्दल जाणून घेऊ या.

अध्याय 3

# अधिकार क्षेत्राचा मुद्दा

मी आधी म्हटल्याप्रमाणे, मी ओहायोमधील गावाच्या बाहेरील भागात असलेल्या उत्तम जमिनीपैकी एक 60 एकर जमीन विकत घेतली आणि त्याच ठिकाणी मी राहतो. सुरुवातीला माझ्याकडे 55 एकर जमीन होती, पण माझ्या शेजाऱ्याने माझ्या जमिनीला लागून असलेली एक जमीन मला विकली, ज्यामुळे माझी एकूण जमीन 60 एकर झाली. गेल्या 22 वर्षांपासून आम्ही ह्या जमीनी वर राहत आहोत आणि आम्हाला येथे राहणे फार आवडते. हरणांची शिकार करण्यासाठी जंगल, बदकांची शिकार करण्यासाठी दलदल असलेली जागा आणि ससे आणि तीतरांची शिकार करण्यासाठी शेतं असणे, तसेच आमच्या चारचाकी वाहनांवर फिरणे हा आमच्या साठी फार मोठा आशीर्वाद आहे. पण जर तुम्ही माझ्या ह्या जागेवर येऊन पाहिले तर तुम्हाला वेगवेगळ्या ठिकाणी पाट्यांवर लिहिलेले दिसेल "अतिक्रमण करू नये". ह्या पाट्या अशासाठी लावलेल्या आहेत कि जेणेकरून लोकांना कळावे की माझ्या मालमत्तेची सीमा कुठून सुरू होते.

ओहायोमधील कायद्यानुसार, कुणालाही जर माझ्या जमिनीवर प्रवेश करायचा असेल आणि काही काळ तिथे राहायचे असेल तर त्या व्यक्ती जवळ सततमाझे लेखी संमतीपत्र असणे आवश्यक आहे. जर त्यांनी तसे केले नाही तर त्याला अतिक्रमण म्हटले जाते आणि त्यांना कायदेशीररित्या बाहेर काढले जाऊ शकते आणि या प्रक्रियेत त्यांना त्याबद्दल दंड भरावा लागतो. मुद्दा असा आहे की जर कुणी माझ्या जमिनीवर माझ्या नकळत प्रवेश करण्याचा प्रयत्न केला तर त्याला त्या प्रकारे स्वतः तो निर्णय घेऊन तिथे प्रवेश करण्याचा कायदेशीर अधिकार नाही, कारण ती त्यांची जमीन नाही. जर मी त्यांना माझ्या जमिनीवरून निघून जाण्यास सांगितले तर त्यांना जावे लागेल, ते निवड करू शकत नाहीत!

थोडक्यात, ज्यावर तुमचा कायदेशीर अधिकार नाही अशा ठिकाणी तुम्ही कब्जा करू शकत नाही.

अतिक्रमनाच्या ह्या उदाहरणावरून "तुमची आर्थिक क्रांती: तरतुदीचे सामर्थ्य" ह्या पुस्तकात, देवाच्या राज्यात काही गोष्टी का घडतात किंवा का घडत नाहीत याबद्दल अनेकांच्या मनात असलेल्या अनेक प्रश्नांची उत्तरे मिळतील. पण राज्यात प्रभावीपणे काम करण्यासाठी राज्यातील अधिकार क्षेत्राचा मुद्दा समजून घेणे ही एक पूर्वअट आहे.

## ते बरे का होऊ शकले नाही?

मला खात्री आहे की तुम्ही अशा प्रकारची गोष्ट ऐकली असेल. कोणीतरी प्रसिद्ध व्यक्ती आजारी पडतो आणि त्याच्यासाठी प्रार्थना केली जाते. लाखो लोक या व्यक्तीच्या बरे होण्या साठी प्रार्थनेत सामील होतात, पण तरीही ही व्यक्ती मरण पावते. का? किंवा कोणीतरी ते आपल्या आजी साठी खूप प्रार्थना करत होते तरी त्यांची आजी मरण पावली, आणि असे का झाले हे समजण्याची त्यांची इच्छा आहे.  किंवा कोणीतरी तुम्हाला म्हणेल की त्यांनी त्यांच्या आर्थिक गरजा पूर्ण व्हाव्यात म्हणून विश्वासाने दान देण्याचे बी पेरले, तरीही ते अजूनही अडचणीत आहेत. या प्रकारच्या प्रश्नांची उत्तरे आहेत का?

मी याचे उत्तर देण्यापूर्वी, आपण हे मान्य करूया की आत्मिक क्षेत्रात काय चालले असते हे आपल्याला संपूर्णपणे माहित नाही आणि मी देखील हे दर्शविण्याचा प्रयत्न करत नाही की मला सर्व काही माहिती आहे. परंतु, देवाच्या वचनाच्या आधारे, आपल्याला माहित आहे की जर कोणी आजारी असेल तर येशूने तो निरोगी व्हावा म्हणून किंमत मोजली आहे. आपल्याला माहित आहे की जर आपण उदारपणे दान दिले तर बायबल म्हणते की आपल्याला परत मिळेल. तरीही, आपण दररोज पाहतो की, अनेक लोकांच्या जीवनात, देवाच्या वचनात ज्या प्रमाणे लिहिले आहे त्या प्रमाणे कार्य होत नाही. तर मग यासाठी देवच दोषी आहे का?

गेल्या अध्यायात आपण जे शिकलो ते पाहिल्या नंतर आणि ह्या अध्यायात आपण या विषयावर चर्चा करत असतांना, तुम्हाला ह्याचे उत्तर "नाही" असेच मिळेल. जर नाही, तर समस्या काय आहे? हा एक प्रमुख प्रश्न आहे. बहुतेक लोक ज्यांना देव नेहमीच चांगला आहे याची मूलभूत समजही नसते, त्यांना जेव्हा विचारले जाते की देवच एखाद्या दुर्घटनेसाठी जबाबदार आहे का, तेव्हा दिसून येते कि त्यांनी असेच गृहीत धरलेले आहे. कारण त्यांना माहित आहे की देवा कडे वाईट गोष्टी घडण्यापासून रोखण्याचे सामर्थ्य  आहे तरीही त्याने

तसे केले नाही, म्हणून त्यांना वाटते की त्यांच्या जीवनात जे झाले ते त्याने होऊ दिले असावे. परंतु जर तुम्हाला हे समजले असेल की देव चांगला आहे आणि तो खोटे बोलू शकत नाही, तर तुम्हाला कळेल की समस्या इतर कुठेतरी आहे आणि तुम्ही उत्तर शोधण्याचा प्रयत्न सुरू कराल.

जेव्हा शिष्यांना दुष्ट आत्म्याने ग्रासलेल्या मुलामधून तो दुष्ट आत्मा काढता आला नाही तेव्हा त्यांनी आपल्या मनातील विचार अशा प्रकारे प्रगट केले. "देवाने त्या दुष्ट आत्म्याला तिथे त्या मुलामध्ये का राहू दिले?" असे विचारण्याऐवजी त्यांनी येशूला विचारले, "आम्ही त्या दुष्ट आत्म्याला का काढू शकलो नाही?"

जेव्हा परिस्थिती देवाच्या वचनाच्या विरुद्ध आहे असे वाटते तेंव्हा हा आपला तात्काळ प्रश्न असला पाहिजे. म्हणून पुन्हा एकदा सांगू इच्छितो की, आपण सर्वप्रथम, हे जाणून घेतले पाहिजे की, देव चांगला आहे आणि दुसरे म्हणजे, तो खोटे बोलत नाही. म्हणूनच जे खऱ्या अर्थाने सोपे आहे परंतु जागतिक मंडळीला ते फार मोठे गूढ आहे असे वाटते ते समजावून सांगण्यात मी इतका वेळ घालवला आहे. प्रश्न विचारायचे तर, राज्य कसे कार्य करते हे जाणून घेण्यासाठी तुम्ही बायबल कसे वाचले पाहिजे हे समजून घेणे असावे.

लक्षात ठेवा, बायबल मधे ज्या महान घटना नमूद केलेल्या आहेत त्या एका विशिष्ट कारणासाठी आहेत. त्या द्वारे येशू तुम्हाला काहीतरी दाखवण्याचा प्रयत्न करीत आहे. तर आता, देवाच्या वचनात सांगितलेल्या गोष्टी एखाद्या व्यक्तीला का मिळू शकल्या नाहीत यावर आपण विचार करू या. लक्षात ठेवा, स्वर्गाच्या अधिकारक्षेत्रात शॉर्ट-सर्किटिंग करणारे अनेक मुद्दे असू शकतात. काही मुद्दे लगेच स्पष्ट होत नाहीत आणि काही वैयक्तिक आणि लपलेले असतात.

**देवाचे राज्य हे एक राज्यच आहे आणि ते कधीही न बदलणारे कायदे आणि सिद्धांत ह्यांच्या आधारावर चालते.**

देवाचे राज्य हे एक राज्यच आहे आणि ते कधीही न बदलणारे कायदे आणि सिद्धांत ह्यांच्या आधारावर चालते. मी आधी म्हटल्याप्रमाणे, आपण हे सिद्धांत शिकू शकतो आणि त्यांचा उपयोग करू शकतो, अगदी ज्याप्रमाणे एक शेतकरी पृथ्वीवरील क्षेत्रात पेरणी आणि

कापणीचे नियम समजून घेतो आणि त्या नियम आणि कायद्यांचा वापर समृद्धीसाठी करतो. कारण हे राज्य प्रत्येक नागरिकाला समजून घेण्यासाठी आणि वापरण्यासाठी दिलेल्या कायद्यांद्वारे चालते, म्हणून कोणीही ते शिकू शकतो. कधीकधी, हे कायदे कसे कार्य करतात हे जाणून घेणे जीवन आणि मृत्यूचे इतके महत्वपूर्ण असू शकते.

जीवन आणि मृत्यूचा निर्णय

मार्क आणि हन्ना आमच्या चर्चमध्ये आले आणि ते बाळ होण्यासाठी प्रार्थना करत होते. आतापर्यंत अनेक डॉक्टरांनी हन्नाला सांगितले होते की तिच्या शरीरातील विविध समस्यांमुळे, तिला गर्भवती होणे किंवा बाळाला जन्म देणे जवळजवळ अशक्य होईल. परंतु फेथ लाईफ चर्चमध्ये देव कसा चांगला आहे हे ऐकून आणि राज्याचे कायदे आणि सिद्धांत शिकत असताना, तिला कळले की ती गर्भवती आहे. शब्दांत सांगता येणार नाही एवढा आनंद तिला झाला. पण लवकरच तिला पोटात तीव्र वेदना होऊ लागल्या. काही वेळा, काही वेळां त्या वेदना इतक्या तीव्र होत होत्या की ती एक दोन वेळेस बेशुद्ध पडली.

असे एक दोन वेळेस झाल्या नंतर, डॉक्टरांनी तिला काही तपासण्या करायला सांगितल्या म्हणून ती तिच्या डॉक्टरां कडे गेली. तिचे डॉक्टर तिथे नव्हते, म्हणून जे डॉक्टर त्या ठिकाणी ड्युटीवर होते त्यांनी तिची परिस्थिती पाहण्यासाठी अल्ट्रासाऊंड करण्यास सांगितले. अल्ट्रासाऊंड मध्ये डॉक्टरांना रक्ताची मोठी गुठळी दिसली, आणि त्यांनी तिला सांगितले की तिचा गर्भपात झाला आहे, अर्भकाच्या हृदयाचे ठोकेही येत नव्हते. डॉक्टरांनी तिला सांगितले कि त्या मृत अर्भकाला गर्भाशयातून काढून टाकण्यासाठी तिला दुसऱ्या दिवशी दवाखान्यात यावे लागेल, परंतु हन्नाने नकार दिला. तिचा पती मार्कने हन्नाला देवाच्या वचनाने आणि देवाने दिलेल्या अभिवचनांनी प्रोत्साहित केले आणि बाळाबद्दलच्या तिच्या विश्वासापासून तिने डळमळू नये म्हणून प्रोत्साहन दिले. त्या आठवड्यात चर्चमध्ये तिच्या साठी प्रार्थना करण्यात आलू आणि डॉक्टरांनी तिला जे सांगितले होते ते माहित असतांना देखील तिला खात्री होती की तिला एक निरोगी बाळ होणार आहे.

त्या सोमवारी, ती तिच्या वैयक्तिक डॉक्टरांना भेटायला गेली, कारण ती तपासणी साठी गेली होती त्या दिवशी हे डॉक्टर तिथे नव्हते. तिच्या डॉक्टरांनी तिला पुन्हा अल्ट्रासाऊंड करण्याचा सल्ला दिला. हन्ना म्हणाली की, डॉक्टरांनी अल्ट्रासाऊंड स्क्रीनवर जे पाहिले त्यामुळे तिला फार आश्चर्य वाटले, म्हणून तिने लगेच काही दिवसांपूर्वी केलेल्या स्कॅनकडे

पाहिले. आणि त्यानंतर ती हन्नाला म्हणाली: “मी हे काम 30 वर्षांपासून करत आहे, आणि मी यापूर्वी असे होताना कधीही पाहिले नाही. गेल्या आठवड्याच्या स्कॅनमध्ये मला रक्ताचा मोठा गोळा दिसत होता आणि अभ्रकाच्या हृदयाचे ठोके नाहीत हे निदान केले गेले होते. आज मी जे पाहत आहे त्यात हे दिसून येत आहे कि तो रक्ताचा गोळा आता तिथे नाही, तो गोळा गायब झाला आहे आणि गर्भामध्ये सुंदर जिवंत बाळ आहे, त्याच्या हृदयाचे ठोके उत्तम प्रकारे सुरु आहेत.” काही महिन्यांनंतर, हन्नाने एका निरोगी बाळाला जन्म दिला, तिचे नाव तिने एव्हलिन ठेवले. एके दिवशी तिने उत्सुकतेने एव्हलिन नावाचा अर्थ पहिला, आणि तिला हे पाहून आश्चर्य वाटले की त्या नावाचा अर्थ खरोखर जीवन आहे!

ही अद्भुत घटना अर्थातच देवाचे काम होते, पण एक आध्यात्मिक शास्त्रज्ञ म्हणून, तुम्ही आत्ताच हे का घडले? अशा काही प्रश्नांचा विचार करायला हवा. हन्ना देवाला आवडणाऱ्या विशेष लोकांपैकी एक आहे का? देवाने तिच्या बाळाला बरे करण्याचा निर्णय उगाचच घेतला का? हे असे प्रश्न आहेत ज्यांची उत्तरे मिळणे अत्यंत आवश्यक आहे. पुन्हा एकदा, सामान्य ख्रिस्ती लोकांच्या दृष्टीने, हा फक्त एक चमत्कार घडला आहे. परंतु मी लोकांना प्रोत्साहित करतो कि त्यांनी चमत्कार या शब्दाविषयी अधिक जाणून घेण्यासाठी विचार करावा कारण ह्या शब्दामध्ये काहीतरी असामान्य आहे. राज्यात, हे फक्त राज्याच्या कायद्याचे कार्य होते.

जर मी एक दगड वरुन खाली टाकला तर तो जमिनीवरच पडणार, पण मी जर ओरडून म्हटले, "वाह, पाहिल का तुम्ही ते? पहा तो दगड जमिनीवर पडला; हा तर चमत्कार आहे!" तुम्ही माझ्या ह्या म्हणण्याला अजिबात सहमत होणार नाही, कारण तुम्हाला माहिती आहे की ही क्रिया फक्त गुरुत्वाकर्षणाच्या नियमाचे कार्य आहे आणि ते प्रत्येक वेळी प्रत्येकासाठी सारखेच कार्य करते. दगड नेहमीच जमिनीवर पडेल. म्हणून एक आध्यात्मिक शास्त्रज्ञ म्हणून, तुम्ही जे घडले ते कसे घडले ह्याचा शोध घेतला पाहिजेत, ते आध्यात्मिक संकेत जे त्या परिस्थिती मध्ये राज्याचे नियम किंवा कायदे प्रगट करतात.

## एक किल्ली उघड झाली

चला आपण आणखी एक घटना पाहू या जिथे आपण या प्रश्नांच्या संदर्भात राज्याच्या कार्याबद्दल अधिक जाणून घेऊ शकतो. बायबलमधील सर्वात महान घटनां पैकी एक जी आपल्याला काही उत्तरे शोधण्यास मदत करेल ती लूकच्या आठव्या अध्यायात आढळते.

> *कारण त्याला सुमारे बारा वर्षांची एकुलती एक मुलगी होती, ती मरणास टेकली होती. मग तो जात असता लोकसमुदाय त्याच्याभोवती गर्दी करत होता. तेव्हा बारा वर्षे रक्तस्राव होत असलेली (जिने आपली सर्व उपजीविका वैद्यांवर खर्च केली होती) व कोणालाही बरी करता न आलेली अशी कोणीएक स्त्री त्याच्या पाठीमागे येऊन त्याच्या वस्त्राच्या गोंड्याला शिवली आणि लगेच तिचा रक्तस्राव थांबला. पण येशू म्हणाला, "मला कोणी स्पर्श केला?" तेव्हा सर्व जण 'मी नाही' असे म्हणत असता पेत्र व त्याचे सोबती म्हणाले, "गुरूजी, लोकसमुदाय तुम्हांला दाटी करून चेंगरत आहेत! अन् तुम्ही म्हणता कोणी मला स्पर्श केला?" पण येशू म्हणाला, "कोणीतरी मला स्पर्श केलाच, कारण माझ्यातून शक्ती निघाली हे मला समजले आहे." मग आपण गुप्त राहिलो नाही असे पाहून ती स्त्री कापत कापत पुढे आली व त्याच्या पाया पडून, आपण कोणत्या कारणाकरता त्याला शिवलो व कसे तत्काळ बरे झालो, हे तिने सर्व लोकांच्या समक्ष निवेदन केले. तेव्हा तो तिला म्हणाला, "मुली, धीर धर, तुझ्या विश्वासाने तुला बरे केले आहे; शांतीने जा."*
>
> —लूक 8:42-48

या घटनेत, आपल्याला एक स्त्री दिसते जी अनेक वर्षांपासून खूप आजारी होती आणि बरी होऊ शकत नव्हती. येशूच्या मागे येऊन तिने त्याच्या वस्त्राला स्पर्श केला आणि ती लगेच बरी झाली. आता, या ठिकाणी राज्याच्या कार्याचे काही अतिशय सखोल संकेत आहेत ज्यातून आपण शिकू शकतो आणि त्यामुळे आपण शोधत असलेली काही उत्तरे प्रकाशात येतील.

सर्वप्रथम, येशूभोवती असलेल्या गर्दीतील लोक त्याला स्पर्श करत होते. ह्या ठिकाणी सांगितल्याप्रमाणे, त्या गर्दीमुळे तो जवळजवळ चिरडला जात होता. जेव्हा येशूने विचारले, "मला कोणी स्पर्श केला?" तेव्हा पेत्राला प्रश्न पडला कि येशू असे का विचारत आहे, कारण त्याला दिसत होते कि सर्वच लोक त्याला स्पर्श करत होते. परंतु येशू म्हणाला की या विशिष्ट व्यक्तीने त्याला वेगळ्या प्रकारे स्पर्श केला आहे, कारण त्याला पवित्र आत्म्याची शक्ती त्याच्यातून बाहेर निघत असल्याचे जाणवले होते.

ही कथा वाचल्यानंतर, तुमच्या मनात अनेक प्रकारचे प्रश्न उत्पन्न व्हायला पाहिजेत आणि त्या मुळे तुम्ही थांबून काय घडले याचा विचार करण्यास उद्युक्त व्हावे असे झाले

पाहिजे. तुमचे मनात लगेचच चौकशीयुक्त प्रश्न उत्पन्न व्हायला हवेत. आध्यात्मिक शास्त्रज्ञ म्हणून, आपल्याला हे जाणून घेणे आवश्यक आहे की ही स्त्री का बरी झाली आणि इतर कोणीही का बरे झाले नाही. मी असा विचार करतो की तेथे असलेले बरेच लोक आजारी तर होते पण ते त्याला शारीरिकरित्या स्पर्श करत होते आणि ते बरे झाले नाहीत. म्हणून आपण हा प्रश्न विचारला पाहिजे की, "त्या क्षणी त्याला स्पर्श करणाऱ्या त्या स्त्रीलाच त्याचा अभिषेक प्राप्त झाला पण इतर सर्वांनाच तो अभिषेक का प्राप्त झाला नाही?"

पारंपारिक धार्मिक उत्तर असे आहे की येशूने तिला बरे केले म्हणून ती बरी झाली. पण त्याने तिला बरे केले का? ती बरी झाल्यानंतर येशू तिची विचारपूस करत होता का? तिने बरे व्हावे म्हणून त्याने तिच्यावर हात ठेवला होता का? त्याने आजाराला तिच्या शरीरातून निघून जाण्याची आज्ञा दिली का? नाही, अजिबात त्याने असे केले नाही. खरं तर, ती तिथे आहे हे देखील त्याला माहित नव्हते. त्याला विचारावे लागले की त्याला कोणी स्पर्श केला आहे. तर येशूने खरोखरच त्या क्षणी तिला बरे करण्याचा निर्णय घेतला का? पुन्हा लक्षात घ्या कि, त्याला माहित नव्हते की ती तिथे आहे. तर मग, ती कशी बरी झाली? ती का बरी झाली?

आध्यात्मिक शास्त्रज्ञ म्हणून, आपण हे निश्चितपणे म्हणू शकतो की ती देवासाठी एक विशेष व्यक्ती होती किंवा तिचा येशू सोबत विशेष संबंध होता, कारण प्रेषितांची कृत्ये 10:34 (KJV) मध्ये सांगितले आहे की देव कोणत्याही व्यक्तीला इतरां पेक्षा विशेष समजत नाही. आपण असेही गृहीत धरू शकतो की येशूला ती तिथे आहे हे देखील माहित नसल्यामुळे, त्या दिवशी बरे होण्याच्या तिच्या निर्णयात त्याचा कोणताही सहभाग नव्हता. आपण हे मान्य करतो की तो अभिषेकाचा स्त्रोत होता, परंतु त्या क्षणी बरे होण्याच्या तिने घेतलेल्या निर्णयात त्याचा भाग नव्हता.

येशू आपल्याला सांगतो की तिने राज्याच्या अधिकाराचा आणि सामर्थ्याचा कसा फायदा घेतला. तो म्हणाला, "मुली, तुझ्या विश्वासाने तुला बरे केले आहे. शांतीने जा." हे वाक्य आपल्याला जे काही जाणून घेण्याची आवश्यकता आहे ते सांगते आणि त्या दिवशी तिला जे मिळाले ते का आणि कसे मिळाले या आपल्या प्रश्नाचे उत्तर देते. आध्यात्मिक शास्त्रज्ञ म्हणून, चला या कथेचा बारकाईने विचार करूया आणि तिला जे मिळाले ते का मिळाले याचे काही संकेत आपल्याला मिळू शकतात का ते पाहूया.

सर्वात आधी हे पहा कि, येशू तिला मुलगी म्हणतो, याचा अर्थ ती इस्राएल राष्ट्राचा भाग होती, अब्राहामाची वंशज होती. अब्राहामाची मुलगी म्हणून, तिला अब्राहामाला मिळालेला आशीर्वाद आणि देवाने अब्राहामाशी केलेल्या कराराचे लाभ मिळाला.

> *"तू आपला देव परमेश्वर ह्याचे वचन मनापासून ऐकशील आणि त्याच्या दृष्टीने जे नीट ते करशील, त्याच्या आज्ञांकडे कान देशील आणि त्याचे सर्व विधी पाळशील, तर मिसरी लोकांवर जे रोग मी पाठवले त्यांपैकी एकही तुझ्यावर पाठवणार नाही; कारण मी तुला रोगमुक्त करणारा परमेश्वर आहे.*
>
> —निर्गम 15:26

म्हणून जेव्हा येशूने तिला मुलगी म्हटले, तेंव्हा याचा अर्थ देवाने अब्राहामा सोबत केलेल्या करारात समाविष्ट असलेल्या सर्व गोष्टींवर तिचा कायदेशीर अधिकार होता. परंतु, केवळ ही वस्तुस्थिती तिला तिच्या बरे होण्याचे एकमेव कारण असू शकत नाही कारण त्या दिवशी येशूला स्पर्श करणाऱ्या प्रत्येक व्यक्तीला हा कायदेशीर अधिकार प्राप्त होता. त्या ठिकाणी देवाच्या राज्याचे सामर्थ्य प्रवाहित होण्याचे निश्चितपणे दुसरे काहीतरी कारण असावे. तिला जे आरोग्य प्राप्त झाले त्याचे आणखी एक कारण येशू आपल्याला सांगतो. खरं तर, येशूने सांगितले की ह्याच विशिष्ट कारणामुळे तिला वैयक्तिकरित्या आरोग्य प्राप्त झाले. तो म्हणाला की तिच्या विश्वासाने तिला बरे केले.

तर, आता आपल्याला माहित आहे की तिला हे का मिळू शकले. ती अब्राहामची मुलगी असल्याने कायदेशीररित्या तिला हे मिळण्याचा अधिकार होता आणि दुसरे म्हणजे, तिचा विश्वास हे स्वीच प्रमाणे होते ज्यामुळे त्या क्षणी तिच्या शरीरात ते सामर्थ्य वैयक्तिकरित्या प्रवाहित होऊ शकले. ती मुलगी होती ह्या वस्तुस्थितीची तुलना आपण वीज चालू करणाऱ्या कंपनीशी आणि तुमच्या घरात येणाऱ्या तारांशी करू शकतो. वीज उपलब्ध आहे, परंतु याचा अर्थ असा नाही की तुमच्या घरातील दिवे चालू असतील. दिवे चालू होण्यासाठी तुम्हाला स्विच चालू करणे देखील आवश्यक आहे.

तर अब्राहामची कायदेशीर वंशज म्हणून, या महिलेला बरे होण्याचा कायदेशीर अधिकार होता. परंतु, ती पृथ्वीच्या आणि तिच्या स्वतःच्या जीवनाच्या अधिकार क्षेत्रात होती, म्हणून तिला ते सामर्थ्य प्राप्त करण्या साठी वैयक्तिकरित्या स्विच चालू करावे लागले.

पण स्विच कुठे आहे? आपण ते कसे चालू करायचे असते? हे शोधण्यासाठी, आपल्याला त्या संबंधित असलेल्या बाबी परिभाषित कराव्या लागतील.

### विश्वास म्हणजे काय?

विश्वास हा एक असा शब्द आहे ज्याचा ख्रिस्ती लोक सहजपणे वापर करतात. आणि मला खात्री आहे की बहुतेकांना, विश्वास म्हणजे काय, तो का आवश्यक आहे, ते विश्वासात आहेत की नाही हे कसे जाणून घ्यावे आणि विश्वास कसा मिळवावा हे माहित नाही. जर विश्वास हा स्विच आहे ज्यामुळे अभिषेक या महिलेवर प्रवाहित झाला आणि ती बरी झाली, तर आपण विश्वासा संबंधी बारकाईने समजून घेतले पाहिजे! रोमकरांस पत्र 4:18–21 मध्ये आपल्याला विश्वासाची व्याख्या आढळते.

**विश्वास हा एक असा शब्द आहे ज्याचा ख्रिस्ती लोक सहजपणे वापर करतात.**

> *“तशी तुझी संतती होईल,” ह्या वचनाप्रमाणे त्याने ‘बहुत राष्ट्रांचा बाप’ व्हावे म्हणून आशेला जागा नसताही त्याने आशेने विश्वास ठेवला. तथापि विश्वासाने दुर्बळ न होता, आपले निर्जीव झालेले शरीर (तो सुमारे शंभर वर्षांचा होता) व सारा हिच्या गर्भाशयाचे निर्जीवपण ही त्याने लक्षात घेतली; परंतु देवाच्या अभिवचनाकडे पाहून तो अविश्वासामुळे डळमळला नाही, तर विश्वासाने सबळ होऊन त्याने देवाचा गौरव केला; आणि देव आपण दिलेले अभिवचन पूर्ण करण्यासही समर्थ आहे अशी त्याची पक्की खातरी होती.*
>
> —रोमकरांस पत्र 4:18-21

या कथेची परिस्थिती समजून घेऊया. अब्राहाम आणि सारा यांना मुले होऊ शकत नव्हती. मी असे म्हणत नाही की त्यांना मूल होण्या मध्ये काही समस्या होती आणि त्यांनी प्रयत्न करत राहायला हवे होते. मला हे म्हणायचे आहे की त्यांचे वय जवळजवळ 100 वर्षांचे होते आणि त्यांना मूल होण्याची शक्यता संपलेली होती. त्यांच्या शारिरीक अवस्थे प्रमाणे त्यांना मुले होऊ शकत नव्हती; ते अशक्य होते! तरीही देवाने नैसर्गिकरित्या पूर्णपणे

अशक्य असतांना देखील अब्राहामला मूल होण्याचे वचन दिले. आणि बायबल म्हणते की जरी नैसर्गिक परिस्थिती पूर्णपणे विरुद्ध होती तरी देवाने जे सांगितले ते करण्याचे सामर्थ्य देवाकडे आहे याची अब्राहामाला पूर्ण खात्री होती.

तर मग विश्वासाची आपली व्याख्या अशी आहे: “देवाने जे वचन दिले होते ते पूर्ण करण्यास तो समर्थ आहे याची पूर्ण खात्री असणे.” मी ते अशा प्रकारे म्हणेन: “तुमचे हृदय स्वर्गाशी एकरूप असणे.” म्हणजे देव जे म्हणतो त्याच्याशी केवळ मानसिकरित्या सहमत असणे नव्हे तर पूर्णपणे खात्री असणे.

आपल्याला हे पूर्णपणे समजले आहे याची खात्री करण्यासाठी मी ते पुन्हा एकदा सांगतो. विश्वास म्हणजे देव जे म्हणतो त्या विषयी पूर्णपणे खात्री असणे! आपले हृदय आणि मन स्वर्गाशी एकरूप असणे, पूर्णपणे खात्री असणे.

## विश्वासाची आवश्यकता का आहे?

देव जेव्हा त्याला पाहिजे तेंव्हा रुग्णालयात असलेल्या सर्वांना बरे का करत नाही? तो युद्धे का थांबवत नाही? तो आपल्याला सुवार्तेचा प्रचार करण्यासाठी देवदूतांना का पाठवत नाही? मला खात्री आहे की तुम्ही हे सर्व प्रश्न आधी ऐकले असतील. त्याचे उत्तर असे आहे की तो असे करू शकत नाही. असे नाही की देवाकडे असे करण्याचे सामर्थ्य नाही, परंतु त्याला तसे करण्याचा अधिकार नाही. मी काय म्हणत आहे ते समजून घेण्यासाठी, आपल्याला इब्रिकरांस पत्र 2:68 मध्ये काय लिहिले आहे ते पाहण्याची आवश्यकता आहे.

> *तर एका ठिकाणी कोणी अशी साक्ष दिली आहे, “मर्त्य मानव तो काय की तू त्याची आठवण करावीस? अथवा मानवपुत्र तो काय की तू त्याला दर्शन द्यावेस? तू त्याला देवदूतांपेक्षा काही काळापुरते कमी केले आहेस; तू त्याला गौरव व थोरवी ह्यांनी मुकुटमंडित केले आहेस; आणि तू आपल्या हातच्या कृत्यांवर त्याला नेमले आहेस; तू सर्वकाही त्याच्या अधीन—त्याच्यापायांखाली—ठेवले आहेस.”*
>
> —इब्रिकरांस पत्र 2:6-8

देवाने मानवाला जेंव्हा पृथ्वीवर ठेवले तेंव्हा त्याला संपूर्ण पृथ्वीवरील क्षेत्रावर पूर्ण कायदेशीर अधिकार दिले. अशी कोणतीही गोष्ट नव्हती जी त्याने त्याच्या अधिकारक्षेत्रात

दिली नाही. त्याने या क्षेत्रावर माझे अधिकारक्षेत्र आहे अशाप्रकारे अधिकाराने राज्य केले. अधिकाराने राज्य करण्याची त्याची क्षमता त्याला येथे स्थापित करणाऱ्या सरकारने समर्थित केली. थोडक्यात, त्याने देवाच्या राज्याच्या नियुक्त अधिकाराने राज्य केले. त्याने त्या राज्याचा मुकुट घातला, जो देवाच्या वैभवाचे, अभिषेकाचे आणि त्याने धारण केलेल्या सन्मानाचे किंवा अधिकाराचे स्थान दर्शवितो.

अर्थात, त्याने खरोखरच धातूचा मुकुट घातला नव्हता, पण मुकुट घालण्याचा जो अर्थ आहे त्या अर्थाने ह्या ठिकाणी असे म्हटले आहे. ह्याचे योग्य चित्रण करण्यासाठी, पृथ्वीवरील खरोखर असलेल्या राजाबद्दल विचार करा. जरी तो एक स्वाभाविक असला आणि त्याला स्वाभाविकरित्या कोणतीही वास्तविक शक्ती नसली, तरी तो मुकुट घालतो, ह्याचा अर्थ तो केवळ स्वतःचेच नाही तर संपूर्ण राज्य आणि सरकारचे प्रतिनिधित्व करतो. त्याच्या शब्दामध्ये अधिकार आहे, कारण तो ज्या राज्याचे प्रतिनिधित्व करतो त्या राज्याने त्याला तो अधिकार दिला आहे.

विचार करा, एक ट्रॅफिक पोलीस रस्त्यावर एका मोठ्या ट्रक ला थांबवतो, आणि तो थांबवतांना म्हणतो, "कायद्या अनुसार थांबावे लागेल."

हो, ट्रक माणसापेक्षा खूप मोठा आहे - त्या ट्रकशी तो शारीरिक रित्या स्वतःची तुलना करू शकत नाही - तरीही तो ट्रक थांबतो, त्या व्यक्ती मुळे नाही तर त्याच्या पोशाखावर त्याने जो बॅज लावलेला आहे त्यामुळे, जो सरकारचे प्रतिनिधित्व करतो. या प्रकरणात, सरकार बॅज घालणाऱ्या माणसापेक्षा खूप मोठे आहे. ट्रक ड्रायव्हरला माणसाची भीती नसते, परंतु तो माणूस ज्या सरकारचे प्रतिनिधित्व करतो त्या सरकारची भीती असते, ज्यामुळे ट्रक ड्रायव्हर थांबतो.

इथेही हेच खरे आहे. पृथ्वीवरील सर्व गोष्टींवर आदामाचे राज्य होते. देवाचे सामर्थ्य आणि प्रभुत्व, जे गौरव आणि सन्मानाच्या मुकुटाने दर्शविले जाते, त्याने मानवाला खात्री दिली की त्याचे शब्द देवाच्या राज्याच्या वतीने राज्य करतात.

हे लक्षात घेणे खूप महत्वाचे आहे की जेव्हा आदामाने देवाच्या शासना विरुद्ध विद्रोह करून पृथ्वीवर राज्य करण्याचा अधिकार गमावला, तेव्हा त्याने आपला मुकुट, आणि देवाच्या राज्यात त्याचे अधिकारपद गमावले, परंतु त्याने पृथ्वीवरील आपला कायदेशीर हक्क गमावला नाही. मानव अजूनही कायदेशीररित्या पृथ्वीचा प्रभारी होता. देवाने त्याला

ती राज्य करण्यासाठी दिली होती. जर आपण इब्रीलोकांस पत्रातील शास्त्रभागा कडे परत गेलो तर आपण हे पाहू शकतो.

> *तर एका ठिकाणी कोणी अशी साक्ष दिली आहे, "मर्त्य मानव तो काय की तू त्याची आठवण करावीस? अथवा मानवपुत्र तो काय की तू त्याला दर्शन द्यावेस? तू त्याला देवदूतांपेक्षा काही काळापुरते कमी केले आहेस; तू त्याला गौरव व थोरवी ह्यांनी मुकुटमंडित केले आहेस; आणि तू आपल्या हातच्या कृत्यांवर त्याला नेमले आहेस; तू सर्वकाही त्याच्या अधीन—त्याच्यापायांखाली—ठेवले आहेस."*
>
> —इब्रिकरांस पत्र 2:6-8

जरी हे वचन आदाम आणि हव्वा यांच्या निर्मितीच्या काळाबद्दल बोलत असले तरी, ह्या वचनात म्हटले आहे कि, "तू सर्वकाही त्याच्या अधीन—त्याच्यापायांखाली—ठेवले आहेस."

> *स्वर्ग तर परमेश्वराचा आहे; पण पृथ्वी त्याने मानवजातीला दिली आहे.*
>
> —स्तोत्रसंहिता 115:16

### माणसाने देवाला बाहेर काढले

जरी मानवाला पृथ्वीवर कायदेशीर अधिकार असले तरी, त्याने आध्यात्मिकरित्या राज्य करण्याचा अधिकार गमावला आहे. मूलतः, आदामाने त्या बागेतच मानवांच्या बाबतीत व्यवहारापासून देवाला दूर केले; आणि त्यामुळे मानवाचे पतन झाले त्यावेळी, पृथ्वीचे क्षेत्र कलंकित झाले आणि बदलून गेले. मृत्यूने पृथ्वीच्या क्षेत्रात प्रवेश केला आणि सैतानाला आता मानवांच्या कारभारात कार्य करण्याचा कायदेशीर अधिकार मिळाला. परंतु हे सर्व घडले असले तरी, हे समजून घेणे आवश्यक आहे की मनुष्य अजूनही पृथ्वीचा कायदेशीर रहिवासी आहे. त्याच्या पतित अवस्थेतही, तो अजूनही प्रभारी आहे. हो, त्याच्याकडे आता त्याला

**म्हणूनच देवाला लोकांच्या जीवनात त्याची इच्छा पूर्ण करण्वासाठी आत्म्याने भरलेल्या लोकांचा वापर करावा लागतो.**

पाठिंबा देणारा देवाच्या राज्याचा मुकुट नाही. त्याला देवाच्या सामर्थ्याने आणि वैभवाने राज्य करण्याचा अधिकार नाही आणि त्याने आपले सन्मानाचे स्थान गमावले आहे. परंतु तो अजूनही एकमेव जिवंत प्राणी आहे ज्याला पृथ्वीच्या क्षेत्रावर राज्य करण्याचा कायदेशीर अधिकार आहे.

म्हणूनच देवाला मानवांच्या जीवनात त्याची इच्छा पूर्ण करण्यासाठी आत्म्याने भरलेल्या लोकांचा वापर करावा लागतो. त्याचप्रमाणे, मानवांसाठी असलेल्या त्याच्या योजनेनुसार पृथ्वीच्या क्षेत्रावर कार्य करण्यासाठी सैतान दुष्ट आत्म्याने युक्त लोकांचा वापर करतो. पृथ्वीवरील मानवाच्या अधिकारक्षेत्राचे हे तत्व राज्याच्या कायद्याबद्दल आणि विशेषतः, एखाद्या परिस्थितीत कायदेशीर अधिकारक्षेत्र मिळविण्यासाठी देवावर विश्वास असणे का आवश्यक आहे हे समजून घेण्यासाठी महत्त्वाचे आहे.

तुम्ही म्हणाल, "पण मला वाटलं होतं की पृथ्वी आणि त्यातील सर्वकाही देवाच्या मालकीची आहे?" खरे आहे, ते त्याचेच आहे. मी तुम्हाला एक उदाहरण सांगतो त्यावरून मी काय म्हणत आहे ते समजण्यास मदत होईल अशी माझी आशा आहे. जर मी माझ्या मालकीचे घर तुम्हाला भाड्याने दिले, तर जरी मी कायदेशीररित्या त्या घराचा मालक असलो तरी, त्या घरात कधीही प्रवेश करण्याचा कायदेशीररित्या अधिकार आता मला राहत नाही. घर भाड्याने देतांना करारा मध्ये घरमालक कायदेशीररित्या त्याच्या घरात  कधी प्रवेश करू शकतो हे स्पष्ट करणारा मुद्दा असतो - उदाहरणार्थ, आपत्कालीन परिस्थिती उद्भवली असतांना किंवा घरामध्ये काही दुरुस्ती काम करण्यासाठी - आणि ते देखील भाडेकरूला पूर्व सूचना देऊनच करता येईल. जर मी या करारा विरुद्ध घरात प्रवेश करण्याचा प्रयत्न केला, तर असे मानले जाईल कि कराराचे उल्लंघन केले आहे, जरी मी त्या घराचा मालक असलो तरीही. आणि अशा परिस्थिती मध्ये, कराराचे उल्लंघन केल्यामुळे कायदेशीररित्या घराचा मालक असूनही तिथून लगेच निघून जाण्यास सांगितले जाऊ शकते.

यावरून हे स्पष्ट होते की सैतानाला पृथ्वीच्या क्षेत्रात प्रवेश मिळवण्यासाठी आदामा द्वारे जा जावे लागले. कारण फक्त आदामाकडेच चावी होती! सैतानाला दारातून जाणे भाग होते आणि कायदेशीररित्या ज्याच्याकडे ती चावी होती त्याच्याकडून तो प्रवेश मिळविणे आवश्यक होते, अन्यथा त्याला कायदेशीररित्या बाहेर काढले गेले असते. अशाच प्रकारे, आदामाने देवाच्या राज्याला पृथ्वीच्या क्षेत्रातून बाहेर काढले, त्यामुळे देवाला त्याचे राज्य

आणि शासन कायदेशीररित्या पृथ्वीच्या क्षेत्रात परत आणण्याचा मार्ग शोधावा लागला. पुन्हा, त्याला मनुष्याच्या द्वारे जावे लागले. आणि ह्या ठिकाणी, अब्राहाम नावाच्या माणसाने ते दार उघडले.

> *परमेश्वराने अब्रामाला सांगितले, "तू आपला देश, आपले नातेवाईक व आपल्या बापाचे घर सोडून मी दाखवीन त्या देशात जा; मी तुझ्यापासून मोठे राष्ट्र निर्माण करीन; मी तुला आशीर्वाद देईन, तुझे नाव मोठे करीन; तू आशीर्वादित होशील; तुझे जे अभीष्ट चिंतितील त्यांचे मी अभीष्ट करीन; तुझे जे अनिष्ट चिंतितील त्यांचे मी अनिष्ट करीन; तुझ्या द्वारे पृथ्वीवरील सर्व कुळे आशीर्वादित होतील."*
>
> —उत्पत्ती 12:1-3

अब्राहामला आपल्या विश्वासाचा पिता म्हटले जाते कारण तोच एक असा व्यक्ती आहे ज्याने पृथ्वीवरील सर्व राष्ट्रांना आशीर्वादित करण्यासाठी देवासाठी पृथ्वीच्या क्षेत्राचे दार उघडले. अर्थात, हे येशू ख्रिस्त आणि मानवजातीसाठी देवाच्या तारणाच्या योजनेबद्दल म्हटले आहे. अब्राहामाच्या विश्वासाने एक कायदेशीर दार उघडले जे देवाने अब्राहाम आणि स्वतःमध्ये कायदेशीर करार करून कायमचे बंद केले. हा करार अब्राहामाच्या संततीसाठी देखील बंधनकारक होता आणि उत्पत्ती 12 मध्ये बायबल सांगते की, "तुझ्या द्वारे पृथ्वीवरील सर्व कुळे आशीर्वादित होतील." "तुझ्या द्वारे आशीर्वादित" म्हणजे येशू अब्राहामाच्या वंशातून येऊन आदामाने जे गमावले ते पुनर्संचयित करण्याविषयी इथे म्हटले आहे.

तर मी जे म्हणतोय ते थोडक्यात सांगतो. स्वर्गाला पृथ्वीच्या क्षेत्रात कायदेशीर प्रवेश मिळण्यासाठी पृथ्वीच्या क्षेत्रात कायदेशीर अधिकार असलेल्या पुरुषाला किंवा स्त्रीला स्वर्गाशी सहमत असले पाहिजे. स्वर्गाशी असलेल्या या कराराला विश्वास म्हणतात. हेच ते तत्व आहे ज्याद्वारे सैतानाने पृथ्वीच्या क्षेत्रात ज्याच्या जवळ चावी होती त्या एका व्यक्ति द्वारे, म्हणजे आदामा द्वारे, कायदेशीर प्रवेश मिळवला.

> *मग सैतानाने त्याला उंचावर नेऊन त्याला जगातील सर्व राज्ये एका क्षणात दाखवली; आणि त्याला म्हटले, "ह्यांच्यावरचा सर्व अधिकार व ह्यांचे वैभव मी तुला देईन, कारण हे मला सोपवून दिले आहे व माझ्या मनास येईल त्याला मी हे देतो.*

*म्हणून तू मला नमन करशील तर हे सर्व तुझे होईल."*

—लूक 4:5-7

या वचनात तुम्ही पाहू शकता की सैतान असा दावा करतो की मानवाच्या राज्याचा अधिकार आणि वैभव (संपत्ती) त्याला देण्यात आले आहे. तो पृथ्वीवर मानवजातीच्या बाबतीत पूर्ण अधिकार असल्याचा दावा करतो. तर त्याला हा अधिकार कोणी दिला? ज्याच्याकडे तो होता, अर्थात आदामाने! अशाप्रकारे देव कायदेशीर प्रवेश मिळाल्या शिवाय मनुष्या च्या कारभारात घुसू शकत नाही, अन्यथा ते बेकायदेशीर ठरेल. सैतान चुकीचा खेळ केल्याचा दावा करेल. नाही, देवालाही त्याच दारातून प्रवेश करावा लागेल ज्या दारातून सैतानाने प्रवेश केला, अर्थात पृथ्वीवरील पुरुष किंवा स्त्रीद्वारे जावे लागेल.

## येशू त्यांना बरे करू शकला नाही—एक शक्तिशाली धडा उलगडला

*तेव्हा येशू त्यांना म्हणाला, "संदेष्ट्याचा सन्मान होत नाही असे नाही; मात्र त्याच्या देशात, त्याच्या आप्तेष्टांत अथवा घरच्या मंडळीत त्याचा सन्मान होत नसतो." त्याने थोड्याच रोग्यांवर हात ठेवून त्यांना बरे केले, ह्याशिवाय दुसरे कोणतेही महत्कृत्य त्याला तेथे करता आले नाही. त्यांच्या अविश्वासामुळे त्याला आश्चर्य वाटले. मग तो शिक्षण देत गावोगाव फिरला.*

—मार्क 6:4-6

जर मी रस्त्यावर चालणाऱ्या लोकांना विचारले की येशू काही करू शकतो का, तर ते कदाचित म्हणतील की होय तो करू शकतो. त्या नंतर जर मी त्यांना पुन्हा विचारले की बायबलमध्ये असे कुठे लिहिले आहे का जिथे येशूने प्रयत्न केला पण तो चमत्कार करू शकला नाही, तर ते काय उत्तर देतील? मी तुम्हाला खात्री देतो की ते मला म्हणतील की बायबलमध्ये असे कुठेही लिहिलेले नाही. पण तुम्ही आत्ताच वाचले कि तो त्यांना बरे करू शकला नाही. एक आध्यात्मिक शास्त्रज्ञ म्हणून, मला हे का जाणून घेणे आवश्यक आहे. उत्तर केवळ हे आहे की तो ते करू शकला नाही, आणि आता तुम्हाला त्याचे कारण माहित आहे. कारण त्यांचा विश्वास नव्हता, याचा अर्थ स्वर्गाशी कोणताही करार नव्हता आणि अशा प्रकारे त्या परिस्थितीत स्वर्गाला कायदेशीर अधिकार क्षेत्र नव्हते. आपण आता जी चर्चा केली आहे ते तुम्हाला स्पष्टपणे समजले आहे याची खात्री करून घ्या.

जोपर्यंत पुरुष किंवा स्त्रीचे हृदय स्वर्ग जे म्हणतो, ज्याला विश्वास म्हणतात त्या सोबत पूर्णपणे सहमत होत नाही तोपर्यंत स्वर्गाला पृथ्वीवर अधिकार नाही.

या प्रकरणाच्या सुरुवातीला मी अनुत्तरीत प्रार्थनेबद्दल एक प्रश्न विचारला होता, त्याकडे जर आपण परत गेलो तर आपल्याला आता त्याची उत्तरे मिळू शकतात. लक्षात ठेवा, मी त्या ठिकाणी म्हटले होते कि, एखादी अशी परिस्थिती असेल जिथे अनेक लोक एखाद्या व्यक्ती साठी प्रार्थना करत असतील पण तरीही त्या व्यक्तीचा मृत्यू होतो. का? त्याचे मुख्य कारण म्हणजे, पुन्हा एकदा, त्या ठिकाणी विश्वास नाही. बहुतेक लोक खूप मोठ्या आवाजात प्रार्थना करण्याला विश्वास समजतात.

> *तुम्ही प्रार्थना करता तेव्हा परराष्ट्रीयांसारखी व्यर्थ बडबड करू नका; आपण पुष्कळ बोललो म्हणजे आपले मागणे मान्य होईल असे त्यांना वाटते. तुम्ही त्यांच्यासारखे होऊ नका, कारण तुमच्या गरजा काय आहेत हे तुमचा पिता, तुम्ही त्याच्याकडे मागण्यापूर्वीच जाणून आहे.*
>
> —मत्तय 6:7–8

बरेच लोक असा विश्वास करतात की जितके जास्त लोक प्रार्थना करतात तितके देव त्यांचे ऐकण्याची आणि मदत करण्यास प्रवृत्त होण्याची शक्यता जास्त असते. मला आशा आहे की आपण आतापर्यंत पुरेसे आकलन केले आहे की हे पूर्णपणे खोटे आहे. आणि जेव्हा आपण म्हणतो की विश्वास नव्हता, तेव्हा आपण प्रामुख्याने अशा व्यक्तीबद्दल बोलत असतो ज्याला देवाकडून विश्वास प्राप्त करणे आवश्यक आहे.

मार्ककृत शुभवर्तमानाच्या 6 व्या अध्यायातील घटनेत, तुम्हाला हे मान्य करावे लागेल की येशूला भरपूर विश्वास होता, तरीही तो त्यांना बरे करू शकला नाही. म्हणून जर तुम्ही आणि मी आजारी मित्रासाठी लाखो लोक प्रार्थना करण्या बद्दल बोलत असलो, तर मी तुम्हाला विचारेन, "तो आजारी माणूस काय म्हणत आहे?" हे बघा, कितीही लोक असू द्यात पण त्यांचा दुसऱ्या व्यक्तीवर आध्यात्मिक अधिकार नाही.  एखाद्या व्यक्ती साठी 20 अब्ज लोक प्रार्थना करत असतील, परंतु जर त्या व्यक्तीचा स्वतः विश्वास नसेल आणि तो म्हणत असेल की तो मरणार आहे, तर तो मरणारच.

पुन्हा एकदा, आपण मार्क 6 मध्ये पाहिलेल्या उदाहरणाचा विचार करूया. आपल्याला

माहित आहे की येशूकडे बरे करण्याचा विश्वास होता, परंतु त्या कार्यासाठी लोकांचा स्वतः विश्वास असल्या शिवाय तो त्यांच्यासाठी काहीही करू शकत नव्हता.

माझ्याकडे असे अनेक लोक आले आहेत जे म्हणतात कि त्यांचे आजी किंवा आजोबा किंवा इतर कुणी नातेवाईक आजारी आहेत आणि ते त्यांच्यासाठी प्रार्थना करत आहेत, पण तरीही काहीच होत नाही. तेंव्हा मी त्यांना विचारतो, "आजी काय म्हणते? आजोबा काय म्हणतात? त्यांचा स्वतःचा विश्वास आहे का?" हे पहा, तुमचा दुसऱ्या व्यक्तीवर आध्यात्मिक अधिकार नाही. तुम्ही त्यांना सुवार्ताप्रसार करू शकता, परंतु त्यांना स्वतः विश्वास ठेवला पाहिजे. म्हणून मी लोकांना जे सांगतो ते म्हणजे जर त्यांना प्रभावी सेवा पाहायची असेल तर त्यांनी प्रथम चित्र बदलले पाहिजे. आजारी व्यक्ती त्याच्या स्वतःच्या परिस्थितीबद्दल काय चित्र पहाटे पाहाते त्याबद्दल मी बोलत आहे. त्यांना खूप जास्त धार्मिक वचने देऊ नका; त्यांना एक चित्र द्या. मी काय सांगण्याचा प्रयत्न करत आहे ते मी तुम्हाला दाखवतो.

> *ह्या सर्व गोष्टींविषयी योहानाला त्याच्या शिष्यांनी सांगितले. मग योहानाने आपल्या शिष्यांतील दोघांना जवळ बोलावून प्रभूकडे असे विचारण्यास पाठवले की, "जे येणार आहेत ते आपणच की आम्ही दुसऱ्याची वाट पाहावी?" ती माणसे त्याच्याकडे येऊन म्हणाली, "बाप्तिस्मा करणाऱ्या योहानाने आम्हांला आपल्याकडे असे विचारण्यास पाठवले आहे की, जे येणार आहेत ते आपणच की आम्ही दुसऱ्याची वाट पाहावी?" त्याच घटकेस त्याने पुष्कळ लोकांना रोग, पीडा व वाईट आत्मे ह्यांपासून मुक्त केले होते आणि बऱ्याच आंधळ्यांना दृष्टी दिली होती. मग त्याने त्यांना उत्तर दिले, "तुम्ही ज्या गोष्टी पाहिल्या व ऐकल्या त्या योहानाला जाऊन सांगा, 'आंधळे डोळस होतात,' पांगळे चालतात, कुष्ठरोगी शुद्ध होतात, बहिरे ऐकतात, मेलेले उठवले जातात व 'गरिबांना सुवार्ता सांगण्यात येते.'*
>
> —लूक 7:18-22

लक्षात घ्या की ह्या ठिकाणी येशूने कोणत्याही वचनाचा उल्लेख केला नाही. तो म्हणू शकला असता, "तुम्ही परत जाऊन योहानाला हे शास्त्रवचन किंवा तो शास्त्रभाग सांगा." पण त्याने तसे केले नाही, त्याने त्यांना देवाच्या राज्याद्वारे घडणाऱ्या सर्व चांगल्या गोष्टींबद्दल सांगितले. तुम्हीही तेच करावे. तुमच्या आजारी मित्राला हे सांगा कि येशूने दुसऱ्या एखाद्या

व्यक्तीला कसे बरे केले. शक्य असल्यास, त्यांना अशा एखाद्या व्यक्तीची साक्ष सांगा जो त्याच आजारापासून बरा झाला आहे ज्या आजाराने तुमचा मित्र बिछान्यावर पडलेला आहे. ही साक्ष त्यांना प्रेरणा देईल आणि त्यांच्या मध्ये विश्वास उत्पन्न करेल. आशा नेहमीच एक चित्र उत्पन्न करते आणि हेच चित्र तुम्हाला तुमच्या मित्राला दाखवायचे आहे की त्याला त्या आजारातून बरे होण्याची शक्यता आहे.

एकदा तुमच्या मित्राला समजले की बरे होणे शक्य आहे, तेंव्हा तो तुम्हाला विचारेल की ते कसे शक्य आहे. तुम्ही ज्या क्षणाची वाट पाहत होता तो हाच क्षण आहे. आता ह्या वेळेस त्याला उपदेश देण्या ऐवजी, त्याला देवाच्या वचनाबद्दल आणि राज्याच्या सिद्धांतां बद्दल सांगा कारण आता तो ते ऐकण्या साठी तयार आहे. प्रथम, जर त्याचा नवा जन्म झाला नसेल तर तुम्ही त्याला नवा जन्म कसा होऊ शकतो ते सांगावे; आणि त्या नंतर, तुम्ही त्यांच्यासोबत बरे होण्याबद्दल पवित्र शास्त्रात काय लिहिले आहे ते स्पष्ट करून सांगण्या मध्ये वेळ घालवावा. शक्य असल्यास, तुम्ही त्याला जे सांगितले आहे त्यामध्ये त्याने अधिक बळकट व्हावे म्हणून त्याला वाचण्या साठी काही साहित्य द्या.

**ह्याप्रमाणे विश्वास वार्तेने व वार्ता ख्रिस्ताच्या वचनाच्या द्वारे होते.**
**—रोमकरांस पत्र 10:17**

आता आपल्याला विश्वास म्हणजे काय (स्वर्गाशी करार) आणि विश्वास कायदेशीररित्या का आवश्यक आहे हे समजले आहे, परंतु तरीही आपल्याला विश्वास कसा मिळवायचा आणि आपण विश्वासात आहोत की नाही हे कसे जाणून घ्यावे हे देखील समजून घेणे आवश्यक आहे.

## आपण विश्वासात कसे येऊ शकतो?

*ह्याप्रमाणे विश्वास वार्तेने व वार्ता ख्रिस्ताच्या वचनाच्या द्वारे होते.*
—रोमकरांस पत्र 10:17

देवाचे वचन ऐकल्याने विश्वास कसा येतो? त्याची प्रक्रिया काय आहे? मानवी आत्म्यात विश्वास विकसित होण्यासाठी फक्त वचन ऐकणे एवढेच पुरेसे आहे का? विश्वास कसा येतो आणि रोमकर 10:17 कशाबद्दल बोलत आहे हे समजून घेण्यासाठी, आपण मार्क अध्याय

4 मध्ये काय लिहिले आहे ते पाहू शकतो. मी नेहमीच म्हणतो की जर तुम्ही तुमचे बायबल हवेत उडवले तर ते मार्क अध्याय 4 वर उघडले पाहिजे; हा अध्याय खूप महत्वाचा आहे! येशूने मार्क 4:13 मध्ये म्हटले आहे की जर तुम्हाला त्या अध्यायात तो काय शिकवत आहे ते समजले नाही, तर तुम्हाला बायबलमधील इतर कोणताही दाखला समजणार नाही. मी पुन्हा म्हणेन की हा अध्याय खूप महत्वाचा आहे!

हा अध्याय इतका महत्त्वाचा का आहे? कारण त्या मध्ये आपल्याला सांगितले आहे की स्वर्ग पृथ्वीच्या क्षेत्राशी कसा संवाद साधतो, त्याला अधिकारक्षेत्र कसे मिळते आणि ते कुठे घडते. हा संपूर्ण अध्याय नेमकं काय सांगत आहे हे जाणून घेणे तुमच्या जीवनातील इतर कोणत्याही गोष्टीं पेक्षा अधिक महत्त्वाचे आहे.

ह्या अध्यायात, येशू तीन दाखल्यां द्वारे हे सांगण्याचा प्रयत्न करत आहे कि मनुष्याच्या आत्म्यात विश्वास कसा निर्माण होतो, जे तुम्हाला आता समजलेच आहे की, स्वर्गाने पृथ्वीवर कायदेशीररित्या प्रवेश करण्यासाठी हे आवश्यक आहे. या प्रकरणातील तीन दाखले म्हणजे पेरणाऱ्याचा दाखला, बी पेरणाऱ्या माणसाचा दाखला आणि मोहरीच्या दाण्याची गोष्ट. मार्ककृत शुभवर्तमान अध्याय चार मध्ये येशूने सांगितलेली दुसरी गोष्ट, बी पेरणाऱ्या माणसाची गोष्ट ह्या पासून सुरुवात करूया.

> *आणखी तो म्हणाला, "परमेश्वराचे राज्य असे आहे की, जणू काय एखादा माणूस जमिनीत बी टाकतो, रात्री झोपी जातो, दिवसा उठतो, आणि ते बी रुजते व वाढते, पण हे कसे होते हे त्याला कळत नाही. जमीन आपोआप पीक देते; पहिल्याने अंकुर, मग कणीस, मग कणसात भरलेला दाणा. पीक तयार झाल्यावर तो लगेच विळा घालतो, कारण कापणीची वेळ आली आहे."*
>
> —मार्क 4:26–29

सर्वप्रथम आपल्याला शब्दांची योग्य परिभाषा करावी लागेल. येशू ज्या बीजाबद्दल बोलत आहे ते काय आहे आणि जमीन म्हणजे काय? येशूने प्रत्यक्षात त्याच अध्यायात पेरणाऱ्याच्या मागील दृष्टान्तात हे दोन शब्द परिभाषित केले आहेत. बीज हे देवाचे वचन आहे आणि जमीन म्हणजे मनुष्याचे हृदय किंवा मनुष्याचा आत्मा.

म्हणून या दाखल्यात, येशू म्हणतो की एक मनुष्य देवाचे वचन त्याच्या हृदयात विखुरतो.

मग माती किंवा मनुष्याचे हृदय स्वतःहून स्वर्गाशी विश्वास किंवा संमती निर्माण करण्यास सुरुवात करते. आता, ही तुमच्या मानवी आत्म्याची नैसर्गिक प्रक्रिया आणि कार्य आहे. तुम्ही त्यात जे काही ठेवता तेच ते उबवते. मी पुढे जाण्यापूर्वी, विश्वासाची आपली व्याख्या काय आहे हे लक्षात ठेवणे अत्यंत महत्त्वाचे आहे: स्वर्ग जे म्हणतो त्यावर दृढपणे विश्वास ठेवणाऱ्या पुरुषाचे किंवा स्त्रीचे हृदय. आता, येथे एक महत्वाची गोष्ट लक्षात ठेवण्या सारखी आहे आणि ती म्हणजे स्वर्गाशी सहमत होणे आणि देवाच्या वचनाशी केवळ मानसिकरित्या सहमत होणे हे एक सारखे नाही. बायबल सांगते की अब्राहाम स्वर्गाशी पूर्णपणे सहमत होता.

## पूर्णपणे खात्री होणे

पूर्णपणे खात्री होणे नेमके कसे असते हे तुम्हाला अगदी स्पष्टपणे समजावे म्हणून मी तुम्हाला एक उदाहरण देतो, समजा मी तुम्हाला न्यू यॉर्क शहरातील एम्पायर स्टेट इमारती वरून उडी मारण्यास सांगितले, आणि म्हणालो कि तुम्ही उडी मारत असतांना, तुमचे हात जोरात फडफडवले तर तुम्ही उडू शकाल आणि सुरक्षितपणे पृथ्वीवर येऊन थांबू शकाल. तुम्ही माझ्या कडे पाहून हसाल कारण तुम्हाला माहित आहे की तुम्ही तसे केले तर तुमचे काय होईल. तुम्हाला परिणामाची पूर्ण खात्री आहे. पूर्णपणे खात्री असणे अगदी असेच असते. तुम्हाला माहिती आहे की तुम्हाला ह्याची पूर्ण खात्री आहे;  आणि त्या व्यतिरिक्त दुसरी कोणतीही शक्यता नाही. जर तुम्ही उडी मारली तर तुम्ही सरळ खाली पडून मराल.

तर चला दुसरी परिस्थिती पाहू या आणि तुमची प्रतिक्रिया त्याबद्दल काय आहे ते पाहूया. समजा तुमच्या शरीरावर स्पष्टपणे दिसणारी, एक मोठी गाठ आहे आणि डॉक्टर म्हणतात की तुम्हाला जगण्यासाठी आता सुमारे एक महिना आहे: तुम्हाला कर्करोग आहे. खरं तर, डॉक्टर म्हणतात की तुमच्या कर्करोगाचा प्रकार इतका दुर्मिळ आहे की ज्या कुणा व्यक्तीला हा कर्करोग झाला आहे त्यापैकी एकही व्यक्ती आज पर्यंत त्यातून बरा झालेला नाही. आता, समजा तुम्हाला माहित आहे कि 1पेत्र  2:24 मध्ये काय सांगितलेले आहे.

> *'त्याने स्वतः तुमची आमची पापे' स्वदेही 'वाहून' खांबावर 'नेली', ह्यासाठी की, आपण पापाला मेलेले होऊन सदाचरणासाठी जगावे. त्याला बसलेल्या 'माराने तुम्ही निरोगी झाला आहात.'*—1 पेत्र 2:24

पवित्र शास्त्र आपल्याला ह्याचे उत्तर सांगते, पण तुमच्या आणि माझ्या जीवनात एक गंभीर समस्या आहे. आपण अंधाराच्या राज्यात वाढलो आहोत आणि आपल्याभोवती विकृती आणि मृत्यू आहेत. आपण भीतीच्या राज्यात वाढलो आहोत, आणि भीती काय म्हणते याची आपल्याला पूर्ण खात्री आहे. तर वरील उदाहरणात, आपल्याला हे सांगण्यात आले आहे की कर्करोग आपल्याला मारू शकतो. प्रत्येक परिस्थिती द्वारे हे स्पष्ट झाले आहे कि हीच वस्तुस्थिती आहे. तर आपण आपला करार कसा बदलणार आहोत; देव जे म्हणतो त्यावर आपण पूर्णपणे कसे विश्वास ठेवू शकतो? खरं तर, आपण हे स्वतःहून करू शकत नाही. परंतु देवाचे वचन जिवंत आणि सामर्थ्याने भरलेले आहे, आणि त्याचा स्वीकार तुम्ही तुमच्या आत्म्यात करून, स्वतःहून, तुमचा आत्मा आणि वचन स्वर्ग जे म्हणतो त्याच्याशी सहमत होऊ देता तेंव्हा ते शक्य होते.

## स्वर्गाशी करार

> *आणखी तो म्हणाला, "परमेश्वराचे राज्य असे आहे की, जणू काय एखादा माणूस जमिनीत बी टाकतो, रात्री झोपी जातो, दिवसा उठतो,आणि ते बी रुजते व वाढते, पण हे कसे होते हे त्याला कळत नाही.जमीन आपोआप पीक देते; पहिल्याने अंकुर, मग कणीस, मग कणसात भरलेला दाणा. पीक तयार झाल्यावर तो लगेच विळा घालतो, कारण कापणीची वेळ आली आहे."*
>
> —मार्क 4:26-29

माती, (तुमचे हृदय) स्वतःहून सहमती निर्माण करते. लक्षात घ्या की तुम्ही विश्वासासाठी प्रार्थना करू शकत नाही; ते तुमच्या हृदयाचे आणि वचनाचे कार्य आहे. ह्या शास्त्रभागा कडे पाहिल्यावर, आपल्याला दिसून येते की स्वर्गाशी आपल्या हृदयाची सहमती ही एक प्रक्रिया आहे; ती लगेच घडत नाही. हे उदाहरण आपल्याला सांगते की जेव्हा आपले हृदय वचन स्वीकारते तेव्हा प्रथम विश्वास वाढू लागतो, अगदी ज्याप्रमाणे नवीन लावलेल्या बीजाचे पाते किंवा अंकुर वाढते. नंतर त्याची वाढ होऊन देठ तयार होते आणि नंतर त्यातून लहान रोपटे तयार होते. त्या रोपट्याला बीज किंवा फळ तयार होण्यास सुरुवात होते. ह्या टप्प्यावर, त्या रोपट्यापासून अजूनही खाण्यासाठी काहीही मिळत नाही. कारण त्या रोपट्याने वनस्पतीने अजून परिपक्व, पिकलेले फळ दिलेले नाही, कारण अजून त्याची वाढ होत आहे.

देवाच्या वचनाबाबतही तसेच आहे. विश्वास वाढत असताना नैसर्गिक क्षेत्रात अद्याप कोणताही दृश्यमान बदल झालेला नसतो. अद्याप सहमती झालेली नसते, परंतु रोप वाढत असते, अगदी त्याचप्रमाणे विश्वास निर्माण होत असतो आणि सहमती होत जाते. येशू पुढे स्पष्ट करतो की जेंव्हा बी पूर्णपणे परिपक्व होते तेव्हा पीक येते, ह्यावेळेस सहमती असते आणि विश्वास देखील असतो.

तर आपण हे समजून घेतले पाहिजे. जेव्हा तुम्ही जमिनीत बी पेरता, तेव्हा अंकुरण्याच्या प्रक्रियेतून, रोप वाढू लागते, परंतु अद्याप फळ येत नाही. जोपर्यंत ते योग्य वातावरणात राहते तोपर्यंत ते वाढत राहते; आणि जसजसे ते परिपक्व होते तसतसे ते त्याचे फळ देते. समजा तुम्ही मक्याची लागवड करत आहात. मक्याच्या रोपातून एक कणीस फुटते, पण सुरुवातीला ते फक्त एक लहान कणीस असते जे तुम्ही खाऊ शकत नाही. पण कालांतराने, ते लहान कणीस वाढून परिपक्व होते. आता हा मुद्दा समजून घ्या! ज्या क्षणी जमिनीत पेरलेल्या बीजा सोबत झाडावर लागलेले कणीस एकरूप किंवा एकजीव होते, त्या क्षणी त्या ठिकाणी सहमती निर्माण होते.

जेव्हा रोपातुन वर आलेले बीज परिपक्व होते, तेव्हा ते अगदी पेरलेल्या बियासारखे दिसेल. मक्याचे रोप लावा, आणि कणीस परिपक्व झाल्यानंतर त्या मध्ये आलेले दाणे तुम्ही लावलेल्या बियाण्याशी अगदी तंतोतंत जुळतात. ते दोन्ही एक सारखेच आहेत. ते सारखेच दिसतात आणि त्यांची चवही सारखीच असते; तुम्ही त्यांना वेगळे करू शकत नाही.

तर येशू काय म्हणत आहे ते मी थोडक्यात सांगतो. जेव्हा आपण देवाचे वचन ऐकतो (रोमकरांस पत्र 10:17), तेव्हा आपण प्रत्यक्षात देवाचे वचन आपल्या आत्मिक जीवनात, आपल्या हृदयात वितरित करत असतो. जर आपण ते वचन आपल्या हृदयात ठेवले तर ते वाढेल आणि परिपक्व होईल; आणि जेव्हा ते परिपक्व होईल, तेव्हा आपल्या हृदयाला स्वर्ग जे सांगिते त्याबद्दल पूर्णपणे खात्री पटेल. स्वर्ग आणि पृथ्वी एकमेकांसोबत जुळून येतात, आणि ज्या व्यक्तीला ह्याची पूर्ण खात्री पटली आहे, ज्याचा विश्वास दृढ झाला आहे त्याच्या द्वारे स्वर्गाला आता पृथ्वीच्या क्षेत्रात कायदेशीर अधिकार क्षेत्र मिळाले आहे. आपले विचार आणि विश्वास स्वर्ग जे म्हणतो त्या सोबत पूर्ण आत्मविश्वासाने जुळतात. हे केवळ सामान्य विचाराने होते असे नाही. आता आपण प्रत्यक्षात त्यावर विश्वास ठेवतो अगदी तेवढ्याच

खात्रीने जेवढ्या खात्रीने आपण मानतो  की एखादा खडक खाली टाकल्यास तो खालीच पडणार. स्वर्ग पृथ्वीच्या क्षेत्रात वचन पेरतो जिथे ते करार आणि देवाची इच्छा आणते. जर स्वर्ग म्हणतो की तुम्ही बरे झाला आहात, तर जेव्हा ते वचन तुमच्या हृदयात परिपक्व होईल, तेव्हा तुम्हाला फक्त स्वर्ग काय म्हणतो ते दिसेल. आता भीती नाही. जेव्हा तुम्ही डोळे बंद करता तेव्हा तुम्ही स्वतःला बरे झालेले पहाल! म्हणूनच इब्री लोकांस पत्र 11:1 (KJV) मध्ये म्हटले आहे:

> *विश्वास हा आशा धरलेल्या गोष्टींविषयीचा भरवसा आणि न दिसणाऱ्या गोष्टींबद्दलची खातरी आहे.*

तुम्हाला ते अजूनही नैसर्गिकरित्या दिसणार नाही, पण तुम्ही ते तुमच्या आत्म्यात पाहिले असणार, आणि तुम्हाला ते तुमच्या हातात धरल्यासारखेच खरे आहे असे भासेल. त्या कराराला विश्वास म्हणतात, आणि तो विश्वास पृथ्वीच्या क्षेत्रात, तुमच्या जीवनात ते चित्र प्रत्यक्षात आणतो!

## स्विच उघडणे

पण थांबा; मार्ककृत शुभवर्तमानाचा चौथा अध्याय इथेच थांबत नाही. आपले हृदय स्वर्गाशी कसे जुळते आणि तिथे विश्वास कसा उत्पन्न होतो हे शिकवल्यानंतर, ते आपल्याला ते फळ कसे प्राप्त करायचे याबद्दल माहिती देते.

> *पीक तयार झाल्यावर तो लगेच विळा घालतो, कारण कापणीची वेळ आली आहे."*
>
> —मार्क 4:29

लक्षात घ्या की हृदय स्वर्गाशी सहमत असले आणि विश्वास असला तरी, अद्याप काहीही घडलेले नसते. का? जसे आपण नेहमीच म्हणत आलो आहोत, पृथ्वीच्या क्षेत्रात तुम्हाला कायदेशीर अधिकार आहेत. रक्तस्त्राव झालेल्या स्त्रीबद्दल लूक 8 मधील आपण केलेली चर्चा तुम्हाला आठवते का? त्या स्त्रीला येशू म्हणाला, "मुली, तुझ्या विश्वासाने तुला बरे केले आहे" हे आठवते का? मी तुम्हाला तेव्हा सांगितले होते की त्या मुलीने स्वर्गासमोर

कायदेशीर स्थान मिळवले होते, कारण ती अब्राहामाची मुलगी होती, त्यामुळे तिला कायदेशीर अधिकार होते.

मी त्याची तुलना पॉवर प्लांटमधील विजेच्या तारा तुमच्या घराशी जोडण्याशी करतो.

**तुम्हाला देवाच्या राज्याचे सामर्थ्य पृथ्वीच्या क्षेत्रात प्रवाहित करावे लागेल कारण फक्त तुम्हीच, जे पृथ्वीवरील पुरुष किंवा स्त्री आहेत, जे कायदेशीररित्या ते करू शकता**

वीज त्या प्लांट मध्ये असते आणि तिथे उपलब्ध देखील असते, पण तुम्हाला स्वतः दिवे चालू करावे लागतील. हे देखील तसेच आहे. एकदा विश्वास स्थापित झाला की, वीज उपलब्ध असते, पण तुम्ही स्विच चालू केल्या शिवाय काहीही होऊ शकत नाही. तुम्हाला देवाच्या राज्याचे सामर्थ्य पृथ्वीच्या क्षेत्रात प्रवाहित करावे लागेल कारण फक्त तुम्हीच, जे पृथ्वीवरील पुरुष किंवा स्त्री आहेत, जे कायदेशीररित्या ते करू शकता. रोमकरांस पत्र 10:10 मध्ये सांगितल्याप्रमाणे, हे तत्व तुम्हाला सांगेल कि तुमचे तारण कसे झाले आहे.

मनुष्य आपल्या हृदयाने वचनावर विश्वास ठेवतो आणि तो नीतिमान ठरतो. जस्टिफाय हा कायदेशीर शब्द आहे ज्याचा अर्थ कायद्याचे प्रशासन असा होतो. म्हणून जेव्हा एखाद्या पुरुषाचे किंवा स्त्रीचे हृदय स्वर्गाशी सहमत असते, जेव्हा ते स्वर्ग जे म्हणतो त्यावर विश्वास ठेवतात, तेव्हा ते स्वर्ग आणि पृथ्वीसमोर नीतिमान ठरतात. स्वर्गाने त्यांच्या जीवनात आणि त्यांच्या जीवनातून प्रवाहित होणे आणि देवाच्या राज्याच्या वतीने पृथ्वीवर प्रभाव पाडणे आता कायदेशीर आहे. पण आश्चर्याची गोष्ट म्हणजे, जरी ते आता कायदेशीर आहेत आणि ते विश्वासात आहेत, तरीही अजून काहीही घडत नाही. "पण, गॅरी, मला वाटले की तुम्ही म्हणालात की जेंव्हा मी विश्वासात असतो, तेंव्हा त्या विश्वासामुळे स्वर्गाला येथे कायदेशीर अधिकार क्षेत्र दिले आहे. "बरोबर आहे, परंतु विश्वास अस्तित्वात आल्यावर कोणीतरी येथे स्वर्गाचा अधिकार प्रवाहित करावा लागेल. चला आपल्या शास्त्रभागा कडे पुन्हा एकदा पाहूया.

> *कारण जो अंत:करणाने विश्वास ठेवतो तो नीतिमान ठरतो व जो मुखाने कबूल करतो त्याचे तारण होते.*
>
> —रोमकरांस पत्र 10:10

एकदा तुम्ही विश्वासात असलात किंवा नीतिमान ठरलात की, स्वर्गाला पृथ्वीच्या क्षेत्रात प्रवेश करणे आता कायदेशीर होऊन जाते, परंतु लक्षात घ्या की त्या वचनात पुढे म्हटले आहे की तुमच्या तोंडाने तुम्ही कबूल करता तेंव्हा तुमचे तारण होते. तुम्हाला ह्या ठिकाणी दोन भाग दिसतात का? स्वर्गाचा भाग म्हणजे वचनाला तुमच्या हृदयात येऊ देणे, जिथे ते पृथ्वीच्या क्षेत्रात करार उत्पन्न करते. मग एकदा करार किंवा विश्वास आला की, तुम्ही त्या करारावर कृती करावी आणि स्वर्ग जे सांगतो ते प्रत्यक्षात स्वीकारण्यासाठी तुमच्या परिस्थितीत स्वर्गाचा अधिकार प्रवाहित होऊ देता. पवित्र शास्त्रात मार्क 4:29 मध्ये म्हटले आहे की, कापणीची वेळ आली की, मनुष्य (पृथ्वीवरील) विळा घालतो. विश्वास आल्यावर देवाच्या वचनावर कृती करावी लागते आणि प्रत्यक्षात ती कापणी स्वीकारावी लागते.

*कारण जो अंत:करणाने विश्वास ठेवतो तो नीतिमान ठरतो व जो मुखाने कबूल करतो त्याचे तारण होते.*

—रोमकरांस पत्र 10:10

## देवाच्या राज्यात स्वीकार

मी मार्क अध्याय चारमध्ये परत जाऊन विळ्याबद्दल क्षणभर बोलणार आहे. माझा असा विश्वास आहे की बहुतेक चर्च मध्ये विळा कसा वापरायचा हे शिकवले गेले नाही, म्हणजेच त्यांना आवश्यक असलेली कापणी कशी करावी हे शिकवले गेले नाही. प्रभुने मला राज्य कसे चालवायचे हे शिकवायला सुरुवात करेपर्यंत मलाही हे माहित नव्हते. देवाच्या राज्यात या महत्त्वाच्या प्रक्रियेचे माझे पहिले प्रकटीकरण कसे झाले ते मी तुम्हाला आता सांगणार आहे.

मला अटलांटातील एका चर्चमध्ये उपदेश करण्या साठी आमंत्रित करण्यात आले होते. ती बुधवारी रात्रीची प्रार्थनासभा होती; आणि चर्च खूप काही मोठे नव्हते, पण ते माझ्यासाठी ठीक होते. मला लोकांना राज्याबद्दल शिकवायला खूप आवडले. मी चर्चच्या परिसरात पोहोचलो तेंव्हा, मला थोडे विचित्र वाटले कारण चर्चचे दरवाजे बंद होते आणि तिथे कोणीही नव्हते. प्रार्थना सुरू होण्यास दहा मिनिटे बाकी होती. मला माझ्या मागे मोठा ट्रक येत असल्याचा आवाज ऐकू आला आणि मी वळून पाहिले तेव्हा मला चर्चच्या मागील भागातून एक जुना पिकअप ट्रक येताना दिसला. मला त्या बद्दल काही विशेष वाटले नाही; कारण,

मी अटलांटाच्या अगदी मध्यभागी होतो.

मी वाट पाहत उभा होतो, आणि इमारतीच्या मागून एक व्यक्ती चालत आला आणि त्याने स्वतःची ओळख करून देत म्हटले कि मी पास्टर आहे. ते म्हणाले की त्यांना यायला उशीर झाला या बद्दल त्यांना वाईट वाटते, पण त्याचे कारण म्हणजे त्यांचा तो जुना ट्रक सुरू होत नव्हता. त्यांनी मला सांगितले की क्लच खराब असल्या मुले त्यांना ट्रकला टेकडीवरून खाली वेगाने आणून मग तो सुरू करावा लागतो. ते पुढे म्हणाले की कधीकधी तो अजिबात सुरू होत नाही आणि तेंव्हा त्यांना चर्चला येण्या साठी पाच मैल चालावे लागते. मला त्यांचे हे बोलणे ऐकून थोडे आश्चर्य वाटले.

ते पुढे सांगू लागले की हे चर्च प्रामुख्याने सुवार्ता प्रसार करणारे चर्च होते आणि ते दर महिन्याला हजारो लोकांना जेवण देत असत, साधारणपणे महिन्याला 10,000 पेक्षा जास्त लोक, त्याच ठिकाणाहून जेऊन जात असत. पास्टर हे सर्व सांगत असतांना मला वाईट वाटत होते. हा देवाचा माणूस आहे जो महिन्याला 10,000 लोकांना जेवण पुरवतो, आणि त्याच्याकडे एक चांगली गाडीही नाही? मी स्वतःशी म्हटले, त्या बाबतीत मी त्यांची मदत करू शकतो. माझ्याकडे 20,000 मैल चाललेली एक चांगली गाडी होती ती मी त्यांना देऊ शकत होतो. मी त्यांना माझा विचार सांगितला आणि मी म्हणालो कि मी माझ्या एका कर्मचाऱ्याला गाडी घेऊन अटलांटाला पाठवेन. हे ऐकून त्यांना खरोखरच खूप आनंद झाला.

मी त्या रात्री पास्टर ला आणि त्याच्या छोट्या चर्चला देवाच्या राज्याबद्दल आणि पैशाच्या बाबतीत ते कसे कार्य करते याबद्दल शिक्षण दिले. त्यांना ह्या शिक्षणाची नितांत गरज होती आणि त्यांनी हे राज्य कसे कार्य करते ते इतरांना देखील सांगावे हे अत्यंत महत्त्वाचे आहे हे मला माहित होते.

घरी गेल्यावर मी गाडी अटलांटाला पाठवण्याची व्यवस्था केली. जेंव्हा माझा कर्मचारी गाडी घ्यायला आला तेंव्हा मला माहित होते की मी स्वर्गात एक आध्यात्मिक व्यवहार करत आहे. मला माहित होते की मी ती गाडी देवाच्या राज्यासाठी दान देत आहे त्या मुळे मी देवावर विश्वास ठेवू शकतो की जेंव्हा मला अशी गाडी हवी असेल तेंव्हा देव ती मला देण्याची व्यवस्था करेल. मी गाडीचे वेड असणारा व्यक्ती नाही, म्हणजे मी गाड्यांची आवड असणारा व्यक्ती नाही. काही लोक असे आहेत, पण मी तास नाही. म्हणून जेव्हा माझा कर्मचारी गाडी

घ्यायला आला तेव्हा मी त्या गाडीवर हात ठेवला आणि म्हणालो, "हे प्रभू, मी ही गाडी अटलांटातील तुझ्या कामासाठी देत आहे. ती दान देत असतांना मी ते बीज म्हणून पेरत आहे आणि मला विश्वास आहे की मला _______________ मिळेल." मला हवी असलेली गाडी मला सुचत नव्हती. म्हणून मी म्हणालो, "मला जी गाडी हवी आहे त्याबद्दल मी तुला नंतर सांगेन!"

बरं, पुढचे काही महिने मी खरोखरच कारबद्दल फारसा विचार केला नाही, पण एका सकाळी मी ड्रेंडाला विचारले की तिला कोणत्या प्रकारची कार हवी आहे. तिने थोडा विचार केल्यानंतर, ती म्हणाली की कन्व्हर्टिबल चांगली असेल. मग, मी तिला विचारले की तिला कोणत्या प्रकारची कन्व्हर्टिबल हवी आहे, आणि आम्ही दोघेही बाजारात उपलब्ध असलेल्या कोणत्याही मॉडेल बद्दल विचार करू शकलो नाही. मी ड्रेंडासाठी कार खरेदी करत असल्याने, मला खात्री करायची होती की तिला आवडणारी कार तिला मिळाली पाहिजे. मी तिला सांगितले कि तू ऑनलाइन किंवा आजूबाजूला बघून थोडा शोध घे आणि तिला आवडणारी कन्व्हर्टिबल सापडेल तेंव्हा मला सांग. आम्ही नवीन कारच्या आमच्या इच्छेबद्दल कोणालाही सांगितले नाही, परंतु दरम्यान, आम्ही कुठेही जात येत असतांना कोणती गाडी चांगली आहे त्याकडे लक्ष ठेऊन होतो, आणि आमचे लक्ष वेधून घेईल अशी कार शोधत होतो.

एके दिवशी, आम्ही जवळच्या एका रेस्टॉरंटमध्ये जेवणासाठी जात होतो, आणि अचानक, ड्रेंडा जवळ जवळ ओरडून म्हणाली, "ते पहा!" "तीच ती आहे?" ती काय म्हणत आहे मी विचारले. "मला आवडणारी कार." ती पार्किंग मधील एका गाडी कडे बोट दाखवत होती, म्हणून मी त्या बाजूने गाडी घेऊन गेलो आणि एक BMW 6 Series Ci कन्व्हर्टिबलच्या मागे थांबलो, नक्कीच ती एक सुंदर कार होती. पण मी ती महागडी कार घेऊ शकणार होतो का? मी तिच्या आवडी बद्दल तिचे कौतुक केले आणि म्हणालो की ती खरोखरच सुंदर कार आहे.

आता, मी तुम्हाला हे सांगू इच्छितो की ड्रेंडा आणि मी स्वतः महागड्या गाड्या खरेदी करत नाही. मी म्हटल्याप्रमाणे, मी कधीच कारचा खूप चाहता नव्हतो. फायनान्समध्ये असल्याने, मला हे देखील माहित होते की गाड्यांची किंमत किती लवकर कमी होते आणि एक ते दोन वर्षे जुनी कार खरेदी करणे नेहमीच चांगले असते. एक दोन वर्ष जुनी पण चांगली

कार शोधून विकत घ्यावी ही माझी योजना होती.

आणि, एका आठवड्यानंतर, चर्चमधील एका व्यक्तीने मला फोन केला आणि म्हणाला, “मला ड्रेंडाला हवी असलेली गाडी सापडली!” त्या दिवशी आम्ही बाहेर जेवणाला गेलो होतो तेंव्हा आम्ही जी बीएमडब्ल्यू पहिली होती त्याबद्दल आम्ही कोणालाही सांगितले नव्हते म्हणून मी त्या व्यक्तीचे बोलणे ऐकून थोडे गोंधळून गेलो. म्हणून मी त्याला विचारले की ती कोणत्या प्रकारची गाडी आहे, आणि त्याने सांगितले की ती बीएमडब्ल्यू 6 सीरीज सीआय कन्व्हर्टिबल आहे. तो म्हणाला की तो शहरात कुठेतरी जात असतांना त्याला ती गाडी दिसली आणि प्रभूने त्याला सांगितले की ती ड्रेंडाची गाडी आहे. “ठीक आहे, आता मला समजलं कि तू काय म्हणत आहेस,” मी त्याला म्हणालो. ती गाडी एक वर्ष जुनी आणि अगदी चांगल्या स्थितीत होती. मी त्यासाठी पैसे दिले आणि ड्रेंडाला तिची गाडी मिळाली. व्वा, हे सर्व कसे घडले?

चला, आपण या कथेची तुलना विश्वासात असण्याबद्दल आणि विळा लावण्याबद्दल शिकलेल्या गोष्टींशी करूया. जेव्हा मी माझी गाडी दिली तेव्हा मी विश्वासात होतो. पण जेव्हा ड्रेंडा मोठ्याने म्हणाली, "हीच ती गाडी!" तेंव्हा ती विळा लावत होती, आणि त्यानंतर काही दिवसांनी, गाडी आली. जरी ती मोठ्याने ओरडून म्हणाली, "हीच ती गाडी!" तेंव्हा मी तिच्या त्या घोषणेला मार्कच्या चौथ्या अध्याया सोबत आणि विळा लावण्याशी जोडले नाही. पण या पुढच्या कथेने ते स्पष्ट केले.

## तुमच्या शब्दाचे सामर्थ्य

मी म्हटल्याप्रमाणे, माझ्याकडे 60 एकर जमीन आहे आणि त्यातील सुमारे 10 एकर जमीन दलदलीची आहे. मला शरद ऋतूमध्ये शिकार करायला आवडते, मी हायस्कूलमध्ये असतांना बदकांची शिकार केली होती, पण ओहायोमध्ये मी कधीही बदकांची शिकार केली नव्हती. पण त्या वर्षी दलदलीचा भाग पाण्याने भरलेला होता आणि बदकांचे मोठे कळप त्यात दिसू लागले होते. रात्रीच्या वेळी शेकडो बदके तिथे त्या दलदलीच्या भागात येत असत. म्हणून मी एका रात्री माझी बंदूक घेतली आणि शिकार करण्यासाठी बाहेर गेलो आणि रात्रीच्या जेवणासाठी बदकांची शिकार करण्यात मला आनंद वाटला.

त्या शरद ऋतूत, मी आणि माझ्या मुलांना बदकांची शिकार करण्याचा खूप आनंद

मिळाला. त्यावेळेस, एक गोष्ट माझ्या लक्षात आली ती म्हणजे बऱ्याच वेळा बदके माझ्या शॉटगनच्या रेंजवर होती. बदकांची शिकार करताना, तुम्हाला कायदेशीररित्या फक्त स्टील शॉट वापरण्याची परवानगी होती, पारंपारिक लीड शॉट वापरण्याची परवानगी नव्हती. लीड शॉट जास्त भारी असतो आणि स्टील शॉटपेक्षा जास्त दूरपर्यंत जातो, त्यामुळे बदकांची शिकार करताना लांब पल्ल्याच्या शूटिंगची समस्या निर्माण होते.

पण त्या शरद ऋतूत मी बदकांची शिकार करणाऱ्या काही लोकांशी बोलत असताना, त्यांनी मला नवीन बंदुकींबद्दल सांगितले ज्या फक्त बदकांच्या शिकारीसाठी डिझाइन केल्या होत्या. त्या जास्त वजनदार गोळीबार करू शकत होत्या आणि त्या छद्मवेशही होत्या. मला खूप वाटत होते कि मी देखील ती एक बंदूक विकत घ्यावी, पण तो डिसेंबर चा महिना होता, बदकांच्या शिकारीचा हंगाम देखील संपत आला होता म्हणून मी त्याबद्दल जास्त विचार केला नाही.

जानेवारीच्या सुरुवातीला, मी काबेला (आमच्या स्थानिय क्रीडासाहित्याच्या दुकानात) काहीतरी घेण्यासाठी थांबलो होतो आणि मला त्या नवीन प्रकारच्या बंदुकीची आठवण झाली. मला ती बंदूक पाहाण्याची खूप इच्छा होती. म्हणून मी बाहेर पडताना गन काउंटरवरून कडे गेलो आणि मला पाण्यातील पक्ष्यांच्या शिकारीसाठी असलेल्या नवीन बंदुकींचा एक संपूर्ण संग्रह दिसला. मला आठवते, मी काहीही विचार न करता, मला जी बंदूक सर्वात जास्त आवडली  त्याकडे बोट दाखवले आणि मोठ्याने म्हटले. "प्रभु, मी ती घेईन." मी ते म्हटले खरे पण नंतर मी त्या बद्दल अजिबात विचार केला नाही; त्या वेळेस ते शब्द केवळ माझ्या तोंडातून बाहेर पडले. पुन्हा शरद ऋतू येई पर्यंत बदकांच्या शिकारीचा हंगाम थांबलेला होता, म्हणून हंगामाचे दिवस जवळ येईपर्यंत मी बंदूक खरेदी करण्याचा विचार केला नाही.

दोन आठवड्यांनंतर, मला एका बिझनेस कॉन्फरन्समध्ये बोलण्यासाठी आमंत्रित करण्यात आले. मी बोलणे संपवताच, सीईओ माझे आभार मानण्यासाठी पुढे आले आणि म्हणाले की त्यांनी माझ्यासाठी गिफ्ट म्हणून एक वस्तू खरेदी केली आहे. आणि आश्चर्याची गोष्ट म्हणजे, त्यांनी नेमकी तीच बंदूक आणली होती, अगदी तेच मॉडेल, ज्याकडे मी दोन आठवड्यांपूर्वी कॅबेलामध्ये निर्देश केला होता. अशा उदार भेटवस्तूमुळे मी नक्कीच आश्चर्यचकित झालो, पण मला माहित होते की हा योगायोग नव्हता. तेव्हा मला कॅबेलाच्या

दुकानात मी काय म्हटले होते ते आठवले आणि मी काय केले हे मला कळले. मी कापणी साठी विळा घातला होता!

*आणखी तो म्हणाला, "परमेश्वराचे राज्य असे आहे की, जणू काय एखादा माणूस जमिनीत बी टाकतो, रात्री झोपी जातो, दिवसा उठतो, आणि ते बी रुजते व वाढते, पण हे कसे होते हे त्याला कळत नाही. जमीन आपोआप पीक देते; पहिल्याने अंकुर, मग कणीस, मग कणसात भरलेला दाणा. पीक तयार झाल्यावर तो लगेच विळा घालतो, कारण कापणीची वेळ आली आहे."*

—मार्क 4:26-29

विळा लावल्याने विश्वासासंबंधीचे तेच तत्व स्पष्ट होते ज्याची आपण रोमकर 10:10 मध्ये आधी चर्चा केली आहे.

*कारण जो अंत:करणाने विश्वास ठेवतो तो नीतिमान ठरतो व जो मुखाने कबूल करतो त्याचे तारण होते*

—रोमकरांस पत्र 10:10

मी माझ्या ह्दयाने विश्वास ठेवला आणि माझ्या तोंडानेच मी पृथ्वीच्या क्षेत्रात राज्य प्रवाहित केले. मी 30 हून अधिक बंदुका दान दिल्या होत्या, पण मला आठवते की मी पहिल्यांदाच मोठ्याने म्हटले होते, "मी ती घेईन." पण मी ह्या संबंधी विचार करत असतांना मला आठवले कि, ह्या पूर्वी देखील एकदा मी असेच केले होते - पण त्यावेळी मला राज्य कसे चालते याची काहीच कल्पना नव्हती.

जेव्हा मी आणि ड्रेंडा ओहायोला परत आलो, तेंव्हा आम्ही ओक्लाहोमाहून त्या ठिकाणी गेलो होतो आणि ओक्लाहोमा मध्ये रायफलने हरणांची शिकार केली जात असे. पण ओहायोमध्ये, रायफल वापरण्यास कायद्याने परवानगी नव्हती; फक्त स्लग वापरणाऱ्या शॉटगनना परवानगी होती. त्यावेळी माझ्याकडे फक्त 20-गेज डबल बॅरल होती ज्याच्या मदतीने मी स्थलांतरित झाल्याच्या पहिल्या वर्षी  दोन हरणांची शिकार करू शकलो. पण मला हरणांची शिकार करण्यासाठी डिझाइन केलेली एक चांगली शॉटगन हवी होती. मला आठवते की ओहायोमधील त्या पहिल्या हरणांच्या शिकारीच्या हंगामानंतर, मी ड्रेंडा ला

म्हटले होते की मला हरणांच्या शिकारीसाठी काळ्या सिंथेटिक स्टॉकची रेमिंग्टन मॉडेल 11- 87 12 गेज खरोखर हवी आहे. काही आठवड्यांनंतर ख्रिसमस होता आणि जेव्हा माझ्या वडिलांनी मला ख्रिसमससाठी तीच शॉटगन दिली तेव्हा मला आश्चर्य वाटले. मी त्यांना शॉटगनची माझी गरजही सांगितली नव्हती. मला आठवते मी स्वतःशी बोलत हे म्हणत होतो, "हे तर खरोखर फार विचित्र आहे." मी नकळत कापणी साठी विळा लावला होता.

## अध्याय 4

# तुम्हाला आठवत नाही का?

सुरुवातीच्या काळात जेव्हा मी पहिल्यांदा राज्य कसे कार्य करते हे शिकत होतो, तेव्हा मी ज्या गोष्टी पाहिल्या त्या पाहून मला धक्का बसला. याचे मुख्य कारण म्हणजे मी ज्या गोष्टी पाहत होतो त्यापैकी काहीही मला पूर्वी कधीच कुणी शिकविले नव्हते. पण मी पुस्तकाच्या पहिल्या भागात सांगितले आहे कि, देव मला जे अनेक धडे शिकवत होता त्या साठी मी करत असलेल्या हरणांच्या शिकारीचा वापर करत आहे असे मला दिसून आले. मी मुळात एक साधा माणूस आहे आणि मला वाटतं की माझं लक्ष वेधून घेण्याचा तो एक उत्तम मार्ग होता. हरणांची शिकार करण्यासाठी पेरणी कशी करायची हे शिकल्यानंतर आणि त्यांची कापणी करण्यास सुरुवात केल्यानंतर - सहसा शिकारीसाठी बाहेर पडल्यानंतर सुमारे 40 मिनिटांत, देवाने राज्याच्या कार्याबद्दल मला अधिक माहिती देण्या साठी मला अधिक धडे देण्यास सुरुवात केली.

मी ओक्लाहोमातील तुलसा येथे होतो तेव्हा देवाने मला सहा-पॉइंट हरणा ची विश्वासाने शिकार कशी करायची हे दाखवले. आणि मी तुम्हाला सांगितलेच आहे कि, आम्ही पुढच्या वर्षी ओहायोला परत गेलो. ओहायोमध्ये हरणांचा मोठा कळप होता पण फक्त दोन हरणांची शिकार करण्याची परवानगी होती, त्या पैकी फक्त एकच नर हरण मारण्याची परवानगी होती. म्हणून जेव्हा मी ओहायोला आलो, तेव्हा मी दरवर्षी दोन हरण, एक नर आणि एक मादी हरणाची शिकार करण्यासाठी पेरणी करायला सुरुवात केली. आणि घड्याळाच्या काट्याप्रमाणे, मला ती शिकार अगदी निश्चित वेळेतच मिळाली.

पण एका वर्षी, मला असे काहीतरी दिसले ज्यामुळे मी गोंधळून गेलो. मी विचार केला, "नाही, हे घडूच शकत नाही." तो हरणांच्या शिकारीचा हंगाम संपला तेंव्हा माझ्या लक्षात आले की मी बी पेरतांना माझ्या चेकवर ज्या क्रमाने हरण लिहिले होते त्याच क्रमाने ते मला मिळाले. उदाहरणार्थ, जर मी "तुमची वित्तीय क्रांती:  तरतूदीचे सामर्थ्य" "नर हरण आणि

मादा हरणासाठी" असे लिहिले, तर मी प्रथम नर हरणाची शिकार केली आणि त्यानंतर मादा हरणाची शिकार केली. ओहायोमधील शिकारीच्या गेल्या काही हंगामांवर विचार करताना, मला वाटले की हे दरवर्षी असेच घडत आहे. मी कधीच त्याकडे जास्त लक्ष दिले नव्हते म्हणून मला खात्री नव्हती, पण मग, मला प्रश्न पडला की हे खरे आहे का.

म्हणून मी विचार केला कि पुढच्या वर्षी, मी निश्चितपणे ह्याचा शोध घेणार आहे. मला मान्य आहे की हा वेडेपणाच विचार होता, पण मला वाटले की जर कार्य अशा प्रकारे होत आहे, तर मी काही प्रयोग केल्याशिवाय मला ते कधीच कळणार नाही. म्हणून मी त्या वर्षी माझे बी पेरतांना क्रम उलट केला. यावेळी, मी यादीत मादा हरणाला पहिले स्थान दिले. तोपर्यंत मी माझे बी पेरताना नेहमीच पहिले नर हरण लिहित असे. आणि शिकार करतांना ते मला त्याच क्रमाने मिळत होते. म्हणून पुढच्या वर्षी, मी पुन्हा तसेच केले, आणि ज्या क्रमाने मी लिहिले त्याच क्रमाने मी त्यांची शिकार केली. मी कधीच विचार केला नव्हता की असं काही घडू शकतं. म्हणजे, राज्याचे कार्य इतक्या विशिष्ट पद्धतीने कार्य करते का?

हे खरोखर घडत आहे की फक्त योगायोग आहे हे शोधण्यासाठी, मी निश्चितपणे शोधून काढायचे आणि थोडा अधिक सखोल प्रयोग करायचा ठरवले. त्या वर्षी मी सात ठिबक्यांच्या हरणासाठी माझे बी  पेरले. मला माहित होते की एका सामान्य, हरणाच्या अंगावर दोन्ही बाजूला सम बिंदू असतात, म्हणून मी एक विषम संख्या आणि एक सम संख्या निवडली. तर मी आणि ड्रेंडा ने त्या प्रमाणे बी पेरले, हे थोडे विचित्र होते तरी आम्ही तसे केले. आम्ही प्रार्थना केली आणि आमचे बी सात-ठिबक्यांच्या हरणासाठी बी पेरले.

## विश्वास किती विशिष्ट आहे?

अखेर ऑक्टोबर आला आणि धनुष्याने शिकार करण्याचा हंगाम सुरू झाला. सहसा, मी माझा धनुष्य घेऊन जंगलात जाण्यासाठी उत्सुक असायचो, पण हंगाम सुरू झाला तेंव्हा मला वाटू लागले कि माझ्या मनात काहीतरी विचित्र भावना येत आहेत. मला शिकारीसाठी बाहेर जाण्याची अजिबात इच्छा नव्हती. ती भावना तीव्र होती आणि मला वाटत होते कि मी आता सध्या शिकारीसाठी बाहेर जाण्यास तयार नाही. मला असे देखील वाटत होते की काही दिवसानंतर झाडांची पाने गळू लागतील, शिकारीचा हंगाम जोमात येईल माझ्या मधील ही भावना दूर होईल. पण नाही, तसे अजिबात झाले नाही, मला शिकारीसाठी न

जाण्याची भावना कशी होती ते मी समजावून सांगू शकत नाही; पण एवढे निश्चित होते कि मला बाहेर जाण्याची अजिबात इच्छा नव्हती, अजिबात नाही. मला आठवतंय मी विचार करत होतो, "आपण मोठे झाल्यावर, जे पूर्वी करत होतो ते करणं थांबवतो का?" म्हणजे मला झालेल्या या विचित्र भावनेचे मी स्पष्टीकरण देऊ शकत नव्हतो. असं वाटत होतं की मी पुन्हा कधी हरणांची शिकार करायला गेलो नाही तरी मला काही फरक पडणार नाही. बरं, आता नोव्हेंबर महिना सुरू झाला होता आणि मला थोडी काळजी वाटत होती. मी जंगलातील सर्वात सुंदर आणि सर्वात उष्ण वेळ आधीच गमावला होता. आता नोव्हेंबरचा मध्य होता, आणि मला अजूनही हरणांच्या शिकारीला जाण्याची अजिबात इच्छा नव्हती. मला वाटले की मी बाहेर देखील जाऊ शकेल किंवा नाही माहित नाही.

ड्रेंडाचे आई वडील काही दिवस आमच्याकडे राहण्यासाठी अलाबामाहून गाडीने आले होते. आम्ही बैठकीच्या खोलीत बोलत बसलो होतो, अचानक मला वाटले की मला उद्या जंगलात शिकारीला जायचे आहे. जणू काही माझ्या मध्ये स्विच चालू झाला होता. मी सर्वांना सांगितले की मला शिकार करण्या साठी सकाळी बाहेर जावे लागेल. दुसऱ्या दिवशी सकाळी मी शिकारीचे सामान तयार करू लागलो आणि मला फार उत्साहित असल्यासारखे वाटू लागले.

मला माहित होते की माझे सात-ठिबक्यांचे हरीण शिकारीच्या जागी येणार आहे. आणि मग मला समजले. सात-ठिबक्यांचे हरणं ऑक्टोबरमध्ये बाहेर निघत नसावेत आणि ते हरण आदल्या दिवशी देखील तिथे नव्हते. हरणांच्या शिकारीला जाण्याची इच्छा नसण्याचे कारण देखील कदाचित हेच असावे. मी विचार केला जर मी माझ्या खिडकीतून बाहेर पाहून म्हटले असते कि हा शिकारीचा महिना आहे आणि मी रोज बाहेर जाऊन वाट पाहणार, आणि दीड महिना दररोज असे केले असते तर ते किती कठीण आणि कंटाळवाणे झाले असते याची मी कल्पना करू शकतो. इतकेच नाही तर ते फार निराशाजनक देखील झाले असते. ह्या क्षणाला, सर्वकाही एक सिद्धांत होता, परंतु दुसऱ्या दिवशी सकाळी मला ह्याची परीक्षा घ्यायला मिळणार होती.

त्या सकाळी मी उठलो तेव्हा अंधार होता आणि रात्री मी कोणत्या झाडावर जावे याबद्दल प्रार्थना केली होती. त्या भागात मी अनेक झाडांवर जाण्या साठी स्टॅन्ड तयार केले होते आणि मी त्याबद्दल प्रार्थना करत असताना, मला खात्रीने वाटले की मी मार्श

स्टॅन्ड वर जावे. आम्ही त्याला मार्श स्टँड म्हणतो कारण त्या स्टँडच्या एका बाजूला सुमारे दहा एकर दलदल आणि स्टँडच्या दुसऱ्या बाजूला झुडुपे होती. मला माहित होते की हरीण कधीकधी दलदलीच्या बाजून निघून काठावरून जात असत. ह्या पूर्वी मी ह्या स्टँड वरून शिकार केली होती आणि त्या दिवशी देखील मार्श स्टँडवरून मला माझे हरीण मिळण्याची पूर्ण अपेक्षा होती.

मी स्टँडकडे जाताना, देवाने हरणांच्या शिकारीद्वारे त्याच्या राज्याबद्दल मला पूर्वी जे दाखवले होते ते मी पाहिले आणि मला वाटले की तो मला अधिक शिकवत आहे. माझ्या प्रयोगाचा परिणाम मी खूप उत्सुक होतो.

पहाटेचा प्रकाश वर येऊ लागला होता आणि शरद ऋतूतील सकाळचे नेहमीचे आवाज आणि वास माझ्यासाठी एक स्वागतार्ह बदल होता. इतके दिवस मी हे सर्व अनुभवू शकलो नव्हतो. सकाळ होऊन जवळजवळ एक तास झाला होता, आणि हरणाचे कोणतेही चिन्ह दिसत नव्हते. तरीही माझ्या त्या भागामध्ये ह्या पूर्वी मी जे पाहिले होते त्यावरून मला हे कळून चुकले होते की हरणं सकाळी उशिरा या भागात येत असत कारण ते निवांत बसण्या साठी उत्तम क्षेत्र होते. जरी मी झाडाच्या स्टँडवर सुमारे एक तास बसून होतो, तरी कायदेशीर रित्या शिकार करण्यासाठी हवा असणारा प्रकाश फक्त 40 मिनिटे असणार होता.

मी तिथे बसलो असताना मला घरा समोर कुणीतरी गाडीचा दरवाजा आपटल्याचा आवाज आला. मग मला आठवलं की ड्रेंडाचे आईवडील त्या सकाळी गाडीने अलाबामाला परत जायला निघणार होते आणि मला त्यांचा निरोप घ्यायचा होता. म्हणून, मी अनिच्छेने खाली उतरलो, आणि विचार केला की मला सात ठिबक्यांच्या हरणाची शिकार करण्यासाठी उद्या परत यावे लागेल.

मी घरी पोहोचताच, सर्वजण उठून नाश्त्यासाठी तयार झाले होते. मी कुटुंबासाठी नेहमीच नाश्ता बनवत असतो, मी जवळजवळ दररोज ड्रेंडासाठी, माझ्या स्वतः साठी आणि आमच्या सोबत इतर कुणी असेल तर त्यांच्या साठी नाश्ता बनवत असतो. म्हणून ड्रेंडाच्या आईवडिलांनी त्यांच्या गाडीत आपले सामान ठेवले आणि मी नाश्ता बनवण्याच्या कामाला लागलो. त्यावेळेस त्यांनी मला हरणाबद्दल विचारले आणि मी त्यांना म्हणालो की आता तुम्ही जाणार आहात म्हणून तुमच्या सोबत थोडा वेळ घालवता यावा म्हणून मी

शिकार सोडून परत आलो. हे करतांना मी थोडा निराश तर झालो होतो, कारण मला वाटले होते कि ते सकाळी थोडे उशिरा जाणार आहेत, त्यामुळे मला माझ्या योजनेप्रमाणे शिकार करायला वेळ मिळेल.

पण मी स्वयंपाकघरात स्क्रॅम्बल्ड एग  तयारी करत असताना, स्वयंपाकघरातील खिडकीतून बाहेर पाहिले,  त्या खिडकीतून आमच्या घराच्या मागच्या बाजूचे जंगल आणि शेतं दिसत होते. शेताच्या मागच्या बाजूला एका नर हरिण मादा हरणाचा पाठलाग करताना दिसले, आणि ते थेट त्याच झाडाच्या दलदलीच्या भागा कडे जात होते जिथे मी स्टँड वर बसलो होतो. मला फक्त एवढंच माहित होतं की तेच माझं शिकारीचं हरीण आहे. मी अचानक मोठ्याने ओरडून म्हणालो कुणीतरी स्वयंपाक सांभाळा मला हरण दिसले आहे आणि मी त्याची शिकार करून येतो. मला माहित होतं की माझ्याकडे जास्त वेळ नाहीये.

हरणाने मला पाहू नये म्हणून घराच्या विरुद्ध बाजूने धावत गेलो. मला वाटलं की तो कदाचित ज्या झाडावर स्टँड आहे त्या बाजूने जात असेल. मी शेताच्या बाजूने शक्य तितक्या वेगाने धावलो आणि स्टँडवर पोहोचलो पण मला एकही हरण दिसले नाही, एका दृष्टीने ते चांगलेच होते. कारण जर ते माझ्या मागच्या बाजूने आले असते तर मला ते मिळाले नसते. माझे हृदय धडधडत होते आणि चेहऱ्यावरून घाम येत होता, मी पटकन स्टँडवर चढलो.

मी स्टॅन्डवर जाऊन बसलो आणि एवढ्यात ते मला दिसले. हरीण अगदी माझ्या स्टँडच्या खालून चालत होती आणि मला माहित होते कि नर हरण तिच्या पासून फार दूर नसणार म्हणून मी स्वतःला तयार केले. आणि खरेच, तो पण आलाच. तो खरोखरच सात-ठिबक्यांचा हरण होता की नाही हे पाहण्यासाठी माझ्याकडे वेळ नव्हता. शॉट घेण्यासाठी मोठ्या मुश्किलीने फारच थोड्या वेळात धनुष्य वर केला. मी तीर मारला, आणि मला माहित होते की तो हरणाला लागला आहे पण तो तीर थोडा कमी वेगाने गेला होता, ज्यामुळे मला वाटले कि त्याला तो लागला कि नाही. मार लागताच हरीण उडी मारून वाढलेल्या गवतात गेला. मी स्टँडवर बसून सुमारे 20 मिनिटे वाट पाहिली आणि शेवटी झाडावरून खाली उतरलो, बाण लागल्याची चिन्हे तपासण्यासाठी मी उत्सुक होतो. दुर्दैवाने, बाणावर आणि जमिनीवर फारच कमी रक्त होते.

मी ज्या प्रकारे बाण मारला त्यामुळे मी फारसा खुश नव्हतो, पण मला माहित होते की

हरीण गवतात जाऊन पडेल पण मला त्याला लगेच बाहेर काढायचे नव्हते. मी याआधी देखील शिकार करतांना पहिले आहे कि बाण लागल्या नंतर देखील हरणाच्या शरीरातून खूप कमी रक्त निघाले आहे, त्यामुळे असे झाले तर त्यांना थोडा वेळ बसू देणे हाच सर्वात चांगला उपाय आहे हे मला माहित होते. म्हणून मी घरी परत गेलो आणि नाश्ता केला, काय झाले ते सर्वांना सांगितले आणि मग माझ्या मुलांना म्हणालो की ज्या हरणाला बाण लागून तो जखमी झाला आहे त्याला शोधण्या साठी मला त्यांची गरज लागणार आहे. मला आशा होती की जे मला वाटत होते कि हरणाला फार कमी प्रमाणात बाण लागला आहे, तसे अजिबात नसावे, त्याला बाण लागल्या मुळे तो आता पर्यंत मरून गेलेला असावा. पण शक्यता ही देखील होती कि मी हरणाला खूप हळुवार मारले आणि तो फक्त जखमी झाला असावा.

काही तास वाट पाहिल्यानंतर, आम्ही बाहेर पडलो आणि आम्ही तिघेही शेतात वेगवेगळ्या दिशेने गेलो. मी माझे धनुष्य गरज पडल्यास तयार ठेवले होते. अचानक, शेताच्या दुसऱ्या म्हणजे माझ्या विरुद्ध बाजूला, टिम हरणाला जवळ जवळ धड़क्ला. हरणाने मला पाहिले नव्हते आणि ते माझ्या दिशेने धावत येत होते. धावत असतांना अचानक त्याला टॉम दिसला आणि आता कोणत्या दिशेने जायचे याचा अंदाज घेण्यासाठी तो थांबला. हरण सुमारे  65 ते 70 यार्ड अंतरावर होते, त्या दिवशी माझ्या जवळ असलेल्या कमी शक्तीच्या क्रॉसबोने चांगला वेगाने क्रॉसबो मारण्यासाठी ते खूप दूर होते, पण मला माहित होते की माझ्यासाठी ती एकमेव संधी आहे. मी पटकन धनुष्य वर केले आणि हरणाच्या वरच्या बाजूला लक्ष्य साधले आणि बाण सोडला. आश्चर्य म्हणजे, बाण हरणाकडे वळला आणि सरळ जाऊन त्याच्या मानेच्या मध्यभागी लागला. ते टेकडीवरून खाली गेले आणि दृष्टीआड झाले. मी आश्चर्याने होतो तसाच उभा राहिलो. आम्ही हळूहळू हरण ज्या दिशेने पळाले होते त्या दिशेने गेलो आणि

**हो, राज्य इतके विशिष्ट होते! कोणीही मला कधीच सांगितले नाही की राज्य अशा प्रकारे कार्य करते, आणि ते इतके विशिष्ट आहे, आणि आपल्याला प्रत्यक्षात अशा प्रकारचा विशिष्ट अधिकार दिला गेला आहे.**

मला ते आमच्यापासून सुमारे 100 यार्ड पुढे पडलेले दिसले. ते डोके वर करून बसले होते पण त्याने आम्हाला पाहिले नव्हते, म्हणून आम्ही मागे हटलो आणि नंतर परत येऊन त्याला पाहण्याचा निर्णय घेतला.

दुसऱ्या दिवशी आम्ही फार उशिरापर्यंत व्यस्त होतो कारण माझा पूर्ण दिवस चर्चमधील कामात व्यस्त राहीला आणि संध्याकाळ होईपर्यंत मी घरी परतू शकलो नाही. घरी आल्या नंतर टिम आणि मी टॉर्च घेतला आणि जिथे आम्ही हरण पडलेले पाहिले होते तिथे परत गेलो. आम्ही त्याला जिथे पहिले होते तिथून ते काही यार्ड अंतरावर आम्हाला सापडले. मी त्याच्या शिंगांकडे पाहिले आणि माझ्या समोर सात-ठिबक्यांचा हरण होता. मी आश्चर्याने त्या हरणाकडे पाहत राहिलो. टिम आणि मी हरणासाठी देवाचे आभार मानले आणि आम्ही ते घराकडे ओढत घेऊन जात असतांना, राज्याबद्दल आणि आम्ही नुकतेच जे पाहिले त्याबद्दल बोलू लागलो.

हो, राज्य इतके विशिष्ट होते! कोणीही मला कधीच सांगितले नाही की राज्य अशा प्रकारे कार्य करते, आणि ते इतके विशिष्ट आहे, आणि आपल्याला प्रत्यक्षात अशा प्रकारचा विशिष्ट अधिकार दिला गेला आहे.

## आणखी एक शोध

मला आणखी एक हरणांची शिकार आठवते, ह्यावेळेस मी एका बटन बक एक प्रकारचे हरीण साठी माझे बी पेरले होते. बटन बक हा एक वर्षाचा हरण असतो, त्याची शिंगे फार लहान  असतात. ते इतके लहान असतात त्यामुळे, जास्त दूर असले तर, असे वाटते कि ते हरिणी आहे. यामुळे, ओहायो राज्यात बटण बक्स ला हरिणीच समजले जाते. कृपया लक्षात ठेवा, ते हरणाचे पिल्लू नसते. ते पूर्ण वाढलेल्या हरणाएवढे मोठे नसतात, पण जवळजवळ त्यांच्या सारखेच असतात.

तर त्या विशिष्ट दिवशी, मी माझ्या झाडाच्या स्टॅंडवर होतो, आणि हरणांचा एक संपूर्ण कळप तिथे आला, ते सुमारे नऊ किंवा दहा होते. ते माझ्या धनुष्याच्या टप्प्या च्या थोडे बाहेर होते पण हळूहळू माझ्या दिशेने येत होते. अचानक, शेजाऱ्याने त्यांची गाडी सुरु केली. आणि तो आवाज ऐकून, संपूर्ण कळप माझ्यापासून दूर पळून गेला. मी मोठ्याने म्हणालो, "बटन बक, मी तुला परत येऊन माझ्या झाडाखाली उभे राहण्याची आज्ञा देतो." तर आता

कल्पना करा. ते कापणी झालेले मक्याचे शेत आहे आणि सर्व नऊ हरीण माझ्यापासून पळून दूर जात आहेत. मी जे ओरडून म्हणालो त्यानुसार, एक हरीण कळपातून बाहेर निघते, गोल गोल फिरते, आणि थेट माझ्या झाडाच्या स्टॅन्ड खाली येऊन थांबते! मी त्या हरणाची शिकार केली आणि ती शिकार घेऊन घरी गेलो, आणि हो, ते एक बटन बक होते.

अशा प्रकारची गोष्ट वारंवार घडतांना मी पाहत होतो. या पुस्तकात मी नंतर राज्य किती तंतोतंत तपशीलवार आणि विशिष्ट पणे कार्य करते याबद्दल अधिक चर्चा करणार आहे, परंतु सध्या, येथे काहीतरी अविश्वसनीय घडत आहे हे आपण लक्षात घेऊ या.

राज्याने आमचे जीवन बदलले आणि आम्ही त्याबद्दल लोकांना सांगण्यापासून स्वतःला रोखू शकलो नाही. आमच्याकडे असे खूप अनुभव आहेत, आणि आम्ही खूप काही पाहिले आहे. आम्ही मृतांना पुन्हा जिवंत होताना पाहिले आहे, ट्यूमर त्वरित नाहीसे होतांना पाहिले आहे, आर्थिक कठीण परिस्थिती मधून आश्चर्यकारक रित्या सुटका आणि मार्गदर्शनाच्या आश्चर्यकारक घटना पाहिल्या आहेत. देवाच्या राज्याच्या चांगुलपणाबद्दल लोकांना सांगण्याची तीव्र इच्छा असल्याने, ड्रेंडा आणि मला 1995 मध्ये लोकांना राज्य समजून घेण्यास मदत करण्यासाठी फेथ लाइफ चर्च सुरू करण्यास आम्ही प्रेरित झालो. त्यानंतर देवाने आम्हाला 2006 मध्ये फेथ लाईफ नाऊ, आमची मीडिया मिनिस्ट्री सुरू करण्याचे निर्देश दिले, ह्या मिनिस्ट्री द्वारे आमचे टीव्ही कार्यक्रम दररोज पृथ्वीवरील प्रत्येक टाइम झोनमध्ये प्रसारण केल्या जातात. आम्हाला आढळले की सर्वत्र लोकांना स्वातंत्र्य आणि विजयाची ही राज्य जीवनशैली कशी जगायची हे जाणून घेण्याची इच्छा आहे.

## देवाचे राज्य सर्वांसाठी कार्य करते

आज सकाळी मी हा अध्याय लिहिण्यासाठी बसलो असताना, मी माझे ईमेल तपासले. देवाचे राज्य त्यांचे जीवन कसे बदलत आहे हे सांगणारे लोक आम्हाला दररोज ईमेल लिहितात. काही मिनिटांपूर्वीच हा ईमेल आला आणि त्यात काय लिहिले आहे ते मी तुम्हाला देखील सांगू इच्छितो.

> मी कोण आहे की तो माझी जाणीव ठेवतो? काही वर्षांपूर्वी, मी तुम्ही देत असलेले शिक्षण ऐकायला सुरुवात केली आणि तेव्हापासून मी माझ्या जीवनात चमत्कार

होतांना पाहिले आहेत. मी आजारातून बरे होणे आणि आर्थिक चमत्कार पाहिले आहेत. त्याचप्रमाणे, मी माझ्या आजूबाजूला पाहतो आणि त्यात तो किती चांगला आहे दे दिसून येते तेंव्हा माझे मन खरोखरच भारावून जाते. मी गरजू लोकांना पाहतो आणि सुवार्तेसाठी आणि सत्यासाठी दरवाजे उघडलेले पाहतो. मला सत्याचे दरवाजे उघडलेले दिसतात! आणि मला सर्वात अधिक आश्चर्य ह्याचे वाटते कि माझी तिजोरी भरलेली असते. त्याने मला समृद्ध केले आहे ह्यासाठी कि मी इतर गरजू लोकांना देऊ शकेन, त्याद्वारे ते लोक देखील त्याचा अनुभव घेऊ शकतील आणि त्याला पाहू शकतील! मी एक स्वयंरोजगार गृह निरीक्षक आहे. मी नियमितपणे तरुण निरीक्षकांना मार्गदर्शन करतो आणि मी ख्रिश्चन व्यवसाय गट सुरू केला जिथे आम्ही उदार होण्याच्या आणि पुढच्या पिढीला शिकवण्याच्या आवाहनाबद्दल बोलतो... आणि हे स्पष्ट करतो की राज्याचा मार्ग स्पर्धा नाही तर विपुलता आहे. खरंच, तुमच्या शिकवणीने माझे आयुष्य बदलले आहे, आणि आता ते शिक्षण इतरांपर्यंत पोहोचवले जात आहे; आणि त्याने मला स्थापित केल्यामुळे, आता इतर लोक त्याचे वैभव ऐकतात आणि पाहतात. त्याने काय केले आहे आणि तो कसा पुरवत आहे हे पाहणे हे माझ्यासाठी नम्रपणाचे आहे. तुमच्या सेवेबद्दल धन्यवाद!

नम्रपणे,<br>
बी.एफ.<br>
नॉक्सविल, टीएन

अशा प्रकारचे ईमेल आम्हाला नेहमीच मिळतात. पण आम्हाला राज्य कसे कार्य करते हे विचारणारे बरेच प्रश्न लोक विचारतात. लोक विचारतात की राज्याचे कार्य आपल्या जीवनात होण्यासाठी काय करावे आणि मी आणि ड्रेंडाने आमच्या जीवनात जे अनुभवले ते आम्ही आमच्या जीवनात कसे अनुभवू शकतो. "तुमची वित्तीय क्रांती" ह्या माझ्या पुस्तकांच्या मालिकेतील चौथ्या पुस्तकाचा उद्देश हाच आहे. जर तुमच्याकडे माझी इतर पुस्तके असतील, तर तुम्हाला माहिती असेलच की राज्याचे कार्य आपल्या जीवनात होऊ देण्याची इच्छा बाळगणाऱ्या प्रत्येकाला माहित असाव्यात अशा काही प्रमुख संकल्पनांचा आढावा घेण्यासाठी मी त्यामध्ये अधिक समजावून सांगण्याचा प्रयत्न केला आहे.

पण आता मला राज्याचे कार्य कसे होते ह्या विषयात थोडे खोलवर जायचे आहे आणि आशा आहे की, राज्याच्या कार्याचे परिणाम आपल्या जीवनात अनुभवत जगणे कसे शक्य आहे याबद्दल तुम्हाला अधिक समजून घेण्यास मदत होईल. देवाने मला शिकवल्याप्रमाणे, देवाच्या राज्यात तुम्हाला आवश्यक असलेली तरतूद मिळविण्यासाठी मी ज्याला पाच मूलभूत पायऱ्या म्हणतो त्या ह्या ठिकाणी मांडून मी सुरुवात करू इच्छितो.

## तुम्हाला आवश्यक असलेल्या तरतुदी मिळविण्यासाठी ह्या 5 मूलभूत पायऱ्या आहेत

मार्क 8:14–21मधील एका कथेने सुरुवात करूया.

*ते भाकरी घेण्यास विसरले होते; आणि मचव्यात त्यांच्याजवळ एकच भाकर होती. मग त्याने त्यांना निक्षून सांगितले की, "सांभाळा, परूश्यांचे खमीर व हेरोदाचे खमीर ह्यांविषयी जपून राहा."*

*तेव्हा 'आपल्याजवळ भाकरी नाहीत' अशी ते आपसांत चर्चा करू लागले. हे जाणून येशू त्यांना म्हणाला, "तुमच्याजवळ भाकरी नाहीत ह्याविषयी चर्चा का करता? तुम्ही अजून ध्यानात आणत नाही व समजतही नाही काय? तुमचे अंतःकरण कठीण झाले आहे काय?*

*डोळे असून तुम्हांला दिसत नाही काय? कान असून तुम्हांला ऐकू येत नाही काय?*

*तुम्हांला आठवत नाही काय? मी पाच हजार लोकांना पाच भाकरी मोडून वाटू दिल्या तेव्हा तुम्ही तुकड्यांच्या किती टोपल्या भरून घेतल्या?"*

*ते त्याला म्हणाले, "बारा."*

*"तसेच चार हजारांसाठी सात भाकरी मोडल्या तेव्हा तुम्ही किती पाट्या तुकडे भरून घेतले?"*

*ते म्हणाले, "सात."*

*तेव्हा तो त्यांना म्हणाला, "अजून तुम्हांला समजत नाही काय?"*

—मार्क 8:14-21

मुळात, येशू म्हणत होता, "अरे, मित्रांनो, तुम्हाला आठवत नाही का? आपण हे ह्या पूर्वी देखील केले आहे आणि तुम्ही आधीच पाहिले आहे की ह्या पूर्वी देखील भाकरी कमी पडल्या असतांना आपण ती कमतरता कशी पूर्ण केली. पण शिष्य या गोष्टी समजू शकले नाहीत. म्हणून येशूने त्यांना पूर्वी घडलेल्या गोष्टींचा विचार करण्यास सांगितले. तो त्यांना एक गंभीर संकेत देत होता. "आपण गेल्या वेळी याच परिस्थितीचा सामना केला होता तेव्हा काय घडले ह्याचा विचार करा, आणि तिथे तुम्हाला उत्तर मिळेल." मी म्हणेन की हेच आपले देखील उत्तर आहे. हो, आपण पाहतो की भाकरी आणि मास्यांची संख्या वाढली आहे, हे कोणालाही दिसून येऊ शकते, परंतु आध्यात्मिक शास्त्रज्ञ म्हणून, आपल्याला खोलवर जाऊन पाहायचे आहे. ते कसे घडले? तर मग येशू ज्या घटनांचा उल्लेख करत होता त्या घटनां कडे परत जाऊया आणि त्याचे संकेत शोधूया.

*दिवस बराच उतरल्यावर त्याचे शिष्य त्याच्याकडे येऊन म्हणाले, "ही अरण्यातली जागा आहे व आता दिवस फार उतरला आहे;तेव्हा लोकांनी भोवतालच्या खेड्यापाड्यांत जाऊन स्वतःकरता खायला काही विकत घ्यावे म्हणून त्यांना निरोप द्या. [कारण त्यांच्याजवळ खायला काही नाही."*

*त्याने त्यांना उत्तर दिले, "तुम्हीच त्यांना खायला द्या." ते त्याला म्हणाले, "काय, आम्ही जाऊन दोनशे रुपयांच्या भाकरी विकत घेऊन त्यांना खायला द्याव्यात?"*

*तो त्यांना म्हणाला, "तुमच्याजवळ किती भाकरी आहेत? जाऊन पाहा." पाहिल्यावर ते म्हणाले, "पाच, व दोन मासे."*

*नंतर त्याने त्या सर्व लोकांना हिरवळीवर गटागटाने बसायला सांगितले. तेव्हा ते शंभरशंभर व पन्नासपन्नास असे पंक्तीपंक्तीने बसले. मग त्याने त्या पाच भाकरी व ते दोन मासे घेऊन वर स्वर्गाकडे पाहून आशीर्वाद दिला आणि भाकरी मोडल्या व त्या त्यांना वाढण्यास आपल्या शिष्यांजवळ दिल्या. ते दोन मासेही सर्वांना वाटून दिले. मग सर्व जण जेवून तृप्त झाले. आणि त्यांनी उरलेल्या तुकड्यांच्या बारा*

*टोपल्या भरून घेतल्या आणि माशांचेही तुकडे नेले. भाकरी खाणारे [सुमारे] पाच हजार पुरुष होते.*

—मार्क 6:35-44

जेव्हा शिष्यांनी येशूला म्हटले कि लोकांना स्वतः साठी अन्न घेऊन येण्या साठी पाठवावे तेव्हा मला खात्री आहे कि, शिष्यांना हे ऐकून धक्का बसला असेल कि येशूने त्यांना उलटून म्हटले कि, "तुम्ही त्यांना खायला द्या." या ठिकाणी "ते" 5,000 पेक्षा जास्त लोक होते. बायबल म्हणते की तिथे 5,000 पुरुष होते, म्हणून मी असे गृहीत धरतो की तिथे महिला आणि मुले देखील होती, ज्यामुळे खरी संख्या 15,000 ते 20,000 पर्यंत पोहोचते. मला वाटतं कोणीही सहमत होईल की ह्या ठिकाणी भरपूर लोकांना खायला घालायचं आहे, आणि ते देखील कोणतीही पूर्वसूचना किंवा तयारी न करता. अर्थात, मला असे वाटते की येशूला लोकांना जेवू घालण्याची इच्छा होती, परंतु मला वाटते की त्याही पेक्षा अधिक महत्वाची गोष्ट म्हणजे ह्या परिस्थितीत तो आपल्या शिष्यांना काहीतरी विशेष शिक्षण देण्याचा प्रयत्न करत होता. आणि कदाचित, म्हणूनच तो त्यांना म्हणाला, "तुम्ही त्यांना खायला द्या." त्यांनी येशूला अनेक चमत्कार करताना पाहिले होते, पण आता त्यांना ते करायचे होते. कारण, तो लवकरच त्यांना सोडून जाणार होता, आणि येशूला खात्री करायची होती की त्यांना जीवन वेगळ्या दृष्टिकोनातून, राज्याच्या दृष्टिकोनातून कसे हाताळायचे हे समजले आहे किंवा नाही.

**येशूला खात्री करायची होती की त्यांना जीवन वेगळ्या दृष्टिकोनातून, राज्याच्या दृष्टिकोनातून कसे हाताळायचे हे समजले आहे किंवा नाही.**

### पायरी #1: तुमच्याकडे काय आहे?

*"तुमच्याकडे किती भाकरी आहेत?" त्याने विचारले. "जा आणि पहा"*

*जेव्हा त्यांना ते मिळाले तेंव्हा ते म्हणाले, "पाच - आणि दोन मासे."*

येथे एक प्रमुख किल्ली आहे. येशूने असे म्हटले नाही की, "चला आपण दगडाच्या

भाकरी बनवू या." असे करणे आत्मिकदृष्ट्या बेकायदेशीर असेल. त्याऐवजी, त्याने त्यांना विचारले की त्यांच्याकडे काय आहे. अर्थात, तो त्यांना विचारत होता की त्यांना ज्याची आवश्यकता आहे त्या पैकी किती त्यांच्याकडे आधीच आहे. त्याला माहित होते की इतक्या मोठ्या संख्येत असलेल्या लोकांना पुरेल इतकी भाकरी आणि मासे तिथे नव्हते आणि त्याच्या विचारण्याचा तो हेतू नव्हता. आता, स्वाभाविकपणे विचार केला तर, इतक्या लोकांना जेवू घालण्याची कल्पनाच मूर्खपणाची वाटत होती. अन्न शोधण्यापूर्वीच शिष्यांना समजत होते की 20,000 लोकांना पुरेल इतके अन्न त्या ठिकाणी मिल्ने शक्यच नाही. येशूने त्यांना सांगितले कि जाऊन बघा की त्या ठिकाणी नेमक्या किती भाकरी आणि मासे आहेत, तेव्हा ते काय विचार करत असतील याची तुम्ही कल्पना करू शकता का? आणि मग परत येऊन त्यांनी सांगितले की त्यांना फक्त पाच भाकरी आणि दोन मासेच मिळाले? वेडेपणा, बरोबर?

मी या संभाषणाचा दृष्टिकोन स्पष्ट करतो. एक पाळक म्हणून, मी कठीण आर्थिक परिस्थितीत असलेल्या अनेक कुटुंबांना मदत केली आहे, कधीतरी त्यांना एका महिन्याचे घराच्या कर्जाचा हफ्ता भरण्यास किंवा घराचे भाडे भरण्यास मदत केली आहे, कधी कधी त्यांचे एखादे बिल भरण्यास किंवा घरात किराणा सामान खरेदी करण्यास मदत केली आहे. पण समजा मला माहित होते की खरे उत्तर त्यांना उचलून पैसे देणे हे नाही, तर राज्य कसे कार्य करते हे त्यांना सांगणे हे उत्तर आहे.

तर आमच्या मधील संभाषण असे झाले असते. “अहो, पास्टर गॅरी, या महिन्यात आमच्याकडे पैशाची थोडी किल्लत आहे आणि भाडे दिले नाही तर आम्हाला आमच्या घरातून बाहेर काढण्यात येईल. चर्च आम्हाला मदत करू शकेल का?” “नक्कीच, मी तुम्हाला मदत करू शकतो. त्या साठी माझा सल्ला हा आहे. तुम्ही घराचे पैसे भरा, आणि तुम्हाला काळजी करण्याची गरज राहणार नाही.” त्यावर ते माझ्याकडे बघून म्हणतील, “पाळक साहेब, मला वाटते मी काय म्हणत आहे ते तुम्हाला समजले नाही. आमच्याकडे घराच्या कर्जाचे ह्या महिन्याचा हफ्ता देण्यासाठी पैसे नाहीत, ते कर्ज फेडणे तर दूरच.” "मला माहित आहे," मी उत्तर देतो, "म्हणूनच मी तुम्हाला ते हफ्त्याचे पैसे द्या म्हणून सांगितले आहे जेणेकरून तुला पुढे घराचे कोणतेही पैसे द्यावे लागणार नाहीत."

आणि मग जर मी त्यांना म्हणालो कि तुम्ही जाऊन हे बघा कि घराच्या कर्जाचा हफ्ता

देण्यासाठी तुमच्या कडे नेमके किती पैसे आहेत तर त्यांना वाटेल कि मी खरोखरच वेडा आहे. पण फक्त माझ्या साठी असलेल्या आदरामुळे, त्यांनी जाऊन पाहिले कि त्यांच्या कडे किती पैसे आहेत आणि परत येऊन म्हणाले, “पास्टर, आम्ही अगदी नीटपणे बघितले, आणि आम्हाला फक्त 20 डॉलर्स मिळाले, पण आमच्या घराच्या कर्जाचे 360,000 डॉलर्स देणे अजून बाकी आहेत.” मला वाटतं तुम्हाला परिस्थितीची पूर्ण कल्पना आली असेल. त्यांना नक्कीच वाटत असेल की मी वेडा झालो आहे, बरोबर?

त्या दिवशी शिष्यांना देखील असेच वाटले असेल, ते पूर्णपणे गोंधळून गेले असतील. 20,000 लोकांना जेवू घालण्यासाठी फक्त पाच भाकरी आणि दोन मासे?

## तुम्ही जे पेरता त्याचीच कापणी करता.

तर, या कथेत खोलवर जाण्यापूर्वी, मला तुमच्या समोर राज्याचा आणखी एक कायदा किंवा नियम प्रकट करायचा आहे, म्हणून आपण क्षणभर त्याविषयी पाहू या. भाकर वाढून आणखी भाकरी होतात, आणि मासे वाढून आणखी मासे होतात. तर हे लिहून ठेवा.

**तुम्हाला ज्याची आवश्यकता आहे ते वाढून अधिक व्हावे म्हणून त्यापैकी जेवढे तुमच्या कडे आहे ते तुम्हाला राज्यामध्ये अर्पण करावे लागेल!**

चला बायबलमधील दुसऱ्या उदाहरणाकडे जाऊया, आणि मग मी मार्क 6 मधील आपल्या कथेकडे परत येईन. चला 2 राजे 4:1-7 कडे जाऊ या.

> *एकदा संदेष्ट्याच्या शिष्यांच्या स्त्रियांपैकी एकीने अलीशाकडे गाऱ्हाणे केले; ती म्हणाली, “तुझा सेवक, माझा नवरा, मरून गेला आहे; तुला ठाऊक आहे की तो परमेश्वराचे भय बाळगणारा होता. त्याचा सावकार माझ्या दोन पुत्रांना दास करून नेण्यासाठी आला आहे.”*
>
> *अलीशाने तिला विचारले, “मी तुझ्यासाठी काय करू हे मला सांग; तुझ्या घरात काय आहे?” ती म्हणाली, “एक घडा तेलाशिवाय आपल्या दासीच्या घरात काहीएक नाही.”*
>
> *तो तिला म्हणाला, “तू जा आणि बाहेरून आपल्या शेजाऱ्यापाजाऱ्यांकडून बरीचशी रिकामी भांडी मागून आण.*

*मग आपल्या पुत्रांसह घरात जाऊन दार बंद कर व त्या सर्व भांड्यांत तेल ओत; आणि भांडे भरेल ते बाजूला ठेव."*

*ती त्याच्यापासून गेली आणि आपल्या पुत्रांसह आपल्या घरात जाऊन तिने दार बंद केले; ते तिच्याकडे भांडी आणत ती भांडी ती भरत जाई.*

*सर्व भांडी भरल्यावर ती आपल्या पुत्रांना म्हणाली, "मला आणखी एक भांडे आणून द्या;" त्यांनी म्हटले, "आता एकही भांडे उरले नाही;" तेव्हा तेल वाढायचे थांबले.*

*तिने जाऊन देवाच्या माणसाला हे सांगितले. तो म्हणाला, "जा, तेल विकून आपले कर्ज फेड व जे शिल्लक राहील त्यावर आपला व आपल्या पुत्रांचा निर्वाह कर."*

—2 राजे 4:1-7

ह्या ठिकाणी लक्ष द्या, संदेष्ट्याने असे म्हटले नाही की, "आपण बघू या कि तिजोरीत आपल्याकडे किती पैसे आहेत." नाही, त्याला ह्या परिस्थितीत प्रश्न सोडवण्याचा एक चांगला मार्ग माहित होता. तो म्हणाला, "मी तुम्हाला कशी मदत करू?" ती स्त्री थोडी गोंधळली असेल, आणि मनात म्हणाली असेल "तुम्ही मला कशी मदत करू शकता? अर्थात मला पैशांची गरज आहे!" पण तो त्या स्त्रीला अपमानित करण्याचा प्रयत्न करत नव्हता. तो तिला एक अतिशय महत्त्वाचा प्रश्न विचारत होता आणि त्या प्रश्नाचे उत्तर तिला मिळेलच हे त्याला माहित होते. आणि हा तोच प्रश्न आहे जो तुम्हाला तुमच्या उत्तराकडे नेईल.

"मी तुला कशी मदत करू शकतो? मला सांग, तुझ्या घरात काय आहे?"

## तुमच्याकडे काय आहे?

तुझ्या घरात काय आहे? मला खात्री आहे की तिला प्रश्न ऐकून खूप धक्का बसला असेल कारण ती तिथे का आली होती हे तिने आधीच स्पष्ट केले होते.

"आपल्या दासीच्या घरात काहीही नाही," ती म्हणाली, "एक घडा तेलाशिवाय आपल्या दासीच्या घरात काहीएक नाही."

तिने कशावर भर दिला आहे हे लक्षात घ्या, "माझ्या घरात काहीच नाही." पण तिच्याकडे खरोखर काहीच नव्हते का?

नाही, ती जे बोलली ते तांत्रिकदृष्ट्या बरोबर नव्हते. तिने सांगितले की तिच्याकडे जैतूनाच्या तेलाने भरलेला एक घडा आहे. व्वा! तो संदेष्टा हेच जाणून घेण्याची वाट पाहत होता.

आणि तुम्हाला देखील स्वतःला हाच प्रश्न विचारायचा आहे. देवाला कार्य करण्या साठी तुमच्या कायदेशीर अधिकारक्षेत्रात असलेले असे काहीतरी हवे आहे.

तर चला पहिल्या पायरीचा आढावा घेऊया. तुम्हाला ज्याची आवश्यकता आहे ते वाढून अधिक व्हावे म्हणून त्यापैकी जेवढे तुमच्या कडे आहे ते तुम्हाला राज्यामध्ये अर्पण करावे लागेल. जेव्हा तुम्ही ते देवाच्या राज्याला देता तेव्हा त्या दानाचे किंवा तुम्ही अर्पण केलेल्या वास्तूचे अधिकारक्षेत्र बदलते, ते देवाच्या कायदेशीर अधिपत्याखाली येते ह्यासाठी कि ते वाढून अधिक व्हावे. आपण हे लक्षात ठेवूया की अधिक होऊन वाढणे म्हणजे आपण या कथेत पाहिले अगदी तसेच होईल असे नाही, म्हणजे तुमची भाकरी तुमच्या स्वयंपाकघरात ठेवलेली असेल आणि ती आपल्या आपण वाढेल असेच होणार नाही, पण मी अशा प्रकारची घटना घडतांना देखील पाहिले आहे. परंतु सहसा, देव इतर लोकांना प्रेरित करून तुमची भाकरी वाढवण्याचा मार्ग तयार करतो. कोणीतरी तुमच्यासाठी उदार होऊ शकते, किंवा तुम्हाला कामावर पगारामध्ये वाढ मिळू शकते, किंवा तुम्ही कुणाला तरी उसने दिलेले पैसे अनपेक्षितपणे तुम्हाला परत मिळू शकतात. देव अनेक आणि असंख्य मार्गाने तुमचे अन्न वाढवून तुमच्यासाठी भरपूर करू शकतो.

**जेव्हा तुम्ही ते देवाच्या राज्याला देता तेव्हा त्या वस्तूचे अधिकारक्षेत्र बदलते, ते देवाच्या कायदेशीर अधिपत्याखाली येते ह्यासाठी कि ते वाढून अधिक व्हावे.**

### तुम्ही तुमच्या पैशाला नाव देऊ शकता.

मला पैशांबद्दल एक अतिशय महत्त्वाचा मुद्दा ह्या ठिकाणी सांगायचा आहे.

पैशाचा वापर आवश्यक असलेल्या कोणत्याही गरजे साठी बीज म्हणून करता येतो.

तुम्ही तुमच्या आयुष्यात प्रत्येक दिवशी जेव्हा काही खरेदी करता तेव्हा त्या विशिष्ट

वस्तू साठी ते विशिष्ट पैशाचा व्यय करता. उदाहरणार्थ, जेंव्हा तुम्ही किराणा दुकानात जाता आणि ब्रेड खरेदी करता तेव्हा तुम्ही त्या ब्रेडच्या बदल्यात ते पैसे देत असता किंवा आपण असे म्हणू कि तुम्ही त्या विशिष्ट पैशाला खऱ्या अर्थाने "ब्रेड" असे नाव देत असता. मला जे म्हणायचे आहे ते मी थोडे अधिक स्पष्ट करून सांगतो. जर तुम्हाला भाकरीची गरज असेल, तर आता तुम्हाला राज्याचा एक नियम समजला आहे ज्याला पेरणी आणि कापणी असे म्हणतात. तो नियम लागू करून, तुम्हाला माहिती आहे की जर तुम्ही भाकरी पेरली तर तुम्हाला भाकरी मिळेल. पण समजा तुम्हाला भाकरीची गरज आहे, पण पेरण्यासाठी भाकरी नाही. तर तुम्ही काय कराल? त्यावेळेस तुम्ही पैशाची पेरणी करू शकता आणि पेरतांना त्याला भाकरी किंवा अन्न असे नाव देऊ शकता. लक्षात ठेवा, पैसा ही फक्त एक देवाणघेवाण प्रणाली आहे. दूध आणि घरभाडे, बूट आणि अन्न ह्या आणि अशाच इतर आपल्याला आवश्यक असणाऱ्या प्रत्येक वस्तूला आपण दररोज हे नाव देतो. म्हणून तुम्ही पैशाची पेरणी करतांना देखील ते नाव देऊ शकता.

**तुम्ही पैशाची पेरणी करतांना देखील ते नाव देऊ शकता.**

ओहायोतील न्यू अल्बानी येथील फेथ लाइफ चर्च हे ड्रेंडाने आणि मी 25 वर्षांपूर्वी सुरू केले आहे. 2008 मध्ये आम्ही जिथे फेथ लाईफ चर्च आहे त्या कॅम्पस वर, नाऊ सेंटर ची उभारणी केली. त्यावेळी 6.5 दशलक्ष डॉलर्सचा हा एक जबरदस्त प्रकल्प, सुमारे 550 लोकांसाठी उभा केलेला मोठा प्रकल्प होता.

आणि, गेल्या 10 वर्षांत, त्या इमारतीत बसणाऱ्यांची कमाल मर्यादा ओलांडून गेली आहे. आठवड्याच्या शेवटी तर सुमारे 3,000 पर्यंत लोक त्या ठिकाणी एकत्र येतात. दर आठवड्याच्या शेवटी त्या ठिकाणी चार लाईव्ह सभा चालवल्या जातात. म्हणून आम्ही आमच्या सध्याची इमारत वाढवण्याचा निर्णय घेतला. हा एक 10 दशलक्ष डॉलर्सचा प्रकल्प असणार होता आणि त्यामुळे आमच्या सभागृहाचा आकार वाढून मुलांसाठी अधिक जागा वाढून आमची मदत होणार होती. त्याच वेळी, आम्हाला जाणवले की पैसे उभारण्यासाठी लागणारा वेळ आणि नंतर प्रत्यक्षात इमारत बांधण्यासाठी लागणारा वेळ हे सर्व थोडे कठीण होणार होते. याचा अर्थ असा होता की ह्या नवीन विस्तारित जागेचा उपयोग करण्या साठी आम्हाला अडीच वर्ष वाट पाहावी लागणार होती.

हे लक्षात घेऊन, आम्हाला वाटले की आपण इमारत उभारणीला सुरुवात करायला हवी

पण त्यासोबतच कॅम्पस साइट वर देखील बांधकाम सुरु केले पाहिजे, जे आमच्या अंदाज अनुसार सुमारे सहा महिन्यांत पूर्ण होऊ शकत होते. आम्हाला विश्वास होता की यामुळे मुख्य कॅम्पसवरील काही ताण कमी होईल आणि त्या सोबतच चर्च वाढण्यास मदत होईल. म्हणून आम्ही कॅम्पस साठी जागेचा शोध सुरू करण्यासाठी एक टीम तयार केली. आम्ही त्या परिसरातील लोकसंख्येचा अभ्यास केला आणि शहराचा मध्यवर्ती भाग निवडला जो आमच्या शहरातील एक उत्तम स्थान आहे असे आम्हाला वाटले. आम्ही शोध घेत राहिलो आणि जवळजवळ दोन वेळा वेगवेगळ्या ठिकाणी खरेदी करण्याच्या निर्णया पर्यंत आलो, पण जेव्हा आम्ही एकत्र बसून विचार करायचो की हीच ती जागा आहे, तेव्हा आम्हा सर्वांचे एकमत होऊन असे वाटायचे की काहीतरी अजूनही बरोबर नाहीये. ह्या विचाराने आम्हा सर्वांना एक प्रकारची निश्चितता वाटत होती.

आता आपण सहा महिने पुढे जाऊया, आणि आम्हाला दिसून आले कि ह्या सहा महिन्यात आम्ही कॅम्पस साठी जागा विकत घेण्याच्या निर्णयाच्या जवळपास देखील पोहचलो नाही. मी हे अगदी मान्य करतो की, ड्रेंडा आणि मी ह्या बाबतीत थोडे निराश झालो. आम्ही जागेचा शोध घेण्याच्या प्रयत्नात प्रत्येक उपलब्ध पर्यायाचा विचार केला होता आणि तरीही आम्हाला खरोखर योग्य आणि अचूक इमारत सापडत नव्हती. हो, आम्ही ही जागा शोधायला सुरवात केली तेंव्हा सुरुवातीलाच आमचे बीज पेरले होते आणि आम्हाला माहित होते की देवाकडे आमच्यासाठी अगदी योग्य इमारत आहे, परंतु ती प्रत्यक्षात येण्यासाठी इतका वेळ लागेल अशी आम्हाला अपेक्षा नव्हती. इथे मी एक गोष्ट फार निश्चितपणे सांगतो कि: योग्य ते मिळण्या साठी कधीकधी जास्त वेळ लागतो!

ह्याच दरम्यान, आम्हाला एका नवीन टीव्ही नेटवर्कसाठी पैसे उभारण्यासाठी निधी संकलन टेलिथॉनचा भाग व्हायचे होते. हा तीन दिवसांचा कार्यक्रम असणार होता आणि तिन्ही दिवस सकाळी आणि संध्याकाळी लाईव्ह आणि ऑन एअर होणार होता. मला वाटतं तो तिसरा दिवस होता, आणि मी सेटवर बसलो होतो तेव्हा मला ऐकू आले कि प्रभू माझ्याशी बोलत आहे. तो म्हणाला, "तुमच्या मिनिस्ट्री तर्फे $100,000 चा चेक घ्या आणि कॅम्पस साठी जागा शोधण्यास जी वेळ लागत असण्याची परिस्थिती आहे ती दूर होण्याच्या उद्देशाने तो या टीव्ही आउटरीचमध्ये दान द्या. तुमच्या मिनिस्ट्रीच्या चारही सभांमध्ये तो चेक घेऊन जा आणि चर्च मध्ये उपस्थित सर्वांना सांगा कि तो चेक दान म्हणून दिल्या जात

आहे आणि त्या सर्वांना त्यावर प्रार्थना करायला सांगा, आणि अशी घोषणा करा कि कॅम्पस साठी जागा मिळण्याचे काम पूर्ण झाले आहे!" तो पुढे म्हणाला की मी प्रार्थना करत असतांना सैतानाला धमकावे आणि गोंधळ आणि विलंब थांबवण्याची आज्ञा द्यावी. देवाने सांगितल्या प्रमाणे, आम्ही पुढच्या आठवड्याच्या शेवटी आमच्या शनिवार आणि रविवारच्या सभांमध्ये ते केले.

दुसऱ्या दिवशी, सोमवार होता, माझ्या कॅम्पस टीमने सांगितले की रिअल इस्टेट एजंटचा फोन आला आहे आणि त्याच्या कडे आत्ताच एका खाजगी हायस्कूल कॅम्पसबद्दल माहिती आली आहे, आणि ही जागा नुकतीच विक्रीसाठी ठेवण्यात आली आहे. टीम ने जाऊन ती जागा बघण्याचा निर्णय घेतला. जेव्हा ते त्या ठिकाणी गेले तेव्हा त्यांना एक पूर्ण K–12 कॅम्पस पाहायला मिळाला, ज्यामध्ये एक प्रीस्कूल देखील होते. कॅम्पससाठी आमचा जो  बजेट होता त्यापेक्षा ही जागा कितीतरी प्रमाणात जास्त महाग होती, आणि मुख्य कॅम्पस साठी पैसे उभारण्या साठी आम्ही नवीन जागा भाड्याने देऊन त्यातून कॅम्पसच्या खरेदीचा खर्च पूरा करण्याची आमची योजना होती. त्या जागेची किंमत जरी खरोखरच विचारात घेण्यासारखी नव्हती, तरी ड्रेंडा ने आणि मी मंगळवारी सकाळी स्वतः जाऊन ती जागा पाहण्याचे ठरवले.

आम्ही जे पाहिले ते 88,000 चौरस फूट क्षेत्रात, चार इमारती, एक धावण्याचा ट्रॅक, कसरत करण्याची जागा, चार टेनिस कोर्ट, एक कलाकृती भवन, विज्ञान प्रयोगशाळा आणि K-12 शाळेच्या कॅम्पसला आवश्यक असलेल्या सर्व गोष्टीं त्या मध्ये होत्या आणि ती एक अद्भुत कॅम्पस साइट होती. ह्या परिस्थितीचा अविश्वसनीय भाग म्हणजे ही जागा सर्व आवश्यक बाबींनी पूर्णपणे सुसज्ज आणि साहित्याने भरलेली होती. ड्रेंडा आणि मी हे सर्व पाहून आश्चर्यचकित झालो पण ती जागा खरेदी करण्याचा कोणताही मार्ग आम्हाला दिसत नव्हता.

असं झालं की त्या रात्री आमच्या एका पार्टनर सोबत सहज एकत्र येऊन गप्पा गोष्टी करण्यासाठी आम्ही भेटणार होतो. आम्ही दोघेही खूप व्यस्त असल्यामुळे गेल्या दोन महिन्यांत आम्ही या जेवणाच्या अपॉइंटमेंटचे वेळापत्रक कदाचित तीन ते चार वेळा बदलले होते. पण त्या रात्री, आम्ही ते साध्य केले. आम्ही जेवणाच्या वेळी बसलो असताना, आम्ही मुख्य चर्च ला वाढवून अधिक व्यापक जागा करण्या बद्दल बोलू लागलो. त्या जोडप्याने आम्हाला विचारले की त्या संबंधात सर्व काही कशा पद्धतीने आणि वेगाने सुरु आहे, आणि

आम्ही त्यांना परवानग्या मिळवणे, ब्लूप्रिंट संबंधात होणारा मोठा विलंब आणि इतर काही समस्यांबद्दल सांगितले. आम्ही त्यांना सांगितले की ज्या वेगाने हे काम सुरु आहे त्यावरून आम्हाला वाटत नाही कि 2022 च्या अखेरीस किंवा 2023 च्या वसंत ऋतूपर्यंत आम्ही हे कार्य पूर्ण करू शकू.

त्यांनी लगेच विचारले की आम्ही कॅम्पस सुरू करण्याचा विचार केला आहे का, आणि आम्ही म्हटले हो, निश्चितपणे. आणि हे देखील सांगितले कि गेली सहा महिने आम्ही योग्य जागा मिळण्यासाठी सतत प्रयत्न करत आहोत. मग आम्ही त्यांना त्या सकाळी आम्ही पाहिलेल्या एका अद्भुत शाळेबद्दल सांगितले, आणि म्हटले की ती जागा अगदी योग्य आहे, पण त्या जागेची किंमत आम्हाला झेपणारी नाही.

ते दोघे पतिपत्नी त्या ठिकाणी शांतपणे बसले होते, आणि एक क्षणाचाही विचार न करता म्हणाले, "आणि, जर ती जागा मोफत मिळाली तर?" ते काय म्हणत आहेत हे आम्हाला लगेच कळले नाही, म्हणून त्यांनी आम्हाला पुन्हा विचारले, "जर ती जागा मोफत मिळाली तर?" पुन्हा एकदा, आम्हाला वाटले की ते मस्करी करत आहेत, पण यावेळी ते म्हणाले, "ड्रेंडा, जर कॅम्पस मोफत मिळत असेल तर?" "तुला नेमकं काय म्हणायचंय?" आम्ही विचारलं. ते म्हणाले, "आम्ही त्या साठी चेक लिहितो!" आम्ही क्षणभर स्तब्ध झालो. पण थोडक्यात सांगायचं तर त्यांनी ती जागा खरेदी करण्या साठी त्या किमतीचा चेक लिहिला.

तर लक्षात घ्या, आम्ही त्या कॅम्पससाठी ते बीज पेरल्यानंतर दोनच दिवसांनी, देव आम्हाला योग्य जागेकडे घेऊन गेला. आता आमच्याकडे 12 दशलक्ष डॉलर्सचा मोफत आणि कोणतेही कर्ज नसलेला कॅम्पस आहे! असे काही होईल असा कोणी कधी विचार केला किंवा अगदी स्पष्टपणे सांगायचे तर, अशी कल्पना देखील केली असेल का? जे घडत होते पाहिल्यानंतर, ड्रेंडा आणि मी दोघेही ह्या बाबतीत सहमत झालो की आपल्या बाबतीत जे काही घडले आहे ते पहिल्या नंतर देखील, आपल्याला ह्या ही पेक्षा मोठ्या गोष्टींची अपेक्षा करण्याची आवश्यकता आहे. देव खरोखरच अद्भुत गोष्टी करू शकतो!

त्या दिवशी 20,000 लोकांना पाच भाकरी आणि दोन मासे जेवू घातल्यानंतर शिष्यांनाही असेच वाटले असावे असे मला वाटते. मला खात्री आहे की ते झोपायला गेले असतील आणि एकमेकांना म्हणाले असतील, "आज काय घडले ते तुम्ही पाहिले का?"

अध्याय 5

# तुमच्या तरतुदीला सक्षम बनवणे

तुमच्या तरतूदीसाठी राज्य कायद्याचा वापर करण्याच्या पहिल्या पायरीबद्दल आपण गेल्या अध्यायात बोललो आहोत.

**तुम्हाला ज्याची आवश्यकता आहे ते वाढून अधिक व्हावे म्हणून त्यापैकी जेवढे तुमच्या कडे आहे ते तुम्हाला राज्यामध्ये अर्पण करावे लागेल!**

मी तुम्हाला तेव्हा सांगितले होते की मी या विधानासंबंधी काही प्रश्नांची उत्तरे देईन, पहिला प्रश्न म्हणजे, "आपल्याला जे आवश्यक आहे त्याची वाढ होण्यासाठी राज्यात काहीतरी पेरण्याचा अर्थ काय?"

पुन्हा एकदा, अधिक समजून घेण्यासाठी आपण मार्क अध्याय 6 मधील आपल्या कथेकडे परत जाऊ या.

> *दिवस बराच उतरल्यावर त्याचे शिष्य त्याच्याकडे येऊन म्हणाले, "ही अरण्यातली जागा आहे व आता दिवस फार उतरला आहे;तेव्हा लोकांनी भोवतालच्या खेड्यापाड्यांत जाऊन स्वतःकरता खायला काही विकत घ्यावे म्हणून त्यांना निरोप द्या. [कारण त्यांच्याजवळ खायला काही नाही."*
>
> *त्याने त्यांना उत्तर दिले, "तुम्हीच त्यांना खायला द्या." ते त्याला म्हणाले, "काय, आम्ही जाऊन दोनशे रुपयांच्या भाकरी विकत घेऊन त्यांना खायला द्याव्यात?"*
>
> *तो त्यांना म्हणाला, "तुमच्याजवळ किती भाकरी आहेत? जाऊन पाहा." पाहिल्यावर ते म्हणाले, "पाच, व दोन मासे."*
>
> *नंतर त्याने त्या सर्व लोकांना हिरवळीवर गटागटाने बसायला सांगितले. तेव्हा ते शंभरशंभर व पन्नासपन्नास असे पंक्तीपंक्तीने बसले. मग त्याने त्या पाच भाकरी*

*व ते दोन मासे घेऊन वर स्वर्गाकडे पाहून आशीर्वाद दिला आणि भाकरी मोडल्या व त्या त्यांना वाढण्यास आपल्या शिष्यांजवळ दिल्या. ते दोन मासेही सर्वांना वाटून दिले. मग सर्व जण जेवून तृप्त झाले. आणि त्यांनी उरलेल्या तुकड्यांच्या बारा टोपल्या भरून घेतल्या आणि माशांचेही तुकडे नेले. भाकरी खाणारे [सुमारे] पाच हजार पुरुष होते.*

—मार्क 6:35-44

ह्या कथेतील काही गोष्टी ज्या कडे आपण सहसा दुर्लक्ष करो त्या कडे तुम्ही विशेष लक्ष द्यावे अशी माझी इच्छा आहे. जेंव्हा येशू म्हणाला, "तुम्ही त्यांना काहीतरी खायला द्या," तेव्हा त्यांचे उत्तर आणि येशूची प्रतिक्रिया आपल्याला तरतूदीबद्दल राज्याविषयीच्या आपल्या समजुतीची सर्वात महत्त्वाची गुरुकिल्ली दाखवते. जेव्हा त्यांनी त्याला उत्तर दिले, तेव्हा त्यांनी म्हटले की इतक्या लोकांना पोट भरण्यासाठी अर्ध्या वर्षापेक्षा जास्त पगार लागेल. त्या समस्येचा सामना करतांना ते त्यांना आवश्यक असलेल्या गोष्टींची तुलना श्रमाशी कशी जोडतात ते लक्षात घ्या. बरं, खरं तर आपण सर्वजण असेच करतो. पण आपल्याला किती पगार मिळतो, आपली कमाई काय आहे ही मानसिकता नेहमीच माणसाच्या विचारांचा भाग नव्हती. ती आदामाच्या पतनाच्या वेळी घडली. मला तुम्हाला आदामाच्या पतनाकडे परत घेऊन जायचे आहे जिथे आपण हे स्पष्टपणे पाहू शकतो.

## माझा पगार किती आहे ही मानसिकता

*आदामाला तो म्हणाला, "तू आपल्या स्त्रीचे ऐकलेस आणि ज्या झाडाचे फळ खाऊ नकोस म्हणून मी तुला आज्ञा केली होती त्याचे फळ तू खाल्लेस; म्हणून तुझ्यामुळे भूमीला शाप आला आहे; तू आयुष्यभर कष्ट करून तिचा उपज खाशील; ती तुला काटे व कुसळे देईल; तू शेतातले पीक खाशील; तू आपल्या निढळाच्या घामाने भाकर मिळवून खाशील व अंती पुन: मातीला जाऊन मिळशील, कारण तिच्यातून तुझी उत्पत्ती आहे; तू माती आहेस आणि मातीला परत जाऊन मिळशील."*

—उत्पत्ती 3:17-19

तुम्हाला आठवत असेल तर, आदाम आणि हव्वा यांना देवाच्या राज्याच्या वतीने

पृथ्वीवर राज्य करण्यासाठी नियुक्त करण्यात आले होते. त्यांनी देवाचे प्रतिनिधी ह्या धिकाराने राज्य केले. पृथ्वीवर आधीच असलेल्या सैतानाने त्यांना तुच्छ लेखले आणि त्यांच्याकडे असलेल्या अधिकाराची लालसा केली. आदाम आणि हव्वा यांचा सैतानावर पूर्ण अधिकार असला तरी, तो त्यांची फसवणूक करून त्यांना असे मानण्यास भाग पाडण्यात यशस्वी झाला की देव त्यांच्यासाठी नाही आणि तो विश्वस ठेवण्याच्या योग्य नाही. त्याने त्यांना हे दाखवण्याचा प्रयत्न केला कि देवाशिवाय तुमचे चांगले भविष्य आहे, म्हणून त्यांनी देवा ऐवजी त्याचे अनुसरण करण्याचा निर्णय घेतला. त्यांच्या बंडामुळे, विद्रोहामुळे त्यांनी देवाच्या राज्यात त्यांचे कायदेशीर स्थान गमावले आणि देवाला आपल्या जीवनातून बाहेर काढले, त्या मुळे मानवजातीच्या संपूर्ण पृथ्वीच्या क्षेत्रावर सैतानाला कायदेशीर अधिकार मिळाला. पौल करिंथकरांस दुसऱ्या पत्रामध्ये सैतानाला या युगाचा देव म्हणतो.

> *त्यांची म्हणजे विश्वास न ठेवणाऱ्या लोकांची मने ह्या युगाच्या दैवताने आंधळी केली आहेत, अशा हेतूने की, देवाची प्रतिमा जो ख्रिस्त त्याच्या गौरवी सुवार्तेचा प्रकाश त्यांच्यावर प्रकाशू नये.*
>
> —2 करिंथ 4:4

आदामाच्या पापाचा सामना करतांना, देव त्याला म्हणतो, “तुझ्यामुळे भूमीला शाप आला आहे; तू आयुष्यभर कष्ट करून तिचा उपज खाशील;” नंतर आणखी एक विशेष बाब तो म्हणतो, “तू आपल्या निढळाच्या घामाने भाकर मिळवून खाशील.”

देव आदामाला सांगत आहे की त्याच्या बंडामुळे, विद्रोहामुळे पृथ्वी पूर्वीसारखी उत्पन्न देणार नाही. देवाचे हात आता बांधलेले आहेत आणि आदामाला स्वतःच्या निढळाच्या घामाने आणि वेदनादायक श्रमाने जीवन जगावे लागेल. कृपया लक्षात घ्या की आदामानेच पृथ्वीला शाप दिला होता, देवाने नाही. आदामाला पृथ्वीवर पूर्ण कायदेशीर अधिकार होते आणि जेव्हा त्याने देवाविरुद्ध बंड केले तेव्हा देवाला आपला आशीर्वाद मागे घ्यावा लागला. म्हणूनच देव आदामाला म्हणतो, "तुझ्यामुळे जमीन शापित झाली आहे." आदामाला जिथे राहण्यासाठी उत्पन्न केले गेले होते ती बाग, जी पुरवठ्याने भरपूर होती, ती आता त्याच्या हातातून गेली होती. त्याने बंड करण्याच्या आधी, आदामाला कधीही पुरवठ्याबद्दल विचार किंवा चिंता करावी लागली नव्हती; जिकडे कुठे त्याची दृष्टी जात असे तेथ पर्यंत ते मुबलक

प्रमाणात उपलब्ध होते. पण आता त्याला स्वतः वेदनादायक कष्ट करून आणि निढळाचा घाम गाळून स्वतःसाठी आवश्यक असलेले उत्पन्न प्राप्त करून घ्यावे लागेल. मी याला वेदनादायक कष्ट आणि घाम गाळून प्राप्त करण्याची व्यवस्था म्हणतो.

आता अन्नधान्य उत्पन्न करण्यासाठी वेदनादायक कष्ट आणि निढळाचा घाम येणे आवश्यक होते! केवळ पृथ्वीच बदलली नाही. आदाम आणि सर्व मानवजात आता बदलली आहे. आदामाने त्याची ओळख, त्याचा उद्देश आणि त्याची तरतूद गमावली आहे आणि आता तो स्वतःचे जीवन जगण्या साठी गुलाम बनला आहे. अशाप्रकारे तुम्ही आणि मी देखील वेदनादायक कष्ट आणि निढळाचा घाम गाळण्याच्या व्यवस्थेत वाढत आलो आहोत.

या पृथ्वीवरील शाप ग्रस्ततेतील प्रत्येक निर्णय हा कसे तरी करून जीवन जगण्यासाठी असतो आणि तो सहसा पैशाच्या समस्यांशी झुंजणे आणि धन प्राप्त करण्या वर आधारित असतो. आपल्याला आवश्यक असलेल्या वस्तू आणि पुरवठा कुठे आणि कसे प्राप्त करावे ह्या विषयीची चिंता आपल्या विचारांवर आणि आपल्या जीवनावर नियंत्रण ठेवते. आपली एक विशिष्ट ओळख, जी एकेकाळी देवाने पृथ्वीवरील आपल्या उद्देशांसाठी आणि कार्यांसाठी अद्वितीयपणे डिझाइन केली होती, त्याचे आता सैतानाने अपहरण केले आहे आणि त्याऐवजी आता आपल्याला जगण्यासाठी आवश्यक असलेले धन प्राप्त करण्याची गरज निर्माण झाली आहे, आता आपण नेहमीच दुसऱ्या दिवसाच्या तरतूदीच्या शोधात असतो.

**आदामाच्या काळापासून, पुरुष आणि स्त्रिया जगण्यासाठी गुलाम बनले आहेत, एकतर तरतूदीच्या मागे धावत आहेत किंवा तरतूद साठवून ठेवत आहेत, कारण पैसा असणे हाच उंदीरांच्या शर्यतीतून सुटण्याचा एकमेव मार्ग आहे.**

## गुलामगिरीची व्यवस्था

अलिकडेच मी पाहिलेल्या एका सर्वेक्षणात असे म्हटले आहे की अमेरिकेतील 70% पेक्षा जास्त लोकांना त्यांची नोकरी आवडत नाही.[5] तुम्ही विचाराल, “मग जर त्यांना ती आवडत नसेल तर ते कामावर का जातात?” सोप्या भाषेत सांगायचे तर, ते पुढच्या

महिन्याचा पगार मिळण्याचे गुलाम आहेत!

वेदनादायक कष्ट आणि निढळाने घाम गाळण्याच्या शापाखाली, प्रत्येकजण करोडपती होण्याच्या, अंतहीन अशा उंदरांच्या शर्यतीतून आणि दररोजचे अन्न मिळवण्याच्या दबावातून सुटकेचे स्वप्न पाहत आहे. लोक लॉटरी जिंकण्याचे स्वप्न पाहतात, श्रीमंत होण्याचे स्वप्न पाहतात जिथे त्यांना जे करणे गरजेचे आहे त्याऐवजी त्यांना आपल्या इच्छे प्रमाणे जे करावेसे वाटते ते करण्यास ते मोकळे असतील. आदामाच्या काळापासून, पुरुष आणि स्त्रिया जगण्यासाठी गुलाम बनले आहेत, एकतर तरतूदीच्या मागे धावत आहेत किंवा तरतूद साठवून ठेवत आहेत, कारण पैसा असणे हाच उंदीरांच्या शर्यतीतून सुटण्याचा एकमेव मार्ग आहे.

ह्या व्यवस्थेने आपल्या सर्वांना विचार करायला कसे शिकवले आहे याचे एक उदाहरण मी तुम्हाला देतो. जर मी तुम्हाला म्हणालो की तुम्हाला पुढील 12 महिन्यांत कर्जातून पूर्णपणे बाहेर पडावे लागेल, तर तुम्ही लगेच हा विचार करू लागाल कि हे पूर्ण करण्यासाठी आम्हाला किती अधिक वेदनादायक कष्ट करावे लागतील आणि निढळाच्या घाम किती तरी अधिक प्रमाणात गाळावा लागेल. तुम्ही विचार करू लागाल कि आता मला माझ्या नोकरी व्यतिरिक्त आणखी, दोन किंवा तीन कामे करावी लागतील, आणि त्यासाठी कितीही वेळ द्यावा लागला तरी ते करावेच लागेल. आणि त्यासाठी अधिक वेदनादायक कष्ट आणि निढळाचा घाम गाळणे आवश्यक आहे. साकार करण्यासाठी समोर असलेल्या प्रत्येक स्वप्नात वेदनादायक कष्ट आणि निढळाचा घाम हे घटक असतातच. जर तुम्हाला नवीन गाडी हवी असेल, तर तुम्ही त्यासाठी लागणारा खर्च, तुम्हाला करावे लागणारे श्रम आणि गाळावा लागणारा घाम किती अधिक असणार आहे ह्याचा आढावा घेऊन म्हणाल, "नाही, आम्हाला ते परवडणार नाही." "मोठे घर? नाही, ते देखील आम्हाला ते परवडत नाही."

## देव अशक्यतेतही शक्यता पाहतो

पृथ्वीवरील शाप प्रणाली अंतर्गत, आपण आपली स्वप्ने मागे टाकून त्याऐवजी लहान सहान शॉपिंग ला जातो आणि त्या नंतर घरी परत जाताना बर्गर खाण्यात आनंद मानतो. आणि जर तुमचे स्वप्न पूर्ण करण्यासाठी तुमच्या कडे पुरेसा वेळ नसेल किंवा तुम्ही अधिक श्रम करू शकत नसाल, तर तुम्ही ते स्वप्न सोडून द्याल आणि स्वतःची समजूत घालून

म्हणाल की मला देखील इतरांप्रमाणे ज्या नोकरीचा मला तिरस्कार आहे ती नोकरी करत राहिले पाहिजे. वेदनादायक कष्ट आणि निढळाचा घाम गाळण्याच्या समीकरणात बहुतेक लोकांसाठी अशक्य हाच शब्द असतो.

आणि शिष्यांनी देखील त्यांच्या समोर आलेली परिस्थिती नेमकी अशीच समजून घेतली, “या 20,000 लोकांना जेवू घालायचे? अशक्य! इतके अन्न आणण्यासाठी सहा महिन्यांच्या पगारापेक्षा जास्त पैसे लागतील!” या परिस्थिती मध्ये वेतन म्हणजे गरज पूर्ण करण्यासाठी अधिक वेदनादायक कष्ट आणि श्रम हे शक्य असलेल्या इतर कोणत्याही बाबी पेक्षा जास्त होते. पुन्हा आपण पाहतो कि, अन्न प्राप्त करण्यासाठी परिश्रम करणे आणि निढळाचा घाम गाळणे हीच एकमेव धारणा लोकांच्या समोर असते. पृथ्वीच्या क्षेत्रात ह्याच प्रकारे कार्य होत असते. सर्वांना हे माहित आहे, परंतु येशू त्यांना जगण्याचा एक नवीन मार्ग, नवीन कायदे असलेले एक नवीन राज्य दाखवणार आहे. हो, खरोखरच ही वेदनादायक कष्ट आणि घामाच्या व्यवस्थेतून सुटका आहे. खरोखरच आहे!

तर पुन्हा त्या घटनेकडे परत जाऊया जेव्हा शिष्य म्हणाले की ह्या एवढ्या मोठ्या जमावाला जेवू घालणे अशक्य आहे आणि त्यावर येशू काय प्रतिसाद देतो ते पाहूया. तुमच्याकडे कदाचित DWJD (येशूने जे केले ते करा) असे लिहिलेले चामड्याचे एक ब्रेसलेट असावे जेणेकरून तुम्ही त्याच्या शिष्यांप्रमाणे तो आपल्याला काय दाखवणार आहे हे विसरू नये. त्याच्या शिष्यांनी परिस्थितीचे जे निदान केले त्या सोबत सहमत न होता, येशू त्यांना एक सूचना देऊन परिस्थिती स्वतःच्या नियंत्रणात घेतो, "जा आणि पाहा तुमच्याकडे किती भाकरी आहेत." आता, त्या गर्दीत जाऊन किती भाकरी आहेत हे शोधण्या पूर्वीच त्यांना हे माहित होते की संपूर्ण जमावाला जेवू घालण्यासाठी त्यांच्याकडे पुरेसे अन्न नाही. म्हणूनच ते सुरुवातीला येशूकडे आले आणि लोकांना स्वतःहून अन्न शोधण्यासाठी पाठवण्याची विनंती केली. पण येशूने त्यांना जे करायला सांगितले होते त्या आज्ञेचे पालन करावे म्हणून, ते उपस्थित लोकांकडे गेले आणि शोध घेतला आणि त्यांना पाच भाकरी आणि दोन मासे मिळाले, ती बातमी घेऊन ते परत येशूकडे आले.

आता, इथे काहीतरी घडतंय ज्याकडे लक्ष देणे आवश्यक आहे, आणखी एक महत्त्वाचा संकेत! पण ते पाहण्यासाठी, आपण हीच घटना मत्तयकृत शुभवर्तमानातून पाहू या.

*येशू त्यांना म्हणाला, “त्यांना जाण्याची गरज नाही; तुम्हीच त्यांना खायला द्या.”*

*ते त्याला म्हणाले, “आमच्याजवळ केवळ पाच भाकरी व दोन मासे आहेत.”*

*तो म्हणाला, “ते इकडे माझ्याजवळ आणा.”*

*मग त्याने लोकसमुदायांना गवतावर बसण्याची आज्ञा केली आणि त्या पाच भाकरी व ते दोन मासे घेऊन त्याने वर आकाशाकडे पाहून आशीर्वाद दिला आणि भाकरी मोडून शिष्यांना दिल्या व शिष्यांनी लोकसमुदायांना दिल्या.*

*मग ते सर्व जेवून तृप्त झाले; आणि उरलेल्या तुकड्यांच्या बारा टोपल्या त्यांनी भरून घेतल्या.*

*जेवणारे सुमारे पाच हजार पुरुष होते; शिवाय स्त्रिया व मुलेदेखील होतीच.*

—मत्तय 14:16-21

वचन 18 मध्ये येशू शिष्यांना भाकरी आणि मासे त्याच्याकडे घेऊन येण्यास सांगतो हे लक्षात घ्या. त्यानंतर 19 व्या वचनाच्या शेवटी, आपण पाहतो की तो भाकरी आणि मासे त्याच्या शिष्यांना परत देतो. ह्या दोन शास्त्र वचनाच्या मध्ये काहीतरी घडले ज्याकडे तुमचे लक्ष वेधले गेले पाहिजे आणि तुम्ही असा प्रश्न विचारला पाहिजे: "जर येशू त्यांच्या कडून घेतलेल्या भाकरी आणि मासे पुढच्याच क्षणी त्यांना परत देणार होता तर त्याने शिष्यांना भाकरी आणि मासे त्याच्याकडे आणून त्याच्या हातात द्यायला का सांगितले?" येशू ह्या ठिकाणी धार्मिकदृष्ट्या काहीही करत नाही, म्हणून त्याने शिष्यांना भाकरी आणि मासे त्याच्या हातात द्यायला सांगितले ह्याचे काही तरी कारण असलेच पाहिजे. आपण स्वतःला जर आध्यात्मिक शास्त्रज्ञ म्हणतो, तर जेंव्हा त्याने शिष्यांकडून भाकरी आणि मासे आपल्या हातात घेतले तेव्हा काय झाले हे आपल्याला जाणून घेणे आवश्यक आहे.

***त्याने पाच भाकरी आणि दोन मासे घेतले आणि वर आकाशाकडे पाहून देवाचे आभार मानले. आणि भाकरी मोडल्या आणि शिष्यांना दिल्या आणि शिष्यांनी त्या लोकांना दिल्या.***

बायबलमध्ये असे म्हटले आहे की त्याने आभार मानले. काही भाषांतरात म्हटले आहे की त्याने ते आशीर्वादित केले. पण याचा अर्थ काय? येथे आभार किंवा आशीर्वाद यासाठी

वापरल्या जाणाऱ्या ग्रीक शब्दाचा शब्दशः अर्थ एखाद्या गोष्टीला पवित्र करणे, एखाद्या गोष्टीवर देवाचा आशीर्वाद मागणे किंवा एखाद्याच्या वापरासाठी देवाला एखाद्या गोष्टीवर आशीर्वाद देण्याची विनंती करणे असा होतो. त्याहून एक पाऊल पुढे जाऊन, एखाद्या गोष्टीला पवित्र करणे म्हणजे ती पवित्र म्हणून घोषित करणे, औपचारिकपणे दैवी उद्देशासाठी समर्पित करणे.

म्हणून मुळात, जेव्हा येशूने मासे आणि भाकरीला आशीर्वाद दिला, तेंव्हा ते पृथ्वीच्या क्षेत्रापासून वेगळे होऊन स्वर्गाच्या अधिकारक्षेत्रात गेले.

**जेव्हा तो त्यांच्यावर आशीर्वादाचे शब्द बोलला आणि त्यांना आशीर्वाद दिला, तेव्हा भाकरी आणि माशांचे राज्यक्षेत्र बदलले.**

## वस्तू नवीन अधिकारक्षेत्रात आणणे

भाकरी आणि मासे पूर्वी पृथ्वीवरील मनुष्या च्या अधिकारक्षेत्रात होते आणि देव त्यांच्या विषयी काहीही करू शकत नव्हता. पण आता आपण पाहतो की त्या लहान मुलाच्या उदारतेमुळे ते येशूला अर्पण केले गेले, त्यामुळे ते देवाच्या राज्याच्या अधिकारक्षेत्रात हस्तांतरित केले गेले. आपण हे देखील लक्षात घेतले पाहिजे की भाकरी आणि मासे जर पृथ्वीच्या अधिकारक्षेत्रातच राहू दिले असते तर ते कधीही वाढून अधिक होऊ शकले नसते.

आध्यात्मिक शास्त्रज्ञ म्हणून, आपण तपशीलांकडे बारकाईने लक्ष दिले पाहिजे. हे हस्तांतरण प्रत्यक्षात कधी झाले? तुम्हाला सुरुवातीला वाटेल की जेव्हा लहान मुलाने शिष्यांना मासे आणि भाकरी दिली तेव्हा अधिकारक्षेत्रात बदल झाला. अर्थात, ते प्रक्रियेचा एक भाग होता आणि मुलाने ते स्वेच्छेने केले ही देखील लक्षात घेण्यासारखी एक महत्त्वाची बाब आहे. परंतु शिष्यांना भाकरी आणि मासे देणे हे वास्तविकरीत्या हस्तांतरणाचे ठिकाण नव्हते. ज्या क्षणी येशू त्यावर आशीर्वादाचे शब्द बोलला, जेव्हा त्याने त्या वस्तूंना आशीर्वाद दिला, तेव्हाच खरे कायदेशीर हस्तांतरण झाले. मी निश्चितपणे असे मानतो की जरी येशूने भाकरी आणि मासे ताब्यात घेतले होते आणि ते त्याच्या हातात धरले होते, तरीही त्याने त्या वस्तूंना विशिष्ट निर्देश देईपर्यंत त्यांची संख्या वाढली नसती.

आपण विश्वासा संबंधी ह्या आधी शिकलेल्या धड्याच्या दृष्टिकोनातून ह्याकडे पाहूया. आपण हे पहिले की आपल्या ह्दयात आपण जरी विश्वास ठेवत असलो, आणि त्यामुळे

आता स्वर्गाला पृथ्वीच्या क्षेत्रात कार्य करणे कायदेशीर झाले असले, तरी तुम्ही ज्यांना पृथ्वीवर कायदेशीर अधिकार प्राप्त आहे ते तुम्ही येथे पृथ्वीवर स्वर्गाचे अधिकार मुक्त केल्या शिवाय काहीही घडणार नाही.

> *कारण जो अंत:करणाने विश्वास ठेवतो तो नीतिमान ठरतो व जो मुखाने कबूल करतो त्याचे तारण होते.*
>
> —रोमकरांस पत्र 10:10

येशूने भाकरी आणि मासे ह्यावर आशीर्वाद मागत असतांना जे म्हटले त्या शब्दांचा उल्लेख बायबलमध्ये नसला तरी, मला खात्री आहे की ते असे म्हटलं असेल: "हे पित्या, मी तुझ्या तरतूदीबद्दल तुझे आभार मानतो आणि तुझ्या गौरवासाठी मी ही भाकरी आणि हे मासे तुझ्या राज्यात स्वीकारतो. हे भाकरी आणि मासे इतके वाढू दे कि या मोठ्या जमावाला पुरेसे खायला मिळेल, आणि त्याद्वारे त्यांना विश्रांती आणि सामर्थ्य प्राप्त होऊन ते तुझे वैभव पाहू शकतील." अर्थात, त्याचे हे शब्द कुठेही लिहिलेले नाहीत. पण मला खात्री आहे की भाकरी आणि मासे त्याच्या हातात दिल्यानंतर त्याने त्यांना आज्ञा दिली. मला हे कसे कळाले? कारण त्याला आधीच योजना माहित होती आणि त्याने लोकांना आधीच गटांमध्ये बसवण्यास सांगितले होते.

> *येशू त्यांना म्हणाला, "त्यांना जाण्याची गरज नाही; तुम्हीच त्यांना खायला द्या."ते त्याला म्हणाले, "आमच्याजवळ केवळ पाच भाकरी व दोन मासे आहेत." तो म्हणाला, "ते इकडे माझ्याजवळ आणा."*
>
> *मग त्याने लोकसमुदायांना गवतावर बसण्याची आज्ञा केली आणि त्या पाच भाकरी व ते दोन मासे घेऊन त्याने वर आकाशाकडे पाहून आशीर्वाद दिला आणि भाकरी मोडून शिष्यांना दिल्या व शिष्यांनी लोकसमुदायांना दिल्या.*
>
> *मग ते सर्व जेवून तृप्त झाले; आणि उरलेल्या तुकड्यांच्या बारा टोपल्या त्यांनी भरून घेतल्या. जेवणारे सुमारे पाच हजार पुरुष होते; शिवाय स्त्रिया व मुलेदेखील होतीच.*
>
> —मत्तय 14:16-21

लक्षात घ्या की त्याने भाकरी आणि मासे ह्यावर आशीर्वाद मागण्या पूर्वीच त्यांना गवतावर बसण्याची सूचना दिली होती. त्याला त्याची योजना नेमकी काय आहे हे माहीत होते. मला खात्री आहे की भाकरी आणि मासे त्याच्या हातात दिल्यानंतर त्याने त्या मासे आणि भाकरीला आज्ञा दिली असेल. जेव्हा तुम्ही तुमचे बी पेरता तेंव्हा ते कशासाठी आहे आणि त्याचे कार्य कसे असले पाहिजे ह्याची दिशा देणे हे तुमचे बी पेरण्याचा महत्त्वाचा पैलू आहे. ते महत्त्वाचे असे मी म्हटले का? होय मी असेच म्हटले आहे, म्हणून त्याकडे विशेष लक्ष द्या. पेरणी करताना त्या पेरणीला कशा प्रकारे दिशा निर्देश द्यायचे हे समजावून सांगण्यासाठी मी येथे थोडा वेळ घेणार आहे.

> *तो त्यांना म्हणाला, "पण तुम्ही मला कोण म्हणून म्हणता?"*
>
> *शिमोन पेत्राने उत्तर दिले, "आपण ख्रिस्त, जिवंत देवाचे पुत्र आहात."*
>
> *येशूने त्याला म्हटले, "शिमोन बार्योना, धन्य तुझी; कारण मांस व रक्त ह्यांनी नव्हे तर माझ्या स्वर्गातील पित्याने हे तुला प्रकट केले आहे.*
>
> *आणखी मी तुला सांगतो, तू पेत्र आहेस आणि ह्या खडकावर मी आपली मंडळी रचीन व तिच्यापुढे अधोलोकाच्या द्वारांचे काहीच चालणार नाही.*
>
> *मी तुला स्वर्गाच्या राज्याच्या किल्ल्या देईन आणि पृथ्वीवर जे काही तू बांधशील ते स्वर्गात बांधले जाईल व पृथ्वीवर जे काही तू मोकळे करशील ते स्वर्गात मोकळे केले जाईल."*
>
> —मत्तय 16:15-19

ह्या शास्त्रभागात आपल्याला स्पष्टपणे सांगतल्या गेले आहे की देवाच्या राज्याच्या वतीने पृथ्वीवर राज्य करण्याची आपली क्षमता आता येशू ख्रिस्ताद्वारे पुनः बहाल करण्यात आली आहे. आपल्याला सैतानाला बांधण्याचा आणि स्वर्गाची इच्छा पृथ्वीवर मोकळी करण्याचा अधिकार देण्यात आला आहे. आता, माझा विश्वास आहे, किंवा

**आपल्याला सैतानाला बांधण्याचा आणि स्वर्गाची इच्छा पृथ्वीवर मोकळी करण्याचा अधिकार देण्यात आला आहे.**

किमान मला आशा आहे की, अनेक ख्रिस्ती लोकांनाहे माहीतच आहे कि सैतानाला बांधणे म्हणजे काय आहे. अगदी सोप्या भाषेत, सैतानाला बांधण्याचा अर्थ त्याला त्याच्या दुष्ट योजना पूर्ण करण्यापासून रोखणे आहे. तुम्ही लोकांमधून दुष्ट आत्मे काढून, आजारी लोकांवर हात ठेवून त्यांना बरे होण्याची आज्ञा देऊन किंवा फक्त "येशूच्या नावाने थांब!" असे म्हणून तुम्ही देवाच्या राज्यात तुमचा अधिकार अमलात आणत असता आणि येशूने सैतानावर मिळवलेला विजय अंमलात आणण्यासाठी त्याचा वापर करत असता.

## तुमच्या अधिकाराचा वापर करणे

माझ्या निरीक्षणानुसार, स्वर्गाला पृथ्वीच्या क्षेत्रात कसे मोकळे करायचे हे फार कमी लोकांना माहिती आहे. 1योहान 5:14-15 ही प्रभावी प्रार्थनेची रूपरेषा कशी आहे ह्या विषयी मी आधीच बोललो आहे.

> *त्याच्यासमोर येण्यास आपल्याला जे धैर्य आहे ते ह्यावरून की, आपण त्याच्या इच्छेप्रमाणे काही मागितले तर तो आपले ऐकेल; आणि आपण जे काही मागतो ते तो ऐकतो, हे आपल्याला ठाऊक आहे; म्हणून ज्या मागण्या आपण त्याच्याजवळ केल्या आहेत त्या आपल्याला मिळाल्या आहेत हेही आपल्याला ठाऊक आहे.*
>
> —1 योहान 5:14 -15

तुमचा विश्वास असणे किंवा आपल्या हृदयात विश्वास बाळगणे हा ह्या समीकरणाचा शेवट नाही. जसे आपण आधीच पाहिले आहे की, जेव्हा तुम्ही स्वर्ग जे म्हणतो त्यावर विश्वास ठेवता तेव्हा तुम्ही नीतिमान ठरता. स्वर्गाने पृथ्वीच्या क्षेत्रात कार्य करणे आता कायदेशीर होऊन जाते, परंतु जोपर्यंत तुम्ही तो अधिकार पृथ्वीच्या क्षेत्रात मोकळा करत नाही तोपर्यंत काहीही घडत नाही. तुम्ही ख्रिस्तासोबत स्वर्गीय ठिकाणी पित्याच्या उजव्या हाताला बसला आहात. तुमचे शब्द राजाचे शब्द आहेत आणि तुम्ही बोलल्याशिवाय स्वर्गाचे कार्य येथे मोकळे करता येत नाही! ही प्रार्थनेत शब्दाने बोललेली घोषणा किंवा करार असू शकतो, परंतु तुमच्याकडे राज्याच्या चाव्या आहेत. देव तुमच्याशिवाय हे करू शकत नाही!

केवळ प्रार्थनेच्या कृतीतून हे कसे घडवून आणायचे हे जाणून घेण्यानेच ही गोष्ट घडून येत नाही; तर असे करतांना दिशा निर्देश कसे द्यायचे हे जाणून घेणे महत्वाचे आहे. लक्षात

ठेवा, जर तुम्ही स्वर्गाला पृथ्वीवर मोकळे करत नाही तर तो पृथ्वीवर मोकळा होणार नाही. म्हणून आपल्या जीवनात आणि आपल्या जगात स्वर्गाची इच्छा कशी मोकळी करायची हे समजून घेणे अत्यंत आवश्यक आहे.

> *तुम्ही प्रार्थना करता तेव्हा परराष्ट्रीयांसारखी व्यर्थ बडबड करू नका; आपण पुष्कळ बोललो म्हणजे आपले मागणे मान्य होईल असे त्यांना वाटते. तुम्ही त्यांच्यासारखे होऊ नका, कारण तुमच्या गरजा काय आहेत हे तुमचा पिता, तुम्ही त्याच्याकडे मागण्यापूर्वीच जाणून आहे. ह्यास्तव तुम्ही ह्या प्रकारे प्रार्थना करा :'हे आमच्या स्वर्गातील पित्या,तुझे नाव पवित्र मानले जावो. तुझे राज्य येवो. जसे स्वर्गात तसे पृथ्वीवरही तुझ्या इच्छेप्रमाणे होवो.आमची रोजची भाकर आज आम्हांला दे;*
>
> —मत्तय 6:7-11

येशू अशा प्रकारे सुरुवात करतो, “हे आमच्या स्वर्गातील पित्या, तुझे नाव पवित्र मानले जावो (त्याच्या प्रभुत्वाचे आणि अधिकाराचे प्रतिबिंब).” या पहिल्या वाक्यात येशू प्रार्थनेची कायदेशीर स्थिती मांडत आहे. त्याची तुलना कोर्टरूममध्ये बोलल्या जाणाऱ्या पहिल्या वाक्याशी करूया.

कोर्टात घोषणा करणारा उभा राहून म्हणतो, “कृपया उठा. कोर्ट ऑफ (मग तो कोर्टाचे नाव घेतो).....” ते फ्रँकलिन काउंटीचे कॉमन प्लेज कोर्ट किंवा सेकंड ज्युडिशियल सर्किट कोर्ट, क्रिमिनल डिव्हिजन किंवा इतर कोणतेही नाव असू शकते. पण सुरुवातीला तिथे अनेक गोष्टी घडतात. तो म्हणतो, “सर्वजण उभे रहा,” ज्यामुळे कोर्टाचा तसेच कोर्टाचे अध्यक्षपद भूषवणाऱ्या न्यायाधीशाचा सन्मान निश्चित होतो. योग्य अधिकार क्षेत्र स्थापित करण्यासाठी कोर्टाच्या नावाचा उल्लेख केला गेला आहे, जेणेकरून तुम्हाला कळेल की तुम्ही योग्य कोर्टरूममध्ये आहात ज्याचे तुमच्या केसवर अधिकार क्षेत्र आहे. घोषणा करणारा पुढे काय म्हणतो ते पाहू या. “कृपया सर्वजण उठून उभे राहा. फ्रँकलिन काउंटी कोर्ट सत्र आता सुरु होत आहे, माननीय न्यायाधीश स्मिथ अध्यक्षपद भूषवत आहेत.”

“हे आमच्या स्वर्गातील पित्या, तुझे नाव पवित्र मानले जावो,” हे संपूर्ण वाक्य या प्रकरणाचा न्याय करणाऱ्या आणि आपल्याला उपस्थित राहण्याचा अधिकार देणाऱ्या

व्यक्तीसाठी परिस्थिती निर्माण करत आहे. तो आमचा पिता आहे आणि आम्हाला या न्यायालयात जाण्याचा कायदेशीर अधिकार आहे. हे पहिले वाक्य स्वर्गाच्या न्यायालयाचा संदर्भ देते, जे अधिकारांचे सर्वोच्च न्यायालय आहे.

पुढे, प्रभूच्या प्रार्थनेत म्हटले आहे, "तुझे राज्य येवो, तुझी इच्छा पूर्ण होवो."

या शिक्षेनुसार न्यायालयाने राज्याच्या कायद्यांनुसार निर्णय देणे आवश्यक आहे. समजा तुम्ही एक याचिका दाखल करणार आहात किंवा तुमचा मुद्दा न्यायालयात घेऊन जाणार आहात आणि तुम्ही न्यायाधीशांना खटल्यासाठी त्यांच्या इच्छा (नियम) सांगण्यास सांगता. मग वचन पुढे म्हणते, “जसे स्वर्गात तसे पृथ्वीवरही तुझी इच्छा पूर्ण होवो.” पुन्हा तुम्ही असे म्हणत आहात की तुम्हाला स्वर्गाप्रमाणेच पृथ्वीवरही राज्य लागू करायचे आहे. आता, या सर्व गोष्टी न्यायालयाचे न्यायस्थान स्थापित करण्यासाठी होत्या. आतापर्यंत काहीही मागितलेले नाही किंवा दाखवलेले नाही. पण मग आता पुढे याचिका येते.

"आमची रोजची भाकर आम्हाला दे." जर तुम्हाला खरोखर भाकरीची गरज नसेल तर या वाक्याचा खऱ्या भाकरीशी काहीही संबंध नाही. त्याऐवजी, हे वाक्य तुम्हाला भाकरी च्या जागी ज्याची तुम्हाला आवश्यकता आहे ते ठेवण्यास सांगते. लक्षात ठेवा, येशू त्याच्या शिष्यांना त्यांच्या गरजा त्वरित पूर्ण होण्यासाठी प्रार्थना कशी करावी हे शिकवत असताना ही चर्चा सुरू झाली. म्हणजेच, तुम्ही तुमची याचिका कुठे दाखल करता, पण मी म्हटल्याप्रमाणे, येथे एक चांगला शब्द वापरला जाऊ शकतो म्हणजेच आपण त्याला हक्काची मागणी म्हणू शकतो. हो, दोन्ही शब्द बरोबर आहेत आणि फिलिप्पैकरांस पत्र 4 मध्ये विनंती हा शब्द वापरला आहे. पण मुद्दा असा आहे की विनंती म्हणजे साधारण विनंती करणे. येथे ज्या गोष्टीकडे लक्ष दिले पाहिजे ते म्हणजे तपशील. जर तुम्ही प्रार्थनेत काही सूचना दिल्या तर; म्हणून ते तपशीलवार आणि स्पष्ट असले पाहिजे. फिलिप्पैकर 4:6-7 आपल्याला हे देखील सांगते.

**पण बहुतेक ख्रिस्ती असे काहीतरी म्हणतील, "अरे, देव मला जे काही देऊ इच्छितो ते ठीक आहे. त्याला चांगले काय ते माहीत आहे." चुक, चुक, चुक!**

*कशाविषयीही चिंताक्रांत होऊ नका, तर सर्व गोष्टींविषयी प्रार्थना व विनंती करून आभारप्रदर्शनासह आपली मागणी देवाला कळवा.म्हणजे सर्व बुद्धिसामर्थ्याच्या पलीकडे असलेली देवाने दिलेली शांती तुमची अंतःकरणे व तुमचे विचार ख्रिस्त येशूच्या ठायी राखील.*

—फिलिप्पैकरांस पत्र 4:6-7

प्रार्थना आणि याचना यात फरक आहे हे लक्षात घ्या. आपल्या प्रार्थना आपल्या विनंत्यांचे प्रतिनिधित्व करू शकतात, परंतु आपल्या प्रार्थना त्या पित्याकडे घेऊन जाणारे वाहन आहेत. एक याचिका खूप तपशीलवार आणि स्पष्ट असते. पण बहुतेक ख्रिस्ती असे काहीतरी म्हणतील, "अरे, देव मला जे काही देऊ इच्छितो ते ठीक आहे. त्याला चांगले काय ते माहीत आहे." चुक, चुक, चुक!

**देवाने तुम्हाला राज्याच्या चाव्या दिल्या आहेत!**

जर तुम्ही माझी पुस्तके वाचली असतील तर तुमच्या लक्षात आले असेल की मी राज्याबद्दल अनेक कथा सांगितल्या आहेत. या पुस्तकातही अशा अनेक कथा आहेत, ज्या तुम्हाला हे पाहण्यास मदत करतील की राज्य किती विशाल आणि किती स्पष्ट आहे आणि तुम्हाला तुमच्या शब्दांमध्ये किती स्पष्ट असणे आवश्यक आहे. माझा मुद्दा मांडण्यासाठी, मी तुम्हाला काही जुन्या कथांबद्दल सांगू इच्छितो ज्या तुम्ही आधी ऐकल्या असतील. पण मला वाटतं की मी तुमच्यासोबत त्या पुन्हा सांगण्यात वेळ घालवला पाहिजे जेणेकरून तुम्हाला राज्य किती स्पष्ट आहे हे चांगल्या प्रकारे समजेल. तुम्हाला आठवण करून देण्यासाठी मी तुम्हाला काही कथा सांगतो.

## कार्यरत असलेले राज्य

तुम्ही हे आधी वाचले असेल की जेव्हा मी प्रभूला म्हटले, "प्रभु, ही गाडी जळून राख झाली तर बरे होईल." मग तुम्ही पाहिले की माझी गाडी प्रत्यक्षात कशी जळाली. तो योगायोग होता का? चला पुढे पाहूया. मी तुम्हाला हरणांबद्दल देखील सांगितले, त्यांच्यासाठी बी कसे पेरायचे हे परमेश्वराने मला कसे शिकवले आणि मी बी पेरल्याशिवाय एकही हरण माझ्या झाडाखाली कसे आले नाही. तुम्ही हे देखील लक्षात घेतले असेल की ज्या हरणासाठी मी बी पेरले होते, तेच हरण प्रत्येक वेळेस योग्य वेळी माझ्याकडे येत असे. मग मी तुम्हाला हे

देखील सांगितले की देवाने मला कसे दाखवले की मी ज्या क्रमाने बी पेरले त्याच क्रमाने मला हरीण मिळाले. तुम्ही कधी असं घडल्याचं ऐकलं आहे का? मला माहित आहे की मी माझ्या स्वतःच्या डोळ्यांनी ते घडतांना पाहण्या आधी मी असे काहीही पहिले कधी ऐकले नव्हते. देवाचे राज्य इतके स्पष्ट आहे की मी तुम्हाला माझा मुलगा टिम ने सात ठिबके असलेल्या आणि सहा ठिबके असलेल्या हरणांसाठी जे बी पेरले होते त्याबद्दल सांगितले. मी तुम्हाला असेही सांगितले होते की जेव्हा देवाने मला त्या हरणांना अधिकाराने हाक मारून बोलायला शिकवले तेव्हा माझ्यापासून 200 यार्ड दूर धावत असलेले एक हरीण थांबले, ते परतून थेट माझ्याकडे आले आणि माझ्या झाडाखाली येऊन उभे राहिले. मी तुम्हाला त्या तितराबद्दल सांगितले ज्याला मी थांबण्याचा आदेश देताच लगेच त्या ट्रॅक वर थांबले.

मी तुम्हाला बंदुकीच्या दुकानात मी पाहिलेल्या बंदुकीबद्दल सांगितले आणि म्हटले, "मी ती खरेदी करेन," आणि काही आठवड्यांनंतर, मला तीच बंदूक बक्षीस म्हणून मिळाली. मी तुम्हाला BMW 645CI कन्व्हर्टिबलबद्दल गाडी बद्दल देखील सांगितले, ड्रेंडाने ती गाडी पार्किंगमध्ये पार्क केलेली पाहिली आणि म्हणाली, "हीच ती आहे जी मला हवी आहे!" आम्ही त्या बद्दल कोणालाही सांगितले नाही, पण काही आठवड्यांनंतर, चर्चमधील एका व्यक्तीने मला फोन केला आणि ते म्हणाले, "मी ड्रेंडाला हवी असलेली गाडी पाहिली आहे." मी स्तब्ध झालो आणि त्याला विचारले की तो कोणाबद्दल बोलत आहे. त्यानंतर त्याने सांगितले की तो गाडी चालवत रस्त्यावरून जात असताना त्याला एक BMW 645ci कन्व्हर्टिबल गाडी दिसली आणि ती विकत घेण्यासाठी अगदी उत्तम स्थितीत असलेली गाडी होती; ही गाडी पाहताच देवाने त्याला सांगितले की ती ड्रेंडा साठी असलेली गाडी आहे. त्या बंदुकीकडे माझे लक्ष वेधले होते, आणि आता नेमके तेच ह्या कार बद्दल झाले!

सातव्या प्रकरणात, मी तुम्हाला मी विकत घेतलेल्या विमानाची कहाणी सांगणार आहे, त्या साठी मी बीज कसे पेरले आणि ते अशा स्त्रोताकडून आले ज्याची आम्हाला अपेक्षा देखील नव्हती  आणि ते खरेदी करण्यासाठी माझ्या कडे पूर्ण पैशांचा प्रबंध देखील झाला. राज्य कसे कार्य करते याबद्दल सांगण्यासाठी माझ्याकडे असंख्य कथा आहेत.

मला आठवतंय जेव्हा मी सर्वात मोठ्या 26 शिंगांच्या काळवीटाची शिकार केली होती. पण नोव्हेंबरच्या एका उबदार दिवशी. मी दिवसभर हरणाला लटकवत ठेवले आणि दुसऱ्या

दिवशी मी टॅक्सीडर्मिस्टला बोलावून त्याचे डोके कापले. त्याने हरणाच्या केसांकडे पाहिले आणि म्हणाला, “कृपया मला माफ करा; पण असं वाटतंय की या हरणाचे केस या उष्ण हवामानात कुजले आहेत. आणि मला वाटत नाही की हे काम यशस्वी होऊ शकेल, पण मी ते करण्याचा प्रयत्न करेन." आता, मी विचार केला की विश्वासाने मिळवलेल्या हरणा पासून मी एक चांगला ऑफिस माउंट बनवण्यात अपयशी ठरू देणार नाही. मग, तो माणूस ऑर्डर फॉर्म घेण्यासाठी ऑफिसमध्ये गेला. जेव्हा तो आत गेला तेव्हा मी माझे हात त्या हरिणीवर ठेवले आणि घोषित केले की त्याचे केस अगदी व्यवस्थित आहेत आणि त्याचा माउंट अगदी परिपूर्ण बनून तयार होईल. मग मी एक महिन्यानंतर टॅक्सीडर्मिस्ट कडे गेलो आणि ते मला म्हणाले, “तुम्हाला आठवत ना, मी तुम्हाला म्हणालो होतो की त्याचे केस कुजले आहेत पण बघा हे अगदी उत्तम माउंट बनून तयार झाले आहे. त्याचे केस एकदम उत्तम स्थितीत आहेत."

मी तुम्हाला अशा गोष्टी तासन् तास सांगू शकतो, पण मुद्दा असा आहे की तुमचं ह्या विषयी काय म्हणणं आहे? तुम्ही तुमच्या प्रत्येक शब्दाने तुम्ही आध्यात्मिक नियमांना गती देत असता! तुम्हाला कदाचित याची माहिती नसेल. मलाही ते माहित नव्हते, पण ते खरे आहे. देवाचे राज्य अगदी स्पष्ट आहे. मी तुम्हाला आणखी एक गोष्ट सांगू इच्छितो, आणि तुम्हाला या पुस्तकात अशा अनेक कथा दिसतील, ज्या मी जे बोलत आहे ते खरे आहे हे सिद्ध करतील. हे सांगण्यास मला खूप उत्सुकता आहे.

## आध्यात्मिक नियमाला चालना देणे

ड्रेंडाच्या महिला परिषदेतील एका कार्यक्रमादरम्यान हे घडलं. आम्ही आमच्या एका पाहुण्या साठी ते आमच्या कडे असताना फिरण्यासाठी कॅडिलॅक एस्केलेड कार भाड्याने घेतली होती. कॉन्फरन्स संपल्यानंतर, दुसऱ्या दिवशी सकाळ पर्यंत ती एस्केलेड आमच्या कडे राहणार होती, म्हणून मी आणि ड्रेंडाने त्या रात्री त्याच गाडीने घरी जाण्याचे ठरविले म्हणजे ती कशी चालते ते आम्हाला पाहायचे होते. आम्ही यापूर्वी कधीही एस्केलेड चालवले नव्हती. पण ते किती चांगली चालते याची तुम्ही कल्पना करू शकता. दुसऱ्या दिवशी सकाळी आम्ही त्याच गाडीने चर्चला जात असताना, आम्ही शब्दाने बोलून म्हणालो कि आपल्याला ही गाडी खरेदी करायची आहे आणि यावर आम्ही सहमत झालो. आम्ही

चालवत असलेली गाडी लहान होती आणि पांढऱ्या मोत्यांच्या रंगाची होती. आम्ही दोघांनी एकमताने विचार केला कि ह्या मधील मोठी गाडी घेण्यापेक्षा आपल्याला लहान गाडी जास्त चांगली वाटते आणि हाच मोत्याचा पांढरा रंग देखील आवडतो.

त्या कार्यक्रमानंतर फक्त एक महिना झाला, मी माझे वर्तमानपत्र घेण्यासाठी बाहेर पडलो तेव्हा माझा फोन वाजला आणि मी फोन उचलला तेव्हा मला माझ्या चर्चमधील एका सदस्याचा आवाज ऐकू आला. तो म्हणाला, “मला तुमच्या साठी कॅडिलॅक एस्केलेड कार खरेदी करायची आहे. तुम्हाला कोणता रंग हवा आहे?" मला हे ऐकून आश्चर्य वाटले पण मी त्यांना सांगितले की मला पांढरा रंग आवडतो. पण मी त्यांना हे  सांगायला विसरलो की मला त्या मधील छोटी गाडी हवी आहे. हे संभाषण होऊन मग एक महिना गेला, आणि मला वाटले की कदाचित तो व्यक्ती एस्केलेडबद्दल विसरला असेल, पण मला पुन्हा फोन आला आणि ते म्हणाले की त्यांना ती गाडी मिळाली आहे. म्हणून आम्ही त्यांना भेटायला गेलो तेव्हा त्याच्याकडे आम्हाला हवी असलेली छोटी पांढरी कार होती. मी त्या गाडीजवळ जाताच, ते म्हणाले, "मला माफ करा, मला ह्या मधील मोठी गाडी मिळत नव्हती म्हणून ह्या कामात इतका उशिरा झाला." त्याला माहित नव्हत की आम्हाला मोठी गाडी नको होती. त्यांना स्वतःला मोठी गाडी आवडत होती आणि त्यांना वाटले की आम्हाला देखील तीच हवी आहे, पण त्याला फक्त छोटी गाडी मिळाली. मला असं म्हणायचं आहे की, आम्हाला तीच गाडी मिळाली जी आम्ही मिळण्या साठी आम्ही एकमत होऊन सहमत झालो होतो.

व्यवसायात मी पाहिलेले एक आश्चर्यकारक उदाहरण गेल्या काही वर्षांत घडले. तुम्हाला माहिती असेल किंवा नसेल, पण मी अजूनही एक वित्तीय सेवा कंपनीचा मालक आहे. 25 वर्षांपूर्वी मी पाळकीय सेवा सुरू करण्यापूर्वी, 5,000 कार्यालयांपैकी माझे कार्यालय पहिल्या क्रमांकावर होते. जेव्हा मी माझे चर्च सुरू केले तेव्हा मला माहित होते की मी खूप व्यस्त असणार आहे आणि मला वाटू लागले की मी ते पहिले स्थान राखू शकणार नाही, आणि तसेच झाले. माझ्या ह्या व्यवसायात, आमचे विक्रेते वर्षात होणाऱ्या  उत्पादनाची वाढ बघून आपल्या सेल्समन ला प्रोत्साहनपर बक्षीस म्हणून ट्रिप देतात.

मी ज्या सेल्समनसोबत काम करत असे, तो त्याच्या वार्षिक उत्सवात 10 दशलक्ष डॉलर्सचा व्यवसाय करणाऱ्या कोणालाही 100,000 डॉलर्सचा बोनस देत असे. वार्षिक कार्यक्रमात सहभागी होण्यासाठी तो $3 दशलक्ष व्यवसाय करणाऱ्या व्यक्तीला एका

चांगल्या सहलीचा खर्च देखील देत असे. मी ह्या कंपनी साठी वर्षाला सुमारे $ 4 दशलक्ष व्यवसाय करत असे, त्यामुळे मला एक मोफत ट्रिप मिळत असे, आणि मग मी तिथे बसून चांगला व्यवसाय करणाऱ्या लोकांना $1कोटीचा चेक मिळतांना पाहत असे. मी हे असे 18 वर्षे केले! हो हे खरे आहे, 18 वर्षांपर्यंत. पास्टर म्हणून चर्चचे नेतृत्व करताना मी ते ध्येय गाठेन असे मला कधीच वाटले नव्हते, म्हणून मी त्या साठी कार्य करून ते प्राप्त करण्या बाबतीत कधीच विश्वास धरला नाही.

पण एके वर्षी मी अधिवेशनात बसून टॉप टेनला  त्यांचे $100,000 चे चेक मिळत असल्याचे पाहत होतो, तेव्हा प्रभू माझ्याशी बोलला आणि म्हणाला, "तू त्या जागी का नाहीस?" मी उत्तर देण्यापूर्वीच, तो म्हणाला, "मला तू तिथे पाहिजे आहेस. मला माझे नाव इथे दिसावे असे वाटते." त्यावेळी मार्च महिना सुरू झाला होता आणि मी म्हटल्याप्रमाणे, आम्ही गेल्या 18 वर्षांपासून या कंपनीसाठी दरवर्षी सुमारे $ 4 दशलक्षाचा कारोभार करत होतो. स्वाभाविकच, मला ते ध्येय गाठण्याचा कोणताही मार्ग दिसत नव्हता, परंतु मी त्याबद्दल प्रार्थना केली आणि मी आणि ड्रेंडा ने आमचा व्यवसाय $10 दशलक्ष पर्यंत पोहचण्या साठी आमचे बी पेरले. माझी कंपनीने ज्या प्रकारे प्रक्रिया कार्य करत होती त्या मध्ये मी कशा प्रकारे बदल करू शकतो ते प्रभूने मला दाखवले, ज्यामुळे मोठा फरक पडला. थोडक्यात, आम्ही टॉप टेनमध्ये स्थान मिळवले आणि $100,000 चा चेक मिळवला. पण ह्या ठिकाणी मी एक विशेष गोष्ट तुम्हाला सांगू इच्छितो. आणि ती ही कि आम्ही तो कारोभार फक्त एका विक्रीत केला होता!

पुढच्या वर्षी, कंपनीने $100,000 चेक ची पातळी गाठण्यासाठी $12 दशलक्षचे उद्दिष्ट ठेवले. म्हणून आम्ही त्यासाठी आमचे बी पेरले आणि त्या वर्षीही आम्ही ते साध्य केले. तुम्ही अगदी योग्य अंदाज लावला आहे; आम्ही ह्यावेळेस देखील हे लक्ष्य केवळ एका विक्रीने पूर्ण केले. पुढची दोन वर्ष हा समारोह कार्यक्रम रद्द करण्यात आला. पण गेल्या वर्षी, 2019 मध्ये, त्यांनी ते पुन्हा $10 दशलक्षाच्या पातळीवर सुरू केले. आम्ही ह्या वेळेस देखील आमचे बी पेरले आणि आम्ही पहिल्या दहामध्ये पोहोचलो; आणि  पुन्हा एकदा तुमचा अंदाज बरोबर आहे, आम्ही ते लक्ष्य फक्त एकाच  विक्रीत पूर्ण केले. दरवर्षी एकाच विक्रीत आम्ही ते साध्य केले हा योगायोग होता का? नाही, आम्ही $100,000 चेक मिळण्याची पातळी गाठण्यासाठी आमच्या बीजाची पेरणी करत होतो. आणि ह्यावेळेस

देखील आम्ही तेच केले. आम्ही ते केवळ एकाच विक्रीत पूर्ण करणार असा विचार करत होतो का? अर्थात नाही. आम्ही वर्षभर पूर्ण परिश्रमाने काम करत होतो आणि महिन्याच्या शेवटच्या दिवसापर्यंत आम्हाला हे दिसत नव्हते कि आता नेमके काय होणार आहे. पुन्हा एकदा आपण ह्या ठिकाणी पाहतो कि, राज्याचे कार्य आश्चर्यकारक कसे होते.

निर्देश देण्याचे महत्त्व

या वर्षीच्या तरतूद परिषदेत, देव माझ्याशी बोलला आणि मला सांगितले की निर्देश देण्या बद्दल मी आणि ड्रेंडा ने जे काही शिकलो आहोत ते लोकांना शिकवावे. पवित्र आत्म्याने नेमके हेच त्याचे वर्णन केले आहे, आज्ञा देणे किंवा निर्देश देणे. म्हणून मी ह्या विषयीचे शिक्षण देण्यात काही वेळ घालवला कारण मला माहित आहे की बऱ्याच लोकांना हे कसे केले जाते ह्या विषयी  फारशी माहिती नाही. शब्दकोशानुसार, आज्ञा ही एक अधिकृत किंवा अधिकारीक सूचना आहे. लक्षात घ्या की त्यात दयेची याचना, किंवा कृपा करणे असे म्हटले नाही. नाही, ती एक अधिकृत आज्ञा आहे! तर चला ह्या संबंधी एक पाऊल पुढे टाकून अधिक सखोल पाहण्याचा प्रयत्न करू या. जर मी आत्मिकरित्या आज्ञा देत असेल तर ती आज्ञा कोण पाळते? हो, कोणीतरी तर निश्चितच त्या आज्ञेचे पालन करते; तर ते कोण करते ते पाहू या.

> *येशूने त्यांना उत्तर दिले, "देवावर विश्वास ठेवा. मी तुम्हांला खचीत सांगतो की, जो कोणी ह्या डोंगराला 'तू उपटून समुद्रात टाकला जा,' असे म्हणेल आणि आपल्या अंतःकरणात शंका न बाळगता, आपण म्हणतो तसे घडेलच असा विश्वास धरील त्याच्या शब्दाप्रमाणे घडून येईल.*
>
> —मार्क 11:22-24

ह्या शास्त्रभागात मी दोन गोष्टींकडे तुमचे लक्ष वेधू इच्छितो. लक्षात घ्या की त्या ठिकाणी म्हटले आहे, "जर कोणी म्हटले तर." येथे मला आणि ड्रेंडा ला काय पाहायला मिळाले ते पाहू. आपले शब्द पृथ्वीच्या क्षेत्रात स्वर्ग मोकळा करतात. दुसरे म्हणजे, मी त्या शास्त्रभागाच्या पुढील भागावर लक्ष केंद्रित करू इच्छितो.

> *"...आणि आपल्या अंतःकरणात शंका न बाळगता, आपण म्हणतो तसे घडेलच*

*असा विश्वास धरील त्याच्या शब्दाप्रमाणे घडून येईल."*

लक्ष द्या, त्यात म्हटले आहे, “त्यांच्यासाठी ते होईल!” देवासाठी नाही, तर त्याच्यासाठी, जो व्यक्ती ते पृथ्वीवर बोलत आहे त्याच्या साठी. व्वा! तुमची सगळी कामं थांबवा. तुम्हाला त्यावर एक मिनिट विचार करायलाच हवा! ते तुमच्या मनात, विचारात पूर्णपणे शिरू द्या; हे तुमच्याबद्दल बोलल्या जात आहे.

तर त्यांच्यासाठी हे कोण करते? हे जाणून घेण्यासाठी आपण इब्री लोकांस 1:14 पाहूया. सर्व देवदूत तारणाचा वारसा मिळवणाऱ्यांची सेवा करण्यासाठी पाठवलेले आत्मे नाहीत का?

ह्या ठिकाणी देवदूतांचे वर्णन करणारे दोन वेगवेगळे शब्द आहेत, सहकार्य करणे आणि सेवा करणे. सेवा करणे म्हणजे दुसऱ्या व्यक्तीसाठी कर्तव्य करणे किंवा त्याची सेवा करणे, ह्या परिस्थिती मध्ये हे तुमच्यासाठी केले जात आहे. सहकार्य करणे म्हणजे सरकारी कामकाजाच्या विभागाचे व्यवस्थापन सोपवलेला राज्याचा उच्च अधिकारी. देवदूत म्हणजे काय हे अशा प्रकारे स्पष्ट करता येईल, तो स्वर्गाच्या दरबाराचा प्रतिनिधी आहे ज्याला देवाच्या राज्याच्या वतीने तुमच्या साठी काम करण्याचा अधिकार आहे! कृपया लक्षात ठेवा की आपण देवदूतांना नियंत्रित करू शकत नाही कारण ते आपल्याला अहवाल देत नाहीत, परंतु आपण स्वर्गाच्या दरबारात आपल्याला आवश्यक असलेल्या गोष्टींसाठी विनंती करू शकतो आणि त्यांना आपल्या साठी पाठवले जाते. हे आश्चर्यकारक नाही का!

"मला काही सांगायचे आहे? मला हे माहित नव्हते." पुढे मी जी घटना सांगणार आहे त्यामध्ये देवाने मला जे शिकवले त्याचे वर्णन आहे.

ही घटना घडली त्या वर्षी, मी एका शिंगाच्या हरणासाठी माझे बी पेरले होते. ही कहाणी लिहितांना, मला पूर्ण खात्री होती कि मला माझे हरण नक्कीच मिळणारच आहे. म्हणून मी नेहमीप्रमाणे, ते एक शिंगाचे हरण लवकरच मिळेल अशा अपेक्षेने बाहेर पडलो. मी माझ्या झाडाच्या स्टँडवर बसलो होतो, आणि मला एक शिंगाचे हरण जंगलातून चालताना दिसले, परंतु ते इतके दूर होते कि माझ्या धनुष्याच्या टप्प्यात येऊ शकत नव्हते. मी त्याला माझ्या दिशेने येण्याचा आदेश देण्याचा प्रयत्न केला, पण काहीही झाले नाही. त्यानंतर संपूर्ण सकाळच्या वेळात मला इतर दुसरे हरीण दिसले नाही. मी दुसऱ्या दिवशी सकाळी पुन्हा बाहेर गेलो आणि तेंव्हा देखील एकही हरण दिसले नाही. त्या वेळेस, मला कळले की

काहीतरी खूप मोठी चूक होत आहे.

त्या दिवशी जंगलातून बाहेर पडताना, मी उत्तरासाठी पवित्र आत्म्याने प्रार्थना करू लागलो. आणि लवकरच, पवित्र आत्म्याने मला  दाखवले कि चूक काय आहे. जेव्हा मी माझ्या हरणासाठी बी पेरले, तेव्हा मी तो चेक लिहिला, तो एका लिफाफ्यात घातला आणि ते पोस्टाने पाठवून दिला. मी नेहमीप्रमाणे त्या चेकवर हात ठेवला नाही आणि त्यावर बोलून घोषणा केली नाही. मग पवित्र आत्म्याने मला त्या प्रसंगाची आठवण करून दिली जेंव्हा येशूने भाकरी आणि मासे वाढवून अधिक केले पण ते वाढण्यापूर्वी येशूने त्यावर आशीर्वाद दिला होता. मला आठवते की, मी ह्या पूर्वी ह्या विषयी म्हटले होते कि, मला ते करावेच लागेलका? मी ह्यापूर्वी नेहमीच त्या लिफाफ्यावर हात ठेऊन त्यावर बोलून घोषणा केली होती, पण ह्या विशिष्ट वर्षी मी तो लिफाफा पाठवला त्या दिवशी मी खूप व्यस्त होतो आणि ते करायला विसरलो. मला वाटले की मी फक्त माझे बी पेरले तर हरण राज्याच्या अधिकारक्षेत्रात येईल.

आता, मी माझी चूक सुधारण्यासाठी आणि राज्याबद्दलची माझी नवीन समज वापरून मी बरोबर आहे का हे पाहण्यासाठी उत्सुक होतो की.  म्हणून मी माझे बी पुन्हा ठिबक्यांच्या हरणांसाठी साठी पेरले, पण यावेळी, मी ते बी पेरतांना त्यावर खात्रीने घोषणा करण्याची खबरदारी घेतली. जेव्हा मी त्या पेरणीवर घोषणा करतो तेव्हा मी काय बोलतो याचे एक उदाहरण देतो. "पित्या, आज मला येशूच्या नावाने, मी हे बी पेरतांना ठिबक्यांचे हरीण मिळाले आहे अशी घोषणा करतो. मी ते मार्क 11:24 अनुसार हे पूर्ण झाले आहे असा मी दावा करतो आणि त्याबद्दल मी तुझे आभार मानतो. पवित्र आत्म्या, येशूच्या नावाने, ते ठिबक्यांचे हरीण माझ्या बंदुकीच्या अचूक निशाणेंत यावे असे होऊ दे. आमेन." इथे तुम्ही पाहू शकता, प्रार्थनेमध्ये मी खूप कलात्मक शब्दांचा वापर केला नाही, परंतु मी हरण दे किंवा ते मिळण्यासाठी विनंती करत नाही. पण मी घोषणा करत आहे, माझी याचिका जाहीर करत आहे. सैन्यात आघाडीवर असलेल्या कोणालाही दारूगोळा मागण्याची गरज नाही; ते फक्त मागणी प्रस्तुत करतात. दुसऱ्या शब्दांत, त्यांना आवश्यक असलेल्या गोष्टींसाठी आधीच कायदेशीर तरतूद करण्यात आलेली आहे, विनंती करण्याची गरज नसते, फक्त एवढेच म्हणावे लागते, "दारूगोळा द्या."

आणि मग, दुसऱ्या दिवशी सकाळी, सूर्योदया पूर्वीच मी माझ्या झाडाच्या स्टँडवर

जाऊन बसलो आणि जेंव्हा जंगलात हलका प्रकाश दिसू लागला, तेंव्हा मला एक एक हरण एकटेच माझ्याकडे येतांना दिसले. त्याच्यावर निशाणा साधण्यासाठी अजून खूप अंधार होता, पण मला ते हरण थेट माझ्या झाडाकडे येताना दिसले. हरण माझ्या झाडाजवळ येऊन थांबले आणि पुढची 15 मिनिटे ते हळूहळू माझ्या झाडाभोवती फिरू लागले. मी आश्चर्याने चकित झालो होतो. ते हरण माझ्या झाडा लगत 20 यार्ड अंतराच्या दरम्यान राहून त्याच भागात हळूहळू गोल फिरत राहिले.

जंगलात प्रकाश हळूहळू उजळत होता, आणि त्या प्रकाशात मला दिसले की त्या हरणाला शिंगे नव्हती. खरं तर, त्या हरणाच्या डोक्यावर अजिबात शिंगे दिसत नव्हती त्यामुळे ते हरणासारखे दिसत देखील नव्हते. अजूनही प्रकाश अंधूकच होता, परंतु आता ओहायोमध्ये सकाळच्या वेळी शिकार करणे कायदेशीर म्हणून मी कायद्याने त्या हरणावर गोळी मारू शकत होतो. पण जसे मी म्हणालो कि ते शिंग असलेले हरण होते की नाही हे मला कळत नव्हते, परंतु मला हे देखील माहित होते की बऱ्याच वेळा, हरणाची शिंगे लहान असली तर ती त्यांच्या केसांच्या खाली झाकून गेलेली असतात. ते हरण ज्याप्रकारे विचित्रपणे वागत होते त्यावरून मला समजून येत होते कि ते माझेच हरण असले पाहिजे, म्हणून मी निशाणा साधून गोळी मारली आणि ते हरण कोसळले. मी हरणाच्या जवळ जाताच, त्याच्या डोक्यावरील लहान शिंगे पाहून मला आनंद झाला आणि मला कळले की ते खरोखर माझे शिंग असलेले हरण होते. माझ्या लक्षात आले कि मी माझा चाकू सोबत आणायला विसरलो होतो, म्हणून मी हरणाला तिथेच सोडून चाकू आणण्या साठी घरी परतलो.

जेव्हा मी हरणाकडे परत आलो तेव्हा मी पहिले कि टिम माझ्याकडे येत आहे. त्याने विचारले की मी काही पाहिले आहे का, आणि मी त्याला सकाळच्या सर्व घटना सांगितल्या. मी मारलेले हरण ज्या ठिकाणी पडलेले होते तिकडे जात असतांना, तो म्हणाला की गेल्या तीन दिवसांत त्याला एकही हरण दिसले नव्हते. टिम मागील तीन दिवस माझ्यासोबत जात होता आणि आता जेंव्हा त्याने असे म्हटले तेंव्हा मला कळले की नेमकं काय झाल आहे. ज्या दिवशी टिम आपल्या हरणासाठी बी पेरण्यासाठी चेक घेऊन माझ्या ऑफिस मध्ये आला तेंव्हा त्याने जो चेक चर्च साठी दिला त्यावर तो नेमका कशा साठी आहे ह्याची त्या चेकवर घोषणा केली नव्हती. म्हणून मी थोडा वेळ थांबून पेरणी करतांना ती आपण

कशासाठी करत आहोत आणि त्या विषयी निश्चितपणे घोषणा करणे किती महत्वाचे आहे हे त्याला समजावून सांगितले.

त्या रात्री, टिम आणि मला कोलंबसमध्ये काही काम होते आणि घरी जाताना आम्ही चर्चजवळून जाणार होतो. टिमने विचारले की तो थांबून पुन्हा त्याचे बी पेरू शकतो का, आणि ह्या वेळी ते बी पेरताना त्याने त्यावर घोषणा केली. आम्ही माझ्या ऑफिसमध्ये बसलो असताना, तो पेरणी करत असलेले बी त्याने मला दाखवले आणि मी पाहिले की त्याने ते सहा शिंगाच्या हरणासाठी त्याने ती पेरणी केली होती. मला वाटले की ती त्याने केलेली ही फार धाडसी आणि विशिष्ट घोषणा होती.

बरं, दुसऱ्या दिवशी सकाळी, टिम त्याच झाडावर गेला जिथे मी आदल्या दिवशी जाऊन थांबलो होतो. त्यालाही माझ्या सारखाच अनुभव आला. दिवस उजाडण्यापूर्वी, एक हरण थेट झाडाकडे आले आणि पूर्ण प्रकाश होई पर्यंत त्या झाडाभोवती गोल फिरत राहिले. टिमने निशाणा साधून तीर मारला आणि त्याला वाटले की हरणाला तीर अचूक लागला आहे. पण दुर्दैवाने, हरण नजरेआड झाले आणि आम्ही दोन तास त्याचा शोध घेतला तरी आम्हाला ते सापडले नाही. आश्चर्याची गोष्ट म्हणजे, त्या दिवशी नंतर, आमच्या एका मित्राने, जो आमच्यापासून काही मैलांच्या अंतरावर राहतो, आम्हाला सांगितले की त्याचा शेजारी त्या दिवशी जेंव्हा सकाळी उठला तेंव्हा त्याला त्याच्या ड्राईव्हवे मध्ये सहा-शिंगाचे एक हरण मृतावस्थेत पडलेले आढळले. हरणाच्या शरीरात एक बाण होता. या शेजाऱ्याचे घर आमच्या जागे पासून अगदी त्याच दिशेने होते ज्या दिशेने हरण पळून गेले होते. माझ्या मित्राने आम्हाला सांगितले की त्याच्या शेजाऱ्याला हरण कोणी मारले हे माहित नव्हते, म्हणून त्याने स्वतः त्या हरणाला कापले. थोडी विचित्र गोष्ट आहे, पण त्यातून धडा शिकायला मिळाला.

**जेव्हा तुम्ही तुमचे बीज पेरता तेव्हा त्याच्याबद्दल बोला, जसे येशूने केले होते.**

तर, टिमने नवीन बी पेरले आणि पुढच्या आठवड्यात शिकारीला गेला तेंव्हा त्याला त्याचे हरण मिळाले.

## जेव्हा तुम्ही बोलता तेव्हा ते निश्चित असू द्या

मला माहित आहे की सहा-शिंगांचे हरण हे अगदी निश्चित वर्णन आहे, पण आम्हाला

हे समजू लागले होते की देवाचे राज्य हे प्रत्येक बाबतीत विशिष्ट असते! उदाहरणार्थ, निसर्गाकडे पहा.

> *कारण सृष्टीच्या निर्मितीपासून त्याच्या अदृश्य गोष्टी म्हणजे त्याचे सनातन सामर्थ्य व देवपण ही निर्मिलेल्या पदार्थांवरून ज्ञात होऊन स्पष्ट दिसत आहेत; अशासाठी की, त्यांना कसलीही सबब राहू नये.*
>
> —रोमकरांस पत्र 1:20

बायबल म्हणते की देवाचे अदृश्य गुण निसर्गात दिसतात. तर मी तुम्हाला एक प्रश्न विचारतो, "निसर्ग किती तपशीलवार आहे?" अत्यंत तपशीलवार! जर मी तुम्हाला सांगितले की मी कार खरेदी करणार आहे, तर तुमचा पुढचा प्रश्न असेल, "कोणती कार?" बरोबर? जेंव्हा मी कार म्हणतो तेव्हा तुम्ही तुमच्या मनात फक्त एक कार असा विचार करत नाही. तुम्ही विशिष्ट "कार" बद्दल विचार करता, फोर्ड किंवा चेव्ही, विशिष्ट रंगाची विशिष्ट मॉडेलची कार. कार या शब्दाने काहीही स्पष्ट होत नाही: कार म्हटले तर एक विशिष्ट कार असते. तुमच्या प्रार्थना जीवनातही तुम्ही असेच असले पाहिजे.

तुम्ही कधी कायदेशीर कागदपत्रे वाचली आहेत का? मला खात्री आहे की तुम्ही ती वाचली असतील. ती खूप तपशीलवार असतात. तर, तुम्ही तुमच्या शब्दांतून जे काही स्पष्ट करता ते अगदी तसेच असते, जरी तुम्हाला ते नको असले तरीही. येशूने कशी सेवा केली ते पहा. त्याला शब्दांचे महत्त्व माहित होते.

> *मग तो डोंगरावरून उतरल्यावर लोकांचे थवे त्याच्यामागे चालले. आणि पाहा, एक कुष्ठरोगी त्याच्याकडे आला व त्याच्या पाया पडून त्याला म्हणाला, “प्रभूजी, आपली इच्छा असली तर मला शुद्ध करण्यास आपण समर्थ आहात.” तेव्हा येशूने हात पुढे करून त्याला स्पर्श केला व म्हटले, “माझी इच्छा आहे, शुद्ध हो;” लगेच त्याचे कुष्ठ जाऊन तो शुद्ध झाला.*
>
> —मत्तय 8:1-3

ह्या ठिकाणी येशूने "शुद्ध हो!" असे म्हटल्याशिवाय काहीही घडले नाही हे लक्षात घ्या.

*मग तो पलीकडे गदरेकरांच्या देशात गेल्यावर दोन भूतग्रस्त कबरांतून निघून येत असताना त्याला भेटले; ते इतके अक्राळविक्राळ होते की त्या वाटेने कोणालाही जाणे शक्य नव्हते. तेव्हा पाहा, ते ओरडून म्हणाले, "हे येशू, देवाच्या पुत्रा, तू मध्ये का पडतोस? नेमलेल्या समयापूर्वी तू आम्हांला पिडण्यास येथे आला आहेस काय?" तेथे त्यांच्यापासून दूर अंतरावर डुकरांचा मोठा कळप चरत होता. मग ती भुते त्याला विनंती करू लागली की, "तू जर आम्हांला काढत असलास तर त्या डुकरांच्या कळपात आम्हांला पाठवून दे." त्याने त्यांना म्हटले, "जा." मग ती निघून डुकरांत शिरली; आणि पाहा, तो कळपचा कळप कड्यावरून समुद्रात धडक धावत जाऊन पाण्यात बुडून मेला.*

—मत्तय 8:28-32

कृपया लक्षात घ्या की तो दुष्ट आत्मा येशूशी बोलत होता आणि त्याच्या पासून पळून जात नव्हता! ते प्रत्यक्षात संभाषण करत होते! येशू म्हणाला, "जा!" तेव्हाच तो दुष्ट आत्मा निघून गेला. तुम्ही प्रभारी आहात, तुमच्याकडे चाव्या आहेत, पण तुम्हाला बोलावे लागेल! काहीतरी बोला. पुन्हा एकदा, हे राज्य कायद्यांचे राज्य आहे जिथे अधिकाराचा योग्य उपयोग केला गेला पाहिजे. तुमचे शब्द महत्त्वाचे आहेत!

पुढे जाण्यापूर्वी, आपण काय शिकलो ते पाहूया. जेव्हा येशूने भाकरी आणि मासे यांना आशीर्वाद दिला त्या वस्तूंचे राज्यक्षेत्र बदलले. आणि येशूप्रमाणे, तुम्ही तुमच्या बीजाला ते पेरत असतांना एक आदेश दिला पाहिजे. तुम्ही तुमचे बीज पेरल्यानंतर तुम्हाला काय पाहण्याची अपेक्षा आहे? प्रत्येक बीजाला एक चित्र जोडलेले असते. प्रत्येक वचनासोबत देखील एक चित्र असते. आपण याबद्दल नंतर बोलू, परंतु पुढील प्रश्न ज्या बद्दल मी विचार करू इच्छितो तो म्हणजे तुम्ही तुमचे बीज कुठे पेरावे.

**तुम्ही प्रभारी आहात, तुमच्याकडे चाव्या आहेत, पण तुम्हाला बोलावे लागेल!**

## तुम्ही तुमचे बी कुठे पेरावे?

सर्वप्रथम, तुम्हाला पृथ्वीच्या क्षेत्रात देवाच्या कार्यात आपले बी पेरावे लागेल. कृपया

लक्षात घ्या की तुम्ही तुमच्या सामान्य जीवनशैली अनुसार गरजूंना उदारतेने देत असता त्या प्रकारच्या देणगी बद्दल मी बोलत नाही.

> *जो दरिद्र्यावर दया करतो तो परमेश्वराला उसने देतो; त्याच्या सत्कृत्यांची फेड परमेश्वर करील.*
>
> —नीतिवचन 19:17

हे खरे आहे की जेव्हा तुम्ही उदारतेणे कुणाला तरी दान करता तेंव्हा देव तुम्हाला त्याची परतफेड करेल!

हे लक्षात ठेवा: जो काटकसरीने पेरतो तो काटकसरीने कापणी करेल आणि जो उदारतेने पेरतो तो उदारतेने कापणी करेल. तुमच्यापैकी प्रत्येकाने तुमच्या मनात जे ठरवले आहे ते द्यावे, अनिच्छेने किंवा सक्तीमुळे देऊ नये, कारण देव आनंदाने देणाऱ्यांवर प्रेम करतो. आणि देव तुम्हाला भरपूर आशीर्वाद देण्यास समर्थ आहे, जेणेकरून सर्व गोष्टींमध्ये नेहमीच, तुम्हाला आवश्यक असलेल्या सर्व गोष्टी मिळाव्यात, तुम्ही प्रत्येक चांगल्या कामात विपुल व्हाल. जसे लिहिले आहे:

त्यांनी गरिबांना त्यांच्या देणग्या मुक्तपणे दान केल्या आहेत; त्यांची नीतिमत्ता सर्वकाळ टिकते.

> *हे ध्यानात घ्या की, जो हात राखून पेरतो तो त्याच मानाने कापणी करील; आणि तो सढळ हाताने पेरतो तो त्याच मानाने कापणी करील. प्रत्येकाने आपापल्या मनात ठरवल्याप्रमाणे द्यावे; दु:खी मनाने किंवा देणे भाग पडते म्हणून देऊ नये; कारण 'संतोषाने देणारा देवाला' प्रिय असतो. सर्व प्रकारची कृपा तुमच्यावर विपुल होऊ देण्यास देव समर्थ आहे; ह्यासाठी की, तुम्हांला सर्व गोष्टींत सगळा पुरवठा नेहमी होऊन प्रत्येक चांगल्या कामासाठी सर्वकाही तुमच्याजवळ विपुल व्हावे. "तो चहूकडे वाटप करीत असतो; दरिद्र्यांस दानधर्म करीत असतो; त्याचे नीतिमत्त्व युगानुयुग राहते,"*
>
> *असे शास्त्रात लिहिले आहे.जो 'पेरणाऱ्याला बी' पुरवतो व 'खाण्याकरता अन्न' पुरवतो तो तुम्हांला बी पुरवील व ते बहुगुणित करील आणि तुमच्या नीतिमत्त्वाचे*

*फळ वाढवील.*

*म्हणजे तुम्ही सर्व प्रकारच्या औदार्यासाठी सर्व गोष्टींनी संपन्न व्हाल; त्या औदार्यावरून आमच्या द्वारे देवाचे आभारप्रदर्शन होते. ही सेवा केल्याने पवित्र जनांच्या गरजा पुरवल्या जातात; इतकेच केवळ नव्हे, तर तिच्या द्वारे देवाचे अधिकाधिक आभारप्रदर्शन झाल्याने ती सेवाही समृद्ध होते. ह्या सेवेच्या कसोटीमध्ये, तुम्ही ख्रिस्तसुवार्तेच्या पत्कराबाबत आज्ञाधारकपणा दाखवल्यामुळे आणि त्यांच्यासाठी व सर्वांसाठी दान देण्याचे तुमचे औदार्य ह्यांमुळे देवाचा गौरव होतो; आणि तुमच्यावर देवाची अपार कृपा असल्यामुळे ते तुमच्याकरता प्रार्थना करतात, व तुमच्याविषयी उत्कंठा बाळगतात. देवाच्या अवर्णनीय दानाबद्दल त्याची स्तुती होवो.*

—2 करिंथ 9:6-15

अर्थात, देव उदार व्यक्तींना प्रतिफळ देतो. पण मी ज्या प्रकारच्या देणग्यांबद्दल बोलत आहे ती लक्ष्यित देणगी आहे ज्यामध्ये लक्ष्यित पीक आहे. लक्षात ठेवा, मी ज्या प्रकारच्या देणग्यांबद्दल बोलत आहे त्यात मी माझ्या बीजाला नाव देत आहे. उदार असणे हे करुणेचे कृत्य आहे आणि मी सहसा माझ्या उदारतेला दान असे नाव देत नाही, तर मी 2 करिंथ 9 मध्ये आपण जे वाचले आहे तेच म्हणतो की देव मला उदार होण्यासाठी बीज देईल आणि मी उदार राहिल्याने तो माझी संपत्ती वाढवेल जेणेकरून मी माझे दान वाढवू शकेन.

## लक्ष्यित देणगी

मी सांगितले आहे की जेव्हा मी पेरतो तेव्हा मी ज्याला लक्ष्यित दान म्हणतो त्यात समाविष्ट असतो. पुन्हा, ह्या देण्याचे लक्ष्यित पीक असते. मार्ककृत शुभवर्तमानाच्या अध्याय 6 मध्ये येशूने हेच केले. त्याच्या समोर एक अतिशय विशिष्ट गरज होती आणि त्याला त्या अतिशय विशिष्ट गरजेसाठी विशिष्ट उत्तराची आवश्यकता होती. त्याला त्या 20,000 लोकांना खायला घालण्यासाठी अन्नाची आवश्यकता होती, आणि म्हणून त्याला ते कार्य होण्या साठी एका अतिशय विशिष्ट बीजाची आवश्यकता होती. आता त्याच्या बाबतीत, तो बीज पेरत नव्हता; तो बीज घेत होता. आणि हे तुम्हाला जे हवे ते स्वेच्छेने द्या अशा प्रकारचे बीज नव्हते. त्याला अशा व्यक्तीला शोधण्याची गरज होती जो विशिष्ट बीज

पेरेल जेणेकरून ते बीज देवाच्या हातात वाढून अधिक होईल. म्हणूनच तो म्हणाला, "जा आणि पाहा तुमच्याकडे किती भाकरी आहेत." त्यावेळी त्याला भाकरी आणि मासे हवे होते, लाकूड किंवा झगा नाही तर विशेषतः भाकरी आणि मासेच हवे होते.

जेव्हा तुम्ही पेरणी करता तेव्हा तुम्ही तुमच्या विशिष्ट गरजा पूर्ण करण्यासाठी त्याला निर्देश देत आहात याची खात्री करा. जेव्हा मला विशिष्ट गोष्टीची आवश्यकता असते, तेव्हा मी सहसा या प्रकारच्या देणग्याद्वारे कार्य करतो, मला काय हवे आहे हे स्पष्टपणे सांगतो, मी बी पेरताना त्या बीजाला नाव देतो. जेव्हा मी दान देतो तेव्हा मी सहसा चेकद्वारे किंवा ऑनलाइन देतो, म्हणून मी ते कशासाठी आहे ते प्रत्यक्षात चेकवर लिहितो. किंवा जर मी ओंलीने देत असेल तर मी त्याची नोंद करून ठेवतो, त्या देणगीसाठी दिलेले निर्देश आणि मी दिलेली तारीख आणि वेळ लक्षात ठेवतो. लक्षात ठेवा, तुम्ही जे मागितले किंवा घोषित केले आहे ते भविष्यातील कोणत्या तरी एका तारखेला मिळेल असे समजून त्याची वाट पाहू नका; पण जेव्हा तुम्ही प्रार्थना करता तेव्हाच ते तुम्हाला प्राप्त झाले आहे अशी घोषणा करा!

*म्हणून मी तुम्हांला सांगतो, तुम्ही प्रार्थना करून जे काही मागाल ते आपल्याला मिळालेच आहे असा विश्वास धरा म्हणजे ते तुम्हांला मिळेल.*

—मार्क 11:24

आता, हे लक्ष्यित दान देव पृथ्वीच्या क्षेत्रात करत असलेल्या राज्याच्या एका सेवा कार्यात पेरले जाते. सहसा ही एक अशी सेवकाई असते जिथे देवाने एखाद्या पुरुषाला किंवा स्त्रीला अशी कामगिरी दिलेली असते जिथे आर्थिक मदतीची गरज असते. पुन्हा एकदा लक्षात घ्या, हे गरीब किंवा गरजूंना मदत करण्याच्या सामान्य दाना पेक्षा वेगळे आहे, गरजूंना दान दिले देखील देवाच्या कार्यातील एक भाग आहे, आणि अशा प्रकारच्या दानाच्या प्रतिफळाबद्दल देव अगदी स्पष्टपणे सांगतो. पण आपण ह्या ठिकाणी लक्ष्यित दानाबद्दल बोलत आहोत. अर्थात, तुम्ही तुमच्या स्थानिय चर्चमध्ये या प्रकारच्या दानाचे बी पेरू शकता आणि खरं तर, तुम्ही तुमच्या लक्ष्यित दानाचा अधिकांश भाग तुमच्या स्थानिय मंडळीला दिला पाहिजे.

तुमच्या चर्चबद्दल बोलायचे झाले तर, तुमचा दशमांश तुमच्या स्थानिय चर्चमध्येच जातो. बरेच लोक आमच्या ऑनलाइन चर्चचा भाग आहेत आणि ते मला विचारतात कि

आमच्या सेवेसाठी ते दशमांश देऊ शकतात का. मी त्यांना सांगतो, "नक्कीच तुम्ही देऊ शकता." पण मी त्यांना त्यांच्या स्वतःच्या क्षेत्रात एक उत्तम चर्च शोधून त्या चर्च मध्ये नियमितपणे जाण्या साठी देखील प्रोत्साहित करतो. पण जर त्यांच्या साठी आमचे चर्च हे मुख्य चर्च असेल, तर हो, ते नक्कीच आम्हाला दशमांश देऊ शकतात. परंतु, एक पाळक ह्या नात्याने, मला माहित आहे की जेव्हा लोक चांगल्या स्थानिय चर्चचे सदस्य असतात तेव्हा ते चर्च अधिक वेगाने वाढेल आणि मजबूत होईल. पण ह्या विरुद्ध, ज्या चर्च मध्ये शंका आणि अविश्वास ह्या वर आधारित शिक्षण दिल्या जाते त्या चर्च मध्ये राहण्याची आणि आर्थिक दृष्ट्या मदत करण्याची किंवा आपले दान देण्याची तुम्हाला इच्छा देखील होणार नाही.

म्हणून, देवाच्या एखाद्या विशिष्ट सेवाकार्यात तुम्हाला सहमतीने पेरणी करायची आहे, अशा एखाद्या व्यक्तीमध्ये किंवा अशा सेवेत ज्याला विश्वास काय आहे ते समजते आणि ज्याला कराराचा किंवा सहमत होण्याचा अर्थ काय आहे ते माहित आहे. "तुम्ही बी पेरले नाही तर आमचे काम चालणार नाही" असे म्हणणाऱ्या लोकांपासून सावध रहा. असे म्हणणार्यामध्ये अजिबात विश्वास नाही. बायबलमध्ये अगदी स्पष्टपणे सांगितले आहे की कुणी तुमच्यावर जबरदस्ती करत असेल तर त्या ठिकाणी पेरणी करू नका. जर देवाची सेवा करणारा कोणताही पुरुष किंवा स्त्री तुम्हाला पेरणी न केल्या मुळे दोषी ठरवत असेल किंवा ते तुमच्यावर असे करण्यासाठी दबाव आणत असतील, तर तुम्ही तुमचे पैसे स्वतः जवळच ठेवणे चांगले. विश्वासाला कोणत्याही प्रलोभनाची गरज नाही. जर तुम्हाला पेरणी करायची असेल परंतु एखाद्या विशिष्ट ठिकाणी दान देण्याचे मार्गदर्शन नसेल, तर अशा ठिकाणी पेरणी करा ज्या ठिकाणी तुम्हाला सेवेचे परिणाम दिसून आले आहेत आणि ते देवाच्या वचनाप्रमाणे विश्वास काय आहे त्याचे शिक्षण देतात. अशा चर्चमध्ये कधीही पेरणी करू नका ज्या ठिकाणी असे शिक्षण दिले जाते की देव लोकांना शिक्षा देण्या साठी मारतो किंवा त्यांना कर्करोग देऊन जागेवर आणतो किंवा अशा प्रकारचे इतर काही मूर्खपणाचे शिक्षण देतात. परंतु अशा सेवेत पेरणी करा जी देवाचे वचन शिकवते.

आता, देणगी देताना घोषणा करायला किंवा पेरणीबद्दल आपण ते का पेरत आहे ते बोलून प्रगट करायला विसरू नका. ड्रेंडा आणि मी हे तेव्हापासून करत आहोत जेव्हा प्रभूने मला पहिल्या वर्षी माझे हरण कसे मिळवायचे हे सांगितले होते. अर्थात, या प्रकरणात मी

तुम्हाला सांगितले की मी माझ्या बीजाबद्दल कबूल केले नाही आणि ते कसे घडले हे तुम्हाला माहिती आहे. आम्ही वर्षानुवर्षे आम्ही बीज का पेरत आहोत ते सतत स्पष्टपणे बोलत राहिलो, त्याबद्दल खरोखर विचार केला नाही किंवा पेरणीचा तो एक महत्त्वाचा भाग आहे हे देखील जाणून घेतले नाही. मी असे गृहीत धरले की माझे देणे राज्याच्या अधिकारक्षेत्रात आणण्यासाठी फक्त स्वतःहून देणे आवश्यक आहे आणि ते आपल्या आपण काम करते. परंतु स्पष्ट निर्देशाशिवाय, राज्याचे लक्ष केंद्रित होत नाही, अचूक कापणी होत नाही; आणि जर तुम्हाला अचूक कापणी माहित नसेल, तर तुम्ही कापणीचा हंगाम देखील गमावाल.

हरणांच्या शिकारीतून मी बरेच धडे शिकलो आहे आणि तुमचा विश्वास कसा मोकळा करायचा यावरील हा अध्याय संपवत असताना, मला आणखी एक गोष्ट तुम्हाला सांगायची आहे.

विश्वासाने शिकार कशी करायची हे शिकल्यानंतर काही वर्षांनीच मी काही कारणास्तव ठरवले की त्या वर्षी मी बी पेरणार नाही. मी माझ्या पत्नीशी याबद्दल बोललो नाही; बंदुकीने हरणांची शिकार करण्याचा हंगाम जवळ येत होता पण मी त्यासाठी पेरणी केली नाही किंवा प्रार्थना देखील केली नाही. देवाने मला जे शिकवले होते त्या आधारावर मी गेल्या काही वर्षांत आश्चर्यकारकरित्या हरणांची कापणी केली होती आणि त्याच्या अनेक कथा माझ्याकडे आहेत, परंतु मला वाटते की ते सर्व माझ्यासाठी नवीन होते; आणि मला असे वाटले की मला हरणाची शिकार करण्या बाबत विश्वास आहे आणि त्यामुळे आता मला प्रत्येक वेळी तो विश्वास प्रगट करून बी पेरण्याची गरज नाही. आणि मग काय झाले असेल ह्याचा तुम्ही अंदाज लावू शकता.

सकाळ होत असतांना, मला वाटले की मी माझ्यापासून सुमारे 300 यार्ड अंतरावर एक हरण धावतांना पाहिले आणि बस त्यानंतर काहीही दिसले नाही. संध्याकाळची शिकारही अगदी गोंधळाचीच झाली. त्या दिवशी मी रिकाम्या हाताने घरात आलो आणि मी ड्रेंडाला सांगितले की हरणांची शिकार होऊ शकली नाही, तेव्हा ड्रेंडाची एक मैत्रीण देखील तिथे होती. मी ड्रेंडाला म्हणालो की देवाने मला माझे हरण मिळवण्याबाबत दिलेल्या सूचना मी पाळल्या नव्हत्या. ड्रेंडाने म्हटले, "तुम्ही बाहेर गेलात तेव्हा मी याबद्दल विचार करत होते." मी माझी चूक मान्य केली आणि त्यांना म्हणालो की तुम्ही माझ्या सोबत प्रार्थना कराल का. मी हरणासाठी माझे बीज म्हणून एक चेक लिहिला, त्यामध्ये मी हा हा उल्लेख केला नाही

कि मला हरण मिळावे किंवा हरिणी मिळावी. आम्ही सर्वांनी त्यावर हात ठेवले, प्रार्थना केली आणि विश्वासाने ते हरण स्वीकारले.

दुसऱ्या दिवशी, मी सकाळी बाहेर शिकारी साठी जाऊ शकलो नाही, म्हणून मी त्या संध्याकाळी जाऊ लागलो. मी पहिले कि त्याठिकाणी एक मोठे मॅपल चे झाड आहे आणि मला वाटले कि शिकार करण्या साठी त्या झाडावर चढून थांबणे योग्य राहील, आणि मी त्या झाडाकडे जाऊ लागलो. डिसेंबरची ती खूप उबदार संध्याकाळ होती आणि माझ्या आठवणी प्रमाणे, जवळजवळ तापमान 25 अंश असेल आणि वाराही जोराने वाहत होता. संध्याकाळच्या वेळेस शिकारीला जाऊन काही मिनिटेच झाली असतील , एक मोठी हरीण जंगलातून बाहेर आली आणि त्या मोठ्या मॅपल च्या झाडाच्या अगदी समोर शेतात गेली. हरीण माझ्या अगदी समोर अशा प्रकारे उभी होती, कि मला अचूक निशाणा साधता येणार होता. मी अंतराचा नेमका आढावा घेतला, आणि मला लक्षात आले की हरीण माझ्यापासून सुमारे 75 यार्ड अंतरावर आहे आणि मी बोअर 12-गेज बंदूक वापरत होतो त्या मुळे मला रेंजबद्दल फार खात्री नव्हती. पण मी काळजीपूर्वक निशाणा साधला आणि एकाच शॉट मध्ये हरीण शॉटवर कोसळले. मी तर फारच खुश होतो.  मी अंधार पडण्यापूर्वी घरी पोहोचलो त्या वेळी ड्रेंडाची मैत्रीण देखील परत आली होती; आणि आम्ही सर्वांनी मिळून देवाच्या राज्याच्या कायद्यां बद्दल देवाला धन्यवाद दिले आणि त्याच वेळी मला हे देखील लक्षात आले की मी एक धडा शिकलो आहे.

या प्रकरणात, आपण राज्याकडून प्राप्त करण्याच्या दुसऱ्या तत्वाचा आढावा घेतला आहे:

## पायरी #2: तुमचे बीज देवाच्या राज्यात मुक्त करणे

जेव्हा आपण राज्याच्या सेवकाई मध्ये आपले बीज पेरतो तेव्हा ते राज्य बदलते हे आपल्याला शिकायला मिळाले. आपण आपले बीज शब्दांनी आणि आदेश देऊन कसे मुक्त करतो याचाही आढावा घेतला. पुढे आपण ज्या मुद्दयांवर चर्चा करणार आहोत ते ह्या प्रकारे आहेत.

1. आपण पैशाला नाव देऊ शकतो.
2. आपण विशिष्ट गरजेसाठी पेरणी करू शकतो.

3. आपण दशमांशाला नाव देऊ शकत नाही.
4. दान करणे हे सूत्र नाही; ते विश्वासाने केले पाहिजे.
5. विशिष्ट दान दिल्याने विशिष्ट कापणी प्राप्त होते.

**आपण आपले बीज शब्दांनी मुक्त करतो.**

अध्याय 6

# विश्वास ही गुरुकिल्ली आहे

आम्ही आमचे चर्च सुरू केल्यानंतर काही वर्षांनी, एक दिवस मी आमच्या गाडीने घरी जात होतो आणि आमच्या जुन्या फार्महाऊसकडे जाताना मला पोलिसांच्या गाडीचे दिवे दिसले. हे काही नवीन नव्हते, कारण मला वाटले की कुणीतरी वेगाने गाडी चालवत असेल आणि त्यांनी त्याला पकडले असेल. अर्थात, मी माझी गाडी हळू केली तेव्हा मला दिसले की पोलिसांच्या गाडीसमोर एक गाडी होती जी ते हळूहळू रस्त्यावर ओढत होते. मी तिथून हळू हळू पुढे जात असताना, एका गोष्टीने माझे लक्ष वेधून घेतले. रस्त्याच्या कडेला एक सुंदर आठ शिंगे असलेले हरण पडलेले होते. मला लगेच समजले की त्या ठिकाणी नेमके काय घडले असेल. जी गाडी ते ओढून बाहेर काढत होते तिने नक्कीच या हरणाला धडक मारली असणार.

मी हरणाच्या जवळ गेलो, ते काळजीपूर्वक पाहिले आणि मग मी पोलिसांकडे जाऊन अधिकाऱ्याला विचारले की ते आता त्या हरणाचे काय करणार आहेत. माझे घर फक्त 400 यार्ड दूर होते आणि माझी मुले देखील जेवणाची वाट पाहत होती, मी त्यांना विचारले कि मला ते हरण मिळू शकेल का. कोणीतरी ते हरण घेण्यास तयार आहे हे पाहून पोलिस अधिकाऱ्याला दिलासा मिळाला. त्याने माझे नाव आणि पत्ता नोंदवला आणि मला त्या हरणाचा टॅग दिला.

आम्ही निरोप घेण्यापूर्वी, ते मला म्हणाले की रस्त्यावर नेहमीच हरण कार ला धडकत असतात आणि जर तुम्हाला अपघातात जखमी झालेली हरणं हवी असतील तर मी तुमचे नाव यादीत टाकेल आणि जर इतर कुणी ते हरण माझे आहे असा दावा केला नाही तर आम्ही तुम्हाला कॉल करू. मला ते खूप छान वाटले. शरद ऋतूची सुरुवात होती आणि मी अजून शिकार करायला गेलो नव्हतो. हे मी धनुष्य बाणाने शिकार सुरु करण्यापूर्वीची गोष्ट आहे आणि बंदुकीने शिकार करण्याचा हंगाम डिसेंबरच्या पहिल्या आठवड्यात सुरू होणार

होता, म्हणून मला वाटले की तो पर्यंत अशा प्रकारे हरणाचे मांस खायला मिळाले तर खूप चांगले होईल. ह्या घटनेनंतर, पोलिस विभागाकडून दुसऱ्या हरणाबद्दल फोन येण्यास फार वेळ लागला नाही. म्हणून बंदुकीने शिकार करण्याचा हंगाम सुरू होण्यापूर्वीच मला चार-पाच हरण मिळाली होती. मला नेमकी संख्या आठवत नाही, पण मला माहित आहे की किमान चार हरणं तर मला मिळाली होती. आणि विशेष म्हणजे बंदुकीने शिकार करण्याचा हंगाम सुरू झाला तेव्हा माझे फ्रीज आधीच भरलेले होते.

असे झाले कि, बंदुकीने शिकार करण्याच्या हंगाम सुरु झाला त्या आठवडी ड्रेंडा शहराबाहेर जाणार होती. तिला का जावे लागले ते मला आठवत नाही, पण मला माहित आहे की आम्ही आठवडाभर एकमेकांपासून दूर राहणे असामान्य होते. म्हणून मी तिच्यासोबत हरणांच्या शिकारीबद्दल प्रार्थना करू शकलो नाही आणि मी एकदा देखील बी पेरले नाही. माझा फ्रीजर हरणांच्या मांसाने भरलेला होता त्यामुळे मला हरणाची शिकार मिळाली किंवा नाही ह्याची काळजी नव्हती. तरीही मी शिकार करायला बाहेर गेलो; आणि तुम्ही अंदाज करू शकता कि काय झाले असेल. थोडक्यात सांगायचे तर, बंदुकीने शिकार करण्याच्या हंगामात मी संपूर्ण आठवडा शिकार करण्या साठी बाहेर गेलो पण मला एकही हरणाची शिकार करता आली नाही. जेव्हा ड्रेंडा घरी आली तेव्हा तिने मला आठवण करून दिली कि देवाने आम्हाला बी पेरण्याबद्दल आणि आपल्या हरणाची शिकार मिळण्यासाठी एकत्र प्रार्थना करण्याबद्दल काय शिकवले होते.

बरं, पुढचं वर्ष आलं, आणि यावेळी, मी तीच चूक करणार नव्हतो. पोलिस विभागाने आम्हाला रस्त्यावर सापडलेले हरण घेण्या बद्दल दोन वेळा फोन केला पण, मला वाटतं मी फक्त एकच घेतले कारण मी विचार करत होतो कि मला स्वतः शिकार करून बहुतेक हरणं मिळवली पाहिजेत. यावेळी, ड्रेंडा आणि मी आमचे बी पेरले आणि प्रार्थना केली आणि एका हरणासाठी आमचे बी मोकळे केले. हे करत असतांना आम्ही कोणत्या आकाराचे हरण हवे आहे त्याबद्दल स्पष्टपणे बोललो नाही, फक्त एक हरण हवे एवढेच बोललो. हंगाम सुरु झाला त्या दिवशी मी सकाळी शिकारी साठी बाहेर जाऊ शकलो नाही पण त्या संध्याकाळी बाहेर जाण्यास उत्सुक होतो. पण दुर्दैवाने, मला तुम्हाला हे सांगावे लागेल की, पुन्हा एकदा, एकही हरण आले नाही. शिकारीची वाट पाहत बसल्यानंतर संध्याकाळी घरी जाताना मी निश्चितच गोंधळलो होतो.

घरी येऊन मी जेवायला बसलो, आणि अचानक फोन वाजला. तो पोलिस विभागाचा फोन होता, ते  म्हणाले की त्यांच्याकडे रस्त्यावर अपघाताने घायाळ झालेले हरण आहे, आणि तुम्हाला हवे असेल तर ते घेऊ शकता. मी त्यांना विचारले की ते कुठे आहे आणि त्यांनी मला पत्ता दिला. मला माझ्या कानांवर विश्वासच बसत नव्हता. "तुम्ही तो पत्ता पुन्हा सांगू शकाल का?" मी विचारले. तिने पत्ता पुन्हा सांगितला आणि तो तर माझाच पत्ता होता! मला धक्काच बसला. म्हणून मी खिडकीजवळ गेलो आणि माझ्या ड्राईव्हवे वर पोलिसांची गाडी उभी होती आणि गाडीचे लाल दिवे चमकत होते, म्हणून मी त्यांना म्हणालो  की मी त्यांच्या कडेच येत आहे. आमचा ड्राईव्हवे रस्त्यापासून जवळपास  900 फुट अंतरावर होता आणि मला आठवते की तिकडे जात असतांना मला त्या गोष्टीवर विश्वास होत नव्हता. जेव्हा मी हरणाकडे पोहोचलो तेव्हा ते एक खूप मोठे बटण  बक होते आणि अगदी उत्तम स्थितीत होते. मी काही फॉर्म भरले, अधिकाऱ्याचे आभार मानले आणि नंतर हरणाला ड्राईव्हवेवरून शेताकडे घेऊन गेलो. मी गोंधळलेला होतो का? होय, खूपच! पुढच्या वर्षी सप्टेंबर किंवा ऑक्टोबरपर्यंत मी हरणांची शिकार करण्या बद्दल विचार केला नाही.

## तुमचे स्रोत काय आहे?

मला आता आठवत नाही की तो महिना कोणता होता, पण मी व्यायामासाठी माझ्या घराच्या मागच्या मैदानात धावत होतो, असे मी कधी कधी करत असे. धावत असतांना, गेल्या दोन वर्षात काय घडले याबद्दल मी प्रार्थना करत होतो. मला काहीच कळत नव्हते. धावत असताना अचानक, "पोलिसांची यादी" हे शब्द माझ्या कानावर अगदी स्पष्टपणे आले. मी क्षणभर विचार केला. देव मला काही सांगण्याचा प्रयत्न करत आहे का? मग मला ते दिसले. मला जाणवले की माझा विश्वास देवाच्या वचनावर किंवा त्याच्या राज्यावर नाही. माझा विश्वास पोलिसांच्या यादीत माझे नाव आहे त्यावर होता! मला माहित होते की जर मला माझे स्वतःचे हरण मिळाले नाही तर पोलिस खात्याच्या यादीत माझे नाव आहेच ते मला हरण देतीलच.

मग माझ्या लक्षात हे देखील आले की गेल्या वर्षी मला मी स्वतः शिकार करण्या ऐवजी माझ्या ड्राईव्हवे वर हरण का मिळाले. खरोखरच पोलिसांच्या यादीत माझे नाव आहे यावर माझा विश्वास होता. जेव्हा मी आणि ड्रेंडाने त्या वर्षीच्या हरणासाठी पेरणी केली होती, तेव्हा

त्या वर्षाचे पहिले हरण अगदी वेळेवर आले पण चुकीच्या ठिकाणावरून, हे असेच होते का? पवित्र आत्म्याने मला हे स्पष्ट केले तेव्हा मी आश्चर्याने तिथेच उभा राहिलो. मग मला समजले की हरण मिळण्या साठी माझा विश्वास ज्या ठिकाणी, अर्थात पोलिसांच्या यादीत माझे नाव आहे ह्या वर होता, अगदी त्याच ठिकाणी मला माझे हरण मिळाले. हे लक्षात येताच मी धावत थेट घरी गेलो, ताबडतोब पोलिस विभागाला फोन केला आणि त्यांच्या यादीतून माझे नाव काढून टाकले. मला कळले की तुमचा बॅकअप प्लॅन हाच तुमचा खरा प्लॅन आहे! त्या वर्षापासून, असे कधीही झाले नाही कि मी शिकार करायला गेलो आणि मला माझे हरण मिळाले नाही.

पण आपली अंतःकरणे किती फसवी आहेत. आपला विश्वास नैसर्गिक गोष्टींकडे सहजपणे वळतो. ही अशी गोष्ट आहे ज्याबद्दल आपल्याला जागरूक राहण्याची आणि सतत लक्ष ठेवण्याची आवश्यकता आहे. विश्वासाला बॅकअप प्लॅनची आवश्यकता नसते. मला अजूनही आश्चर्य वाटते की माझा विश्वास खरोखर पोलिसांच्या यादीत माझे नाव आहे यावर होता, त्यामुळे त्या दिवशी माझ्या ड्राईव्हवे वर मला त्यांच्याकडून ते हरण मिळाले. आणि यामुळे देवाने मला दाखवलेला तिसरा सिद्धांत समोर येतो.

## पायरी #3: जेव्हा तुम्ही विश्वासात आहात तेव्हा तुमचे बीज मोकळे करा!

हा एक मोठा प्रश्न आहे, जसे आपण आधी पाहिले होते कि, जेव्हा शिष्य दुष्ट आत्म्याने ग्रस्त मुलामधून दुष्ट आत्म्याला काढू शकले नाहीत. तेंव्हा येशू म्हणाला की हे त्यांच्या अविश्वासामुळे किंवा विश्वासाच्या अभावामुळे होते. विश्वास म्हणजे काय आणि विश्वास कसा मिळवायचा हे समजून घेण्याबद्दल आपण आधीच स्पष्टपणे पाहिले आहे, परंतु तुम्ही विश्वासात आहात की नाही ह्या विषयी स्वतःचे मूल्यांकन करायला शिकणे अत्यंत महत्त्वाचे आहे. तर मी तुम्हाला एक सोपी चाचणी देतो जी तुम्ही स्वतः देऊ शकता हे पाहण्यासाठी की तुम्ही खरोखर विश्वासात आहात की नाही . डोळे बंद करा, आणि तुम्हाला काय दिसते?

> *विश्वास हा आशा धरलेल्या गोष्टींविषयीचा भरवसा आणि न दिसणाऱ्या गोष्टींबद्दलची खातरी आहे.*
>
> —इब्रिकरांस पत्र 11:1 (KJV)

विश्वास हा आशा धरलेल्या गोष्टींविषयीचा भरवसा आहे. आशेसोबत नेहमीच एक चित्र असते. जर मी तुम्हाला आईस्क्रीम कोन देण्याचे वचन दिले तर तुमच्या मनात लगेच आईस्क्रीम कोनचे चित्र येईल. जर तुम्हाला असे वाटते की मी जे म्हणत आहे ते पूर्ण करण्या विषयी प्रामाणिक आहे आणि त्या साठी पैसे खर्च करण्याची माझी क्षमता आहे, तर तुम्हाला तुमच्या हातात आईस्क्रिम चा कोण दिसू लागेल, आणि त्या कल्पना चित्रात तुम्ही स्वतःला अगदी आनंदी आणि उत्साही असे पाहाल.

देवाच्या वचनाबाबतही हेच खरे आहे. जेव्हा तुम्ही देवाच्या वचनावर विश्वास ठेवता आणि देवाकडे त्याचे वचन पूर्ण करण्याचा हेतू आणि साधन आहे याची तुम्हाला पूर्ण खात्री असते, तेव्हा तुम्हाला त्या वचनासोबत स्वतःचे चित्र दिसेल. जरी तुमच्याकडे त्या क्षणी वचन दिलेली वस्तू नसली तरी, तुम्ही असे वागाल जसे काही ती वस्तू तुम्हाला मिळालेलीच आहे, कारण खरे पहिले तर ती वास्तविकरीत्या तुम्हाला प्राप्त झालीच आहे. वचन खरे आहे, हेतू खरा आहे आणि ते तुमचे झाले आहे. म्हणून विश्वास हा आशा धरलेल्या गोष्टींविषयीचा भरवसा आणि न दिसणाऱ्या गोष्टींबद्दलची खातरी आहे. ते अद्याप न दिसणाऱ्या गोष्टींचा पुरावा देखील आहे.

**जेव्हा तुम्ही देवाच्या वचनावर विश्वास ठेवता आणि देवाकडे त्याचे वचन पूर्ण करण्याचा हेतू आणि साधन आहे याची पूर्ण खात्री असते, तेव्हा तुम्हाला ते वचन तुमच्या मध्ये पूर्ण होत असतानाचे चित्र दिसेल.**

तुमच्या कडे चेक असला तरी तुम्हाला बँकेत जाऊन त्या चेक ची रोख रक्कम घ्यावी लागेल, ही एक कायदेशीर प्रक्रिया आहे जी नैसर्गिक जगात लागू होते तशीच आध्यात्मिक क्षेत्रात देखील लागू होते. म्हणून जेव्हा मी म्हणतो, "डोळे बंद करा. तुम्हाला काय दिसते ते पहा?" तेव्हा माझ्या म्हणण्याचा अर्थ हा आहे कि. जर तुम्हाला जे हवे आहे ते तुम्ही पाहू शकत नसाल, तर तुम्हाला ते प्राप्त होणारच नाही. मी हे एका अगदी सोप्या शब्दात समजावून सांगतो. जर तुम्ही डोळे बंद केले आणि तुम्ही स्वतःला त्या अभिवाचना सोबत पाहू शकत नसाल, तर तुम्ही विश्वासात नाही. जर तुम्ही आजारी असाल आणि डोळे बंद केल्यावर तुम्ही स्वतःला बरे झालेले पाहता - म्हणजे तुमच्या मनात बरे होण्या विषयी कोणतीही भीती

नसते, परंतु तुम्ही बरे झाला आहात याची पूर्ण खात्री आहे - तेंव्हा तो विश्वास आहे. पण जर तुम्ही डोळे बंद केले आणि तुम्हाला असे दिसते कि तुम्ही अजूनही आजारी आहात, बरे होण्याची वाट पाहत आहात, तर तुम्ही विश्वासात नाही. जर तुम्हाला पैशाची गरज असेल आणि तुम्ही देवाच्या वचनावर विश्वास ठेवता, तर तुम्ही आता पैशाबद्दल चिंता करत नाही परंतु तुम्हाला आवश्यक असलेली तरतूद पूर्ण होत असलेली दिसते.

भीती ही विश्वासाच्या विरुद्ध आहे

या प्रकारच्या आत्मविश्वासा मध्ये भीती अस्तित्वात नसते. जर तुम्हाला अजूनही परिणामांबद्दल चिंता वाटत असेल, तर तुम्ही विश्वासात नाही. विश्वासाच्या बाबतीत, तुम्ही विश्वासात आहात की नाही हे कसे ओळखावे हे तुम्हाला माहित असणे आवश्यक आहे. जर तुम्ही विश्वासात नसाल तर तुम्हाला मोठे निर्णय घेण्याची इच्छा होत नाही, कारण जर तुम्ही विश्वासात नसाल तर तुमच्या मध्ये भीती आहे. भीती नेहमीच अविश्वास आहे. म्हणूनच मी म्हटले आहे की जेव्हा तुम्ही विश्वासात असता तेव्हा तुमचे बी पेरा. तुम्ही केवळ एक नियम म्हणून बी पेरू शकत नाही, असे करणे म्हणजे केवळ नियमाची अंमलबजावणी करणे आहे, त्यातून काहीही निष्पन्न निघणार नाही. देव काय म्हणतो यावर तुम्हाला विश्वास ठेवणे गरजेचे आहे असे केल्याने जेव्हा तुम्ही डोळे बंद करता तेव्हा तुम्हाला फक्त तुम्ही आणि ते वचन दिसेल. तुमच्याकडे ते आधीच आहे, तुम्हाला ते प्राप्त झाले आहे, ते तुमचे आहे आणि तुमच्या चिंता जाऊन त्यांची जागा शांतीने घेतली आहे.

> *कशाविषयीही चिंताक्रांत होऊ नका, तर सर्व गोष्टींविषयी प्रार्थना व विनंती करून आभारप्रदर्शनासह आपली मागणी देवाला कळवा. म्हणजे सर्व बुद्धिसामर्थ्याच्या पलीकडे असलेली देवाने दिलेली शांती तुमची अंतःकरणे व तुमचे विचार ख्रिस्त येशूच्या ठायी राखील.*
>
> —फिलिप्पैकरांस पत्र 4:6-7

जेव्हा तुम्ही विश्वासात असता तेव्हा जी शांती असते ती परिस्थितीवर आधारित नसते तर वचनावर आधारित असते.

पुढे, विश्वासाचा पुरावा म्हणजे आध्यात्मिक न्यायालयात स्वतःचा बचाव करण्याची तुमची क्षमता. विश्वासाचा आधार देवाच्या वचनावर असल्याने, तुम्ही जे मानता ते तुम्ही

का मानता हे तुम्हाला माहित असले पाहिजे. तुम्ही न्यायालयात आहात आणि तुम्ही बचाव पक्षाचे वकील आहात असे भासवा. विरोधी पक्षाचा वकील असे म्हणत आहे की तुमचा क्लायंट त्यांच्या क्लायंटच्या घरात बेकायदेशीरपणे राहत आहे आणि ते घर प्रत्यक्षात तुमच्या क्लायंटचे नाही तर त्यांच्या क्लायंटच्या मालकीचे आहे. तुम्ही काय कराल? तुम्ही म्हणाल, माफ करा आणि माझा क्लायंट ताबडतोब मालमत्ता रिकामी करेल? जर तुमच्याकडे त्या घरात राहण्याचे स्वाक्षरी केलेले कागदपत्र असतील तर भीतीची जागा आत्मविश्वासाने घेतली जाईल आणि तुम्ही न्यायाधीशांना त्या ढोंगी लोकांना कोर्टरूममधून बाहेर फेकून देण्यास सांगाल. विश्वासाचे कार्य असेच आहे. ते सत्य जाणते, आत्मविश्वासू असते आणि त्या मध्ये दृढता असते त्या मुळे असे वाटते कि अहंकारी आहे. तर तुम्ही तुमच्या भूमिकेचे रक्षण करू शकता का?

सारा ह्या शहरात नवीन होती आणि एके दिवशी आपल्या गाडीतून फिरत असतांना आमच्या चर्चमध्ये आली. तिची आणि तिच्या पतीची कोलंबसला बदली झाली होती आणि ते एक चांगले चर्च मिळावे ह्या साठी प्रार्थना करत होते. गाडीने आमच्या भागात आले तेंव्हा, ते आमच्या ड्राईव्हवे कडे वळले आणि त्यांना वाटले की एकदा ह्या चर्चला देखील जाऊन पाहू या. आणि त्यानंतर ते कधीही आमच्या चर्च मधून निघून गेले नाहीत. सारा आयुष्यभर दम्याचा त्रास सहन करात आली होती. लहानपणा पासून सतत  हॉस्पिटलमध्ये भरती व्हावे लागत होते, ती ह्या आजाराने अगदी त्रस्त झाली होती. हळू हळू ती दमा वाढण्यास कारणीभूत असणाऱ्या वातावरणांपासून कसे दूर राहायचे हे शिकली आणि  प्रत्येक वेळेस न चुकता आपला इनहेलर जवळ ठेवायची.

फेथ लाईफ चर्चमध्ये, तिला कळले की बरे होणे आणि आध्यात्मिकरित्या स्वतःचे रक्षण कसे करावे हे शिकणे हा तिचा कायदेशीर अधिकार आहे. एका सभेत तीने आमच्या एका सदस्याची साक्ष ऐकली कि जीवघेण्या आजारापासून ते कसे बरे झाले, आणि त्याच क्षणी तिने तिचा निर्णय घेतला. देवाला पक्षपात करत नाही. तिने तिच्या पर्समधून तिचा इनहेलर बाहेर काढला आणि त्या जागी तिच्या बरे होण्याच्या कायदेशीर अधिकाराचे अभिवचन देणाऱ्या शास्त्रवचनांचे कार्ड ठेवले. ती दररोज ते वाचत असे. जेव्हा जेव्हा तिला दम्याचा झटका येत आहे असे वाटायचे तेव्हा तेंव्हा ती तिच्या इनहेलरऐवजी शास्त्रवचनांचे कार्ड पर्स मधून काढून वाचायची, आणि त्यानंतर तिला पुन्हा कधीही दम्याचा झटका आला नाही!

एकदा आम्ही संपूर्ण कुटुंब एकत्र जमलेले असतांना माझी मावशी माझ्या कडे येऊन म्हणाली. माझ्या साठी प्रार्थना कर, कारण तिला फुफ्फुसाचा कर्करोग होता आणि दीड आठवड्यात एक मोठी गाठ काढून टाकण्यासाठी शस्त्रक्रिया करावी लागणार होती. तिने मला पुढे सांगितले की तिचे डॉक्टर दीड वर्षापासून तिच्या फुफ्फुसात असलेल्या द्राक्षाच्या आकाराच्या गाठीचा उपचार करत होते. आणि आता ती गाठ अचानक अधिक वेगाने वाढू लागली होती आणि डॉक्टरांनी सांगितले की ती गाठ काढून टाकणे आवश्यक होते. तिचे सर्व बोलणे ऐकत असतांना मी विचार करत होतो कि तिचे आयुष्य कशा प्रकारचे होते. ती आयुष्यभर चेन स्मोकर होती आणि मला माहित होते की ती अनेक वर्षांपासून चर्चमध्ये गेली नव्हती. मी तिला आश्वासन दिले की मी तिच्यासाठी खरोखर प्रार्थना करेन पण मला वाटले की ती त्या क्षणी प्रार्थनेसाठी तयार नाही. मी तिला म्हणालो की मी तिच्या साठी प्रार्थना करण्यापूर्वी बरे होण्या बद्दल जे साहित्य आमच्या कडे आहे ते तिने वाचावे. आणि ते साहित्य वाचल्या नंतर  येत्या रविवारी सकाळी उपासना संपल्या नंतर लगेच मी तिच्यासाठी प्रार्थना करेन. तिने तसे करण्यास होकार दिला.

मला माहित होते की तिने अनेक वर्षां पूर्वी तिचे हृदय प्रभूला दिले होते पण ती ख्रिस्तासाठी जीवन जंगली नव्हती. मला आशा होती की देवाच्या बरे होण्याची अभिवचने वाचून  त्यावर विचार करत असतांना तिचा विश्वास वाढेल. मला हे देखील माहित होते की जर आपण देवाच्या वचनाला आधार मानून ज्या आशेवर आपण विश्वास ठेवतो त्याच्याशी सहमत होऊन प्रार्थना केली तर सकारात्मक परिणाम मिळण्याची शक्यता जास्त आहे.

तर पुढच्या रविवारी, माझी मावशी तिने वचन दिल्या प्रमाणे चर्चमध्ये आली. उपासना संपल्या नंतर, मी तिला पुढे येण्यास सांगितले; आणि ती पुढे येऊन उभी राहिली, मी तिला विचारले की तिने मी दिलेले साहित्य वाचले आहे का. ती म्हणाली की तिने ते वाचले आहे, म्हणून मी तिला विचारले, "मी तुझ्यावर हात ठेऊन प्रार्थना केल्यावर तू बरी होशील हे तुला कसे कळेल?" त्यावर तिने अनेक शास्त्रवचने बोलून दाखविली आणि म्हणाली की तिचा विश्वास देवाच्या वचनावर आहे. तिचे ते बोलणे ऐकल्या नंतर मला समजले की त्या क्षणी ती प्रार्थनेसाठी तयार आहे, आणि मी तिच्यावर माझे हात ठेवले, प्रार्थना केली आणि घोषित केले की ती बरी झाली आहे आणि कर्करोगापासून मुक्त झाली आहे. मी प्रार्थना

करत असताना देवाचा अभिषेक तिच्यावर झाला आणि ती देवाच्या सामर्थ्याने जमिनीवर कोसळली. ती जेंव्हा उठली, तेंव्हा ती थरथर कापत होती आणि ती आनंदाने ओरडून म्हणत होती, "मी बरी झाले आहे!"

त्या मंगळवारी तिची ट्यूमर काढण्यासाठी शस्त्रक्रिया करण्यात आली, पण जेव्हा तिला ऑपेरेशन साठी आत घेण्यात आले तेंव्हा त्यांना त्या ठिकाणी काहीच नाही. त्या ठिकाणी ट्यूमर नव्हते, ट्युमर असल्याचा अगदी एकही व्रण नव्हता किंवा तिथे कधीही काहीही असल्याचे चिन्ह देखील नव्हते.

लोकांना आपले जीवन केवळ जगायचे म्हणून जगताना पाहणे खूप विचित्र आहे. तुम्हाला वाटत असेल की देवाने माझ्या मावशीला बरे केले म्हणून ती देवाची फार आभारी असेल आणि त्यानंतर तिने आयुष्यभर एकदा ही चर्च ला जाणे चुकवले नसेल. पण खरे तर ती बरी झाली त्या रविवार नंतर मी तिला फक्त एकदाच चर्चला आलेले पहिले. सहा सात वर्षां नंतर तिचे निधन एका वेगळ्या कर्करोगाने झाले. पण ह्या वेळी तिने मला तिच्या साठी प्रार्थना करायला सांगितले नाही.

### तुम्ही विश्वास मोकळा करता त्या क्षणाला धरून राहा

मी लोकांना एक गोष्ट आठवण करून देतो ती म्हणजे "आमेन" आणि "ते प्राप्त झाले आहे" याच्यामध्ये नेहमीच वेळ जात असतो. त्यामुळे, जेंव्हा आपण आपला विश्वास मोकळा करतो, किंवा ज्या साठी प्रार्थना केली आहे ते मिळणारच असा विश्वास धरतो त्या क्षणाला दृढतेने धरून राहणे अत्यंत महत्त्वाचे आहे. मी असे म्हणेन तुम्हाला ह्याची आठवण राहावी म्हणून तुम्ही हे तुमच्या डायरीत किंवा एका कागदावर लिहून ठेवावे. मी ह्या विषयी ह्या आधी देखील सांगितले होते, परंतु मला वाटते की हे खूप महत्वाचे आहे. आपण नेमके काय लिहिले पाहिजे याचे एक उदाहरण खालीलप्रमाणे आहे. "12 नोव्हेंबर रोजी दुपारी

**"आमेन" आणि "ते प्राप्त झाले आहे" याच्यामध्ये नेहमीच वेळ जात असतो. त्यामुळे, जेंव्हा आपण आपला विश्वास मोकळा करतो, त्या क्षणाला दृढतेने धरून राहणे अत्यंत महत्त्वाचे आहे.**

1:30 वाजता, मी दृढपणे विश्वास करतो की मला मार्क 11:24 नुसार मी प्रार्थना केल्या नंतर (विशिष्ट विनंती घाला) मला प्राप्त झाले आहे."  ह्या मध्ये तुम्ही आणखी हे देखील लिहू शकता कि ह्या प्रार्थने मध्ये तुमच्या सोबत कोण सहमत होते, तुम्ही किती रकम बी म्हणून पेरले आणि तुम्ही ते देवाच्या कोणत्या कार्यासाठी पेरले. हे फक्त एक उदाहरण आहे, परंतु ते लिहून ठेवणे महत्वाचे आहे कारण तुम्ही ही तथ्ये घेऊन प्रार्थनेत लढू शकता.

जेव्हा परिस्थिती तुम्हाला भीतीने मागे हटण्यास भाग पाडते, तेव्हा तुम्ही स्वतःला तुमचे उत्तर मिळालेल्या तारखेची आणि वेळेची आठवण करून देऊ शकता. जेव्हा भीती तुमच्या मनात डोके वर करण्याचा प्रयत्न करेल, तेव्हा तुम्ही ती चिठ्ठी काढून ती घोषणा मोठ्याने वाचून आपला विश्वास पुन्हा दृढ करू शकता. "नाही, भिती, तू खोटी आहेस. मला माझ्या प्रार्थनेचे उत्तर या तारखेला आणि ह्या वेळी मिळाले आहे (आणि हे बोलत असतांना तुम्ही पवित्र शास्त्रातील ज्या वचनावर विश्वास आधारित केला आहे ते वचन देखील बोला.)" कधीकधी माझे हृदय शांत ठेवण्यासाठी मला ती चिठ्ठी अनेक वेळा वाचावी लागायची. अपयश दाखविणारी कोणती ही परिस्थिती तुम्हाला तुमचा विश्वास सोडून देण्यास कारण ठरू देऊ नका. खरं तर, माझी मुले मोठी होत असताना हे तत्व इतके महत्त्वाचे होते की आमच्या आठवड्याच्या कौटुंबिक प्रार्थनेत आमच्याकडे एक कौटुंबिक जर्नल असायचे जिथे आम्ही काय प्रार्थना केली होती आणि आम्हाला काय मिळाले आहे असे आम्हाला वाटत होते ते लिहायचो. आम्ही याला आमची याकोब 4 नोटबुक म्हणत असायचो. खरं तर, जर हे नोटबुक तुम्हाला हवे असेल तर आम्ही ते आमच्या सेवकाई द्वारा विकतो तुम्ही ते प्राप्त करू शकता.

कधीकधी, आत्म्यात अशा काही गोष्टी घडत असतात ज्या तुम्हाला माहिती नसतात. देव सर्वकाही व्यवस्थित करण्यासाठी काम करत आहे, परंतु त्यासाठी वेळ लागू शकतो. या कोड्यात अनेक तुकडे असू शकतात जे जागेवर ठेवावे लागतील. उदाहरणार्थ, जर देवाला आर्थिक गरज पूर्ण करायची असेल, तर त्याला त्या संबंधी कार्य पूर्ण करण्यासाठी एखाद्याशी बोलावे लागेल किंवा तुम्हाला आवश्यक असलेले पैसे मिळवण्याची संधी द्यावी लागेल. मी पुन्हा म्हणेल कि, या सर्व गोष्टींना वेळ लागतो.

*तो मला म्हणाला, "दानिएला, भिऊ नकोस; कारण ज्या दिवशी तू समज*

*घेण्याचा, व आपल्या देवापुढे नम्र होण्याचा निश्चय केलास त्याच दिवशी तुझे शब्द ऐकण्यात आले; त्या तुझ्या शब्दांवरून मी आलो आहे. पारसाच्या राज्याचा अधिपती एकवीस दिवस मला आडवा आला; तेव्हा पाहा, मुख्य अधिपतींपैकी एक, मीखाएल, माझ्या साहाय्यास आला; व मी पारसाच्या राजांजवळ राहिलो. आता ह्या शेवटच्या दिवसांत तुझ्या लोकांचे काय होणार हे तुला कळवण्यास मी आलो आहे; कारण दृष्टान्ताची परिपूर्ती होण्यास बराच अवधी आहे."*

—दानीएल 10:12-14

मी तुम्हाला ह्या पूर्वी कॅम्पसच्या विकत घेण्याची घटना सांगितली होती, त्यावर पुन्हा एकदा नजर टाकूया. आम्ही विकत घेण्यासाठी अनेक इमारती पाहिल्या होत्या आणि त्यापैकी अनेक इमारती भाड्याने घेण्याचा विचार देखील केला होता पण आत्म्या मध्ये आम्हाला प्रेरणा होत नव्हती कि त्या पैकी एकही इमारत आम्ही घ्यावी. जेव्हा आम्ही कॅम्पस साठी जागा शोधण्याचा निर्णय घेतला तेंव्हा आम्ही देवाला विनंती केली कि त्याने आम्हाला एक परिपूर्ण जागा दाखवावी, आणि त्या साठी आम्ही विश्वासाने बीज पेरले. प्रत्येक वेळी जेव्हा आम्हाला एखादे ठिकाण सापडले आणि आम्ही ते भाड्याने घेण्याविषयी विचार करू लागलो तेंव्हा आम्हाला आत्म्यात पूर्ण शांती जाणवत नव्हती आणि त्यामुळे आम्ही जवळजवळ निराश झालो होतो. ज्या भागात आम्हाला कॅम्पस उभारायचा होता त्या परिसरातील प्रत्येक इमारतीची आम्ही तपासणी केली, परंतु आम्हाला ज्या प्रकारची इमारत हवी होती तश्या प्रकारच्या इमारतीचे कोणतेही पर्याय उपलब्ध नव्हते.

चर्च म्हणून आमची जी मुख्य मूल्ये आणि तत्वे आहेत त्यामध्ये मुलांना योग्य शिक्षण देणे आणि कुटुंबांची काळजी घेण्यास मदत करण्याची तीव्र इच्छा समाविष्ट आहे. आम्ही अनेकदा ह्या वर चर्चा केली आहे की आमच्याकडे कधीतरी शाळा, डे केअर सेंटर, लॅचकी प्रोग्राम आणि आपल्या समुदायांची सेवा करण्यासाठी अनेक कार्यक्रम असतील. आमच्या कडे सध्या जी जागा आहे ती लहान पडू लागली आहे, त्यामुळे आमची इच्छा असूनही आम्ही यापैकी कोणतेही कार्यक्रम राबवू शकत नाही.

तुम्ही कदाचित म्हणाल कि राज्य आपले कार्य करत नाही असे वाटते, परंतु तुम्ही हे लक्षात ठेवले पाहिजे की आम्ही आधीच आम्हाला नेमके जे हवे होते त्या प्रकारच्या कॅम्पससाठी पेरणी केली होती. खरी परिस्थिती अशी होती की देवाला माहित होते की

आम्ही जी शाळा विकत घेण्याचा प्रयत्न करत होतो ती जप्त केली जाणार आहे. त्याने आम्हाला जे दिसत नव्हते ते मोठे चित्र पाहिले होते. आम्ही सुरुवातीला जेंव्हा जागा शोधायला सुरुवात केली तेव्हा ती जागा उपलब्ध नव्हती.

शाळा आमच्या कॅम्पस साठी उत्तम जागा असेल हे त्याला माहित होते, पण त्या व्यतिरिक्त, त्याला हे देखील माहित होते की ती जागा विकत घेण्यासाठी आम्हाला पैसे कुठून उपलब्ध होणार आहेत. ज्या जोडप्याने आमच्यासाठी कॅम्पस खरेदी केले त्यांच्या सोबत जेवणासाठी बाहेर जाण्याची तारीख किमान चार वेळा बदलली गेली होती. आम्हा दोघांच्याही काही अडचणी आल्या त्यामुळे आम्हाला प्रत्येक वेळी तारीख बदलावी लागली. आणि ज्या दिवशी आम्ही शेवटी जेवणासाठी एकत्र आलो त्याच दिवशी सकाळी आम्हाला ही जागा सापडली होती.

शाळेची इमारत खरेदी करण्या साठी इतरही अनेक लोक इच्छूक होते, पण आम्ही सर्वात आधी बोली लावली. सगळं काही योग्यप्रकारे नियोजित झालेले होते. आमच्या मित्रांसोबत जेवणा साठी भेटण्याच्या दोन दिवस आधी पवित्र आत्म्याच्या सूचनेनुसार आम्ही $100,000 चे बी पेरले होते, माझा विश्वास आहे कि सैतान ती शाळा आमच्या पासून लपवून ठेवण्याचा प्रयत्न करणार होता किंवा इतर काही युक्तीचा आम्ही त्या शाळेपर्यंत पोहचू नये असा प्रयत्न करणार होता. पण जेव्हा देवाने मला ते पैसे बीज म्हणून पेरायला आणि सैतानाला आमच्या कॅम्पस शोधण्यात हस्तक्षेप करू नये म्हणून धमकावण्यास सांगितले, तेव्हा त्याची हस्तक्षेप करण्याची योजना तिथेच थांबली.

शाळेची ही इमारत खरेदी करण्या साठी आम्हाला आर्थिक मदत करणारे पती पत्नी देखील आपल्या एका मित्राला काही प्रॉपर्टी खरेदी करण्यासाठी मदत करावी किंवा नाही हा निर्णय घेण्या बद्दल विचार करत होते, आणि त्यांच्या मनात त्याविषयी द्वंद्व सुरु होते, कारण त्यामुळे त्यांच्या कडे उपलब्ध असलेली रक्कम पूर्णपणे त्याच कामासाठी वापरली जाणार होती. त्या रात्री आमची कहाणी ऐकल्यानंतर ते म्हणाले की आता त्यांना समजले की त्यांच्या दुसऱ्या मित्राला प्रॉपर्टी खरेदीसाठी पैसे देण्यास त्यांना का शांती मिळत नव्हती. म्हणून एक गोष्ट लक्षात ठेवा, जेव्हा तुम्ही विश्वासाने प्रार्थना करता, आणि ती प्रार्थना करत असतांना तुम्हाला तुमचे उत्तर मिळाले आहे तेंव्हा, त्या "आमेन" आणि "वास्तविकरीत्या प्राप्त झाले आहे" या मध्ये एक वेळ जात असतो. म्हणून खंबीर राहा आणि धीर धरा.

## विश्वासात दृढ राहा

*आणि धीराला आपले कार्य पूर्ण करू द्या, ह्यासाठी की, तुम्ही कशातही उणे न होता तुम्हांला अखंड परिपूर्णता प्राप्त व्हावी.*

—याकोब 1:4 (KJV)

म्हणूनच मी लोकांना सल्ला देतो की त्यांनी मागणी केलेल्या गोष्टी बद्दल विश्वास कधी आणि कोणत्या तारखेला आणि कोणत्या वेळी व्यक्त केला आहे हे लक्षात ठेवावे, कारण तुम्हाला त्या विश्वासात दृढ राहण्याची आवश्यकता आहे.

जेव्हा माझ्या मुलीच्या पोटात 6 किलो वजनाचा ट्यूमर होता, तेव्हा तिला त्यामुळे आरोग्यासंबंधी होणाऱ्या समस्या सहन करून कंटाळा आला: तिच्या मूत्रपिंडात सतत संसर्ग होत असे, सतत पाठदुखी आणि पचनाच्या समस्यांना तोंड द्यावे लागत होते. तिने ठरवले की आता बस पुरे झाले आणि तिने 30 दिवस पर्यंत देवाच्या वचनावर आणि बरे होण्याबद्दलच्या देवाच्या वचनांवर मनन करण्यासाठी घालवण्याचा निर्णय घेतला. मननाचे हे दिवस पूर्ण झाल्या नंतर, तिने तिच्या आईला आणि मला तिच्या डोक्यावर हात ठेऊन प्रार्थना करायला सांगितले कारण आता तिला विश्वास होता की ती बरी झाली आहे. म्हणून आमच्या चर्चच्या वडिलांनी, तिच्या आईने आणि मी तिच्या डोक्यावर हात ठेवले आणि विश्वास ठेवला की ती याकोब 5:14-16 अनुसार बरी झाली आहे.

*तुमच्यापैकी कोणी दुखणाईत आहे काय? त्याने मंडळीच्या वडिलांना बोलवावे आणि त्यांनी प्रभूच्या नावाने त्याला तेल लावावे व त्याच्यावर ओणवून प्रार्थना करावी. विश्वासाची प्रार्थना दुखणाइताला वाचवील आणि प्रभू त्याला उठवील आणि त्याने पापे केली असतील तर त्याला क्षमा होईल. तेव्हा तुम्ही निरोगी व्हावे म्हणून आपली पातके एकमेकांजवळ कबूल करून एकमेकांसाठी प्रार्थना करा. नीतिमानाची प्रार्थना कार्य करण्यात फार प्रबळ असते.*

—याकोब 5:14-16

त्या रात्री ती ज्या अवस्थेत आमच्या कडे आली होती त्याच अवस्थेत परत घरी गेली; तिच्या पोटातला ट्यूमर अजूनही तिथेच होता. पण ती दृढ विश्वासाने म्हणाली, "मी बरी झाली आहे." दोन आठवडे तिच्या परिस्थितीत कोणताही बदल झाला नाही तरीही

ती आपल्या विश्वासावर ठामपणे टिकून राहिली, त्या दोन आठवड्यात तिला आतापर्यंत झाल्या नव्हत्या इतक्या अधिक वेदना होत होत्या. तिने मला सांगितले की त्या दोन आठवड्यांच्या काळात जेव्हा तीला खूप जास्त वेदना सहन कराव्या लागत होत्या, तेव्हा तिने सैतानाला धमकावून म्हटले, "तू मला दुखवण्याचा प्रयत्न करू शकतोस, पण मी बरी झाली आहे."

दोन आठवड्यांनंतर, ते ट्यूमर अजूनही तिच्या पोटात होते, आणि त्याच अवस्थेत ती झोपायला गेली, पण ती झोपेतून उठली तेंव्हा पूर्णपणे बरी झाली होती. झोपेत असतांना तिच्या कंबरेत 6 किलो आणि 9 इंच वजन कमी झाले आणि तिची पाठ, जी त्या गाठीमुळे मुरगळलेली होती, ती पुन्हा सामान्य झाली, तिचा पाठीचा कणा अगदी सरळ झाला.

एकदा तुमचा विश्वास वचना मध्ये स्थिर होऊन दृढ झाला की, सैतानाला तुम्हाला असे सांगून फसवू देऊ नका कि तुमचा उपचार होऊ शकत नाही किंवा देवाने दिलेले वचन कार्य करू शकत नाही.

क्रिस्टीन जेंव्हा आमच्या चर्चमध्ये आली तेंव्हा ती कुठल्याही चर्च सोबत फारसा संबंध ठेवत नसे. तिच्यासाठी हे सर्व नवीन होते. क्रिस्टीन अनेक वर्षांपासून दोन्ही कांना मध्ये श्रवणयंत्रे वापरत होती आणि ती आमच्या कडे आली तेंव्हा तिला फारच कमी ऐकायला येत होते. तिच्या आईलाही हाच आजार होता आणि ती जवळजवळ पूर्णपणे बहिरी होती. जेव्हा क्रिस्टीन आमच्या चर्चमध्ये आली तेव्हा तिने तिचे हृदय प्रभूला समर्पित केले आणि देवाने तिचे जीवन अद्भुत रित्या बदलले. ती उत्साहित होती आणि तिला देवाच्या राज्याबद्दल जितके होईल तितके अधिक शिकायचे होते. चर्चमध्ये नवीन येणाऱ्या लोकांसाठी साठी आम्ही "विश्वासणाऱ्यांचा अभिमुखता वर्ग" चालवत असतो आणि क्रिस्टीन त्या वर्गात सहभागी होण्यास फारच उत्सुक होती. ह्या वर्गांमध्ये विविध विषयांचा समावेश आहे, परंतु असे घडले की क्रिस्टीन ज्या वर्गात जात होती तो बरे होण्या विषयी शिक्षण देणारा होता. सत्राच्या शेवटी, प्रशिक्षकांनी ज्यांना बरे होण्याची आवश्यकता होती त्यांच्यासाठी प्रार्थना केली. प्रार्थनेसाठी पुढे जाताना क्रिस्टीन खूप उत्साहित झाली.

**पुन्हा एकदा लक्षात ठेवा, देवाच्या वचनावर दृढ राहणे ही तुमच्या स्वातंत्र्याची गुरुकिल्ली आहे.**

तिच्यासाठी प्रार्थना केली जात असताना, तिचे कान अचानक उघडले. पहिल्यांदाच, तीला पूर्णपणे ऐकू येऊ लागले.

त्या दिवशी ती उपासने नंतर परत जात असताना, मला प्रेरणा झाली कि मी तिला सैतानाच्या प्रतिहल्ल्याबद्दल इशारा द्यावा. आणि, दुसऱ्या दिवशी सकाळी तिने मला सांगितले की, अचानक तिचे कान बंद झाले आणि आता तिला काळजी वाटायला लागली आहे. पण मी तिला सांगितले की असे घडणार आहे, आणि जेव्हा असे घडेल तेंव्हा तिने घोषणा करावी की ती बरी झाली आहे आणि सैतानाला धमकावावे. बरं, तिने मी तिला जे करायला सांगितले होते तेच केले. तिने देवाची स्तुती करायला सुरुवात केली आणि घोषणा केली कि मी शत्रूला बांधून टाकत आहे, आणि मी बरी झाली आहे. काही मिनिटांतच तिचे कान उघडले आणि तेव्हापासून आज पर्यंत तिला उत्तम प्रकारे ऐकू येत आहे, आणि ते घटना सुमारे चार वर्षांपूर्वीची आहे.

पुन्हा एकदा लक्षात ठेवा, देवाच्या वचनावर दृढ राहणे ही तुमच्या स्वातंत्र्याची गुरुकिल्ली आहे.

## मी पुन्हा सांगेन - आपली मागणी स्पष्ट असू द्या

तुमचा विश्वास दृढ करत असतांना, मी तुम्हाला पुन्हा एकदा आठवण करून देतो कि तुम्ही आपल्या मागणी बद्दल देवाला अगदी स्पष्टपणे सांगा! ही कहाणी तेव्हाची आहे जेव्हा देवाने मला माझ्या शब्दांचे महत्त्व खरोखर काय आहे ते दाखवले. तेंव्हा पासून मी ते इतरांना सांगत आलो आहे, परंतु ते आजही तितकेच शक्तिशाली आहे जितके ते घडले तेव्हा होते.

तो हरणांची शिकार करण्याचा सामान्य हंगाम होता आणि मी जंगलात जाऊन शिकार करण्यासाठी अगदीच तयार होतो कारण त्या दिवसात मी खूप व्यस्त होतो. या विशिष्ट वर्षी, मी दोन हरणांसाठी विश्वासाची पेरणी केली होती, एक चार-शिंगाच्या किंवा त्याही पेक्षा मोठ्या शिंगांच्या हरणासाठी आणि एक बटण बक साठी विश्वासाने पेरले होते. ड्रेंडाने आणि मी आमचे हे बी सहमतीने आणि विश्वासाने पेरले होते. सकाळी सूर्याची किरणे अजून पूर्णपणे दिसत नव्हती तेंव्हा मी पहिली शिकार करण्या साठी बाहेर पडलो. आकाश नुकतेच गुलाबी होऊ लागले होते, आणि मला पहिली शिकार मिळाली, ते आठ शिंगाचे हरण होते. मी झाडावर शिकारी साठी फक्त 15 मिनिटे बसलो होतो! हे खूपच रोमांचक होते! म्हणून मी

दोन आठवड्यांनंतर जेंव्हा माझ्या बटन बक ची शिकार करण्या साठी बाहेर पडलो तेव्हा मला खूप आत्मविश्वास होता. पुन्हा, मी सकाळी बाहेर पडलो आणि सकाळी सुमारे 20 मिनिटांनी,  जवळ जवळ 300 यार्ड अंतरावर एक आठ-शिंगांची हरीण  दिसली जी थेट माझ्या झाडाकडे येत होती.

ओहायोमध्ये, तुम्ही शिंगं असलेल्या फक्त एकाच हरिणीचे शिकार करू शकता. दुसरे हरिणी किंवा बटन बक असणे आवश्यक आहे. बटन बक हरिणी असल्यातच जमा असते कारण तिची शिंगे इतकी लहान असतात की तुम्हाला ती दुरून दिसत नाहीत. म्हणून जेव्हा मी हरिणीला जंगलातून येतांना पाहिले, तेव्हा मला वाटले की तो माझ्या झाडाजवळ येण्यापूर्वीच थांबेल, पण तो थांबला नाही. तो थेट माझ्या झाडाजवळ आला आणि माझ्या स्टँडखाली सुमारे 20 सेकंद थांबला. मी फक्त पाहत राहिलो कारण त्याची शिकार करणे कायदेशीर नव्हते.  20 सेकंद तिथे उभे राहिल्यानंतर, तो अचानक त्याच वाटेने परत चालू लागला ज्या वाटेने तो आला होता. आश्चर्याची गोष्ट म्हणजे, तो त्याच जंगलात 300 यार्ड परत चालत गेला आणि गायब झाला. मला फार आश्चर्य वाटले आणि गोंधळलो.

आतापर्यंतच्या अनुभवा प्रमाणे, माझ्या स्टँडखाली कधीही ते हरीण आले नव्हते ज्याच्या साठी मी विश्वासाचे बी पेरले नव्हते. मी गोंधळलो आणि घरी परत जातांना आत्म्याने प्रार्थना करू लागलो. "प्रभु, तो हरीण तिथे का आला होता?" अचानक, मी ऐकले, पवित्र आत्म्या मला म्हणाला, "तू काय पेरणी केली आहे ते तपास." मी पेरणी तपासू? हे अगदी वेडेपणाचे आहे; मला चांगले माहित आहे की मी कशासाठी पेरणी केली आहे. तरीही, माझी बँक मासिक स्टेटमेंट सोबत रद्द केलेल्या चेकच्या प्रती देखील पाठवते. मी पटकन ते स्टेटमेंट काढले आणि मला मी लिहिलेला चेक सापडला. चेकवर खाली लिहिले होते, दोन हरणं चार-शिंगाचे किंवा त्याहून मोठे, आणि एक बटण बक. आता हे  किती हरणं झाले? खरं म्हणजे मला जे म्हणायचे होते ते हे कि मी एकूण दोन हरणं मिळण्या साठी विश्वास ठेवत आहे, एक चार किंवा त्याहून जास्त शिंगाचा हरण आणि दुसरे बटण बक. पण, मी ते ज्या पद्धतीने लिहिले त्यावरून असे दिसून येत होते की मी चार किंवा जास्त शिंगाच्या दोन हरणांसाठी आणि एका बटन बक साठी ती पेरणी करत आहे.  मी तिथेच स्तब्ध बसलो. ते दुसरे हरण आले कारण मी त्याच्यासाठी विश्वासाची पेरणी केली होती. म्हणूनच तो त्या जंगलातून आला आणि माझ्या झाडाखाली उभा राहिला. त्याचे तिथे येणे निश्चित होते.

ते पाहून मी ओरडू लागलो, आणि ओरडतच घरात इकडे तिकडे पळू लागलो. मी खूप उत्साहित झालो होतो, पण त्याच वेळी मला भीती देखील वाटली. मी विचार केला कि कदाचित मी किती तरी वेळा अशा गोष्टी बोललो असेल ज्या प्रत्यक्षात पूर्ण व्हाव्यात असे माझ्या म्हणण्याचा अर्थ नव्हता पण मी ज्या प्रकारचे शब्द बोललो त्या मुळे त्या प्रत्यक्षात आल्या होत्या? यामुळे याकोब 3:3-4 खरोखरच जिवंत झाले.

> *घोड्यांनी आपल्या कह्यात राहावे म्हणून आपण त्यांच्या तोंडात लगाम घातला, तर त्यांचे सर्व शरीर आपण फिरवतो. तारवेही पाहा, ती एवढी मोठी असतात व प्रचंड वाऱ्याने लोटली जात असतात, तरी सुकाणदाराची इच्छा असते तिकडे ती अगदी लहानशा सुकाणाने फिरवली जातात.*
>
> —याकोब 3:3-4

याकोब हे सांगत आहे कि आपल्या शब्दांमध्ये किती सामर्थ्य आहे. जर आपल्या शब्दातून काहीतरी वेगळेच प्रतिपादित होत असेल पण आपल्याला खऱ्या अर्थाने काहीतरी वेगळे पहायचे असेल, तर आपले जीवन पूर्णपणे विस्कळीत झालेले असेल आणि आपण त्या अवस्थेत कसे पोहोचलो हे आपल्याला कळणार नाही.

म्हणून लक्षात ठेवा, राज्य आपले काम फार स्पष्टपणे करते आणि तुमचे शब्द हे अचूकपणे परिभाषित करतात कि तुम्ही कुठे जाता आणि तिथे कसे पोहोचता!

## सहमत होण्याचे महत्त्व

आपण विश्वासात असताना आपले बी विश्वासाने पेरणी करण्या बद्दल बोलत आहोत आणि येथे तुम्हाला एक गोष्ट लक्षात ठेवण्याची आवश्यकता आहे. जर तुम्ही विवाहित असाल तर ते बी पेरताना तुमच्या जोडीदाराशी सहमत व्हा. जर तुमचा पती किंवा पत्नी नसेल तर काय केले पाहिजे त्याबद्दल मी थोड्या वेळात तुम्हाला सांगेन, पण जर तुम्ही विवाहित आहात, तर पुन्हा एकदा मी स्पष्टपणे सांगू इच्छितो कि, तुम्ही तुमच्या पती किंवा पत्नी सोबत सहमत होऊन ते करा.

माझ्या लग्नाच्या सुरुवातीच्या दिवसांत, ड्रेंडाला माझ्या शिकारीबद्दल माझ्या सोबत सहमत होण्यास सांगणे मला आवडत नव्हते. कारण जर मी शिकारीला जाण्याबद्दल बोललो

तर मला माहित होते कि ती घरातला कचरा बाहेर काढणे, घरातले ब्लब बदलणे, किंवा इतर अनेक गोष्टींची यादी माझ्या समोर ठेऊन मला शिकारी साठी जाऊ देणार नाही. ही त्या वेळेसची गोष्ट आहे जेंव्हा मी अपरिपक्व आणि स्वार्थी होतो. ती दिवसभर मुलांसोबत असायची, पण मी घरी पोहोचताच मला जंगलात जायला हवे असायचे. मला नाही वाटत की आपल्या अशा वागण्याला देव आशीर्वादित करेल. हो, मी स्वार्थी होतो. विश्वासाने शिकार कशी करायची हे शिकण्यापूर्वी, मी दिवसभर शिकार करण्यात घालवायचो पण यश मिळात नव्हते. म्हणून शिकारीचा हंगाम आला कि ती घाबरून जायची यात काही आश्चर्य नाही.

पण नंतर मी तिला प्रथम स्थान द्यायला शिकलो. मला हे शिकावे लागले की आपण या बाबतीत एकत्र आहोत आणि आपल्याला एकमेकांची गरज आहे. मी तिच्या गरजांना प्रथम स्थान देऊ लागलो तेव्हा ती हरणांची शिकार करण्या साठी माझ्याशी सहमत होण्यास तयार होऊ लागली. आणि हरणांच्या शिकारीत मला यश मिळाल्याचे पाहून तिला विशेष आनंद होत असे. मला हे शिकावे लागले की पती-पत्नी म्हणून, आम्ही आत्मिकदृष्ट्या एक आहोत आणि आम्ही दोघेही सहमतीने एकत्र आलो तेव्हा जे कार्य अधिक सामर्थ्याने झाले तसे पूर्वी कधी झाले नव्हते. हे फक्त हरणांच्या शिकारीबद्दल नव्हते. मला आढळले की जर आपण एकत्र आणि एकमताने चाललो तर ते जीवनाच्या प्रत्येक क्षेत्रात कार्य करते.

**मला हे शिकावे लागले की पती-पत्नी म्हणून, आम्ही आत्मिकदृष्ट्या एक आहोत आणि आम्ही दोघेही सहमतीने एकत्र आलो तेव्हा जे कार्य अधिक सामर्थ्याने झाले तसे पूर्वी कधी झाले नव्हते.**

*पतींनो, तसेच तुम्हीही आपापल्या स्त्रीबरोबर, ती अधिक नाजूक पात्र आहे म्हणून सुज्ञतेने सहवास ठेवा; तुम्ही उभयता जीवनरूपी कृपादानाचे समाईक वतनदार आहात, म्हणून तुम्ही त्यांना मान द्या; म्हणजे तुमच्या प्रार्थनांत व्यत्यय येणार नाही.*

—1 पेत्र 3:7

पुरुषांनो, लक्षात ठेवा की जर तुम्ही तुमच्या पत्नींची काळजी घेणारे नसाल तर तुमच्या प्रार्थनांमध्ये अडथळा येईल! काळजी घेणे म्हणजे तुम्ही तिला समान मानता, कारण तुम्ही प्रत्येक निर्णयात तिच्यासोबत एकमत आहात. हो, आत्मिक दृष्ट्या, विवाहात पुरूष हा प्रमुख असतो पण हुकूमशहाच्या रूपात नाही तर एक सेवक म्हणून, तिच्यासाठी आपले जीवन अर्पण करतो आणि तिचा सन्मान करतो.

## पण जर तुमचा जीवनसाथी विश्वासणारा नसेल तर काय?

मला असे ईमेल येतात ज्यात विचारले जाते की जर कुणी अशा व्यक्ती सोबत लग्न करतात ज्यांना देवाची ओळख नाही आणि ते प्रभूची सेवा करू इच्छित नाही तर त्यांनी काय करावे? ते कसे सहमत असू शकतात? सहमतीबद्दलची तुमची समज चुकीची आहे. समजा तुम्ही अशा पुरुषाशी लग्न केले आहे जो प्रभूची सेवा करत नाही. पण, तुम्ही दोघेही सहमत आहात की तुम्हाला नवीन कारची आवश्यकता आहे. तर काय होईल माहित आहे का? तुम्ही दोघे सहमत आहात! जर तुम्ही दोघेही सहमत असाल की तुम्हाला किराणा सामानाची आवश्यकता आहे, तर तुम्ही सहमत आहात. बायबल अगदी स्पष्ट आहे की जर दोघांपैकी फक्त एकच व्यक्ती देवाच्या वचनावर विश्वास ठेवत असेल, तर राज्याला कुटुंबात काम करण्याचा कायदेशीर अधिकार आहे!

> *कारण पत्नीच्या द्वारे ख्रिस्तीतर पती पवित्र झाला आहे आणि ख्रिस्ती पतीच्या द्वारे ख्रिस्तीतर पत्नी पवित्र झाली आहे; असे नसते तर तुमची मुलेबाळे अशुद्ध असती; परंतु आता ती पवित्र आहेत.*
>
> —1 करिंथ 7:14

मी असे म्हणत नाही की अविश्वासू जोडीदाराचा त्यांच्या जोडीदाराच्या विश्वासाने तारण होते. माझा असा विश्वास आहे की प्रत्येक व्यक्तीने वैयक्तिकरित्या येशूला आपले तारण होण्यासाठी प्रार्थना केली घेतले. पण, माझा असा विश्वास आहे की जर दोघांपैकी एकाने देवाच्या वचनावर विश्वास ठेवला तर त्यांचा विश्वास संपूर्ण कुटुंबाला राज्याच्या आशीर्वादाखाली पवित्र करतो किंवा आणतो. आता, अर्थातच, विश्वासणाऱ्या व्यक्ती सोबत लग्न करणे चांगले आहे. आणि बायबल ह्या बाबतीत स्पष्ट आहे कि विश्वासणाऱ्या जोडीदाराने

सत्याने आपल्या विश्वास न करणाऱ्या जोडीदाराला राज्याकडे आकर्षित करावे.

जर तुम्ही विवाहित नसाल, तर तुम्हाला प्रार्थनेत तुमच्याशी सहमत होण्यासाठी दुसरी व्यक्ती शोधण्याची गरज नाही. फक्त तुम्ही स्वतः वचनावर विश्वास ठेवा आणि राज्याचे कार्य होतांना पहा!

आपण विश्वासाच्या विषयावर बोलत असताना, मी पुढील प्रकरणात पेरणीबद्दल विचारल्या जाणाऱ्या सर्वात सामान्य प्रश्नांपैकी एक आणि बरेच लोक करत असलेल्या चुकांबद्दल चर्चा करणार आहे.

अध्याय 7

# चेतावणी: तुमच्या विकसित विश्वासात राहा!

“मी 400 किलो वजनाचा मार्लिन मासा पकडणार आहे!” माझ्या ऑफिससोबत माउई, हवाई येथे ट्रिपवर जाणाऱ्या माझ्या एका सहकाऱ्याने असे म्हटले होते. आम्ही उत्पादने विकण्या मध्ये उच्चांक गाठल्या मुले आमच्या एका विक्रेत्याने आम्हाला ही ट्रिप दिली होती ज्याचा संपूर्ण खर्च त्यांनी उचलला होता. माउईला जाण्यापूर्वी, आम्ही तिघांनी ब्लू मार्लिनची मासेमारी करण्याचे ठरवले होते, कारण माउईला जगाची ब्लू मार्लिन राजधानी म्हणून ओळखले जाते हे सर्वांनाच माहित आहे. या घटनेच्या काही महिन्यांपूर्वी आम्ही विश्वासा बद्दल बोलत होतो आणि मी माझ्या कर्मचाऱ्यांना ते कसे कार्य करते हे शिकवत होतो. डॅन साठी विश्वास आणि तो कसे कार्य करतो हे सर्व काही नवीन होते आणि मी विचार करत होतो कि त्याच्यासाठी आमच्या सोबत जाऊन राज्याचे काम प्रत्यक्ष पाहण्याची ही एक उत्तम संधी आहे. म्हणून मी त्याला म्हणालो, “अरे, डॅन, तुला माहित आहे का की जेव्हा आपण हवाईला जाऊ तेव्हा तू निळा मार्लिन पकडला आहे हे आधीच निःसंशयपणे जाणून घेणे शक्य आहे?” माझ्या ह्या बोलण्या कडे त्याचे लक्ष वेधले आणि आम्ही माउईला जाण्यापूर्वी विश्वासावर चर्चा करण्यात बरेच तास घालवले. डॅनने मी शिकवल्याप्रमाणे त्याचे विश्वासाचे बी पेरले आणि त्या अनुसार ब्लू मार्लिन चे आपले स्वप्न, पूर्ण करण्यास तो खूप उत्सुक होता.

माझा दुसरा सहकारी माझ्या चर्चचा सदस्य होता, त्याला विश्वास कसे कार्य करतो याची आधीच चांगली समज होती आणि त्याने देवाला त्याच्या आयुष्यात अद्भुत गोष्टी करताना पाहिले होते. त्याने मार्लिन पकडण्यासाठी विश्वासाचे आपले बीज पेरले, कोणतेही मार्लिन नाही तर 400 किलो वजनाचे मार्लिन. मला आठवते, मी विचार केला होता, "वाह, तो एक मोठा मासा आहे!" माझा मित्र ज्या विशिष्ट आकाराच्या माशासाठी विश्वासाचे बीज

पेरत होता त्याबद्दल मला थोडी चिंता होती, परंतु मी त्यावेळी त्याला त्याबद्दल काहीही बोललो नाही.

आणि ह्याच्या विरुद्ध, डॅनने विशिष्ट आकाराचा मासा पकडण्या विषयी विचार केला नव्हता. थोडक्यात सांगायचे तर, डॅनने 75 किलो वजनाचा निळा मार्लिन पकडला, पण माझ्या दुसऱ्या सहकाऱ्याने मार्लिन अजिबात पकडला नाही. तर आता विचार करण्याची गोष्ट आहे कि डॅनने मार्लिन का पकडला पण माझ्या दुसऱ्या मित्राने एकही मासा का पकडला नाही? हा एक चांगला प्रश्न आहे आणि बहुतेक लोक, अगदी बहुतेक ख्रिस्ती लोक देखील, तो प्रश्न विचारला आहे ह्या बद्दलच आश्चर्य करतील. ते हसून म्हणतील, "मासेमारी मध्ये असेच होत असते, कधीकधी तुम्ही ते पकडू शकता आणि कधीकधी तुम्हाला काहीच मिळत नाही." पण मला हे निश्चित माहित आहे की राज्य खूप विशिष्ट आणि विश्वास ठेवण्या योग्य आहे.

> *नंतर असे झाले की, लोकसमुदाय त्याच्याभोवती गर्दी करून देवाचे वचन ऐकत असता तो गनेसरेत सरोवराच्या किनाऱ्याशी उभा होता. तेव्हा त्याने सरोवराच्या किनाऱ्याला लागलेले दोन मचवे पाहिले; त्यांवरील कोळी खाली उतरून जाळी धूत होते. त्या मचव्यांपैकी एक शिमोनाचा होता; त्यावर चढून तो किनाऱ्यापासून थोडासा लोटावा म्हणून त्याने त्याला सांगितले. मग तो मचव्यात बसून समुदायांना शिक्षण देऊ लागला.*
>
> *आपले बोलणे संपवल्यावर त्याने शिमोनाला म्हटले, "खोल पाण्यात हाकार; मग मासे धरण्यासाठी तुम्ही आपली जाळी खाली सोडा."*
>
> *शिमोनाने त्याला उत्तर दिले, "गुरूजी, आम्ही सारी रात्र कष्ट करून काही धरले नाही, तरी आपल्या सांगण्यावरून मी जाळी सोडतो."*
>
> *मग त्यांनी तसे केल्यावर माशांचा मोठा घोळका जाळ्यांत सापडला आणि त्यांची जाळी फाटू लागली. तेव्हा त्यांचे जे साथीदार दुसऱ्या मचव्यात होते त्यांनी येऊन आपल्याला साहाय्य करावे म्हणून त्यांनी त्यांना खुणावले. मग ते आल्यावर दोन्ही मचवे इतके भरले की ते बुडू लागले.*

*हे पाहून शिमोन पेत्र येशूच्या पाया पडून म्हणाला, "प्रभूजी, माझ्यापासून जा, कारण मी पापी मनुष्य आहे." कारण त्यांनी धरलेल्या माशांचा घोळका पाहून तो व त्याच्याबरोबर असलेले सर्व जण विस्मित झाले होते; तसेच शिमोनाचे भागीदार, जब्दीचे मुलगे याकोब व योहान हेही विस्मित झाले होते. तेव्हा येशू शिमोनाला म्हणाला, "भिऊ नकोस; येथून पुढे तू माणसे धरणारा होशील."*

—लूक 5:1-10

मी हरणांची शिकार केली तशीच पेत्राने मासेमारीची एक नवीन पद्धत शोधून काढली. त्याने मासेमारी करण्याचा प्रयत्न केला होता पण येशूने त्याला खोल पाण्यात कुठे मासेमारी करायची हे सांगेपर्यंत त्याला एकही मासा सापडला नाही. तिथे त्याने इतके मासे पकडले की त्याच्या दोन्ही होड्या जवळजवळ बुडू लागल्या. मी लोकांना सांगतो, "जर येशूने तुम्हाला कुठे आणि कसे मासेमारी करायची हे सांगितले तर कोणीही मासे पकडू शकतो."

तर माझ्या मित्राच्या बाबतीत ज्याने त्याचा मोठा मार्लिन मासा पकडला नाही, हो, हे खरे आहे की देवासोबत तुमच्यासाठी सर्व काही शक्य आहे. पण जर तुम्ही तुमच्या बाथटबमध्ये निळे मार्लिन पकडण्याचा विश्वास ठेवून बी पेरले तर ते काम करणार नाही. आता, जर तुम्हाला निळे मार्लिन पकडायचे असेल, तर तुम्ही विश्वासाचे बी पेरू शकता आणि पवित्र आत्मा तुम्हाला अगदी त्या ठिकाणी घेऊन जाईल ज्या ठिकाणी तुम्हाला तो निश्चितपणे मिळेल - अर्थातच समुद्रात, पण समुद्रात कुठे?

हे लक्षात ठेवा: प्रत्येक कापणीचे एक वेगळे स्थान असते आणि कापणीची वेळ असते! जर तुम्हाला जागतिक विक्रमी ब्लू मार्लिन पकडण्या साठी विश्वासाची पेरणी करायची असेल, तर तुम्ही फक्त "मी समुद्रात जाईन" असे म्हणू शकत नाही. तुम्हाला समुद्रातील एका विशिष्ट भागात जावे लागेल. का? कारण ब्लू मार्लिन स्थलांतर करत असतात आणि दरवर्षी त्यांचे विशिष्ट मार्ग असतात. 400 किलो वजनाचे ब्लू मार्लिन पकडणे देखील दुर्मिळ आहे. उदाहरणार्थ, फ्लोरिडातील मिरामार येथे एमराल्ड कोस्ट ब्लू मार्लिन क्लासिक मासेमारी स्पर्धा 17 वर्षांपासून सुरू आहे. त्या काळात पकडलेला सर्वात मोठा ब्लू मार्लिन 407 किलो वजनाचा होता. माउईच्या आमच्या ह्या ट्रिप दरम्यान 408 किलो वजनाचा ब्लू मार्लिन पकडणे शक्य होते का? कारण, हवाईमध्ये पकडलेला रेकॉर्ड ब्लू मार्लिन 624 किलो वजनाचा होता, पण तुमच्या लक्षात राहावे म्हणून हे लिहून ठेवा.

**तुमच्या विश्वासाचा विषय जितका विशिष्ट किंवा अद्वितीय असेल तितकेच त्याचे स्थान, पद्धत आणि वेळेकडे लक्ष देणे अधिक महत्त्वाचे आहे.**

त्या दिवशी माऊई येथील बोटीच्या कॅप्टनने आम्हाला सांगितले की ब्लू मार्लिन अजून तिथे आलेले नाहीत. त्याच्या स्वतःच्या दोन बोटी होत्या ज्या गेल्या चार महिन्यांपासून दिवसाला आठ तास समुद्रात मासे पकडण्या साठी थांबलेल्या असायच्या पण त्या वरील लोकांनी फक्त एकच स्ट्रीप्ड मार्लिन पकडले होते. ब्लू मार्लिन महिन्याच्या शेवटी येणार होते. पण, आम्ही हंगामातील पहिला मर्लिन पकडला आहे. पण जेव्हा माझ्या मित्राने त्याचे विश्वासाचे बी अधिक विशिष्ट आणि स्पष्ट शब्द बोलून पेरले आणि विशेषतः रेकॉर्ड बुक लेव्हल च्या मार्लिन पकडण्या विषयी पेरले, त्यामुळे आता कापणीचे स्थान आणि वेळ ही देखील तितकीच महत्त्वाची असणार होती. मला वैयक्तिकरित्या असे वाटते की त्या वेळी त्या भागात रेकॉर्ड आकाराचे मार्लिन नव्हते. आपल्याला हे देखील लक्षात ठेवण्याची गरज आहे की माझा मित्राने कदाचित खरोखर मोठा मासा पकडण्या बाबतीत विश्वास धरला नव्हता. परंतु जर तो खरोखरच 400 किलो वजनाचा मार्लिन पकडण्याबाबत गंभीर असेल, तर मला माहित आहे की जर त्याने त्याचे बी त्या विश्वासाने पेरले आणि मासा पकडण्याची जागा आणि वेळ नेमकी कोणती असावी ह्या बाबतीत पवित्र आत्म्याचे मार्गदर्शन ऐकले, तर त्याला त्याचा 400 किलो वजनाचा ब्लू मार्लिन नक्कीच मिळेल.

## स्थान आणि वेळेचे महत्त्व

कापणीचे ठिकाण आणि वेळेबाबत विशिष्ट असणे हे तुम्ही पेरलेल्या विश्वासाच्या विशिष्ट बीजा इतकेच महत्त्वाचे आहे. मी सात-शिंगाच्या हरणाबाबतीत जो प्रयोग केला तेव्हा ते वास्तविकरीत्या कसे घडले हे तुम्हाला माहित आहे. मला शिकारी साठी बाहेर जाण्याचे नेमके मार्गदर्शन मिळेपर्यंत वाट पहावी लागली; आणि अशा परिस्थितीत, मी शिकारीच्या हंगामात एक महिन्यापेक्षा जास्त वेळ वाट पाहिली. का? कारण बहुधा सात-शिंगाचे हरण त्यावेळी माझ्या घराच्या परिसरात नव्हता किंवा कदाचित हवामान आणि वाऱ्याची दिशा यासारखे इतर घटक माझ्या यशात अडथळा ठरू शकत होते.

पवित्र आत्म्याला त्या विशिष्ट कापणीची वेळ माहित होती आणि त्याने मला योग्य वेळी, योग्य दिवशी, योग्य ठिकाणी, त्या हरणाची कापणी करण्यासाठी योग्य स्थितीत ठेवले.

मी लोकांना ही चूक करतांना अनेकदा ऐकतो आणि पाहतो. "अरे, गॅरी, जर राज्य तुमच्या म्हणण्याप्रमाणे हरणांना शिकारी साठी समोर घेऊन येतो, तर तुम्ही जागतिक विक्रमी हरण का मारत नाही?" ठीक आहे, चांगला प्रश्न आहे, आणि आपल्याला ते सोडवण्याची गरज आहे. ते विधान म्हणजे मला अशा लोकांकडून येणाऱ्या ईमेलसारखे आहे जे मानतात कि आम्हाला $500,000 चे गृहकर्ज फेडायचे आहे पण त्यांनी ते सात दिवसांत फेडण्यासाठी विश्वासाचे बी पेरले आहे. पण जेव्हा त्यांना ते सात दिवसांत पूर्ण झालेले दिसत नाही, तेव्हा ते निराश होतात आणि मला विचारतात की आम्हाला गरज असलेले पैसे का आले नाहीत. लोक मला आणखी एक सामान्य प्रश्न विचारतात, "मी फक्त विश्वासाचे बी पेरून लॉटरी का जिंकू शकत नाही?"

ठीक आहे, आधी रेकॉर्ड हरणाची शिकार करण्याच्या प्रश्नाबद्दल बोलूया. हो, मला वाटतं की जर माझ्या मनात आवड असती तर मी रेकॉर्ड हरण मारू शकलो असतो, पण तसे नाहीये. मी सहसा भोजन व्यवस्थे साठी शिकार करतो आणि मला रेकॉर्ड हरणाची शिकार करण्याची प्रेरणा मिळत नाही. मी त्या वर्ल्ड रेकॉर्ड हरणाच्या मागे जाण्यास प्रेरित होत नसण्याचे एक कारण म्हणजे मी तुम्हाला आत्ताच स्पष्ट केले आहे की तुम्ही तुमच्या बाथटबमध्ये व्हेल मासा पकडू शकत नाही. वर्ल्ड रेकॉर्ड हरण माझ्या घराच्या परिसरात नाहीत. जर मी खरोखरच त्या प्रकारच्या कापणीबद्दल गंभीर झालो, तर मला माहित आहे की मला शिकार करण्यासाठी दुसरीकडे जावे लागेल. रेकॉर्ड हरण सहसा रात्रीच्या वेळी बाहेर येतात आणि त्यांच्या स्वतःच्या विशिष्ट सवयी असतात म्हणून मला काही शिकारीचे नवीन प्रकार शिकण्याची आवश्यकता असू शकते. असा प्राणी कुठे सापडेल हे शोधण्यासाठी मला खूप संशोधन करावे लागेल आणि प्रार्थना करावी लागेल. पण मला त्या सर्व त्रासात जायचे नाही. मला माझ्या स्वतःच्या परिसरात शिकार करायला आवडते. मला माझ्या स्वतःच्या घराभोवती आणि त्याच परिसरातील जंगलात आरामात चरणाऱ्या हरणाची शिकार करणे आवडते. पण तुमच्या प्रश्नाचे उत्तर द्यायचे झाले तर, मला वाटते की एखादी व्यक्ती त्या बाबतीत देखील देवावर विश्वास ठेवू शकते, पण मी काय म्हटले ते लक्षात

**मी ते पुन्हा सांगतो - मला वाटतं तुम्हाला ते पुन्हा ऐकायला हवं - देवा जवळ तुमची योजना आहे!**

ठेवा. कापणी जितकी वेगळी आणि विशिष्ट असेल तितकेच स्थान, वेळ आणि पद्धत जास्त महत्त्वाची असते.

सहसा, जेव्हा मला इमेल मध्ये कोणीतरी असे विचारते कि आम्हाला पाच दिवसांत दहा लाख डॉलर्स का मिळाले नाहीत, तेव्हा मला जाणवते की मी कदाचित अशा व्यक्तीशी बोलत आहे ज्याला विश्वासात असणे आणि फक्त समजूत करून घेणे यातील फरक कळलेला नाही.

हे एके दिवशी मला मिळालेल्या ईमेलसारखे आहे ज्यामध्ये त्यांनी लिहिले होते कि ते 30 दिवसांत दहा दशलक्ष डॉलर्सचे बी पेरणार आहेत, आणि खरे तर त्यांच्याकडे किराणा सामान देखील नव्हते, तीन महिन्यांपासून त्यांनी घराचे भाडे देखील दिले नव्हते आणि त्यांच्या कडे नोकरी देखील नव्हती. ते त्यांच्या विकसित विश्वासाच्या खूप बाहेर होते.

तर, गॅरी, तुमचे असे म्हणणे आहे का कि देव एखाद्या व्यक्तीला दहा लाख डॉलर्स देऊ शकत नाही? अर्थात तो देऊ शकतो. देवाला सर्व काही शक्य आहे. प्रश्न "तो देऊ शकतो का?" असा नाही तर "तुमच्याकडे खरोखर त्यासाठी विश्वास आहे का?" असा आहे. जर तुमचा विश्वास तुम्हाला दररोज आवश्यक असलेले अन्नाचा पुरवठा करू शकत नाही, तर मला शंका आहे की तुमच्या आयुष्याच्या या टप्प्यावर ते दहा लाख डॉलर्स प्राप्त होण्या साठी तुमचा विश्वास आहे. पण तुम्ही निश्चितपणे तिथपर्यंत पोहोचू शकता! तुम्ही जिथे आहात तिथून तुम्हाला सुरुवात करावी लागेल आणि विश्वास कसा कार्य करतो हे शिकायला सुरुवात करावी लागेल आणि तुम्ही आता जे व्यवस्थापित करत आहात त्यापेक्षा जास्त व्यवस्थापन करण्याची तुमची क्षमता वाढवावी लागेल.

## लॉटरी जिंकण्यासाठी तुम्ही विश्वास करू शकता का?

लॉटरीबद्दल काय?

व्वा, चला तर पुढे जाऊया आणि ह्या विषयावर चर्चा करू या. गेल्या काही वर्षांत पॉवरबॉल जॅकपॉट्स खरोखरच प्रचंड झाले आहेत. मला आठवते की गेल्या वर्षी ते जवळजवळ एक अब्ज डॉलर्सपर्यंत पोहोचले होते! मी माझ्या आयुष्यात कधीही लॉटरीचे तिकीट खरेदी केले नव्हते, पण यावेळी, जेव्हा ते एक अब्ज डॉलर्सवर होते, तेव्हा ऑफिसमधील आमच्यापैकी काही जण म्हणाले, "अरे, चला किमान दोन तिकिटे तरी खरेदी करूया." मी त्याबद्दल

जास्त विचार केला नव्हता, म्हणून मी म्हटले की मी काही डॉलर्स टाकून पाहू शकतो. मला परिणामांची शक्यता माहित होती - मी ते जिंकेनच असा विश्वास ठेऊन चालत नव्हतो - पण मला वाटले की मी माझे पैसे एका पात्रात टाकत होतो. जसे प्रत्येकजण म्हणत असे, "कोणीतरी तर ते जिंकलेच." मला असे वाटत होते की जेव्हा कोणीतरी ते एक अब्ज डॉलर्स जिंकेल तेव्हा मला असे वाटायला नको की मी ह्या शर्यतीतमाझा एक डॉलर गमावला आहे. पण, मला हे सांगायला लाज वाटते की मी त्याच्या आहारी गेलो.

त्या रात्री, प्रभू स्वप्नात माझ्या सोबत याबद्दल बोलला. तो माझ्या स्वप्नात मला म्हणाला, “माझी सर्व वचने तुझी आहेत!” “हो, प्रभू, तू जे म्हणत आहेस ते मला स्पष्टपणे ऐकू येत आहे,” मी म्हणालो. “मला ते समजले आहे.” हो, त्याने माझी चूक दुरुस्त केली, पण त्याने मला प्रोत्साहनही दिले. त्याने मला सांगितले की मला त्या लॉटरीची गरज नाही आणि जर मला अब्ज डॉलर्सची गरज असेल तर तो स्वतः मला गरज पडेल तेव्हा ते देईल. माझ्याकडे 7,000 हून अधिक वचने आहेत ज्यांवर माझा कायदेशीर दावा आहे आणि ती माझ्या साठी पुरेशी आहेत!

आता, लॉटरी किंवा कोणतीही स्पर्धा जिंकण्यासाठी पेरणी करण्याबद्दलच्या प्रश्नाचे उत्तर देण्याकडे परत जाऊया; त्यावर तुमच्या अधिकार कक्षेत नाही. मी हरणासाठी पेरणी करू शकतो कारण हरण माणसाच्या अधीन आहेत. त्यांच्यावर माझा कायदेशीर अधिकार आहे. पण लॉटरीवर माझा कोणताही अधिकार नाही; हा नशिबाचा खेळ आहे.

## तुम्ही विश्वासात नाही हे कसे ओळखावे

तुम्ही विश्वासात आहात की नाही हे जर तुम्ही निश्चितपणे समजायला शिकलात तर तुम्हाला निर्णय घेताना मदत होईल आणि भया मध्ये असालत तर आपण निर्णय घेऊ नये  हे समजण्यास देखील मदत होईल. लक्षात ठेवा, विश्वास हा आत्मविश्वास, अपेक्षा आणि शांतीने भरलेला असतो. मी माझ्या पहिल्या हरणाची शिकार करायला निघालो तेव्हा माझ्यात आत्मविश्वास नव्हता. मी विश्वासात नव्हतो. तुम्ही कोणत्या वेळी विश्वासात नाही ते सांगू शकाल का? मला आशा करतो कि तुम्ही ते समजू शकाल.

तुम्हाला माहिती आहेच की, ड्रेंडा आणि माझ्याकडे 60 एकर सुंदर जमीन आहे जिच्या आजूबाजूला जंगल, दलदल आणि गवताळ प्रदेश आहे. हरणांची शिकार करण्यासाठी हे

एक अगदी योग्य ठिकाण आहे. आमच्या ह्या जमिनीच्या आजूबाजूला पिके लावली जातात आणि जंगल आणि दलदल हरणांसाठी नैसर्गिक चुंबक आहेत. मी आमच्या गॅरेज मध्ये माझे ऑफिस बनवले आणि त्या मध्ये पुस्तकांचे लाकडी कपाट आणि बिल्ट-इन गॅस फायरप्लेस बनवले. ते एक शांत, आरामदायी मॅन केव्ह प्रकारचे ऑफिस आहे, तिथे बसून मला काम करायला आवडते. फऑफिस मध्ये एका गोष्टीची कमी होती ती म्हणजे माझ्या डेस्कच्या मागे भिंतीवर शोभा देणारे एक छानसे हरण. खरं सांगायचं तर, मी आमच्या भोजनासाठीच फक्त शिकार करत असे त्यामुळे मला कधीही मोठ्या हरणांना मारण्यात रस नव्हता आणि मी कधीही असा हरण मारला नव्हता ज्याचे डोके वॉलमाऊंट साठी उपयोगात आणता येईल. पण मी ह्या बाबतीत थोडा विचार केला आणि ड्रेंडाशी सहमत झालो, कारण हा तिचाच आग्रह होता कि मी माझ्या ऑफिस मध्ये वॉलमाऊंट करण्या साठी मोठ्या हरणाची शिकार करावी.

जेव्हा आम्ही ह्या विषयावर बोलू लागलो तेव्हा आम्हाला त्या ठिकाणी राहून पाच वर्षे झाली होतो आणि मी कधीही त्या भागात मोठे हरण पाहिले नव्हते. हरणांची शिकार करण्याच्या प्रत्येक हंगामात मी शिकार करण्यासाठी बाहेर गेलो होतो आणि जास्तीत जास्त आठ-शिंगाचे हरण मारले होते पण माउंटिंग करण्या साठी वापरले जाणारे हरण मारण्या बद्दल कधीही विचार केला नव्हता. पण त्या वर्षी, मी ड्रेंडाला म्हणालो की मी वॉलमाऊंट करण्या साठी मोठ्या हरणाची शिकार करू शकेल असे मला वाटले. पण, मी जंगलात कधीही मोठे हरण पाहिले नव्हते. आमच्या स्वयंपाकघराच्या खिडकीचे तोंड जंगल आणि शेताकडे होते, आणि तरीही त्या खिडकीतून, मी कधीही एकही मोठे हरण पाहिले नव्हते.

**माझ्या मित्रा, हे सर्व आधीच तुझे आहे, संपूर्ण राज्य. देवाने तुला जे दिले आहे त्यात तो आणखी भर घालू शकत नाही. तुला आधीच सर्व काही देण्वात आले आहे!**

पण ड्रेंडा आणि मी मोठ्या हरणासाठी आमचे विश्वासाचे बी पेरले. त्या साठी माझा चेक लिहितांना मी त्यावर लिहिले की मी 10-शिंगांच्या किंवा त्याहून मोठ्या हरणा साठी हे बी पेरत आहे. आम्ही त्या चेकवर हाथ ठेऊन प्रार्थना केली आणि मी तो चेक पोस्ट करण्यासाठी माझ्या डेस्कवर ठेवला. तो लिफाफा तीन दिवस तिथेच राहिला

आणि मी तो पोस्ट करू शकलो नाही. मला माहित होते की मला तो 10-शिंगांचा हरण मिळेल ह्यावर माझा विश्वास नाही. दिवसभर मी केवळ आठ, सहा किंवा चार-शिंगांचे हरण मिळेल असाच विश्वास धरून चालत होतो. पण माझ्या मध्ये हे म्हणण्या इतका विश्वास नव्हता कि, "मला माहित आहे की मी शिकारी साठी गेल्या नंतर 10-शिंगांचे किंवा त्याहून अधिक मोठ्या हरणाची शिकार करणार आहे." मला राज्याच्या कार्याचा पुरेसा अनुभव होता ज्यामुळे मला हे समजत होते की मी विश्वासात नाही. म्हणून मी तो चेक फाडला, आणि त्याच्या जागी दुसरा चेक लिहिला, आणि त्यावर लिहिले "चार-शिंगांचा किंवा त्याहून मोठ्या हरणासाठी"  आणि तो चेक पोष्टाने पाठवून दिला.

शिकारीला जाण्याच्या आदल्या रात्री मी काय केले ते ड्रेंडाला सांगितले. “मी मोठे हरण मारू शकतो एवढा माझा विश्वास नाहीये,” मी तिला सांगितले. तिने माझ्याकडे पाहिले आणि म्हणाली, “तुमचा विश्वास हरण मारण्यावर आहे आणि माझा विश्वास मोठे हरण मारण्यावर आहे. देव तुम्ही जे काही मागता किंवा विचार करता त्यापेक्षा अधिक देण्यास समर्थ आहे!”

जंगलातील खारी आणि पक्ष्यांच्या चिवचिवटाने सकाळची सुरुवात झाली आणि शरद ऋतूतील झाडलेल्या पानांच्या वासाने मला अनेक हरणांच्या शिकारीची आठवण झाली. मी तिथे बसून फारसा वेळ झाला नव्हता, कदाचित 20 मिनिटे झाली असतील, तेव्हा मला जंगलातून एका हरणाचा आवाज ऐकू आला. हरण घड्याळाच्या काट्याप्रमाणे थेट माझ्या झाडाकडे जात होता आणि मी त्याच्यावर निशाणा साधण्या साठी स्वतःला तयार केले. हरण जवळ येऊ लागले तेंव्हा मला दिसले की ते चार-शिंगांचे हरण आहे, मी नेहमी ह्याच हरणाच्या शिकारी साठी जात असतो कारण ते खाण्यासाठी फार चविष्ट आहेत. हरण सुमारे 25 यार्ड अंतरावर मला स्पष्टपणे दिसू येईल अशा क्षेत्रात आले आणि मी बाण सोडला. अहो, तो बाण उंच गेला आणि परत माघारी येऊन मग त्याला लागला आणि मला कळून चुकले की आता मला त्याचा माग काढावा लागणार आहे. हरण जंगलात निघून गेला आणि नंतर जंगलाच्या सीमेवर असलेल्या मक्याच्या शेतात उडी मारली आणि दृष्टीआड झाला. मला अजूनही तो त्याचा मक्याच्या शेतातून धावण्याचा आवाज ऐकू येत होता आणि तो किती जोरात धावत होता हे देखील मला समजत होते.

मी झाडाच्या स्टँडवर सुमारे 20 मिनिटे वाट पाहिली आणि नंतर बाण पाहण्यासाठी झाडावरून खाली उतरण्याचा निर्णय घेतला. मला माहित होते कि माझा बाण हरणाला

नक्कीच लागला आहे, आणि मला रक्ताचे डाग देखील दिसले. मी रक्ताच्या डागाच्या मागे जात राहिलो, आणि ते चांगले मोठे होते म्हणून मला पुढे जात राहण्या साठी आणखीच प्रोत्साहन मिळाले. पण सुमारे 100 यार्ड चालल्यानंतर, रक्ताचे डाग संपले. मी खूप शोधले पण मला पुन्हा काही थेंब सापडले नाही. दोन तास शोध घेतल्यानंतर मला वाटले की हरण दूर निघून गेले आहे. मी खूप निराश झालो. एकतर, हरणाला जखमी करून ते गमावणे मला आवडत नाही; आणि दुसरे म्हणजे, मी ज्या प्रकारे निशाणा लावला होता तो बरोबर नव्हता, त्यामुळे देखील मी निराश झालो.

मी मक्याच्या शेतात उभा होतो आणि परत घराकडे जाऊ लागलो तेंव्हा, माझ्या मनात एक विचार आला. मला ते हरण सापडण्याची अजूनही शक्यता आहे. ह्या मक्याच्या शेतातून आणि पुढे दलदलीच्या भागातून घरी जाताना कदाचित मला अचानक हरण दिसेल. मी माझा बाण तयार केला. मक्याच्या शेतातील नाल्याच्या बाजूने मी हळू हळू जात असताना, अचानक एक हरण माझ्यासमोरून उडी मारून बाहेर पडले. मी नेमकी काय चीज आहे हे न कळल्यामुळे ते हरण थांबले आणि त्याने मागे वळून पाहिले. कारण मी छद्मवेश घातला होता, त्यामुळे त्याला मी दिसत नव्हतो पण मला जे दिसत होते ते हरण होते. हे सर्व एका क्षणात घडले. मला शिंगे दिसत होती, पण ते किती मोठे किंवा किती शिंगाचे आहे हे मला सांगता येत नव्हते. मला माहित होते की हरणाबद्दल माझे मत बनवण्यासाठी माझ्याकडे फक्त एक सेकंद होता. तो माझ्या धनुष्याच्या निशाणा बाहेर सुमारे 55 यार्ड अंतरावर होता आणि मला दिसेल अशा प्रकारे अगदी समोर उभा होता. मी पटकन बाण खेचला आणि त्याच्या पाठीच्या वरच्या भागावर निशाणा साधला आणि बाण सोडला. बाण लागताच हरण लगेच खाली पडला आणि तिथेच पडून राहिला. मी थोडा धक्का बसला आणि मी स्वतःशी म्हणालो. ते खरोखरच घडले का?

मी हरीणाजवळ जाताना, जे पहिले शब्द मी बोललो ते हे कि, "ड्रेंडाचा विश्वास!" हरीण खूप मोठा होता! मी त्याचे शिंगं मोजले ते 26 होते, आणि त्याची शिंगे ड्रॉप टायन्स होती, म्हणजे मुख्य शिंगांमधून काही शिंगे निघून खाली लोंबकळत होती. मी असा इतका मोठा हरीण कधीच पाहिला नव्हता. ते पाहून, मी रोमांचित झालो एवढेच म्हणणे खरोखर पुरेसे होणार नाही. तुम्ही अंदाज लावू शकता की, ते हरीण आता माझ्या ऑफिसमध्ये माझ्या डेस्कच्या मागच्या भिंतीवर वॉलमाऊंट म्हणून टांगलेले आहे. पण मला या हरणाबद्दल एक

मिनिट बोलायचे आहे. तो कसा आणि का आला?

माझा निशाणा चुकला होता तरी चार शिंगांचे हरण वेळेवर त्या ठिकाणी आले होते. पण ड्रेंडा म्हणाली होती की तिचा विश्वास मोठ्या हरणाची शिकार करण्याच्या बाबतीत आहे. आता, आता तिच्या बाबतीत एक गोष्ट ही आहे कि, ती हरणांची शिकार करत नाही म्हणून तिच्या हिशोबाने, मोठ्या हरणाची शिकार करणे हे चार शिंगांच्या हरणाची शिकार करण्या इतकेच सोपे आहे. तिच्यासाठी ते फक्त हरण आहे. ती शिकार करत नसल्यामुळे, मोठ्या हरणाची शिकार करणे किती कठीण किंवा अशक्य आहे असे वाद करणारे प्रश्न किंवा विचार उत्पन्न होत नाहीत. मी आमच्या घराच्या सभोवताली कधीही आठ शिंगांचे मोठे हरण पाहिले नव्हते, परंतु तिचा विश्वास घरासभोवताली काय आहे किंवा नाही यावर आधारित नव्हता. तिचा विश्वास होता की देव ते हरण त्याठिकाणी आणू शकतो. ही शिकार हरणांच्या प्रजनन हंगामात झाली, ज्याला रट म्हणतात, आणि अशा वेळेस हरणं मादा हरणींचा शोध घेण्यासाठी अनेक मैलांचा प्रवास करत असतात. म्हणून अशी शक्यता नेहमीच रट च्या दिवसांमध्ये तुम्हाला तुमच्या घराच्या परिसरात सामान्यतः न दिसणारे हरणं दिसू लागतील, जसे ह्या वेळेस माझ्या बाबतीत झाले.

## विश्वासात भागीदारी करणे

मी मोठ्या हरणाची शिकार करू शकेन ह्यावर माझा विश्वास नव्हता तरीही ड्रेंडाच्या विश्वासामुळे मला ती शिकार मिळाली. तुम्ही हे पुन्हा वाचावं असं मला वाटतं. मी मोठ्या हरणाची शिकार करू शकेन ह्यावर माझा विश्वास नव्हता! मला माहिती आहे तुम्ही काय विचार करत आहात. "थांबा, गॅरी. मी गोंधळलो आहे. जर तुम्हाला त्या हरणाची शिकार करण्या बाबत विश्वास नव्हता, तर ते हरण तुम्हाला का दिसले?" मी तुम्हाला स्पष्ट करून सांगतो.

> *नंतर असे झाले की, लोकसमुदाय त्याच्याभोवती गर्दी करून देवाचे वचन ऐकत असता तो गनेसरेत सरोवराच्या किनाऱ्याशी उभा होता. तेव्हा त्याने सरोवराच्या किनाऱ्याला लागलेले दोन मचवे पाहिले; त्यांवरील कोळी खाली उतरून जाळी धूत होते. त्या मचव्यांपैकी एक शिमोनाचा होता; त्यावर चढून तो किनाऱ्यापासून*

*थोडासा लोटावा म्हणून त्याने त्याला सांगितले. मग तो मचव्यात बसून समुदायांना शिक्षण देऊ लागला.*

*आपले बोलणे संपवल्यावर त्याने शिमोनाला म्हटले, "खोल पाण्यात हाकार; मग मासे धरण्यासाठी तुम्ही आपली जाळी खाली सोडा."*

*शिमोनाने त्याला उत्तर दिले, "गुरूजी, आम्ही सारी रात्र कष्ट करून काही धरले नाही, तरी आपल्या सांगण्यावरून मी जाळी सोडतो."*

*मग त्यांनी तसे केल्यावर माशांचा मोठा घोळका जाळ्यांत सापडला आणि त्यांची जाळी फाटू लागली. तेव्हा त्यांचे जे साथीदार दुसऱ्या मचव्यात होते त्यांनी येऊन आपल्याला साहाय्य करावे म्हणून त्यांनी त्यांना खुणावले. मग ते आल्यावर दोन्ही मचवे इतके भरले की ते बुडू लागले.*

—लूक 5:1-7

मला माहित आहे की तुम्हाला हा शास्त्रभाग आधीच माहित आहे, परंतु मला येथे असे काहीतरी दाखवायचे होते जे आपल्या प्रश्नाचे उत्तर देईल.

*जेव्हा त्यांनी येशूने सांगितले तसे केले, तेव्हा त्यांनी इतके मोठे मासे पकडले की त्यांची जाळी फाटू लागली. म्हणून त्यांनी दुसऱ्या होडीतील त्यांच्या साथीदारांना मदत करण्यासाठी येण्याचा इशारा केला आणि त्यांनी येऊन दोन्ही होड्या इतक्या भरल्या की त्या बुडू लागल्या.*

मी तुम्हाला एक प्रश्न विचारू इच्छितो. याकोब आणि योहान यांनी त्यांची होडी माशांनी भरून जावी यासाठी किती विश्वास धरला होता? ह्याचे उत्तर आहे - काहीच नाही! जर तुम्हाला आठवत असेल तर, पेत्राची होडी, तसेच याकोब आणि योहानाची होडी किनाऱ्यावर होती आणि येशू त्यांच्या जवळ आला तेंव्हा ते त्यांचे जाळे धूत होते. येशूने पेत्राला म्हटले उपदेश करण्यासाठी मला तुझी होडी वापरायला दे, आणि नंतर त्याला मासे

**मी नेहमीच म्हणतो की देवाची गुपिते तुमच्यासाठी लपलेली आहेत, तुमच्यापासून नाही! सैतान अंधारात राहतो आणि त्याला देवाच्या योजना माहित नाहीत.**

पकडण्यासाठी खोल पाण्यात जाळे टाकण्यास सांगितले. परिणामी, पेत्राने इतके मासे पकडले की त्याचे जाळे फाटू लागले आणि त्याची होडी बुडू लागली. पेत्राने किनाऱ्यावर असलेल्या त्याच्या साथीदारांना मासे होडीत भरण्यास मदत करण्यासाठी बोलावले. त्यांची होडी पेत्राच्या जाळ्यासारखीच भरली, इतकी भरली की मासे त्यामध्ये भरून वाहू लागले. माझा तुम्हाला प्रश्न आहे की, "याकोब आणि योहान यांनी त्यांची होडी माशांनी भरण्यासाठी किती विश्वास धरला होता?" पुन्हा एकदा उत्तर आहे - काहीच नाही. मग त्यांच्या होडीत पेत्राच्या होडीइतकेच मासे का भरले गेले? वरील शास्त्रभाग  त्या प्रश्नाचे उत्तर देतो; त्या ठिकाणी म्हटले आहे की ते भागीदार किंवा साथीदार होते.

कॉलिन्स इंग्लिश डिक्शनरीमध्ये भागीदाराची किंवा साथीदाराची व्याख्या अशी आहे: "एखादी व्यक्ती जी एखाद्या कृतीत किंवा प्रयत्नात दुसऱ्याशी सहभागी असते किंवा त्याच्याशी संबंधित असते; सहसा त्यांचा तोटा आणि नफा सामायिक करते."

भागीदारी ही एक कायदेशीर संस्था आहे आणि व्यवसायातील जोखीम, खर्च आणि नफ्यात त्यांचा वाटा सारखा असतो. म्हणून जेंव्हा पेत्राचा विश्वास येशूचे अनुसरण करत होता, तेंव्हा तो खरोखर येशूला केवळ होडीच नव्हे तर कायदेशीरपणे व्यवसाय उधार देत होता. तांत्रिकदृष्ट्या, याकोब आणि योहान यांच्याकडेही पेत्राने येशूला वापरण्यास दिलेल्या होडीचा एक भाग होता आणि त्यामुळे दोन्ही बोटी सारख्याच प्रमाणात भरल्या. तर मग कोणाच्या विश्वासामुळे ते पीक आले? अर्थात, ते पीक पेत्राचे होते. तोच म्हणाला होता, "प्रभु, आम्ही रात्रभर खूप कष्ट केले आहेत आणि काहीही पकडले नाही. पण तू म्हणतोस म्हणून मी जाळे टाकतो."

म्हणून याकोब आणि योहान यांनी पेत्राप्रमाणेच पीक घेतले, जरी त्यांनी त्या परिस्थितीत विश्वास ठेवला नव्हता तरी. तसेच ड्रेंडाच्या बाबतीतही घडले. आपण भागीदार आणि साथीदार आहोत आणि आपण एक आहोत. तिच्या विश्वासानेच त्या दिवशी ते मोठे हरण मिळाले. भागीदारीची ही संकल्पना एक शक्तिशाली आध्यात्मिक तत्व आहे हे आपण पाहू शकतो, जसे आपण या कथेत पाहिले आहे. पौलाने फिलिप्पैकरांच्या पुस्तकात भागीदारीच्या या तत्वाबद्दल सांगितले आहे.

*मला तुमची जी एकंदर आठवण आहे तिच्यावरून मी आपल्या देवाचे आभार*

*मानतो; पहिल्या दिवसापासून आजपर्यंत सुवार्तेच्या प्रसारात जी तुमची सहभागिता तिच्यामुळे मी तसे करतो; आणि तुम्हा सर्वांसाठी नेहमी प्रत्येक प्रार्थनेच्या वेळेस आनंदाने विनंती करतो. ज्याने तुमच्या ठायी चांगले काम आरंभले तो ते येशू ख्रिस्ताच्या दिवसापर्यंत सिद्धीस नेईल हा मला भरवसा आहे.*

*तुम्हा सर्वांविषयी मला असे वाटणे योग्यच आहे, कारण माझ्या बंधनात आणि सुवार्तेसंबंधीच्या प्रत्युत्तरात व समर्थनात तुम्ही सर्व माझ्याबरोबर कृपेचे भागीदार असल्यामुळे मी आपल्या अंतःकरणात तुम्हांला बाळगून आहे.*

—फिलिप्पैकरांस पत्र 1:3-7

पौल म्हणतो की त्याला फिलिप्पै येथील मंडळीची आठवण येते कारण त्यांच्या सेवेत त्यांनी सतत सहभाग घेतला होता. तो पुढे म्हणतो की त्यांच्या भागीदारीमुळे, आता ते देवाच्या सेवेत असलेल्या कृपेत सहभागी आहेत. कृपा म्हणजे देवाचे सामर्थ्य किंवा देवाची क्षमता जी पौलावर त्याला सोपण्यात आलेले काम पूर्ण करण्यासाठी दिली गेली होती. फिलिप्पै येथील मंडळी या कामाचा खर्च भागवत होती आणि याकोब आणि योहानप्रमाणे, त्यांना देखील त्या कामावर असलेल्या अभिषेक आणि कृपेत हिस्सा मिळाला. चला चौथ्या अध्यायात जाऊया, आणि भागीदारीमुळे निर्माण होणारा आश्चर्यकारक परिणाम तुम्हाला दिसेल.

तथापि माझ्या संकटात तुम्ही माझे सहभागी झालात हे ठीक केलेत. फिलिप्पैकरांनो, तुम्हांलाही ठाऊक आहे की, सुवार्तेच्या प्रारंभी, मी मासेदोनियाहून निघालो तेव्हा तुमच्यावाचून दुसऱ्या कोणत्याही मंडळीने माझ्याबरोबर देण्याघेण्याचा व्यवहार केला नाही; कारण मी थेस्सलनीकात होतो तेव्हादेखील तुम्ही एकदाच नाही तर दोनदा माझी गरज भागवली. मी दानाची अपेक्षा करतो असे नाही; तर तुमच्या हिशेबी जमेची बाजू वाढावी अशी इच्छा धरतो. मला सर्वकाही आहे व ते विपुल आहे; एपफ्रदीताच्या हाती तुम्ही जे पाठवले त्याने मी भरून गेलो आहे. ते जणू काय सुगंध, देवाला मान्य व संतोषकारक यज्ञ, असे आहे. माझा देव आपल्या संपत्त्यनुरूप तुमची सर्व गरज ख्रिस्त येशूच्या ठायी गौरवाच्या द्वारे पुरवील.

—फिलिप्पैकरांस पत्र 4:14-19

फिलिप्पै येथील मंडळीला पौल काय म्हणतो ते लक्षपूर्वक ऐका, “माझा देव तुमच्या सर्व

गरजा पूर्ण करील." लक्षात घ्या की पौलाने असे म्हटले नाही की, "तुम्ही माझ्यावर उदारता दाखवली आहे म्हणून तुमचा देव तुमच्या गरजा पूर्ण करील." नाही! तो म्हणाला, "माझा देव आता तुमच्या गरजा पूर्ण करील!" तुम्ही पहा, फिलिप्पै येथील लोक पौलाचे भागीदार होते आणि भागीदार म्हणून त्यांनी पौलाच्या कामातील कृपेत भाग घेतला. आता, जसे याकोब आणि योहान पेत्राच्या विश्वासामुळे ते सर्व मासे पकडू शकले, तसेच पौल ह्या ठिकाणी घोषित करत आहे की त्यांच्या गरजा त्याच्या विश्वासामुळे पूर्ण होतील! मला आशा आहे की तुम्हाला या तत्त्वा मध्ये काय फायदा आहे ते दिसेल.

समजा गाडीची किंमत $30,000 आहे. आता, जेव्हा तुम्ही Garykeesee.com मध्ये बी पेरता तेव्हा तुम्हाला भागीदारीचा अर्थ समजतो. तुम्ही आमच्या सेवेतील अभिषेक आणि कृपेत सहभागी होता. एक सेवकाई म्हणून, आम्ही त्या $30,000 वर सहजपणे सहमत होऊ शकतो कारण आम्हाला देखील खूप पूर्वी $30,000 ची गरज होती आणि आम्ही त्या गरजेच्या काळातून गेलो आहोत. आम्ही आता दरवर्षी लाखो खर्च करतो त्यामुळे $30,000 साठी आम्ही सहजपणे विश्वास ठेवू शकतो. पण त्या काळात, मला आठवते की $30,000 साठी देवावर विश्वास ठेवणे, अगदी मोठा डोंगर असल्या सारखे वाटत होते. म्हणून जर तुम्ही मला विचारले की मी $30,000 साठी देवावर विश्वास ठेवू शकतो का, तर उत्तर "अगदी ठेऊ शकतो" असे आहे.  म्हणून पौलाप्रमाणे, जेव्हा आपण सहमत असतो आणि आपण भागीदार असतो, तेव्हा मी घोषित करू शकतो की तुमची गरज तुमच्या विश्वासामुळे नाही तर माझ्या विश्वासामुळे पूर्ण झाली आहे.

म्हणून हे अगदी स्पष्ट आहे कि, जेव्हा तुम्ही ते $30,000 प्राप्त होण्या साठी आपले विश्वासाचे बीज पेरता तेव्हा तुम्हाला विश्वासात असणे आवश्यक आहे, आणि तुम्हाला केवळ देवाच्या वचनावरच नाही तर माझ्यावरही विश्वास असणे आवश्यक आहे. तुमचा माझ्यावर विश्वास असला पाहिजे कि, मी देवाचा अभिषिक्त आहे आणि त्याने मला पाचारण केलेले आहे, मी सचोटीने काम करतो आणि तुम्हाला माझ्या जीवनात आणि माझ्या सेवेत त्याचे प्रत्यक्ष परिणाम दिसले पाहिजेत. जर तुम्हाला हे माहित असेल कि  आम्ही काय करतो आणि आम्ही कुठून आलो आहोत तर तुम्हाला कळेल की माझा विश्वास आहे कि तुम्हाला ते $30,000 मिळतील! तुमचा कदाचित विश्वास नसेल कि तुम्हाला ते $30,000 मिळू शकतील, परंतु आपण भागीदारीत एकत्र काम करू शकतो आणि आश्चर्यकारक गोष्टी

घडतांना पाहू शकतो. मोठ्या हरणाची शिकार करतांना देखील असेच झाले. मी शिकारीला जाण्यापूर्वीच्या रात्री ड्रेंडा म्हणाली, "तुम्ही हरणासाठी विश्वास ठेवता आणि मी मोठ्या हरणासाठी विश्वास ठेवेन." भागीदारी अशा प्रकारे कार्य करते.

## धोरणात्मक भागीदारी निवडणे

तर मी तुम्हाला एक प्रश्न विचारून काही मूलभूत नियम सांगतो. जर तुम्ही संगणक कंपनी सुरू करणार असाल, तर तुम्ही अशा एखाद्या व्यक्तीला तुमचा भागीदार बनवाल का जो संगणक विज्ञानाच्या पहिल्या सत्रात शिकत आहे आणि त्याच्याकडे पैसे नाहीत, किंवा असा व्यक्ती ज्याने कोट्यवधी डॉलर्सचा संगणक व्यवसाय उभारलेला आहे आणि तुमची कंपनी उभारण्यासाठी आर्थिक मदत करण्यासाठी त्याच्या कडे आवश्यक तितके पैसे आहेत? अर्थात, ह्या मध्ये इतर अनेक गोष्टींचा समावेश असू शकतो पण मी फक्त एक उदाहरण देत आहे. पण मला वाटते की वरकरणी पाहता हे अगदी स्पष्ट आहे कि तुम्ही अशा व्यक्तीची निवड कराल ज्याला ह्या क्षेत्रात अनुभव आहे, ज्याचा ट्रॅक रेकॉर्ड अगदी कायदेशीर आहे आणि तो आपल्या व्यवसायात अशाच प्रकारे टिकून राहणार आहे!

तर, जेंव्हा तुम्हाला एखाद्या सेवकाई च्या भागीदारीत पेरणी करायची असते तेव्हा देखील हेच खरे आहे. देवाने तुम्हाला कोणाशी भागीदारी करण्यासाठी स्पष्ट मार्गदर्शन करत असेल तर मी जे म्हणत आहे त्या विषयी गोंधळून जाऊ नका. देवाकडून सरळ आणि स्पष्टपणे आलेले मार्गदर्शन हे मी ज्याबद्दल बोलत आहे त्यापेक्षा वेगळे आहे. बऱ्याचदा, देव तुम्हाला त्याच्या विशिष्ट कामांमध्ये भागीदारी करण्यास प्रेरित करेल, पण कधीकधी तुम्हाला स्वतः निवड करावी लागते. मी विशेषतः अशा पेरणी बद्दल बोलत आहे जेव्हा तुम्ही पुढील उन्नतीच्या स्तरावर जाण्याची इच्छा बाळगता तेंव्हा पेरणी करणे तुमची स्वतःची निवड आहे. मला माहित आहे की मी माझ्या स्वतःच्या जीवनात आवश्यक असलेली आर्थिक सहायता त्वरित मिळण्या साठी अशा सेवकाई मध्ये पेरणी करतो ज्यांच्या कामांवर माझा विश्वास आहे. ज्या वेळेस मला गरीब किंवा गरजूंची मदत करण्याची प्रेरणा पण सेवकाई मध्ये बी पेरणी करण्याचे स्पष्ट मार्गदर्शन असते तेंव्हा मी एक नियम मोडत नाही तो म्हणजे मी नेहमीच अशा कामात पेरतो ज्यांना विश्वास आणि करार काय आहे हे निश्चितपणे माहित आहे. अर्थात, आम्ही गरीब आणि गरजूंची मदत करत असतांना ही अपेक्षा करत

नाही कि विश्वास काय आहे हे त्यांना समजणे आवश्यक आहे. आम्ही त्यांच्यामध्ये प्रेमाची पेरणी करतो हे जाणून कि देव आम्हाला त्याची परतफेड करेल. आणि हे लक्षात घ्या कि, गरिबांसाठी पेरणी करणे हे आम्ही येथे जे बोलत आहोत त्या पेरणीपेक्षा वेगळ्या प्रकारची पेरणी आहे. पेरणी करताना मी आणखी एक गोष्ट बघण्याचा प्रयत्न करत असतो ती म्हणजे ज्या सेवकाई मध्ये मी पेरणी करत आहे त्या सेवकाईची फळे तीच आहेत जी देव मला देणार आहे असा माझा विश्वास आहे.

उदाहरणार्थ, माझ्या कंपनीकडे दोन विमाने आहेत. आणि त्या दोन्ही विमानांची खरेदी करण्यापूर्वी, मी देवाच्या अशा सेवकाई मध्ये पेरणी केली, ज्यांच्या बद्दल मला माहित होते की ज्यांनी विमान खरेदी साठी कोट्यवधी डॉलर्स खर्च केले होते. जेव्हा मी अनेक म्हणतो तेव्हा माझा अर्थ अनेक असतो आणि त्या सर्वांसाठी रोख रक्कम दिली गेली होती. विमान खरेदी करण्या बाबतीत त्यांचा परिणाम पुराव्या सह मी पहिला होता. मला माहित होते की माझे विमान खरेदी करण्या साठी ते माझ्या सोबत विश्वासात  सहजपणे सहमत होऊ शकतात आणि ते पूर्ण होण्यासाठी विश्वास ठेवू शकतात. मी अशा सेवकाई सोबत भागीदारी करणार नव्हतो जे असे म्हणतील की विमान खूप महाग आहेत किंवा ती विकत घेणे योग्य नाही. ही अजिबातच आपसातील सहमती नाही. पण, मी अशा सेवकाई सोबत सहमत होऊ इच्छित होतो जे हे समजून घेतील कि माझा विश्वास काय आहे, विमान खरेदी करण्या साठी माझ्या सोबत देवावर विश्वास ठेऊ शकतील आणि त्यांच्या जीवनात त्यांनी आपला विश्वास पूर्ण होण्याचा अनुभव घेतला आहे.

मी वयाच्या 19 वर्षांचा होतो तेंव्हा पासून पायलट आहे आणि ग्रामीण भागात  3,000 फूट उंच रेतीच्या धावपट्टीवरून उड्डाण करायला शिकलो आहे. मी आयुष्यभर विमाने भाड्याने घेतली, पण एके दिवशी मला वाटले, अरे, तुला माहिती आहे काय? मला फक्त एक बी पेरले पाहिजे आणि माझ्या स्वतःच्या विमानासाठी देवावर विश्वास ठेवला पाहिजे. आणि, मी अगदी तसेच केले. मला माहित होते कि मला नेमके कोणत्या विमाना साठी बी पेरायचे आहे. म्हणून मी माझ्या चेकवर त्याच विमाना बद्दल लिहिले आणि ड्रेंडा आणि मी त्यावर सहमत झालो. मग आम्ही तो चेक मी आताच ज्या सेवकाई बद्दल सांगितले त्यांना पाठवला.

ह्या गोष्टीला जवळजवळ एक महिना झाला आणि मला माझ्या डॉक्टरां कडे नियमित चेक अप साठी गेलो. त्या दिवशी डॉक्टरांशी बोलत असताना, त्यांनी सहजतेने म्हटले,

"तुम्हाला कोणी व्यक्ती माहित आहे का ज्याला विमान खरेदी करायचे आहे?" हा प्रश्न ऐकून मला थोडे आश्चर्य वाटले कारण माझ्या आयुष्यात मला कधीही कोणी विचारले नव्हते की मला विमान खरेदी करायचे आहे का. म्हणून मी विचारले की ते कोणत्या प्रकारचे विमान आहे आणि ते अगदी तेच विमान होते ज्यासाठी मी माझे बी पेरले होते. आणि त्या कडे माझे लक्ष वेधले गेले. मी गेलो आणि ते विमान पाहिले, मालकाशी संपर्क साधला आणि तो मला विमानाची सैर करायला घेऊन गेला. ते अगदी उत्तम विमान होते. फक्त एकच समस्या होती. त्यावेळी, माझ्याकडे ते खरेदी करण्या साठी पैसे नव्हते. पण देवाची एक योजना होती.

मागच्या शरद ऋतूत, मार्च महिन्यात, मी माझ्या वडिलांकडून एक घर घेतले होते आणि मी वसंत ऋतूमध्ये त्या घराची डागडुजी करून तिथे ऑफिस बनवणार होतो. माझ्या वडिलांनी मला सांगितले होते की त्यांनी त्या इमारती मधील सर्व नळ हिवाळ्यापूर्वी बंद केले होते, म्हणून मी ते खरंच बंद आहेत कि नाही हे कधीही जाऊन पाहिले नाही. मी विमान पाहिल्यानंतर काही दिवसांनीच, माझ्या भावाने फोन केला आणि सांगितले की माझे घर उद्ध्वस्त झाले आहे. त्यानंतर त्याने मला सांगितले की घरातील सर्व ड्रायवॉल उद्ध्वस्त झाली आहे आणि भिंतींवरून पापड्या निघून पडत आहेत. तर परिस्थिती अशी होती कि, नळ बंद केले गेले नव्हते आणि हिवाळ्यात नळाचे पाणी गोठले होते. आता मार्च महिना होता आणि उष्णता वाढत होती, गोठलेले पाणी वितळले आणि घरात वाहू लागले आणि आम्हाला कोणालाच कल्पना नव्हती कि हे किती वेळ पासून होत होते, किमान काही आठवडे तरी हे होत राहिले असावे.

माझ्या भावाला हे माहित नव्हते की मी आधीच त्या घराच्या डागडुजी साठी एका बांधकाम कंपनीसोबत करार केला होता आणि त्यात संपूर्ण घराचा ड्रायवॉल आणि बाहेरील साइडिंग काढून टाकण्याचा समावेश होता. हे घर माझ्या नवीन ऑफिस कॉम्प्लेक्समध्ये रूपांतरित करण्यासाठी पुनर्बांधणी प्रक्रियेचा तो एक भाग होता. आता, इथेच एक छान गोष्ट घडली. विमा कंपनीने पाण्याच्या नुकसानीसाठी दावा भरला आणि तीच रोख रक्कम मी माझ्या विमानासाठी वापरली. मी माझे विमान रोख रक्कम देऊन खरेदी केले!

म्हणून लक्षात ठेवा, भागीदारी ही एक शक्तिशाली आध्यात्मिक तत्व आहे ज्याची तुम्हाला जाणीव असायला हवी म्हणजे तुम्ही त्याचा फायदा घेऊ शकाल.

विश्वासात असताना बी पेरण्या बद्दलची आपली चर्चा येथे संपते. तर आता तुम्ही जर बी पेरले आहे, तर पुढे काय होते? मी अगदी खात्रीने सांगतो, बहुतेक लोकांना हे माहित नाही, कारण अनेक ख्रिस्ती लोक पेरणी करतात परंतु त्यांच्या दानाचा कोणतेही प्रतिफळ किंवा परिणाम त्यांना दिसत नाही. तुमची कापणी येईपर्यंत निवांत बसून लिंबूपाणी पिण्याची ही वेळ आहे का?

तुम्ही असे अजिबात करू नये! तुम्ही काय करायला हवे याबद्दल आपण पुढील प्रकरणात चर्चा करू.

## अध्याय 8

# तुम्हाला योजनेची आवश्यकता आहे!

जेव्हा ब्रॅड आणि चॅरिटी पहिल्यांदा आमच्या चर्चमध्ये आले तेव्हा मी त्यांना खरोखर ओळखत नव्हतो. मला आठवते की आम्ही एकमेकांना भेटून थोडेफार औपचारिक संभाषण करत होतो. ते जेंव्हा ड्रेंडाच्या महिला परिषदेला आले तेंव्हा पहिल्यांदा माझे विशेष लक्ष त्यांच्या कडे वेधले गेले. ही परिषद गुरुवारी रात्री सुरू होऊन शनिवारी दुपारी संपत असे. त्यानंतर उपस्थित असलेले बरेच लोक आमच्या शनिवारी संध्याकाळच्या चर्च उपासने साठी थांबायचे. याच दिवशी उपासने नंतर ब्रॅड आणि चॅरिटी आपली एक विनंती घेऊन आमच्या कडे आले. त्यांना व्यवसाय सुरू करायचा होता आणि त्यांनी विचारले की आम्ही त्यांचे विश्वासाचे बीज आमच्या सेवेसाठी स्वीकारून त्यांच्या व्यवसायासाठी  प्रार्थना करू शकता का.

मला नंतर कळले की चॅरिटीने महिला परिषदेत आफ्रिकन-अमेरिकन लोकांच्या कुरळ्या केसांसाठी तिच्या हाताने बनवलेल्या केसांच्या उपचारांची विक्री करण्यासाठी एक बूथ भाड्याने घेतला होता. तिने परिषदेत टेबल $150 ला भाड्याने घेतले होते आणि तिने $350 किमतीचे उत्पादन विकले, ज्यातून तिला $200 नफा झाला होता. शनिवारी संध्याकाळी उपासनेत, ते दोघेही $200 घेऊन पुढे आले आणि त्यांच्या व्यवसायाच्या वाढीसाठी ते आमच्या सेवकाई मध्ये बी पेरण्याची इच्छा प्रगट केली. मी म्हणालो, "अगदी नक्की," आणि आम्ही प्रार्थना केली. मी याबद्दल फारसा विचार केला नव्हता, परंतु मी त्यांच्या डोळ्यात उत्साह पाहू शकलो आणि जेव्हा त्यांनी त्यांचे बीज मोकळे केले तेव्हा मी निश्चितपणे सांगू शकतो कि त्या बाबतीत त्यांनी विश्वास धरला होता.

ब्रॅड आणि चॅरिटीबद्दल मी थोडीशी माहिती देऊ इच्छितो, त्यावेळी ब्रॅड एका कंपनीत आयटी मॅनेजर होता आणि चॅरिटी अर्धवेळ काम करून प्रति तास $10 कमवत होती, त्यांचे कुटुंब दर आठवड्याला मिळणाऱ्याला चेक वर चालणारे होते. कॉन्फरन्सनंतर, त्यांनी

त्यांचे उत्पादन मित्रांना आणि काही ऑनलाइन विकणे सुरू ठेवले परंतु त्यांनी सांगितले की त्यांच्या व्यवसायत वाढ होत नव्हती. परंतु देव त्यांच्या भविष्यातील वाढीची तयारी करण्यासाठी पडद्यामागे काम करत होता.

ते तयार करत असलेल्या उत्पादनात शहामृग तेल हा एक प्रमुख घटक होता, जो त्यांनी कॅलिफोर्नियातील एका शहामृग शेतकऱ्याकडून खरेदी केला होता, आणि आता तो व्यक्ती त्यांना आपली कंपनी विकू इच्छित आहे हे त्यांना कळले. त्या कंपनीची किंमत $40,000 होती. चॅरिटीला माहित होते की ही त्यांच्या कंपनीच्या भविष्यातील वाढीसाठी एक उत्तम संधी आहे, परंतु ब्रॅड आणि चॅरिटीकडे $40,000 नव्हते, इतकेच नाही तर काहीच पैसे नव्हते. कॅलिफोर्नियातील कंपनीला जाऊन भेटण्यासाठी त्यांच्याकडे विमानाच्या तिकिटांसाठी पुरेसे पैसे होते, पण बस तेवढेच पैसे त्यांच्या कडे होते. ब्रॅड म्हणाला जसजसा तो कॅलिफोर्नियाच्या जवळ पोहचू लागला तसतसा तो अधिक घाबरू लागला. तो विचार करत होता कि तो त्या कंपनीच्या मालकाला कसे सांगणार कि त्यांच्याकडे पैसे नाहीत आणि पती पत्नीने एकमेकांना वचन दिले होते की ते त्यांच्या व्यवसायासाठी कोणतेही पैसे उधार घेणार नाहीत? जेव्हा ते कॅलिफोर्नियाला पोहोचले तेव्हा शेतकऱ्याने त्यांना संपूर्ण फिरवून दाखवली पण नंतर त्यांना सांगितले की त्याला तेल कंपनी खरेदी करण्या साठी आधीच एक खरीददार मिळाला आहे. स्पष्ट दिसत होते कि आता काही उपाय राहिलेला नाही. पण कंपनीच्या मालकाने ब्रॅडला त्याच्यासाठी काही आयटी काम करण्यास सांगितले, आणि ब्रॅडने ते स्वीकारले.

काम करण्याच्या त्या काळात, ब्रॅड आणि चॅरिटीचे मालकाशी चांगले संबंध निर्माण झाले; आणि एके दिवशी, त्याने सांगितले की त्याने व्यवसाय त्यांना विकण्याचा निर्णय घेतला आहे. त्याने व्यवसायासाठी त्यांच्या कडून पैसे घेतले आणि ती शहामृग तेल कंपनी ब्रॅड आणि चॅरिटीच्या मालकीची झाली. याच सुमारास ब्रॅड आणि चॅरिटीने आम्ही फेथ लाइफ चर्चमध्ये सुरू केलेल्या एका बांधकाम प्रकल्पाबद्दल ऐकले आणि त्यांच्या मनात काहीतरी नवीन आले. त्यांनी पहिले कि त्यांनी आधी पेरलेल्या विश्वासाच्या बीजा मुळे त्यांच्या व्यवसायात पूर्णपणे बदल घडून आला होता आणि आता त्यांना माहित होते की पुन्हा एकदा विश्वासाचे बी पेरून व्यवसायाला पुढील स्तरावर नेण्याची वेळ आली आहे. पुन्हा एकदा, ब्रॅड आणि चॅरिटी चर्चमध्ये समोर आले आणि त्यांच्या व्यवसायासाठी एक

ध्येय समोर ठेऊन बीज पेरले. ते त्यांच्या वैयक्तिक पैशासाठी पेरत नव्हते तर आपण चर्च च्या बांधकाम प्रकल्पा साठी सहा आकडी रक्कम देण्या साठी सक्षम व्हावे ह्या ध्येया ने पेरणी करत होते.

थोडक्यात सांगायचे तर, उत्पादनात पुन्हा एक मोठा बदल झाला आणि देवाने त्यांच्या उत्पादनात शामिल करण्या साठी एक नवीन घटकाचा पुरवठा केला ज्या मुळे त्यांचे उत्पादन आणखी उत्तम झाले आणि ते आफ्रिकन-अमेरिकन लोकांच्या कुरळ्या केसांसाठी परिपूर्ण उत्पादन बनले. उत्पादनाने चांगली लोकप्रियता मिळवली. आणि काही वेळातच, त्यांनी बांधकाम प्रकल्पाला सहा आकडी रक्कम दिली. आता, ते संपूर्ण आफ्रिकेती आपला प्रकल्प चालवत आहेत आणि त्यांचे उत्पन्न  सात आकडीं रक्मे पेक्षा जास्त झाले आहे. हे सर्व तीन वर्षांच्या कालावधीत घडले. तीन वर्षांत प्रति तास $10 वरून लाखो डॉलर्सपर्यंत जाण्याची ही किती अविश्वसनीय कहाणी आहे! व्वा!

ही एक उत्तम कहाणी आहे आणि देव तुमच्यासोबत तुमच्या गरजा पूर्ण करण्यासाठी आणि तुमचा प्रभाव निर्माण करण्यासाठी कसा काम करतो याचे एक उत्तम उदाहरण आहे. मला सर्वात आधी जे लक्षात आले ते म्हणजे राज्यासाठी त्यांचे मन आणि त्यांच्या कंपनीचा उद्देश, जो देवाच्या राज्याला आर्थिक मदत करणे आहे. दुसरे म्हणजे, त्यांनी देवासोबत कंपनीची रचना, उत्पादन आणि योजना मुळात शून्यातून विकसित करण्यासाठी कसे काम केले.  कोणतेही महत्त्वाचे काम करू इच्छिणाऱ्या प्रत्येकाने ह्या कहाणी द्वारे प्रेरणा घेतली पाहिजे आणि हे समजले पाहिजे कि तुमच्याकडे किती पैसे आहेत किंवा तुम्ही सुरुवात करताना काय जाणता यावर हे अवलंबून नाही. देव तुमच्यासोबत तुमच्या ह्या प्रवासात सातत्याने काम करेल.

हे मला देवाने शिकवलेल्या राज्याच्या चौथ्या तत्वाकडे घेऊन जाते, आणि ते म्हणजे तुम्ही विश्वासाचे बी पेरल्यानंतर आणि ते मुक्त केल्या नंतर, तुम्हाला योजना मिळण्या साठी लक्ष देऊन ऐकावे लागेल.

## पायरी #4: तुमच्या विश्वासाची पेरणी केल्या नंतर आणि ते मुक्त केल्या नंतर, तुम्हाला एक योजनाची आवश्यकता आहे.

*त्याने त्यांना उत्तर दिले, “तुम्हीच त्यांना खायला द्या.”*

*ते त्याला म्हणाले, “काय, आम्ही जाऊन दोनशे रुपयांच्या भाकरी विकत घेऊन त्यांना खायला द्याव्यात?”*

*तो त्यांना म्हणाला, “तुमच्याजवळ किती भाकरी आहेत? जाऊन पाहा.*

*पाहिल्यावर ते म्हणाले, “पाच, व दोन मासे.”*

*नंतर त्याने त्या सर्व लोकांना हिरवळीवर गटागटाने बसायला सांगितले. तेव्हा ते शंभरशंभर व पन्नासपन्नास असे पंक्तीपंक्तीने बसले. मग त्याने त्या पाच भाकरी व ते दोन मासे घेऊन वर स्वर्गाकडे पाहून आशीर्वाद दिला आणि भाकरी मोडल्या व त्या त्यांना वाढण्यास आपल्या शिष्यांजवळ दिल्या. ते दोन मासेही सर्वांना वाटून दिले. मग सर्व जण जेवून तृप्त झाले. आणि त्यांनी उरलेल्या तुकड्यांच्या बारा टोपल्या भरून घेतल्या आणि माशांचेही तुकडे नेले. भाकरी खाणारे [सुमारे] पाच हजार पुरुष होते.*

—मार्क 6:37-44 (GNT)

येशूने शिष्यांना मासे आणि भाकरी वाढण्याआधीच अंमलबजावणीची योजना दिली. म्हणून, हे समजून घ्या. एकदा तुम्ही विश्वासात बी पेरले की, तुम्हाला पवित्र आत्म्याकडून योजना प्राप्त करावी लागेल. हे करण्याचा सर्वोत्तम मार्ग म्हणजे आत्म्याने प्रार्थना करण्यात वेळ घालवणे. देवाकडून ऐकल्याशिवाय तुम्ही कोणतेही निर्णय घेऊ नयेत किंवा स्वतःच्या शक्तीने सुरुवात करू नये. याची अनेक कारणे आहेत. प्रथम, तुम्ही तुमच्या शक्तीने जेंव्हा हे करण्याचा प्रयत्न कराल तेंव्हा तुमचे विचार खूप तोकडे असतील आणि तुम्ही त्या प्रमाणेच कार्य कराल. दुसरे म्हणजे, जेंव्हा देव तुम्हाला नवीन दिशेने नेऊ इच्छित असेल तेव्हा तुम्ही तुम्हाला तुमच्या बुद्धीने माहित असलेल्या गोष्टींभोवती योजना तयार करण्याचा प्रयत्न करू लागाल. तुम्ही आधीच जे जाणता त्याचा उपयोग करून तुम्ही पाहिला आहे पण आता तुम्हाला नवीन कल्पना आणि तुमची कापणी बदलण्याच्या योजनेची आवश्यकता आहे. म्हणून, नवीन कल्पना आणि योजनेसाठी प्रभूची वाट पहा. ती कुठूनही येऊ शकते. तुम्हाला एखादी जाहिरात दिसू शकते, एखाद्या व्यक्तीची भेटू होऊ

**एकदा तुम्ही विश्वासात बी पेरले की, तुम्हाला पवित्र आत्म्याकडून योजना प्राप्त करावी लागेल.**

शकते किंवा माझ्यासारखे स्वप्न पडू शकते. देव तुमचे लक्ष वेधून घेईल आणि तुमची नवीन योजना तयार करण्यास मदत करेल. हे इतके महत्त्वाचे का आहे याचे मी तुम्हाला एक उदाहरण देतो.

## योजनेची ताकद

मी कदाचित माझ्या "तुमची आर्थिक क्रांती" ह्या पुस्तकांच्या मालिकेतील एका पुस्तकात हे उदाहरण दिले असेल, पण ते पुन्हा पुन्हा सांगावेसे वाटते. जर मी तुम्हाला सांगितले की मी तुमच्या सर्व आर्थिक समस्या पुढील काही शब्दांत सोडवू शकतो, तर तुम्ही लेखणी घेऊन तपशीलांसाठी बसाल याची मला खात्री आहे. तर, तयार राहा कारण तुमचे उत्तर येथे आहे. या वर्षी $10 दशलक्ष निव्वळ उत्पन्न मिळवा. हो, मी म्हणत आहे की हे वर्ष संपण्यापूर्वी $10 दशलक्ष निव्वळ उत्पन्न मिळवा. बहुतेक लोकांसाठी, ह्या मुळे त्यांचे आर्थिक व्यवहार सुरळीत पणे चालतील.

काय? मला बाहेर हसण्याचा आवाज येतो का? तुम्ही हसताय का? जेव्हा मी माझ्या प्रेक्षकांमधील लोकांना हे करायला सांगतो तेव्हा मला सभागृहात हसण्याचा आवाज ऐकू येतो. मग मी विचारतो की ते का हसत आहेत. ते हसत आहेत कारण त्यांच्यासाठी तो विनोद आहे; ते शक्य नाही. मग मी त्यांना म्हणतो की जर मी वर्षासाठी उत्पन्नाचे ध्येय कमी केले तर ते हसणे थांबवतील आणि म्हणतील, "हो, आम्ही ते करू शकतो."

तर, तुमचे हसणे कुठे थांबणार आहे, $600,000 प्रति वर्ष? तुम्ही स्वतःला कुठे पाहता, $200,000 किंवा $100,000 प्रति वर्ष? कदाचित तुमची संख्या खूपच कमी असेल, कदाचित $45,000 प्रति वर्ष. $10 दशलक्ष ते $0 प्रति वर्षाच्या दरम्यान कुठेतरी, तुम्हाला एक अशी संख्या मिळेल जिथे तुम्ही म्हणाल, "मला वाटते की मी ते करू शकतो." आणि ह्याच ठिकाणी समस्या आहे; तुम्ही तिथेच राहाल. हे समजून घ्या, कोणीही व्यक्ती त्यांना अशक्य वाटणारी कोणतीही गोष्ट करण्याचा प्रयत्न करत नाही. तर, समस्या हीच आहे. तुम्ही तुमच्या स्वतःच्या विचारांनी बांधलेले किंवा मर्यादित आहात.

आता, मी तुम्हाला योजनेची ताकद दाखवतो. चला मी जे आत्ता बोललो तेच पुन्हा पाहू या, की जर तुम्ही या वर्षी 10 दशलक्ष डॉलर्सची कमाई केली तर तुमच्या सर्व आर्थिक समस्या सुटतील. पण यावेळी, मी तुम्हाला काही पैसे कमवण्यासाठी एक करार देणार

आहे. तुम्ही एका बॉक्स मध्ये एक बॉल टाका, तो टेप लावून चांगला बंद करा आणि पोष्टाने पाठविण्या साठी तयार करा आणि मी त्या बॉक्स साठी तुम्हाला 500 डॉलर्स देईन. समजा तुम्ही तासाला 100 बॉक्स तयार केले किंवा तासाला 50,000 डॉलर्सची कमाई केली. समजा तुम्ही दिवसाला 10 तास अविरत काम करून 500,000 डॉलर्सची कमाई केली. आता, जर मी म्हणतो की वर्ष संपण्यापूर्वी 10 दशलक्ष डॉलर्सची कमाई करू शकाल, तेव्हा तुम्ही काय म्हणाल? "सोपे! त्यासाठी फक्त 20 दिवस काम करावे लागेल." ठीक आहे, तर आता मी तुम्हाला विचारतो की ह्या ठिकाणी काय बदलले. आता तुमच्याकडे अशी योजना आहे ज्या प्रमाणे काम केले तर तुम्ही तुमचे वार्षिक 10 दशलक्ष डॉलर्सचे उत्पन्न मिळवण्याचे ध्येय साध्य कराल याची हमी मिळते.

समजले का? जर तुमच्या स्वतःच्या कल्पनेवर सोडले असते, तर तुम्हाला कदाचित तुमचे ध्येय शक्य आहे असे कधीच वाटले नसते आणि तुम्हाला जे शक्य वाटले त्यावर तुम्ही समाधान मानले असते. पण तुम्हाला तुमच्या मताची गरज नाही; तुम्ही त्या मर्यादित जगात खूप काळापासून राहत आला आहात. नाही, स्वप्न पाहण्यास मदत करण्यासाठी तुम्हाला पवित्र आत्म्याची आवश्यकता आहे.

## देवाकडे तुमच्यासाठी एक योजना आहे.

आमच्या भयानक आर्थिक परिस्थितीबद्दल आणि आर्थिक अडचणींमुळे मला झालेल्या पॅनिक अटॅक आणि नैराश्याबद्दल मी तुम्हाला आधी पुस्तकात सांगितले आहे. जेव्हा मी राज्यानुसार जीवन जगण्याची पद्धत शिकू लागलो तेव्हा देवाशिवाय इतर कुठेही जाण्याचा मार्ग माझ्याकडे नव्हता. तो माझ्याशी बोलला आणि मला फॉरवर्ड फायनान्शियल ग्रुप सुरू करण्याची आणि लोकांना कर्जातून कसे बाहेर पडायचे हे दाखवण्याची योजना दिली. ते मूर्खपणाचे आहे! मला आठवते की त्यावेळी मी माझ्या घरात बसून तो मला काय करायला सांगत होता याचा विचार करत होतो आणि स्वतःला विचारत होतो, "हेच, मी माझ्या जीवनात कसे लागू करावे हे मला स्वतःला सांगण्याची गरज आहे." पण त्याने उत्तर दिले की जर मी ह्या योजने प्रमाणे चालत गेलो तर कर्जातून बाहेर पडेन.

जेव्हा मी आणि ड्रेंडा ने देवाने दिलेल्या योजनेवर काम सुरू केले, तेव्हा आमच्याकडे कोणतेही उपकरण नव्हते, संगणक नव्हते, काहीही नव्हते. पण जेव्हा आम्ही योजना

पाहिली तेव्हा मला माहित होते की ती कार्य करेल; मला माहित होते की ते शक्य आहे. आणि योजनेचा अर्थ आहे, योजना सुरू करण्याच्या संदर्भात त्याने आम्हाला दाखवलेली रणनीती आणि तपशील. मी ते करू शकलो! खरं तर, मला ते करायला आवडते.

ब्रॅड आणि चॅरिटीच्या बाबतीत जे झाले अगदी तसेच, देवाने आम्हाला आवश्यक असलेली सर्व स्टार्ट-अप उपकरणे पुरवली. माझ्या वडिलांचे पिझ्झा शॉप होते आणि त्यांना संगणकाची गरज नव्हती, अद्भुत रित्या, एके दिवशी, त्यांनी मला म्हटले की त्यांना एक संगणक खरेदी करायचा आहे आणि मला त्यांच्या सोबत जाण्याची विनंती केली. म्हणून आम्ही गेलो आणि त्यांचा संगणक आणि एक वर्ड प्रोसेसिंग प्रोग्राम विकत घेतला आणि ते म्हणाले की मी त्याचा वापर करू शकतो. हे समजून घ्या, मला संगणकांबद्दल काहीही माहिती नाही. माझे वडील माझ्यापासून रस्त्याच्या दुसऱ्या बाजूला एक मैल अंतरावर राहत होते आणि मी त्या संगणक आणि प्रोग्रामवर काही तरी करण्याचा प्रयत्न करू लागलो, आणि हे करता करता मी कर्ज कसे फेडायचे याबद्दल एक उत्तम क्लायंट प्रेझेंटेशन तयार केले. माझ्याकडे पैसे नसताना देवाने माझ्या साठी एक मार्ग काढला.

कंपनी वाढत गेली आणि मी विक्री प्रतिनिधींना कामावर ठेवू लागलो. त्या काळात, आम्ही प्रत्येक कुटुंबाच्या योजनेतील सर्व गणिते पूर्ण करण्यासाठी आमच्या हातातील आर्थिक कॅल्क्युलेटरचा वापर करायचो. नंतर आम्ही तो डेटा माझ्या वर्ड प्रोसेसिंग सॉफ्टवेअरवर तयार केलेल्या टेम्पलेटमध्ये टाइप करायचो आणि प्रिंट करायचो जेणेकरून आमचे प्रतिनिधी तो तपशील घेऊन त्यांच्या क्लायंटच्या घरी जाऊ शकतील. डॉट मॅट्रिक्स प्रिंटर दिवसभर काम करत असायचे (तुम्हाला ते आठवतात ना?) लवकरच माझ्या सेक्रेटरीला एकट्याने काम करणे कठीण होऊ लागले आणि मला हे क्लायंट रिपोर्ट टाइप करण्यासाठी आणि प्रिंट करण्यासाठी आणखी एका व्यक्तीला कामावर ठेवावे लागले.

मला जाणवले की मला व्यवसाय करण्यासाठी एक चांगला मार्ग हवा आहे. मला एका संगणक प्रोग्रामची आवश्यकता होती जो प्रत्येक क्लायंटच्या बाबतीत हिशोब करण्या साठी आवश्यक असलेल्या सर्व आर्थिक समीकरणांची गणना करू शकेल आणि ते छापू शकेल. ड्रेंडाने आणि मी प्रभूकडे मदत मागितली आणि विनंती केली कि त्याने आमच्या कंपनीसाठी संपूर्ण प्रोग्राम लिहिण्यासाठी परवडणारा संगणक प्रोग्रामर द्यावा.

या प्रार्थनेनंतर काही महिन्यांनी, मी नियमित क्लायंट भेटी साठी गेलो तेव्हा क्लायंटने

मी त्याच्यासाठी बनवलेले प्रिंटआउट पाहून मला विचारले, "तुम्ही हे हाताने करता का?" मी म्हणालो, "हो, पण आम्हाला खरोखर हे एका संगणक प्रोग्राममध्ये करायचे आहे म्हणजे ते ऑटोमॅटिक होऊ शकेल." त्याने माझ्याकडे पाहिले आणि सांगितले की तो ज्या ठिकाणी काम करतो त्या ठिकाणी त्याचे काम पूर्णवेळ संगणक प्रोग्राम लिहिण्याचे आहे परंतु संध्याकाळी तो आमच्यासाठी स्वतःच्या सवडी प्रमाणे एक प्रोग्रॅम तयार करण्यास मदत करण्यास तयार आहे. त्याने आपल्या कामाची किंमत सांगितली आणि तो म्हणाला कि तुम्ही पुढच्या वर्षभरात जमेल तसे पैसे देऊ शकता.

त्या कार्यक्रमामुळे सगळं काही बदललं आणि मी अधिक लोकांना कामावर ठेऊ शकलो. लवकरच, पूर्व अमेरिकेतील बहुतेक ठिकाणी आमच्याकडे 300 प्रतिनिधी होते, त्यामुळे आमचे कार्यालय आमच्या एका विक्रेत्यासाठी 5,000 कार्यालयांपैकी नंबर एक चे कार्यालय बनले.

आमची स्वतःची कंपनी सुरू करून आणि पवित्र आत्म्याचे अनुसरण करून, आम्ही पूर्णपणे कर्जमुक्त झालो, आणि जी म्हण आहे, त्याप्रमाणे बाकीच्या सर्व गोष्टी इतिहासात जमा झाल्या. मी जे सांगण्याचा प्रयत्न करत आहे ते हे की जर तुम्ही देवाला विचारले आणि त्याला ते करू दिले तर तो तुम्हाला योजना देईल. तो तुम्हाला अशा ठिकाणी घेऊन जाईल जिथे पोहचण्याचा तुम्ही कधीही विचार देखील केला नसेल.

तर, मी पुन्हा यावर जोर देतो की तुम्हाला योजनेची आवश्यकता आहे. तुमच्या यशासाठी देवाकडे एक योजना आहे. खरं तर, तुमच्या यशासाठी त्याच्याकडे अनेक योजना आहेत. त्याचे विचार आणि ज्ञान अंतहीन आहे.

*"तुमच्याविषयी माझ्या मनात जे संकल्प आहेत ते मी जाणतो; ते संकल्प हिताचे आहेत, अनिष्टाचे नाहीत; ते तुम्हांला तुमच्या भावी सुस्थितीची आशा देणारे आहेत.*

—यिर्मया 29:11

## तुम्ही देवाची योजना कशी ऐकू शकता?

तर, तुम्हाला योजना कशी ऐकायला मिळते? मी म्हटल्याप्रमाणे, आत्म्याने प्रार्थना करणे हा ऐकण्याचा सर्वोत्तम मार्ग आहे. मी येथे आत्म्याने प्रार्थना करण्याबद्दल जास्त

तपशीलवार चर्चा करणार नाही कारण माझे पुस्तक "तुमची वित्तीय क्रांती: रणनीतीचे सामर्थ्य" मध्ये पवित्र आत्म्याचे ऐकणे खूप तपशीलवार सांगितले आहे. परंतु ह्या ठिकाणी थोडक्यात माहिती देणे आवश्यक आहे.

> *तथापि जे पोक्त आहेत त्यांना आम्ही ज्ञान सांगतो; पण ते ज्ञान ह्या युगाचे नाही, आणि ह्या युगाचे नाहीसे होणारे जे अधिकारी त्यांचेही नाही. तर देवाचे गूढ ज्ञान आम्ही सांगतो; तुप्त ठेवलेले होते, ते देवाने युगांच्या पूर्वी तुमच्याआमच्या गौरवाकरता नेमले होते. ते ह्या युगातल्या अधिकाऱ्यांतील कोणालाहळले नव्हते; कारण त्यांना ते कळले असते तर त्यांनी गौरवाच्या प्रभूला वधस्तंभावर खिळले नसते;*
>
> *हे तर ह्या शास्त्रलेखाप्रमाणे आहे, "डोळ्यानहले नाही, कानाने जे ऐकले ने नाही व माणसाच्या 'मनात जे अले नाही, ते आपणावर प्रीत करणाऱ्यांसाठी देवाने सिद्ध केल आहे;" कारण देवाने ते आत्म्याच्या द्वारे आपल्याला प्रकट केले;*
>
> *कारण आत्मा हा सर्व गोष्टींचा व देवाच्या गहन गोष्टीचाही शोध घेतो. मनुष्याच्या ठायी वसणारा जो आत्मा त्याच्यावाचून मनुष्यया गोष्टी ओळखणारा मनुष्यांमध्ये कोण आहे? तसा देवाच्या गोष्टी ओळखणारा देवाच्या आत्म्याशिवाय कोणी नाही. आपल्याला जगाचा आत्मा नव्हे, तर देवापासून निघणारा आत्मात्मा मिळाला आहे; ह्यासाठी की, जे देवाने आपल्याला कृपेने दिले ते आपण ओळखून घ्यावे.*
>
> —1 करिंथ 2:6-12

या शास्त्रभागात ज्या गोष्टी आपण ऐकल्या नाहीत, पाहिल्या नाहीत किंवा विचार केला नाही, असा उल्लेख आहे त्या पवित्र आत्म्याद्वारे आपल्याला प्रकट झालेल्या गोष्टी आहेत. हे मला खूप लाभदायक वाटते; मी त्याचा वापर करू शकतो. जेव्हा तुम्ही ख्रिस्ती झालात, तेव्हा पवित्र आत्मा तुमच्यामध्ये वास करायला आला आणि तो तुमच्या जीवनाचे मार्गदर्शन करू लागला.

पण येशूने मंडळीला दिलेल्या पवित्र आत्म्याचा आणखी एक पैलू आहे, ज्याला पवित्र आत्म्याचा बाप्तिस्मा म्हणतात. हे आपण पेंटेकॉस्टच्या दिवशी घडताना पाहतो जेव्हा शिष्य वरच्या खोलीमध्ये एकत्र होऊन वाट पाहत होते तेंव्हा पवित्र आत्मा शिष्यांवर आला, जसे

तो यार्देन नदीवर येशूवर आला होता. याच वेळी येशूने त्याचे सेवाकार्य सुरू केले. याच वेळी देवाचे सामर्थ्य त्याच्यावर राज्याचा साक्षीदार होण्यासाठी आले. येशूने बालपणी कोणतेही चमत्कार केले नाहीत. त्याने आपल्या कुटुंबात राहत असतांना  अन्न वाढवले नाही किंवा तो पाण्यावरून चालला नाही. पवित्र आत्म्याचा बाप्तिस्मा समजून घेण्यासाठी, तुम्हाला हे समजून घेणे आवश्यक आहे की नव्याने जन्म घेणे (जेव्हा देवाचा आत्मा तुमच्यामध्ये येतो) आणि पवित्र आत्म्याचा बाप्तिस्मा (जेव्हा पवित्र आत्मा तुमच्यावर येतो) यात फरक आहे.

> *त्याच दिवशी म्हणजे आठवड्याच्या पहिल्या दिवशी संध्याकाळी जेथे शिष्य होते तेथील दारे यहूद्यांच्या भीतीमुळे बंद असता, येशू आला व मध्ये उभा राहून म्हणाला, "तुम्हांला शांती असो." असे बोलून त्याने आपले हात व कूस त्यांना दाखवली; तेव्हा प्रभूला पाहून शिष्यांना आनंद झाला.*
>
> *येशू पुन्हा त्यांना म्हणाला, "तुम्हांला शांती असो. जसे पित्याने मला पाठवले आहे तसे मीही तुम्हांला पाठवतो." असे बोलून त्याने त्यांच्यावर फुंकर टाकली आणि त्यांना म्हटले, "पवित्र आत्म्याचा स्वीकार करा.*
>
> —योहान 20:19-22

शिष्यांचा नव्याने जन्म योहान 20 मध्येच झाला, तरीही येशूने त्यांना सांगितले की त्यांना अजूनही पवित्र आत्म्याच्या बाप्तिस्म्याची वाट पाहावी लागेल जेणेकरून ते देवाच्या राज्याचे साक्षीदार बनू शकतील.

> *मरण सोसल्यानंतरही त्याने त्यांना पुष्कळ अचूक प्रमाणांनी आपण जिवंत आहोत हे दाखवले. चाळीस दिवसपर्यंत तो त्यांना दर्शन देत असे व देवाच्या राज्याच्या गोष्टी सांगत असे. तो व ते एकत्र जमले असताना त्याने त्यांना आज्ञा केली की, "यरुशलेम सोडून जाऊ नका, तर पित्याने देऊ केलेल्या ज्या देणगीविषयी तुम्ही माझ्याकडून ऐकले आहे तिची वाट पाहा; कारण योहानाने पाण्याने बाप्तिस्मा केला खरा; पण तुमचा बाप्तिस्मा थोड्याच दिवसांनी पवित्र आत्म्याने होईल."*
>
> —प्रेषितांची कृत्ये 1:3-5
>
> *परंतु पवित्र आत्मा तुमच्यावर येईल तेव्हा तुम्हांला सामर्थ्य प्राप्त होईल, आणि*

*यरुशलेमेत, सर्व यहूदीयात, शोमरोनात व पृथ्वीच्या शेवटापर्यंत तुम्ही माझे साक्षी व्हाल."*

—प्रेषितांची कृत्ये 1:8

देवाकडून मिळालेला हा अभिषेक देवाचे सामर्थ्य प्रदान करतो आणि तुम्हाला त्याची काम करण्यास सक्षम करतो. कृपया लक्षात ठेवा की तो अभिषेक तुमच्यावर येतो, तुमच्यामध्ये नाही. तुम्हाला हे देखील आठवत असेल की पेन्टेकॉस्टच्या दिवशी यरुशलेम मध्ये वरच्या खोलीत वाट पाहत असलेल्या सर्व शिष्यांचा पवित्र आत्म्याने बाप्तिस्मा झाला होता. याचा एक पुरावा काय होता? ते सर्व अन्य भाषेत बोलू लागले. 1करिंथकर 12 मध्ये अन्य भाषेत बोलणे हे मंडळीला देण्यात आलेल्या नऊ आध्यात्मिक देणग्यांपैकी एक म्हणून सूचीबद्ध आहे. तुम्ही म्हणाल की त्या देणग्या निघून गेल्या आहेत, परंतु मी ह्या बाबतीत पूर्णपणे असहमत आहे. पवित्र आत्म्याच्या बाप्तिस्म्यामुळे सर्व नऊ आध्यात्मिक देणग्या मिळतात, परंतु मी फक्त या एकाच देणगीवर लक्ष केंद्रित करू इच्छितो, अन्य भाषेत बोलणे.

**देवाकडून मिळालेला हा अभिषेक देवाचे सामर्थ्य प्रदान करतो आणि तुम्हाला त्याची काम करण्यास सक्षम करतो.**

सुरुवातीला, तुम्हाला हे निरर्थक वाटेल,  कारण तुम्हाला वाटेल की ते फक्त तेव्हाच आवश्यक आहे जेव्हा तुम्ही सुवार्ताप्रसार करण्या साठी वेगळी भाषा बोलणाऱ्या लोकांशी बोलता. परंतु तुम्हाला माहित नसलेल्या भाषेत लोकांशी बोलता येणे हा अन्य भाषांमध्ये बोलण्याच्या देणगीचा उद्देश कधीच नव्हता. ही एक अमूल्य देणगी का आहे आणि तुमच्या समृद्धीसाठी ती का महत्त्वाची आहे हे मी तुम्हाला दाखवतो.

*कारण अन्य भाषा बोलणारा माणसांबरोबर नव्हे, तर देवाबरोबर बोलतो; कारण ते माणसाला समजत नाही; तो आत्म्याने गूढ गोष्टी बोलतो. संदेष्टा हा माणसांना उद्देशून उन्नती, उत्तेजन व सांत्वन ह्यांबाबत बोलतो. अन्य भाषा बोलणारा स्वत:चीच उन्नती करतो, संदेष्टा मंडळीची उन्नती करतो. तुम्ही सर्वांनी भाषा बोलाव्यात, तरी विशेषत: तुम्ही संदेश द्यावा अशी माझी इच्छा आहे; कारण*

*मंडळीच्या उन्नतीकरता अर्थ न सांगता जो भाषा बोलतो त्याच्यापेक्षा संदेष्टा श्रेष्ठ आहे.*

—1 करिंथ 14:2-5

येथे पौलाच्या पत्राचा संदर्भ आपल्याला समजून घेणे आवश्यक आहे. तो मंडळी मध्ये एकत्र येणाऱ्या लोकांचे आयोजन कसे करावे याबद्दल बोलत आहे. तो मुळात असे म्हणत आहे की मंडळी मध्ये उपासनेच्या वेळी अन्य भाषांमध्ये बोलणे ऐकणाऱ्यां साठी लाभदायक नसते कारण जे ऐकतात त्यांना ती व्यक्ती काय म्हणत आहे हे समजत नाही. पौल म्हणतो की मंडळी मध्ये भविष्यवाणी करणे अधिक फायदेशीर आहे कारण ते लोकांच्या सामान्य भाषेत असते आणि अधिक प्रभावी असते.

पण जेंव्हा एखादी व्यक्ती अन्य भाषेत प्रार्थना करते तेंव्हा तो एक अद्भुत अनुभव असतो, ती एक वेगळीच गोष्ट आहे. अन्य भाषेत बोलण्याचा बोलणाऱ्याला खूप फायदा होतो. बायबल म्हणते की ते आपल्या आत्म्यांद्वारे रहस्ये प्रगट करतात. ही रहस्ये अशी आहेत जी तुम्हाला स्वतःला देखील माहित नाहीत पण तुम्हाला जाणून घेण्याची आवश्यकता आहे. दुसरे म्हणजे, पौल म्हणतो की अन्य भाषेत बोलणारा स्वतःचीच उन्नती करतो. उन्नती या शब्दाचा अर्थ सूचना प्राप्त करणे असा होतो. अर्थात, जर तुम्हाला काही जाणून घ्यायचे असेल तर ते त्या क्षणी तुमच्यासाठी एक रहस्य आहे. परंतु अन्य भाषेत बोलल्याने बोलणाऱ्याला सूचना मिळते. जर आपण आपल्याला जे आधीच माहित जे माहित आहे त्या पेक्षा जास्त योजना विकसित करणार असू तर तुम्हाला आणि मला याची निश्चितच गरज आहे. जसे 1 करिंथकर 2:9-10 मध्ये म्हटले आहे:

*“डोळ्याने जे पाहिले नाही, कानाने जे ऐकले ने नाही व माणसाच्या ‘मनात जे आले नाही, ते आपणावर प्रीत करणाऱ्यांसाठी देवाने सिद्ध केल आहे;” कारण देवाने ते आत्म्याच्या द्वारे आपल्याला प्रकट केले.*

मला आणि तुम्हालाही ती मदत हवी आहे. तुमचा पुढचा प्रश्न असेल, "जर तुम्ही अन्य भाषांमध्ये बोलत असाल आणि तुम्ही काय बोलत आहात हे तुम्हाला समजत नसेल, तर तुम्ही जे बोलत आहात त्यातून तुम्हाला काही कसे मिळेल?" तर, हे रहस्य आहे. पवित्र आत्मा तुमच्या स्वतःच्या मानवी आत्म्याद्वारे बोलत असल्याने, तुमचे मन तुमच्यामधून

येणाऱ्या काही विचारांना घेऊ लागतो. आपण याला प्रकटीकरण म्हणतो आणि हा शब्द प्रकट करण्यासाठीच्या मुळ शब्दा पासून येतो. म्हणून, बायबलमध्ये अन्य भाषांमध्ये बोलणे म्हणजे, आत्म्याने प्रार्थना करणे आहे, ह्या प्रकारे तुमच्याकडे अशा कल्पना आणि विचारांना आत्मसात करण्याची क्षमता येते जे तुमचे स्वतःचे नाहीत.

मला माहित आहे की याबद्दल तुमचे बरेच प्रश्न असतील, म्हणून मी तुम्हाला माझे "तुमची वित्तिय क्रांती: रणनीती चे सामर्थ्य" हे पुस्तक वाचण्यास प्रोत्साहित करतो. तुम्हाला तुमची सर्व उत्तरे तिथे मिळतील.

## थांबा आणि रणनीतीसाठी प्रार्थना करा

सध्या तरी, आपण हे समजून घेऊया की एकदा तुम्ही विश्वासाचे बीज पेरले की, पुढचे पाऊल म्हणजे काही काळ थांबून पवित्र आत्म्यात प्रार्थना करणे कारण तुम्हाला एका योजनेची आवश्यकता आहे. कार्लाने हेच केले.

कार्ला आणि टॉड सामान्य अमेरिकन जीवनशैली जगत होते, त्यांना नियमित पगार मिळत होता पण ते कर्जात बुडत चालले होते. कार्लाने एके दिवशी टीव्हीवर फिक्सिंग द मनी थिंगचे प्रसारण पाहिले आणि तिला समजून चुकले की तिला त्यांचे आर्थिक नियोजन करण्याची गरज आहे. मला कार्लाकडून मिळालेला ईमेल आठवतो. त्यामध्ये तिने म्हटले होते की त्यांच्याकडे कोणतेही आर्थिक नियोजन नाही. आणि पुढील काही महिने देखील ते असे काही करू शकतील असे दिसत नाही, ते इतके अडचणीत होते. त्यांना पैशांची कमी पडली तर क्रेडिट कार्ड चा उपयोग करावा लागत होता.

तिला माहित होते की त्यांना कर्जातून बाहेर पडायचे आहे, पण कसे? माझे पुस्तक वाचल्यानंतर तिने आणि तिच्या पतीने एका व्यवसाया बद्दल विचार केला आणि त्या साठी आपले विश्वासाचे बीज पेरले आणि ते घरून करू शकतील अशा व्यवसाया साठी स्पष्टपणे पेरणी केली. टॉड स्थानिक शाळेत शिक्षिका म्हणून आधीच व्यस्त होती, म्हणून ती ह्या व्यवसायात कशा प्रकारे मदत करू शकते याचा विचार करत होती. त्यांनी व्यवसायासाठी आपले बी पेरल्या नंतर दररोज सकाळी, कार्ला प्रभूसोबत काही वेळ शांततेत घालवत असे, आणि पवित्र आत्म्याकडून काही मार्गदर्शन ऐकण्याची वाट पाहत असे.

एका सकाळी, तिच्या आत्म्यात, तिला "पिल्ले" हा शब्द ऐकू आला. सुरुवातीला ती थोडी गोंधळली. पिल्ले? पिल्ले पाळायची? त्यांच्याकडे एकेकाळी एक कुत्रा होता, पण पिल्ले पाळणे ही अशी गोष्ट होती ज्याचा तिने खरोखर विचार केला नव्हता. त्या संध्याकाळी टॉड घरी आला तेव्हा देवाने तिला काय सांगितले आहे ते त्याला सांगितले. अपेक्षेप्रमाणे, टॉडला या योजनेबद्दल थोडी भीती वाटली पण कार्लाला म्हटले कि आपण हे कसे करू शकतो ह्या बद्दल संशोधन कर. लवकरच टॉड आणि कार्लाने दोन मादी गोल्डनडूडल पिल्ले विकत घेतली आणि त्यांचा छोटासा पिल्लांचा व्यवसाय सुरू केला. अर्थात, त्यांना प्रथम त्यांच्या पिल्लांचे संगोपन करावे लागले आणि नंतर प्रजनन प्रक्रिया सुरू करावी लागली.

वाटेत काही अडचणी आल्या, पण पहिल्या वर्षी त्यांच्या कुत्र्यांना पिल्ले झाली ती 13 होती. एक पिल्लू सुमारे $1,500 ला विकले गेले आणि कार्ला म्हणते की आता मला कळते कि जेंव्हा मी 'पप्पीज' हा शब्द ऐकला तेव्हा ते शब्द पवित्र आत्म्या कडून अगदी बरोबर ऐकू आले आणि तिला अश्रू अनावर झाले. त्याच वर्षी, टॉडला स्थानिय शाळेत मुख्याध्यापकपदी बढती देण्यात आली.

पिल्लांचा व्यवसाय वाढतच राहिला; आणि आता, त्यांच्याकडे 300 हून अधिक पिल्ले आहेत आणि त्यांची किंमत प्रत्येकी $2,500 पर्यंत वाढली आहे. त्यांची आर्थिक स्थिती अगदीच उत्तम झाली आहे! गेल्या वर्षी त्यांनी त्यांचे घराचे पूर्ण पैसे भरले आणि आता ते पूर्णपणे कर्जमुक्त झाले आहेत. ते देशाबाहेर फिरण्या साठी गेले आणि देवाने त्यांच्या कुटुंबात इतके काही केले आहे की कार्लाला लोकांना देवाच्या राज्याबद्दल सांगण्याची संधी मिळाली. तिने नुकतेच तिचे पहिले पुस्तक, प्लॅन्स टू प्रोस्पर: हाऊ गॉड गेव्ह अस फायनान्शियल फ्रीडम थ्रू पपीज प्रकाशित केले आहे.

टॉड आणि कार्ला देवाच्या राज्याची जीवनशैली जगत आहेत, जी लोकांचे लक्ष वेधून घेते आणि त्यांना थांबून देवाचा विचार करायला लावते. यशया संदेष्ट्याने यशया अध्याय 61 मध्ये चर्च युगाबद्दल सांगितले आहे जिथे त्याने आपल्याला सांगितले आहे की आपण पृथ्वीवर असताना देव आपल्या जीवना संबंधी काय करू इच्छितो.

> *त्यांना नीतिमत्तेचे वृक्ष परमेश्वराने लावलेले रोप म्हणता यावे म्हणून त्याने मला पाठवले आहे.*
>
> —यशया 61:3

ओक हे एक अतिशय मजबूत झाड आहे आणि ते आकारानेही मोठे असते. बायबल म्हणते की आपले जीवन ओकच्या झाडांसारखे असेल, ते स्थिर, दृढ आणि अचल असेल. या झाडाचे फळ नीतिमत्ता असेल, याचा अर्थ असा की देवाच्या दृष्टीने योग्य असे आपले जीवन असावे ह्या कडे लोक लक्ष देतील. आपण प्रभूचे रोपटे आहोत, याचा अर्थ देव आपल्याला योग्य वाटेल तिथे, सर्व ठिकाणी, सर्व व्यवसाय आणि संस्कृतींमध्ये, त्याचे वैभव प्रदर्शित करण्यासाठी ठेवणार आहे. देव तुमच्याकडे लोकांचे लक्ष वेधून घेऊ इच्छितो! त्याची इच्छा आहे की लोकांनी तुमच्या जीवनात त्याच्या मार्गांचे चांगले फळ पहावे. ज्याप्रमाणे फळझाड तुम्हाला त्याच्या स्वादिष्ट फळांनी त्याच्याकडे आकर्षित करते, त्याचप्रमाणे देवाला तुमचे जीवन पृथ्वीवर स्वर्गासारखे दिसावे अशी इच्छा आहे.

तर टॉड आणि कार्ला यांनी हे कसे केले? अर्थात, त्या पिल्लांना वाढवण्यासाठी खूप मेहनत घ्यावी लागली, पण त्यानंतर मिळालेले स्वातंत्र्य नक्कीच त्या कष्टांपेक्षा उत्तम होते. त्या स्वातंत्र्याची सुरुवात देवाकडून आलेला एक शब्द ऐकून झाली. तिला फक्त एक साधा शब्द ऐकू आला, "पिल्ले!" पण एवढीच गरज होती. देव तुमच्या सोबत देखील बोलेल. तो तुम्हाला स्तोत्र 23 मध्ये सांगितल्याप्रमाणे हिरव्या कुरणांकडे आणि संथ पाण्याकडे घेऊन जाईल.

पण तुम्ही कल्पना करू शकता की, फक्त योजना ऐकणे पुरेसे नाही. मी पुढील प्रकरणात पाचव्या पायरीवर चर्चा करणार आहे, आणि कदाचित तो सर्वात महत्वाचा अध्याय असेल कारण पाचव्या पायरीमध्ये बहुतेक लोक अपयशी ठरतात. पण तुम्ही अपयशी ठरणार नाही, तुम्ही या पुस्तकात वाचलेल्या कथांप्रमाणेच देवाच्या चांगुलपणात चालणार आहात! तुम्ही तयार आहात का? चला पाचव्या पायरीवर जाऊया.

## अध्याय 9

# आता जाणवाची वेळ आली आहे!

प्रत्येक शेतकऱ्याला माहित असते की प्रत्येक पेरणी केल्या नंतर कापणी करेपर्यंत एक विशिष्ट वेळ जातो. विशिष्ट पिकासाठी योग्य कापणीचा हंगाम जाणून घेणे हे यश आणि अपयश यातील फरक आहे. आणि हे अगदी स्पष्टपणे समजून घेऊ या: तुम्ही कापणी चुकवू शकता. म्हणून, हा एक अत्यंत मोठा आणि महत्त्वाचा विषय आहे. कल्पना करा कि तुम्ही एका दुकानात जात आणि त्या ठिकाणी एक सुंदर लाल सफरचंद तुम्हाला दिसते तुम्ही त्या कडे पाहून म्हणता, किती सुंदर लाल सफरचंद आहे हे, आणि तुम्ही ते विकत घेता - पण घरी आल्या नंतर जेंव्हा तुम्ही ते खायला सुरुवात करता तेंव्हा तुम्ही म्हणता ह्याला तर काहीच चव नाही? तर, हीच ती कापणीच्या वेळेची गोष्ट आहे.

योग्य वेळे कडे लक्ष ने देता एखादी योजना समोर येताच त्यामध्ये उडी मारून कापणीची योग्य वेळ चुकवून आर्थिक संकटात पडून त्याला तोंड देणाऱ्या किती तरी लोकांबद्दल मी ऐकले आहे आणि त्यामध्ये त्यांना मार्गदर्शन केले आहे. वेळे संबंधी माझे आवडते शास्त्रवचन मत्तय 13:44आहे.

> *स्वर्गाचे राज्य शेतात लपवलेल्या ठेवीसारखे आहे; ती कोणाएका मनुष्याला सापडली आणि त्याने ती लपवून ठेवली. मग आनंदाच्या भरात तो जातो,आपले सर्वस्व विकतो आणि ते शेत विकत घेतो.*

या कथेत, तो माणूस इतका हुशार होता की त्याला माहित होते की तो त्या वेळेस तो खजिना प्रत्यक्षात घेण्यास सक्षम नव्हता. त्याला तो खरेदी करण्यासाठी तयारी करावी लागली.

उदाहरणार्थ, जेव्हा कार्लाने "पपीज" हा शब्द ऐकला तेंव्हा त्याचा अर्थ असा नव्हता कि तिने लगेच पिल्लांची विक्री करण्या साठी जाहिरात करायला सुरुवात करावी. तिच्याकडे

अजून एकही पिल्लू नव्हते. त्यासाठी तिला बरीच तयारी करणे गरजेचे होते. त्यांना आधी दोन मादी कुत्र्यांना खरेदी करणे भाग होते. त्यांच्या राहण्यासाठी जागेची व्यवस्था करायची होती आणि येणाऱ्या पिल्लांसाठी नियोजन करायचे होते. जर तुम्ही त्यांना विकणार असाल तर पिल्लांना आवश्यक असलेल्या लसींबद्दल काही कायदेशीर बाबी जाणून घेणे आवश्यक होते.

परवाना, विपणन, बँकिंग आणि करांचे काही मुद्दे देखील आहेत. तुम्ही ज्या व्यवसाया बद्दल विचार करत आहात त्याच्या कापणीच्या हंगामात प्रत्यक्षात पाऊल ठेवण्यापूर्वी या गोष्टींचा विचार करणे आवश्यक आहे.

तुम्ही तुमचे योग्य परिश्रम केले आहेत असे गृहीत धरले तर, पुढे कठीण परिस्थिती येणार हे निश्चित आहे. देवाने तुम्हाला जो दृष्टांत दिला आहे त्यामध्ये पाऊल टाकून तुम्हाला पुढे जावे लागेल. हो, देवाने दिलेला दृष्टांत तुमच्या कल्पने पेक्षा मोठा असेल आणि त्यामध्ये पाऊल टाकणे तुम्हाला भीतीदायक वाटेल. पण भीती हे तुमच्या जीवनातील जुना मनुष्य आहे. लक्षात ठेवा, आता तुम्ही नवीन व्यक्ती आहात.

जेव्हा देवाने मला सांगितले मी मला माझा स्वतःचा व्यवसायात सुरु करायचा आहे, तेव्हा मी सुरुवातीला खूप घाबरलो होतो. कारण मी पूर्णपणे शून्यापासून सुरुवात करणार होतो. जरी देवाने स्वप्नात मला त्याबद्दल पाऊल उचलण्यास सांगितले आणि मी योग्य ती काळजी घेऊन कामाला सुरुवात केली होती, तरीही मी घाबरलो होतो. आता सर्व काही माझ्यावर अवलंबून होते की मी पुढे कसे जावे. तुमचा असा एखादा मित्र किंवा ओळखीचा व्यक्ती आहे का जो, नेहमी तो पुढे काय करणार आहे याबद्दल बोलत असतो पण प्रत्यक्षात ते कधीच करत नाही? मी अशा बऱ्याच जणांना ओळखतो! लक्षात ठेवा, मी 30 वर्षांहून अधिक काळ सेल्समनना प्रशिक्षण दिले आहे.

जेव्हा मी माझा व्यवसाय सुरू केला तेव्हा मला कोणतेही संकेत देण्यात आले नव्हते. त्या वेळी मी पूर्णपणे कमिशनवर जगत होतो आणि घरामध्ये मी एकटाच कमावणारा व्यक्ती होतो. पण माझ्या मध्ये एक गोष्ट होती ती म्हणजे आवड. जेव्हा देवाने मला लोकांना कर्जातून बाहेर पडण्यास मदत करण्यासाठी एक कंपनी सुरू करण्यास सांगितले तेव्हा मी ते करण्यास पूर्णपणे तयार होतो. माझ्या आयुष्यातील बहुतेक काळ मी आर्थिक समस्यांनी त्रस्त होतो; आणि आता मला उत्तर सापडले आहे, देवाचे राज्य, आणि मला त्याबद्दल

सर्वांना सांगण्याची इच्छा होती. दुसरे म्हणजे, देवाने जेंव्हा मला योजना तयार करण्यास मदत केली त्यामुळे मला पाच ते सात वर्षांत कुटुंबांना त्यांचे घर गहाणखत आणि त्यांचे बजेट न बदलता,कर्जातून बाहेर काढण्यासाठी लेखी योजना कशा तयार करायच्या हे दाखवले, मी खूप उत्साही होतो. मला माहित होते की आर्थिक बाजारपेठेत माझे एक स्थान आहे आणि माझ्याकडे सांगण्यासाठी एक खरी कहाणी आहे. पण मी पुन्हा म्हणेन कि, स्विच चालू करण्यापूर्वी मला काम करण्याची योजना आधीच व्यवस्थित आणि निश्चित करावी लागली.

मार्गक्रमण करत असतांना तुम्हाला नेहमीच काही गोष्टी शिकायला मिळतात हे निश्चित आहे, पण जेव्हा तुम्ही खरोखर काम करायला सुरुवात करता तेव्हा तुमची मूलभूत रचना आधीच विकसित केलेली असावी. पण तुम्हाला प्राप्त होणारी संधी, उत्पादन किंवा संभाव्य पगार कितीही मोठा असणार असला तरी, तो नेहमीच आजचा दिवस महत्वाचा असतो आणि आजचा तो दिवस आहे जेव्हा तुम्ही योजनेत पाऊल ठेवले पाहिजे.

आता, हे मला खऱ्या समस्येकडे घेऊन जाते, माझ्या मते, देवाकडून त्यांच्या आर्थिक समस्यांसाठी मार्गदर्शन आणि उत्तर ऐकल्यानंतरही, बरेच लोक त्यांचे ध्येय गाठू शकत नाहीत याचे मुख्य कारण हेच आहे.

## दिरंगाई!

कामात दिरंगाई ही असुरक्षितता, भीती किंवा आळस ह्यामुळे होऊ शकते. पण एक गोष्ट निश्चित आहे; असे करणे कुणालाही सोपे जाते! पदवीधर विद्यार्थ्यांच्या कामात दिरंगाई करण्याच्या सवयींबद्दल मी खालील अध्ययन वाचले आहे.

> *जेनी तिचे अपार्टमेंट साफ करते. कॅथी गणिताचे कोडे सोडवत बसते. मॅट खेळांचे स्कोअर बघत राहतो आणि कार्मेन तिचे फेसबुक पेज अपडेट करत राहते. हे सर्व जण मानसशास्त्राचे विद्यार्थी आहेत आणि त्यांनी आपल्या अभ्यासासंबंधी जे काम करायला हवे ते न करता इतर कामं करतात. कामामध्ये दिरंगाईचे उत्कृष्ट उदाहरण.*
>
> *ही सवय सोडणे कठीण आहे, विशेषतः आजकाल इंटरनेट मुळे विद्यार्थी*

*शिस्तबद्धपणे अभ्यास न करता त्यातच गुंतून राहतात. कॅल्गरी विद्यापीठाचे मानसशास्त्रज्ञ पियर्स स्टील, पीएचडी यांनी 2007 मध्ये केलेल्या मेटा-विश्लेषणानुसार,80 ते 95 टक्के महाविद्यालयीन विद्यार्थी, विशेषतः जेव्हा त्यांचा अभ्यासक्रम पूर्ण करण्याचा प्रश्न येतो तेव्हा, कामात विलंब करतात.*

पण, मी असे म्हणेन की हे फक्त पदवीधर विद्यार्थ्यांनाच लागू होत नाही. हे लक्ष विचलित करणारे घटक खूप तीव्र आहेत. मी जेंव्हा फोन उचलतो किंवा ईमेल उघडतो तेंव्हा त्यामुळे माझा बराच वेळ व्यर्थ वाया जातो. परंतु कामा मध्ये केल्या जाणाऱ्या दिरंगाईची एक अधिक निश्चित, आणि भयानक बाजू आहे जी तुम्हाला माहिती असणे आवश्यक आहे. या धोकादायक विषयावर स्पष्टीकरण देण्यासाठी आणि त्यावर प्रकाश टाकण्यासाठी - हो, मी ह्याला धोकादायक म्हणतो - आपण 1 करिंथकर 2:6-8 कडे जाऊ या.

*तथापि जे पोक्त आहेत त्यांना आम्ही ज्ञान सांगतो; पण ते ज्ञान ह्या युगाचे नाही, आणि ह्या युगाचे नाहीसे होणारे जे अधिकारी त्यांचेही नाही. तर देवाचे गूढ ज्ञान आम्ही सांगतो; गुप्त ठेवलेले होते, ते देवाने युगांच्या पूर्वी तुमच्याआमच्या गौरवाकरता नेमले होते. ते ह्या युगातल्या अधिकाऱ्यांतील कोणाला कळले नव्हते; कारण त्यांना ते कळले असते तर त्यांनी गौरवाच्या प्रभूला वधस्तंभावर खिळले नसते;*

—1 करिंथ 2:6-8

व्वा, हे तुम्ही कुठेतरी लिहून ठेवले पाहिजे. जर सैतान तुम्ही काय करत आहे हे कळले तर तो युक्त्या बदलेल! म्हणूनच देव दाखल्यांमध्ये बोलतो. म्हणूनच देव कधीकधी तुमचे उत्तर प्रकट करण्यापूर्वी मध्यरात्रीची वाट पाहतो. तुम्हाला माहित असले पाहिजे आणि लक्षात ठेवले पाहिजे की आपला एक शत्रू आहे. तुमचा शत्रू हातात भाला घेऊन आणि लाल पोशाख घातलेला एक लाक्षणिक पात्र नाही. बायबल ह्या बाबतीत स्पष्ट सांगते:

*सावध असा, जागे राहा; तुमचा शत्रू सैतान हा गर्जणाऱ्या सिंहासारखा कोणाला गिळावे हे शोधत फिरतो.*

—1 पेत्र 5:8

आता, खऱ्या अर्थाने तो कोणालाही गिळंकृत करू शकत नाही, परंतु त्याची इच्छा आणि योजना असते कि तुम्हाला स्वर्गाच्या अधिकारक्षेत्राबाहेर त्याच्या कायदेशीर अधिपत्याखाली खेचून आणून मारून टाकावे, चोरी करावी आणि नष्ट करावे. बायबल म्हणते, "तुमचा शत्रू!" सैतान ह्याच्या युक्त्यांपैकी एक म्हणजे तुम्हाला आत्मसंतुष्टतेत, कामात ढिलाई करण्याच्या परिस्थितीत नेणे. यामुळे त्याला तुम्ही आणि देव काय करत आहात हे समजून घेण्यासाठी वेळ मिळेल.

एका रात्री मला पडलेले एक स्वप्न मला आठवते. स्वप्नात मी जे पाहिले ती रात्रीची वेळ होती आणि माझ्या बेडरूमच्या खिडकीतून प्रकाश येत होता तो लॉनवर जात ङोई त्या नंतर तो अंधारात परिवर्तित होत होता. ज्या ठिकाणी प्रकाश मंदावत होता तिथेच सावलीत मला दिरंगाई करणारे दोन आत्मे माझ्या खिडकीसमोर उभे असलेले दिसत होते, त्यांच्या हातात नोटबुक होते. मला समजून आले की त्यांना माझ्या घरात कायदेशीर प्रवेशद्वार शोधण्यासाठी पाठवले गेले आहे. ते नोट्स घेत होते, देवाचे काम थांबवण्याचा प्रयत्न करण्यासाठी माझ्या जीवनात कोणती कमजोरी आहे हे शोधत होते.

## कामात दिरंगाई करणे प्राणघातक ठरू शकते!

कामात दिरंगाई करणे प्राणघातक ठरू शकते! हे ऐकायला खूप कठीण वाटते, नाही का? कामात दिरंगाईचा मोह तुम्हाला जे सांगतो त्याच्या अगदी उलट हे आहे असे वाटते. त्याचा आवाज सूक्ष्म आणि तुम्हाला विश्वास ठेवण्यास भाग पडणारा असतो, तो म्हणतो "तुम्ही ते नंतर केले तरी काही फरक पडणार नाही." तुम्ही ते नंतरही करू शकता. पण ते खरे आहे का? कामात दिरंगाई किती धोकादायक असू शकते हे दाखवणारी एक गोष्ट मी तुम्हाला सांगतो.

> *तिकडे तो पलिष्टीही दाविदाच्या जवळ आला; त्याचा शस्त्रवाहक त्याच्यापुढे चालत होता. त्या पलिष्ट्यांनी दाविदाला न्याहाळून पाहिले तेव्हा तो त्याला तुच्छ वाटला, कारण तो केवळ अल्पवयी असून तांबूस रंगाचा व सुकुमार होता. तो पलिष्टी दाविदाला म्हणाला, “मी काय कुत्रा आहे म्हणून तू काठी घेऊन माझ्यापुढे आला आहेस?” त्या पलिष्ट्याने आपल्या देवांची नावे घेऊन दाविदाला शिव्याशाप दिले.*

*तो दाविदाला म्हणाला, “असा जवळ ये म्हणजे तुझे मांस आकाशातील पक्ष्यांना व वनपशूंना देतो.”*

—1 शमुवेल 17:41-44

*मग तो पलिष्टी उठून दाविदाशी सामना करायला जवळ आला, तेव्हा दावीद त्या पलिष्ट्याशी सामना करायला सैन्य होते त्या दिशेकडे त्वरेने धावला. दाविदाने आपल्या बटव्यात हात घालून त्यातून एक गोटा घेऊन गोफणीत घातला, आणि ती गरगर फिरवून पलिष्ट्याच्या कपाळावर असा मारला की तो त्याच्या कपाळात घुसला आणि तो जमिनीवर पालथा पडला.*

—1 शमुवेल 17:48-49

दावीद आणि गोल्यथ ची कहाणी खूपच रोमांचक आहे. गोल्यथचे ओरडणे ऐकून संपूर्ण इस्राएल राष्ट्र घाबरले होते. पण दावीद म्हणतो की तो त्याच्याशी एका अटीवर लढेल: त्याला स्वतःचे शस्त्र निवडण्याची परवानगी देण्यात यावे, आणि ते म्हणजे मेंढ्यांची राखण करताना तो वर्षानुवर्षे वापरत आलेला गोफण. दावीद गोल्यथजवळ येताच गोल्यथ गोंधळून ओरडतो.” “मी कुत्रा आहे का, की तू काठी घेऊन माझ्या समोर उभा आहेस” गोल्यथला जी काठी वाटते ती प्रत्यक्षात दावीदाची लाठी आहे. त्याला त्याच्या कमरेला अडकलेली गोफण दिसत नाही. नाही, दावीद काठीचा वापर फसवणूक म्हणून करत आहे, गोफण ऐवजी गोल्यथचे लक्ष काठी कडे वेधत आहे. गोल्यथ जेंव्हा दावीदाकडे येऊ लागतो तेंव्हा दावीद गोल्यथकडे धावतो. ही आणखी एक युक्ती होती जी दावीदाने वापरली. त्याला माहित होते की जर गोल्यथने अचानक त्याच्यावर हल्ला केला तर लगेच गोफण हातात घेणे त्याला शक्य होणार नाही.

पण जर दावीद इतर अनेक लोकांसारखा वागला असता तर? ज्यांना संघर्षात उतरण्याची भीती वाटते, त्यामुळे ते टाळाटाळ करतात. जर दावीदाला वाटले असते कि मी अजून हमला करायला तयार नाही आणि तो गोलियाथ भोवती नाचत राहिला असता तर? मला वाटते की त्या वेळेस गोलियाथने गोफण पाहिले असते, दावीदची रणनीती ओळखली असती आणि त्यानुसार आपली युक्ती बदलली असती. आणि

**सैतान तुमच्यासोबत हेच करू इच्छितो. तो तुमच्या योजनांना बंदी बनवू इच्छितो.**

दावीद लढाई हरला असता आणि संपूर्ण इस्त्राएल राष्ट्राला बंदी केले गेले असते.

सैतान तुमच्यासोबत हेच करू इच्छितो. तो तुमच्या योजनांना बंदी बनवू इच्छितो. जर तो तुम्हाला काम करण्यापासून थांबवण्यात आणि पुन्हा काम करण्यास तयार होण्याची वाट पाहण्या साठी तुमचे मन बदलण्यास यशस्वी झाला, तर तुमच्या जीवनात देवाच्या योजनेला विरोध करण्यासाठी त्याच्या युक्त्या बदलण्यासाठी त्याला वेळ मिळेल. तर मग कामात दिरंगाई धोकादायक आहे असे तुम्हाला वाटते का? नक्कीच! मला खात्री आहे की यामुळे तुमच्या आयुष्यात हजारो डॉलर्सचे नुकसान आधीच झाले आहे. दाविदाच्या बाबतीत म्हणायचे तर, यामुळे हजारो लोकांचे जीव जाऊ शकले असते.

म्हणूनच, जेव्हा तुम्हाला निश्चितपणे वेळ माहित आहे आणि तुमच्याकडे योजना देखील आहे, तेव्हा आत्मविश्वासाने पाऊल उचला. मला विश्वास आहे की पवित्र आत्म्याकडून तुम्हाला प्रेरणा मिळेल जेणेकरून तुम्ही नेमके कधी पाऊल उचलायचे हे तुम्हाला समजून येईल. परंतु चुकीच्या शिकवणीमुळे, बरेच लोक संकोच करतात किंवा पाऊल उचलत नाहीत आणि नंतर, जेव्हा त्यांना दिसते कि संघर्ष सुरु झाला आहे, तेव्हा ते मागे हटतात आणि मग त्यांना वाटते की त्यांनी देवाचे मार्गदर्शन न ऐकण्याची चूक केली आहे .

## संघर्षाला घाबरू नका

लोक मला सांगतात की जेव्हा ते कार्य करण्या साठी पाऊल उचलले तेंव्हा त्यांना भयानक परिस्थितीला तोंड द्यावे लागले. लक्षात घ्या, तुम्ही न भीता कोणत्याही कोणत्याही प्रकारची कठीण परिस्थिती हाताळण्यासाठी सज्ज आहात. पवित्र आत्म्याच्या योजनेने शत्रूवर हल्ला झाला आहे आणि त्यामुळे तुमचे कार्य बंद करण्यासाठी तो अशा प्रकारे प्रतिक्रिया देत आहे. पण तो आता ते थांबवू शकत नाही. खूप उशीर झाला आहे. पण जर तो तुम्हाला इथपर्यंत घेऊन येणाऱ्या प्रभूच्या वचनावर शंका घेण्यासाठी जर तो  तुम्हाला प्रवृत्त करण्यात यशस्वी झाला, तर भीती तुम्हाला माघारी जाण्यास कारणीभूत होईल. तो असाच गोंधळ घालण्याचा प्रयत्न करत असतो की ज्या मुळे तुम्ही मागे हटावे. पण आता तुम्हाला पूर्वीपेक्षा जास्त खंबीर राहण्याची आणि त्याला रोखण्यासाठी तुमच्या अधिकाराचा वापर करण्याची आवश्यकता आहे. "नाही, तू असे करू शकत नाही" किंवा "मी गोंधळाच्या आत्म्याला बांधून टाकतो जो मला त्रास देण्याचा प्रयत्न करत आहे, मला माहित आहे की

प्रभूने काय करायला सांगितले आहे आणि मी ते येशूच्या नावाने करत आहे. आता मागे हट, सैतान!" असे म्हणण्यास घाबरू नका.

दुर्दैवाने, आजचे बहुतेक अप्रशिक्षित ख्रिस्ती लोक सैतानाचा प्रतिहल्ला पाहून घाबरून जातात. त्यांना वाटते की देव त्यांच्याशी बोलला आहे आणि त्यांना त्याची योजना दिली आहे तर आता सर्व काही सहजपणे आणि जलद गतीने होईल आणि अचानक कोणतीही विपरीत परिस्थिती समोर येणार नाही. आता, मी हे जे म्हणत आहे याचा गैरसमज करून घेऊ नका. आपल्याला दुष्ट आत्म्यांवर पूर्ण अधिकार आहे, परंतु लोकांवर आपला पूर्ण अधिकार नाही. हे लक्षात घेण्यासारखे आहे की जरी मी देवाच्या अधिकारक्षेत्रात असलो तरी, माझ्या सभोवतालचे बरेच लोक त्या अधिकारक्षेत्रात नाहीत आणि म्हणून ते अफवा आणि गोंधळाला बळी पडतील. मी जे करतो त्या बद्दल ते गैरसमज करून घेऊ शकतात किंवा माझ्या विरुद्धसातव आणू शकतात.

पण ते पवित्र आत्म्याच्या योजनेला थांबवू शकत नाहीत!!! शत्रू तुम्हाला एक दिवस उशिर करण्यासाठी आणि एक डॉलर कमी मिळण्या साठी तुम्ही दिरंगाई करावी म्हणून प्रयत्न करत राहणार. परंतु देव त्याच्या फार पुढे आहे आणि जर तुम्ही विश्वासात दृढ राहिलात आणि तडजोड करण्यास नकार दिला तर तो तुम्हाला तुमच्या विजयाकडे घेऊन जाईल.

देवाने दिलेली योजना पूर्ण करण्या साठी पाऊल उचलण्याचा टप्पा हा असा टप्पा आहे जिथे  पाऊल उचलण्या साठी विश्वासापेक्षा जास्त धैर्य लागते. विश्वासाने तुम्हाला या क्षणापर्यंत आणले आहे, पण आता पाऊल उचलण्या साठी धैर्याची गरज आहे. मला वाटते की समस्या अशी आहे की लोक लाल समुद्र आणि यार्देन नदीची जी घटना आहे त्या बाबतीत गोंधळून जातात.

लाल समुद्राच्या कथेत, इस्राएल लोकांची इजिप्तमधून सुटका झाली आहे आणि ते लाल समुद्राकडे प्रवास करत आहेत आणि त्यावेळेस फारोने आपला विचार बदलला आणि तो त्यांचा पाठलाग करू लागला, त्यामुळे त्यांना वाटते कि आता ते पुढे समुद्र आणि आजूबाजूला पर्वतांनी वेढलेले आहेत. असे दिसते की सुटकेचा कोणताही मार्ग नाही. पण मोशेने आपली काठी (अधिकार) उचलली आणि लाल समुद्र दुभंगला. ते समुद्रातून कोरड्या जमिनीवरून चालत पार गेले आणि फारोचे सैन्य त्यांचा पाठलाग करण्याचा प्रयत्न करतात.

पण फारोचे सैन्य पाठलाग करत असताना, समुद्र त्यांना वेढून टाकतो आणि ते सर्व त्या पाण्यामध्ये मारले जातात. इस्राएल आता इजिप्तमधून मुक्त झाला आहे आणि गुलामगिरीतून मुक्त झाला आहे. हे सुटकेचे एक महान कृत्य आहे आणि आपल्या सर्वांना देवाने आपली सुटका केली आहे म्हणून त्याची स्तुती करायला आवडते.

पुढे त्यांना वचन दिलेला, कनान देश आहे. हा त्यांच्या पूर्वजांचा देश आहे आणि तो अब्राहामच्या संततीला देण्याबद्दल वचन दिले गेले आहे. ते वाळवंटातून प्रवास करत असतांना, मोशेचे शब्द त्यांच्या कानात घुमतात: ज्या देशात तुम्ही जात आहात तो दूध आणि मधाच्या नद्या वाहणारा देश आहे. जे लोक आयुष्यभर गुलामगिरी मध्ये आपले जीवन जगले त्यांना हे खरे वाटणे खूप कठीण वाटते. पण एक समस्या आहे. हा देश आधीच इतर राष्ट्रांच्या लोकांनी व्यापलेला आहे. जेंव्हा ते यार्देन नदीजवळ येतात, तेंव्हा मोशे नवीन देशात जाण्या साठी त्यांच्यासाठी प्रवास करण्याचा सर्वात चांगला मार्ग कोणता हे पाहण्या साठी आणि त्यातील काही फळे घेऊन येण्या साठी हेर पाठवतो म्हणजे ती फळे पाहून लोकांना विश्वास होईल की तो खरोखर उत्तम देश आहे ज्या मध्ये सर्व काही उत्तम आहे.

पण हेर परत येतात तेंव्हा ते असे काही सांगतात ज्यामुळे इस्राएल लोकांना वाटते कि त्यांच्या साठी मिसर देशाला परत जाणे बरे होईल. ह्या देशाच्या तटबंदी फार उंच आहेत आणि तिथले लोक इस्राएली लोकांपेक्षा खूप धिप्पाड आणि उंच आहेत. इस्राएली लोक खूप निराश होतात आणि देव आणि मोशे दोघांवर रागावतात, त्यांना वाटते की त्यांना खोटे सांगण्यात आले आहे. त्यांच्या अविश्वासामुळे, देव त्यांना वचन दिलेल्या देशात घेऊन जात नाही कारण त्याला माहित आहे की विश्वासाशिवाय त्यांचा नाश होईल. ती पिढी वाळवंटातच राहते आणि तिथेच मारून जाते आणि त्या पिढीतील कोणीही पुढे जाण्या साठी शिल्लक राहत नाही.

आता, देवाने यहोशवाला त्यांना पार नेण्याची आज्ञा दिली आहे. पण पुन्हा एकदा, ते यार्देन नदीजवळ येतात, आणि एक समस्या निर्माण होते. नदी पुरामुळे दुथडी भरून वाहत आहे आणि लोक त्या वेगाने वाहणारे पाणी ओलांडून पुढे जाऊ शकत नाहीत. पण देव ह्या ठिकाणी पुन्हा एकदा पाणी दुभंगतो आणि इस्राएली लोक कोरड्या जमिनीवरून चालत पुढे जातात - यावेळी ते मिसर देश सोडताना झालेल्या संघर्षातून नाही, तर आपला वतनाचा देश मिळवण्याच्या तयारीत असताना संघर्षाचा सामना करतात.

हे तुम्हाला माहित असले पाहिजे. कार्य करण्या साठी पाऊल उचलतांना काही प्रश्न किंवा समस्या समोर येतील, पण घाबरू नका. देव तुम्हाला मदत करेल आणि तुम्ही पुढे जात असतांना तुमचे रक्षण करेल. नेहमी लक्षात ठेवा की त्या समस्येमागे देवाचे एक वचन आहे. ते कधीही विसरू नका.

तर आता, मी इथे असं काही सांगणार आहे ज्या मुळे तुम्हाला धक्का पोहचू शकतो. समस्यांबद्दल जागरूक राहा. नाही, तुम्ही आपल्या वैयक्तिक समस्यांबद्दल भीती बाळगावी ह्या बद्दल मी बोलत नाही. तुम्ही संधी शोधावी ह्या बद्दल मी बोलत आहे. ह्या कडे लक्ष द्या, लोक समस्यांचे निवारण करण्या साठी खूप पैसे देतात. व्यवसाय हा खरोखरच एखाद्याच्या समस्येवर उपाय असतो. उदाहरणार्थ, लोकांची एक समस्या असते - ते भुकेले असतात - म्हणून कोणीतरी सबवे शॉप सुरू करतो. मला खात्री आहे की तुम्ही कदाचित आह्या पूर्वी सब सँडविच बनवले असेल, परंतु तुम्ही ते व्यवसाय संकल्पनेत रूपांतरित करावे असा विचार केला नाही. पण आज, सबवेमध्ये जगभरात हजारो दुकाने आहेत कारण ते इतरांची समस्या सोडवत आहेत. आणि तुम्ही म्हणाल, "मी ते करू शकलो असतो," होय तुम्ही ते करू शकला असता. पण तुम्हाला वेगळा विचार करण्याची गरज आहे.

ड्रेंडा आणि मी आज करोडपती आहोत, आम्ही हुशार आहोत किंवा सुंदर आहोत म्हणून नाही. आम्ही फक्त देवाचे राज्य कसे चालते हे शिकलो आणि देवाने आम्हाला आमच्या समस्येचे निराकरण कसे करायचे ते दाखवले. मग देवाने आम्हाला इतर लोकांना तीच समस्या सोडवण्यास कशी मदत करायची ते दाखवले. ते इतके कठीण नाही!

## तयारीचे ठिकाण

म्हणून, विश्वासाने पेरल्यानंतर आणि योजना मिळाल्यानंतर, विचार न करता पाऊल उचलू नका. मत्तय 13 मधील हे वचन लक्षात ठेवा.

> *स्वर्गाचे राज्य शेतात लपवलेल्या ठेवीसारखे आहे; ती कोणाएका मनुष्याला सापडली आणि त्याने ती लपवून ठेवली. मग आनंदाच्या भरात तो जातो, आपले सर्वस्व विकतो आणि ते शेत विकत घेतो.*
>
> —मत्तय 13:44

देव नेहमीच तुम्हाला तयारीच्या ठिकाणी येण्यास सांगतो. म्हणून जरी तुम्ही देवाची वाणी ऐकली आणि त्याने तुम्हाला एक नवीन व्यवसाय सुरू करण्याची कल्पना दिली असली तरी, ते सुरु करण्याची योग्य वेळ कोणती आहे ह्याबद्दल खात्री करून घ्या. देव तुमची तयारी करण्या साठी तुम्ही प्रेरित व्हावे म्हणून प्रथम खजिना प्रकट करतो. लक्षात घ्या मी असे म्हटले नाही की देव तुम्हाला खजिना देतो मी म्हटले कि खजिना म्हणजे उत्तर प्रगट करतो. अनेकांनी खजिना प्रकट होण्याचा अर्थ चुकीचा समजला आहे की खजिना हस्तगत करण्याची वेळ आली आहे, ज्याचे भयानक परिणाम झाले आहेत. खजिना हस्तगत करण्यासाठी पाठवण्यापूर्वी देव तुम्हाला नेहमीच प्रशिक्षण आणि तयारीच्या ठिकाणी घेऊन जाईल.

मला माहित आहे की मी तरुण असतांना देवाने मला एक दृष्टान्त दाखवला कि मी हातात बायबल धरून उभा आहे. त्या दृष्टांतात, मी केवळ हे पाहिले नाही कि मी बायबलमधून उपदेश करत आहे पण हे देखील पाहिले कि मी कोणत्या खोलीत आहे आणि कोणत्या लोकांना उपदेश करत आहे. तो दृष्टान्त पाहताना मला एक आवाज ऐकू आला. "मी तुला माझ्या वचनाचा प्रचार करण्यासाठी बोलावत आहे." मी ते तीन वेळा ऐकले आणि नंतर दृष्टान्त नाहीसा झाला. त्या वेळी मी 19 वर्षांचा होतो. त्यावेळी मी माझ्या वडिलांचे पिझ्झा दुकान चालवत होतो आणि प्रत्यक्षात त्या दृष्टान्ताचा अर्थ काय हे मला पूर्णपणे माहित नव्हते. मला माहित होते की मला देवाच्या वचनाचा प्रचार करण्यासाठी बोलावण्यात आले आहे, परंतु ते कसे आणि कुठे होईल हे मला अद्याप माहित नव्हते.

त्या वेळेस मला फक्त तयारी करण्या साठी तो दृष्टांत दाखवण्यात आला होता. देवाने मला तो दृष्टांत दिल्यानंतर थोड्याच कालावधी नंतर त्याने मला बायबल शाळेत जाण्यास आणि नंतर ओरल रॉबर्ट युनिव्हर्सिटी मध्ये जाण्यास सांगितले. तिथे मला माझ्या आयुष्यातील प्रिय, ड्रेंडा भेटली. आम्ही ओरल रॉबर्ट युनिव्हर्सिटी मधून बाहेर आल्या नंतर आर्थिक व्यवसाय सुरू करण्यासाठी गेलो, ही एक योजना होती जी मला त्यावेळी समजली नव्हती. तर आता, देवाने मला त्याच्या वाचनाचा प्रचार करण्या साठी पाचारण केले होते त्याचे काय झाले? पण देवाची एक योजना होती. त्याने त्या वेळेचा उपयोग मला जीवनाच्या आर्थिक क्षेत्रांमध्ये, त्याच्या राज्याच्या कायद्यांमध्ये आणि तत्त्वांमध्ये प्रशिक्षित करण्यासाठी केला, जे माझ्या सेवेचा आधारस्तंभ बनले आहेत. त्याने त्या वेळेचा उपयोग

माझा आत्मविश्वास वाढवण्यासाठी देखील केला कारण मी लहान असताना लोकांशी बोलण्यास खूप घाबरत असे.

1 सप्टेंबर 1995 रोजी देवाने आम्हाला स्थानिय ख्रिश्चन रेडिओ स्टेशनच्या इमारतीच्या तळघरात आमचे चर्च सुरू करण्यास मार्गदर्शन केले. आमची पहिली उपासना रात्री होती आणि मी तिथे उभा असताना, 21 वर्षांपूर्वी देवाने मला दिलेल्या त्या दृष्टान्ताचे ते अचूक चित्र आहे असे मला दिसले.

म्हणून हे समजून घ्या की जेव्हा तुम्हाला दृष्टांत दिला जातो, दिशा मिळते किंवा कल्पना येते तेव्हा सहसा त्याच क्षणी तुम्ही त्या कामाला सुरुवात करावी असा त्याचा अर्थ होत नाही. देव तुम्हाला सांगेल कि त्याने जी योजना दिली आहे त्यावर काम करण्या साठी तुम्ही केंव्हा पाऊल उचलले पाहिजे. तो तुमच्याशी बोलेल आणि तुम्हाला ते कळेल.

माझ्या बाबतीत, 1995 मध्ये आम्ही आमच्या घराजवळील एका लहान चर्चला जात होतो; आणि रविवारी रात्रीच्या एका प्रार्थनेत, देवाने माझ्याशी बोलायला सुरुवात केली. देवाचा आत्मा माझ्यावर इतका प्रभावी होता की पास्टर काय बोलत होते ते ऐकू येत नव्हते. मला समजले की आता पाऊल उचलण्याची वेळ आली आहे! आणि तुम्हाला देखील ते समजेल.

देवाने जे काही केले आहे ते पाहून मी आणि ड्रेंडा खूप आनंदित आहोत, पण देव जे काही करू इच्छितो ते करण्यातच आमचा उत्साह आणि आनंद आहे!!!!! आम्ही आमच्या उर्वरित आयुष्यासाठी राज्याचा संदेश प्रचार करण्यासाठी आणि शिकवण्यासाठी स्वतःला वचनबद्ध केले आहे. जेव्हा आम्ही शिकवतो तेव्हा लोकांचे चेहरे प्रकटीकरणाने उजळलेले पाहण्यापेक्षा आम्हाला आणखी काही रोमांचित करत नाही. आम्हाला त्याचा अर्थ माहित आहे; त्यांना उत्तरं मिळत आहेत आणि ते त्यांना समजते.

आम्हाला माहित आहे की राज्य हे तुमचेही उत्तर आहे! तर देवाने मला शिकवलेले पाचवे तत्व कोणते आहे?

**पायरी #5: जेव्हा तुम्हाला वेळ, पद्धत आणि ठिकाण माहित असेल तेव्हा टाळाटाळ करू नका! दुसरे म्हणजे, संघर्षा मुळे आश्चर्यचकित होऊ नका.**

तुम्ही आणि देव हे काम पूर्ण करू शकता, यात काही शंका नाही! फक्त लक्षात ठेवा की तुम्ही यशस्वी व्हावे ही देवाची इच्छा आहे.

> *प्रिय बंधो, जसा तुझा आत्मा सुस्थितीत आहे तसे तुला सर्व गोष्टींत सुस्थिती व आरोग्य असावे, अशी मी प्रार्थना करतो.*
>
> —3 योहान 2 (NASB)

निरोगी राहणे आणि जीवनात समृद्ध होणे ही देवाची इच्छा नाही असे कोणालाही तुम्हाला सांगू देऊ नका! हेच सैतानाने पृथ्वीच्या क्षेत्रातून चोरले पण देवाने येशू ख्रिस्तामध्ये तुम्हाला परत दिले आहे. धार्मिक तत्वांनी लोकांना देवाबद्दल असे खोटे शिकवले आहे. कधीकधी लोकांना सत्य शिकण्या साठी आपल्या जीवनातून काल्पनिक कथा सोडून दिल्या पाहिजेत. एक दिवस मला खाली दिलेला ईमेल मिळाला, ज्या मध्ये देव खरोखर काय म्हणतो याबद्दल तुमचे मन नवीन करण्याची किती आवश्यकता आहे हे स्पष्ट केले आहे.

> *प्रिय गॅरी,*
>
> *माझे नाव अँनेट आहे. माझा जन्म बाप्टिस्ट पास्टर च्या घरी झाला, लहानपणीच माझे तारण झाले आणि मी येशूवर खूप प्रेम करत होते. तरुणपणीच, मला पवित्र आत्म्याचा  बाप्तिस्मा मिळाला आणि खरी उपासना, सुटकारा, बंधमुक्त होणे, पवित्र आत्म्याच्या देणग्या आणि देवाच्या राज्याबद्दलची इतर सत्ये मला समजू लागली. ख्रिस्ताच्या मंडळीतील विविध शिक्षकांकडून मी पेरणी करणे आणि कापणीची मूलभूत तत्त्वे शिकले. पण माझे पती जॉनला तुमच्या शिकवणींचे साहित्य मिळाले, आणि त्या वेळी मला हे समजू लागले की ख्रिस्ती लोकांनी, विशेषतः पाळक वर्गाने आणि सेवेत असलेल्या लोकांनी - त्यांच्या मूलभूत गरजा पूर्ण करण्यापलीकडे समृद्ध होण्याचा प्रयत्न केला पाहिजे यावर विश्वास ठेवण्यात मला खरोखरच अडचण येत आहे. आम्हाला समजले की देवाचे राज्य कसे कार्य करते हे आम्हा दोघां पैकी कोणालाही खऱ्या अर्थाने समजले नव्हते.*

*आम्ही सेवेत होतो आणि दशमांश देण्याच्या बाबतीत फार विश्वासू होतो. आम्ही उदारपणे दान देणारे देखील होतो आणि पेरणी आणि कापणीचे तत्व देखील शिकवत होतो. पण आम्हाला असे वाटले की आम्ही एक आरामदायी जीवन जगत आहोत आणि आमची अपेक्षा फक्त तेवढ्या पुरतीच मर्यादित असावी. 2003 च्या शरद ऋतूपर्यंत आमच्या व्यवसाय आणि सेवकाईच्या मुख्यालय असलेल्या आमच्या गोदामात आग लागली. त्यानंतर इतर अनेक घटना घडल्या ज्यांनी सर्व काही बदलून टाकले. जॉनला सतत हृदयविकाराचा त्रास होऊ लागला, अखेर त्याला ओपन हार्ट सर्जरीची आवश्यकता पडली. त्यावेळी आमच्याकडे आरोग्य विमा नव्हता आणि मोठ्या रुग्णालयात उपचार सुरु असल्यामुळे खूप मोठे बिल येऊ लागले. ह्या परिस्थितीत आम्ही काम करू शकत नव्हतो त्या मुळे परिस्थिती आणखी बिकट झाली. आणि मग आमच्या काही अयोग्य निर्णयांमुळे मोठ्या आर्थिक समस्या निर्माण झाल्या. 2015 पर्यंत, आमची सामान्य आर्थिक जीवनशैली बरीच चांगली होती, पण आता ती मोठ्या प्रमाणात कर्ज आणि अनेक प्रकारचे बाकी राहिलेले टॅक्स ह्या मुळे पूर्णपणे बदलून गेली.*

*आम्ही नेहमीच उदारतेने दान देत आलो आहोत कारण आम्हाला दान करायला आवडते आणि आम्हाला पेरणी आणि कापणीवर विश्वास आहे. आम्ही उत्तरांसाठी पूर्वीपेक्षा जास्त प्रभूचा धाव करत होतो. मग जॉनला टीव्हीवर तुमची शिकवण दिसली. सुरुवातीला तो म्हणाला, "तुम्ही अशा प्रकारे देवाला विकत घेऊ शकत नाही" आणि त्याने टीव्ही बंद केला. पण काही दिवसांनी, त्याने पुन्हा तुमचा कार्यक्रम पाहिला आणि त्या वेळी तो टीव्ही बंद करू शकला नाही. त्याने त्यावेळी तुमच्याकडे उपलब्ध असलेली प्रत्येक शिक्षण साधने ऑर्डर केली! आम्ही दोन वर्षे त्या साहित्याचा वापर केला आणि त्यानंतर आम्ही दोघेही भरपूर आणि पुरेशा प्रमाणात मिळवण्याची इच्छा करणे चुकीचे आहे या वेड्या समजुतीपासून मुक्त झालो.*

*एके दिवशी, आम्ही दहाव्यांदा तुमची एक विशिष्ट डीव्हीडी पाहत होतो जिथे तुम्ही*

*मत्तय 17 मधील येशू पेत्राला मासे पकडण्यास आणि त्याच्या तोंडातील नाणे वापरून कर भरण्यास सांगतो याबद्दल शिक्षण देत आहात, तसेच 2 राजे 4 मधील एका उदाहरण ज्यामध्ये स्त्रीने तिच्या घरात असलेल्या वस्तू कशा वापरल्या ते दाखवले आहे.*

*मला अचानक आठवले की काही वर्षांपूर्वी एका मित्राने आम्हाला त्यांच्यासाठी केलेल्या कामाच्या बदल्यात एक सोन्याचे नाणे दिले होते. ते आमचे कर्ज फेडण्यासाठी पुरेसे नव्हते, परंतु आमच्या घरात असलेले "काहीतरी" होते आणि आम्हाला वाटले कि आम्ही ते पेरू शकतो! आम्ही ते नाणे तुमच्या सेवेत पेरले आणि इनर सर्कल पार्टनर झालो आणि देव पुढे काय करतो ते पाहत राहिलो.*

*पुढील काही महिने, आम्ही तुमच्या शिकवणींवर भर देत राहिलो आणि कर्ज फेडताना आमचे डोके वर ठेवण्यासाठी आम्ही धडपडत राहिलो. मग एका रात्री, मला एक स्वप्न पडले ज्यामध्ये देवाने मला दाखवले की आमच्याकडे मोठी रक्कम येत आहे. त्यानंतरच्या आठवड्यात, आम्हाला काही लहान आर्थिक आशीर्वाद येत असल्याचे दिसले. देवाच्या निर्देशानुसार आम्ही प्रार्थना करत राहिलो आणि अधिक देत राहिलो आणि देवाचे सत्य घोषित केले आणि तो आम्हाला सांगत असलेल्या प्रत्येक गोष्टीचे पालन करत राहिलो. नंतर एक उलट परिस्थिती निर्माण झाली आणि असे काही होईल ह्याची आम्ही कल्पना देखील करत नव्हतो. त्यानंतर लवकरच स्वप्नाची पूर्तता व्हायला सुरवात झाली. आम्हाला मिळालेले पैसे आमच्या कर्जाची परतफेड करण्यासाठी आवश्यक असलेल्या रकमेपेक्षा खूपच जास्त होते. आता आम्ही कर्जमुक्त झालो आहोत. आम्ही आता हुशारीने गुंतवणूक कशी करावी आणि दुप्पट भाग प्राप्त करण्याचे जीवन कसे जगावे यासाठी योजना* शोधत आहोत जेणेकरून आम्ही नेहमी आणि उदारतेने, प्रत्येक प्रसंगी देऊ शकू.

—जॉन आणि अँनेट

देव आणि त्याच्या राज्याबद्दल सत्य शिकणाऱ्या आणि आपल्याला धार्मिक तत्वामुळे खोटे शिक्षण मिळाले आहे असे वाटणाऱ्या  लोकांकडून आम्हाला अशा प्रकारचे ईमेल

नेहमीच मिळतात.

मला कळले की एकदा माझे मन देवाच्या चांगुलपणाकडे आणि त्याच्या वचनाकडे वळले की, मुक्त होण्यासाठी आवश्यक असलेल्या प्रकटीकरणात मी वाढू शकती. लक्षात ठेवा, देवावर कधीही संशय घेऊ नका. कधीतरी जर तुमच्या जीवनात येणाऱ्या एखाद्या परिस्थिती मुळे तुम्हाला असे वाटले की जी देवाचे राज्य अपयशी ठरले आहे तर शिष्यांनी जे केले तेच करा. त्यांनी येशूला विचारले नाही, "येशू, तू त्या दुष्ट आत्म्याला का काढले नाहीस?" नाही, त्यांनी विचारले, "आम्ही तो दुष्ट आत्मा का काढू शकलो नाही?" त्यांना माहित होते जी काही चूक आहे ती त्यांच्याच बाजूने झालेली आहे, आणि त्यांनी येशूला ते समजून घेण्यास मदत करण्याची विनंती केली. जर तुम्हाला बायबल तुमच्या आयुष्यात काय म्हणते ते दिसत नसेल, तर ते का दिसत नाही हे देवाला तुम्हाला दाखवण्याची विनंती करा! तो तुमच्याशी बोलेल आणि त्याचे अद्भुत राज्य कसे कार्य करते हे शिकण्यास तुम्हाला मदत करेल.

**तो तुमच्याशी बोलेल आणि त्याचे अद्भुत राज्य कसे कार्य करते हे शिकण्वास तुम्हाला मदत करेल.**

कालच, माझ्या चर्चमधील एका व्यावसायिकाला त्याच्या बँकेकडून कळले की त्याला जे सरकारी अनुदान मिळणार होते ते नाकारण्यात आले आहे. ते पैसे मला मिळणार ह्या अपेक्षेने त्याने योजना आखल्या होत्या. ह्या अनुदानाची रक्कम मिळणार नाही हे समजल्या मुळे त्याला आपल्या कर्मचाऱ्यांना कामावरून काढून टाकावे लागेल. जेव्हा त्याने बँकेला पैसे का नाकारले गेले असे विचारले तेव्हा ते त्याचे कारण सांगू शकले नाहीत. त्याला वाटले की त्याच्याकडे भरपूर पैसे येणार आहेत, म्हणून त्याने त्याच्याकडे असलेले पैसे त्याला आवश्यक असलेल्या इतर वस्तू घेण्यासाठी खर्च करून टाकले. पण आता जेंव्हा समजले कि ते पैसे मिळणार नाहीत, तेंव्हा त्याला पैशाची कमतरता होऊ लागली आणि आता काय करावे हे त्याला कळत नव्हते. त्याच्या खिशात कुणीतरी त्याला दिलेले एक गिफ्ट कार्ड उरले होते. ते घेऊन तो ताबडतोब चर्च मध्ये गेला, कारण त्याला माहित होते की त्याच्या जवळ जे काही आहे ते त्याला पेरायचे आहे आणि या कठीण काळात देव मदत करेल यावर विश्वास ठेवावा लागेल. चर्चमध्ये गिफ्ट कार्ड बीज म्हणून टाकल्यानंतर काही तासांतच,

बँकेने त्याला फोन केला आणि म्हणाले की आम्हाला माफ करा, आमच्या कडून चूक झाली असावी. आम्ही तुमचे पैसे पाठवत आहोत.

## तुम्ही तुमची भूमिका पूर्ण करावी

मी शेवट करत असताना, तुम्हाला आवश्यक असलेले पैसे मिळवण्याबद्दल माझे शेवटचे शब्द तुम्हाला सांगतो. मला आढळले की देवाच्या अनेक लोकांकडे दान देण्याचे हृदय आहे, लोकांसाठी त्यांच्या हृदयात दया आहे, पण पैसे नाहीत. माझा असा विश्वास आहे की लोकांना त्यांची देणगीच परतफेड होतांना न दिसण्याचे मुख्य कारण म्हणजे ते दिल्यानंतर काय घडले पाहिजे याबद्दलची त्यांची चुकीची धारणा आहे. बरेच ख्रिस्ती लोकांचे असे चुकीचे मानणे आहे की त्यांनी ज्या पैशांबद्दल विश्वास ठेवला आहे केवळ तो पैसा देव त्यांना देणार आहे. परंतु ते शक्य नाही कारण देवाकडे पैसे नाहीत. सर्व पैसा पृथ्वीच्या क्षेत्रात आहे आणि तो केवळ व्यापाराचा (काहीतरी खरेदी किंवा विक्री) उत्पादनाच भाग आहे.

म्हणून एकदा आपण दान केले की, जर आपल्याला प्रक्रियेचा हा पैलू समजला, तर आपण पवित्र आत्म्याचे ऐकले पाहिजे जेणेकरून आपण बाजारात कशा प्रकारे संपत्ती निर्माण करू शकतो किंवा हस्तगत करू शकतो ह्याची योजना, दिशा किंवा कल्पना मिळेल. याचा अर्थ असा नाही की आपल्याकडे स्वतःचा व्यवसाय असावा, परंतु पवित्र आत्मा तुम्हाला बाजारात कुठेतरी जाळे लावण्यासाठी निर्देशित करेल. जाळे म्हणजे ज्या द्वारे बाजारात पैसे कमवण्याची किंवा निर्माण करण्याची क्षमता असते. देव तुमची पावले आणि तुम्ही ज्या योजनेचे अनुसरण करायचे आहे ते निर्देशित करेल. बहुतेक लोकांसाठी, माझा असा विश्वास आहे की बहुधा सर्वोत्तम, जलद जाळे म्हणजे व्यवसाय आहे. जेव्हा मी व्यवसाय म्हणतो, तेव्हा मी एखाद्या कॉर्पोरेशन मध्ये किंवा एखाद्या कंपनी मध्ये काम करणे ह्याचा देखील समावेश आहे, परंतु जाळे तुम्हाला आवश्यक असलेले मासे पकडण्यासाठी पुरेसे मोठे असले पाहिजे. ते तुमचे स्वतःचे किंवा इतर कोणाचाही व्यवसाय असू शकते.

पण जेव्हा जाळ्यांचा विचार येतो तेव्हा, माझ्या अनुभवानुसार, बहुतेक लोक बाथटबमध्ये व्हेल मासा पकडण्याचा प्रयत्न करतात. मी हे तुम्हाला समजावून सांगतो. समजा एखादा व्यक्ती किराणा दुकानात काम करतो आणि तो तासाला $10 कमावतो. पण आता तो त्याला त्याच्या घराचे $150,000 चे कर्ज फेडायचे आहे आणि ते साध्य

करण्यासाठी राज्याच्या कायद्याचा उपयोग करण्याची त्याची इच्छा आहे. ठीक आहे, इथ पर्यंत ठीक आहे.

पुढे, त्याला पेरणी आणि कापणी, हा राज्याचा एक नियम आहे हे समजते आणि तो पेरणी करतो आणि विश्वास ठेवतो कि त्याच्या घराचे कर्ज फेडून होणार आहे. आणि, इथपर्यंत देखील ठीक आहे. पण काही कारणास्तव, त्याला वाटते की पैसे कुठून तरी त्याच्या हातात येणार आहे. त्याला माहित आहे की तो जे काम करतो त्या कामाच्या उत्पन्नातून घराचे पैसे फेडणे शक्य नाही, म्हणून तो प्रभूवर आशा ठेवतात (आणि ते चांगले आहे). पण जेव्हा मी म्हणतो की "प्रभूवर आशा ठेवा," तेव्हा तुम्हाला मी जे म्हणत आहे ते समजून घेणे आवश्यक आहे की आपण प्रभूवर आशा ठेवत आहोत जेणेकरून ते पैसे मिळवण्यासाठी आपल्याला ज्ञान आणि दिशा मिळेल. आणि याचा अर्थ असा होऊ शकतो की त्यामध्ये मोठे बदल समाविष्ट आहेत.

बघा, लोकांना हे कळत नाही की देवाला व्हेल मासे पकडण्यासाठी त्यांना नवीन तलावा कडे निर्देशित करावे लागेल, त्यांच्या परिचित बाथटब मध्ये ते शक्य होणार नाही. लक्षात घ्या, तुमच्या बाथटबमध्ये एकही व्हेल मासा नाही! 10 डॉलर प्रति तास काम करत राहिले तर काही वर्षांनी 50,000 डॉलर्सचे घराचे कर्ज देणे कठीण होईल. पण देवाला मासे कुठे आहेत हे माहित आहे आणि तो तुम्हाला तुमचे ध्येय गाठण्यासाठी आवश्यक असलेले मासे पकडण्यासाठी योग्य ठिकाण आणि पद्धत दाखवू शकतो. पेत्राची आणि मोठ्या प्रमाणात मासे पकडण्याची गोष्ट आठवते का? पेत्राने रात्रभर मासेमारी केली आणि काहीही पकडले नाही, पण येशूने त्याला मासे कुठे पकडायचे हे सांगितले; आणि नंतर, पेत्राच्या बोटीत सर्व मासे सामावू शकले नाहीत. इथे फरक काय आहे? मार्गदर्शनाचा एक शब्द, "खोल पाण्यात तुमची जाळी टाका." तुम्ही पहा, पेत्र चुकीच्या ठिकाणी मासेमारी करत होता, पण येशूने त्याला काय करायचे ते सांगितले आणि त्याची परिस्थिती बदलली.

जेव्हा ड्रेंडा आणि मी खूप कर्जात होतो, तेव्हा आम्हाला देवाचे ऐकायला शिकावे लागले आणि मोठ्या आणि मोठ्या तलावां कडे जाण्या साठी त्याचे अनुसरण करावे लागले जेणेकरून आम्हाला आवश्यक असलेले मासे पकडता येतील. देवाचे मार्गदर्शन आम्हाला खोल आणि खोल पाण्यात घेऊन जात राहिले. अगदी स्पष्टपणे सांगायचे तर, देवाने आम्हाला इतके दूर नेले की आम्हाला जमीन दिसत नव्हती, जे खूप भयानक ठिकाण

होते कारण आम्ही यापूर्वी कधीही तिथे गेलो नव्हतो आणि विशेषतः वादळ आल्यावर भीतीदायक वाटायचे.

बहुतेक लोक देवाकडून आपोआप पैसे येण्याची वाट पाहत असतात, त्यामुळे त्यांना असे कधीच वाटत नाही की देव त्यांना कधीही माहित नसलेल्या गोष्टी करायला सांगेल

आणि त्यांना अशा नवीन आणि भयानक ठिकाणी घेऊन जाईल जिथे ते पूर्वी कधीही गेले नाहीत. बहुतेक लोक त्यांना माहित असेलेल्या परिचित गोष्टींकडेच फक्त लक्ष देतात. पण व्हेल तुमच्या बाथटबमध्ये नाहीत. तुम्हाला खोल पाण्यात जावे लागेल.

म्हणून लक्षात ठेवा, एकदा पेरणी केल्यानंतर आपण शांत बसू नये. जेव्हा आपण पेरणी करतो तेव्हा आपण देवाच्या वचनाला धरून राहू राहावे आणि देव आपल्याला कापणीकडे घेऊन जाईल हे लक्षात ठेवावे. परंतु आपण त्याचे मार्गदर्शन लक्ष देऊन ऐकले पाहिजे, त्याचे अनुसरण केले पाहिजे आणि नंतर जेव्हा आपण तिथे पोहोचतो तेव्हा व्हेल पकडण्यासाठी आपल्या कडे जाळे असते.

बरेच लोक प्रत्यक्षात तलाव बदलण्यासाठी पावले उचलतात पण त्यांची कापणी पकडण्यासाठी वापरल्या जाणाऱ्या पद्धती बदलण्यात अपयशी ठरतात. ब्लूगिल हुक व्हेलला धरू शकत नाही. (तसे, मी असे म्हणत नाही की आपण प्रत्यक्षात व्हेल पकडले पाहिजेत. मी हे फक्त त्यांच्या आकारामुळे उदाहरण म्हणून वापरत आहे.)

एकदा तुम्ही योग्य ठिकाणी आलात की, तुमच्या पद्धती आणि यंत्रणा मोठ्या पिकाला पकडण्यासाठी लागणारे जास्त वजन आणि दबाव सहन करण्यास सक्षम असायला हवेत. हे सर्व अंमलात आणण्यासाठी वेळ लागतो. बऱ्याचदा, देवाला माहित आहे की आपण ज्या व्हेलची शिकार करत आहोत ती एकदा आपल्या डोळ्यांसमोर आली की ती हाताळण्यास आपण सक्षम नाही. पण देव आपल्याला प्रशिक्षण देईल आणि आपण खात्री बाळगू शकतो की आपण हार मानली नाही तर आपण ते मासे किनाऱ्यावर आणू.

**आपल्याला देवासोबत काम करावे लागेल, कापणीची तयारी करावी लागेल आणि देवाने आपल्यासमोर ठेवलेल्या प्रत्येक संधीचा फायदा घेण्यासाठी आपले काम करावे लागेल.**

म्हणून पुनरावलोकनात, आपण चमत्कारिक रित्या पैसे येतील किंवा मी ज्याला मेलबॉक्स मानसिकता म्हणतात त्या प्रकारे विचार करणे थांबवले पाहिजे (जरी अनेक वेळेस देव काही आश्चर्यकारक गोष्टी देखील करतो). त्याऐवजी, आपल्याला देवासोबत काम करण्याची, कापणीची तयारी करण्याची आणि देवाने आपल्यासमोर ठेवलेल्या प्रत्येक संधीचा फायदा घेण्यासाठी आपला भाग आपले कर्तव्य पूर्ण करण्याची आवश्यकता आहे.

तुमच्या हातात तरतूदीचे सामर्थ्य सोपवण्यात आले आहे. नाही, मी माझ्या पुस्तकाच्या शीर्षकाबद्दल बोलत नाहीये. मी पवित्र आत्म्याबद्दल आणि देवाने तुम्हाला ज्या राज्यामध्ये ठेवले आहे त्याबद्दल बोलत आहे. म्हणून त्यासाठी प्रयत्न करा आणि तुमच्या यशाच्या उदाहरणाने अनेकांना ख्रिस्ता साठी जिंका.

आणि हो, मी नुकताच हा ईमेल पाहिला, आणि आपण समापन करत असतांना ही एक चांगली आठवण आपल्या साठी राहील असे मला वाटले.

> *जागतिक अर्थव्यवस्था कोसळत असताना, आमच्या व्यवसायावर $4000 चे कर्ज होते आणि $8,000 चे कर्ज माफ झाले! तरीही अजून बरेच कर्ज बाकी आहे!! आम्ही आमच्या व्यवसायाच्या वित्तव्यवस्थेकडे पाहत होतो आणि आम्हाला जाणवले की, आजपर्यंत, 2020 साठी आमचे व्यवसायाचे निव्वळ उत्पन्न 2019 च्या आमच्या संपूर्ण व्यवसायाच्या निव्वळ उत्पन्नापेक्षा जास्त आहे! संपूर्ण जगात लोक अर्थव्यवस्थे बाबतीत त्रागा करत असतांना, आमच्या कडे आम्ही कल्पना करू शकतो जास्त आहे आणि आंम्ही समृद्ध आहोत (इफिसकरांस पत्र 3:20)! देव जे करत आहे त्याबद्दल आम्ही खूप उत्साहित आहोत. तो त्याच्या वचनाशी खूप विश्वासू आहे!!*
>
> *गॅरी आणि ड्रेंडा, तुमचे कुटुंब, तुमचे कर्मचारी आणि सेवेतील तुमचे इतर भागीदार, तुम्ही देवाचे वचन आमच्या आयुष्यात आणल्याबद्दल धन्यवाद, धन्यवाद, धन्यवाद! आम्ही 17 वर्षे अतिशय गरिबीत जगलो—जसे गॅरी आणि ड्रेंडा 9 वर्षे गरिबीत जगले—त्यानंतर आमच्या पास्टर ने बुधवारी रात्री चर्चमध्ये फिक्सिंग द मनी थिंग मालिका दाखवायला सुरुवात केली. ही 5.5 वर्षांपूर्वीची गोष्ट आहे, आणि आम्ही कधीही पूर्वीसारखे राहिलो नाही!! पुन्हा एकदा धन्यवाद, आणि देव तुम्हाला*

*आशीर्वादित देवो!*

GaryKeesee.com वर तुमचे अनुभव मला सांगा. तुमच्या आयुष्यात देवाचे राज्य किती अद्भुत काम करत आहे हे इतरांनी देखील ऐकले पाहिजे.

# गैरी किसी द्वारा अन्य पुस्तके

पावर ऑफ़ एलि जेंस (अधीनते सामर्थ)

पावर ऑफ़ रेस्ट (विश्रांतीचे की सामर्थ)

पावर ऑफ़ जेनरॉसिटी (उदारतेचे सामर्थ्य)

पावर ऑफ़ स्ट्रेटेजी (कार्यनितीचे सामर्थ्य)

पावर ऑफ़ प्रोविजन (तरतुदीचे सामर्थ्य)

तुमच्या भाषेत अधिक मोफत शिक्षण सामग्री डाउनलोड करण्यासाठी
**FLNFree.com** ला भेट द्या!

तुमच्या भाषेत अधिक विनामूल्य शिक्षण संसाधने हवी आहेत?
**FLNFree.com** ला भेट द्या

# तुमची वित्तीय क्रांति
## तरतुदीचे सामर्थ्य

जगण्यासाठी धडपड करत आहात...
किंवा तुम्ही मोठे स्वप्न पाहू शकता का?

कर्जाचे गुलाम आहात...
की देवाने ठरवलेल्या तुमच्या उद्देशाचा पाठलाग करत आहात?

यापैकी कोणाशी तुमचे सर्वात जास्त साम्य आहे?

तुमच्या आयुष्यात कशाने फरक पडणार आहे?

*तरतूद*

जीवनात आवश्यक असलेल्या गोष्टींसाठी पुरेशी तरतूद असणे महत्त्वाचे आहे यावर आपण सर्वजण सहमत आहोत.

पण तुम्हाला खरोखरच तरतूदीचे सामर्थ्य काय आहे ते माहित आहे का?

गॅरी कीसी ते सोपे करून सांगत आहेत.

"तुमची आर्थिक क्रांती" मालिकेच्या या चौथ्या भागात, गॅरी तुमच्या स्वतःच्या आणि इतरांच्या यशातील सर्वात महत्वाच्या घटकांपैकी एक आणि देवाच्या राज्याचे आणखी एक महत्त्वाचे रहस्य प्रकट करतात: तरतूदीचे सामर्थ्य!

शिका:

• तुमच्या गरजा पूर्ण करण्यासाठी तुम्ही घेऊ शकता अशी पाच मूलभूत पावले.
• विश्वासाचे महत्त्व आणि तुम्ही विश्वासा नाही हे कसे ओळखावे.
• कामात दिरंगाई कशी घातक ठरू शकते.
• जर तुम्हाला लॉटरी जिंकण्यावर विश्वास असेल (हो, तो खरोखरच आहे).
• आणि बरेच काही!

ह्या डोळे उघडणाऱ्या प्रवासात गॅरीसोबत सामील व्हा आणि तुमच्या जीवनात तरतूदीचे सामर्थ्य कसे वापरायचे ते शिका!



गॅरी कीसी हे एक लेखक, वक्ते, उद्योजक, आर्थिक तज्ञ आणि पाळक आहेत ज्यांना जीवनात, विशेषतः विश्वास, कुटुंब आणि आर्थिक क्षेत्रात, लोकांना जिंकण्यास मदत करण्याची आवड आहे. गॅरी आणि त्यांची पत्नी ड्रेंडा यांनी अनेक यशस्वी व्यवसाय उभारले आहेत आणि ते फेथ लाईफ नाऊचे संस्थापक आहेत, जे दोन टेलिव्हिजन कार्यक्रम - फिक्सिंग द मनी थिंग आणि ड्रेंडा, जगभरातील परिषदा आणि व्यावहारिक संसाधने तयार करते. कीसी हे कोलंबस, ओहायो जवळील फेथ लाइफ चर्चचे पाळक देखील आहेत.

GKM GARY KEESEE MINISTRIES
garykeesee.com